त्रिवेणी

लेखक :

कालिदास मोहोळकर

उस्ताद अमीर खाँ



पं. कुमार गंधर्व

वसंतराव गोडसे

❖ कालिंदी प्रकाशन ❖

त्रिवेणी

कै. वसंतराव गोडसे, उस्ताद अमीरखाँ आणि कुमार गंधर्व.

लेखक

कालिदास मोहोळकर

१९९९

कालिंदी प्रकाशन, पुणे

मूल्य रु. १२५/-

प्रकाशिका
सौ. कालिंदी उजळंबकर
कालिंदी प्रकाशन
११, प्रमोदबन, २४२ ब, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

सर्वाधिकार
श्री. कालिदास मोहोळकर
दुर्गा अपार्टमेंट, सुधाकरनगर
जवाहरनगर रोड,
कोल्हापूर ४१६ ०१२
यांचे स्वाधीन

प्रकाशन दिन
४ डिसेंबर १९९९

अक्षर जुळणी
सारांश ॲडस्
१३५८, गद्रे चेंबर्स, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

मुद्रक
आत्माराम भिकू भुरके
पॅड प्रिंटर्स
शॉप नं. २९, पर्वती टॉवर्स
पुणे ४११ ००९

मूल्य रु. १२५/-

हैद्राबादमधील उस्मानिया विद्यापीठातील
निवृत्त, राज्यशास्त्र विभागप्रमुख आणि
प्रोफेसर डॉ. न. गो. राजूरकर
महाराष्ट्रातील थोर विचारवंत आणि साक्षेपी संशोधक
डॉ. य. दि. फडके
यांना सादर अर्पण

अनुक्रमणिका

१) अष्टपैलू कलावंत वसंतराव गोडसे	१-७६
२) उस्तादांचे उस्ताद अमीरखाँ	७७-१२४
३) कुमार गंधर्व	१२५-१९२

आलाप

सोलापूरचे श्रीराम पुजारी यांची व माझी मैत्री आहे गेल्या साठ वर्षांची. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये आम्ही एकत्र आलो. एकनिष्ट स्वयंसेवक आणि घनिष्ट मित्र बनलो. आम्ही दोघे बालमित्र आणि संघ मित्र.

राम एकेकाळी कविवर्य गिरीश, शं. के. कानेटकर यांच्या घरीच राहत होता. तेथे त्याच्यावर उत्तम संस्कार होत गेले. काव्य, नाट्य, भाषणे यांत रामला रस वाटू लागला. रसिकतेला सौंदर्यास्वादाची जोड मिळाली. काव्यात्मकता, गुणग्राहकता आणि संवेदन क्षमता वाढतच गेल्या. कविवर्यांनी त्याला प्रेरणा आणि प्रोत्साहन दिले. त्याचा उत्साह उदंड वाढला. उमेद आणि उभारी शतपट झाल्या. नेतृत्व करण्याची पात्रता निर्माण झाली. एकलव्याची निष्ठा त्याने कमावली.

डॉ. द. रा. बेंद्रे, कर्नाटक साहित्यातील रवींद्रनाथ टागोर अशी ख्याती असलेल्या अण्णांच्या मार्गदर्शनाने त्याला वाचन, चिंतन, मनन करण्याची सवय लागली. संगीताची आवड मुळातच असल्यामुळे त्याला अण्णांनी काव्याची, नाट्याची, संगीताची एक वेगळी दृष्टी दिली.

भागवत चित्रमंदिराच्या समोरील माणिकचंद चाळीमध्ये राहणारे फडके बंधू, कृष्णा गोरटे, वसंत जोग आणि इतर मित्रांनी एकत्र येऊन रामच्या पुढारीपणामुळे शारदोपासक मंडळ स्थापन करण्यात आले. सारंगमामा, बाबा राजपूत, प्रभाकर पोतदार, टी. एच्. कुलकर्णी इत्यादी अनेक मित्र त्यांना सहकार्य देऊ लागले. शारदोपासक मंडळाने अनेक सांस्कृतिक कार्यांना आरंभ केला. अत्रे-काणेकर-क्षीरसागर यांची भाषणे संयोजित केली. नाटके बसविण्यास सुरूवात केली. मलाही त्यांच्या कार्यामध्ये गोडी वाटू लागली. शारदोपासक मंडळात मी सामील झालो.

उद्याचा संसार, घराबाहेर, भटाला दिली ओसरी अशी नाटके मंडळाने बसविली, वसंत घाटे होता नाटकातील हीरो. बाबा रजपूत नायिकेची भूमिका अतिशय देखणी करीत असे. आपणही नाटकात काम करावे, असे मला वाटू लागले. पण मला कोण संधी देणार ? वसंत घाटे, बाबा रजपूत, कृष्णा गोरटे, टी. एच्. कुलकर्णी, सारंगमामा ही मंडळी उत्तम तयार झाली होती. एका नाटकात रामने काम करून सर्वांना तोंडात बोट घालायला लावले.

लहानपणापासून राम सर्व घरंदाज घराण्यांतील गायक-वादक यांच्या मैफली ऐकत होता. संगीत शास्त्राची त्याची जाण वाढतच गेली. तो मर्मज्ञ रसिक मानला जाऊ लागला. ख्यालगायन, ठुमरी, टप्पा, तराणा यांविषयीचे त्याचे सखोल व सूक्ष्म ज्ञान लक्षणीय होते.

रामने सोलापूरमध्ये 'एकलव्य' या नावांची एकट्याचीच संस्था काढली. या संस्थेच्या वतीने त्याने गायन-वादन-नर्तनाचे कितीतरी लहान मोठे कार्यक्रम केले. या कार्यक्रमांना

नी उपस्थित असे. मलाही गायन वादन-नर्तनाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची आवड उत्पन्न झाली.

प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. त्यासाठी राम पुजारी हैदराबादला आला होता आणि आमच्याच घरी उतरला होता. रामने माझा परिचय करून दिल्यामुळेच महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व-पु. ल. देशपांडे उर्फ भाई आमच्या घरी आले आणि त्यांनी दोन तीन तास काव्यशास्त्र विनोदाची रसीली मैफल जमविली आमच्या घरी. आमच्या घरी झालेली ती पहिली गप्पांची बैठक. आम्हा सर्वांच्या आनंदाला पारावारच उरला नव्हाता.

कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, टीकाकार, समीक्षक, कथाकथनकार, काव्यगायक, चरित्रकार, आत्मचरित्रकार यांच्या सहवासात राहावे, त्यांचे विचार ऐकावेत, त्यांच्याशी सहज संवाद साधावा ही माझी आंतरिक इच्छा होती. राम पुजारी मुळेच माझी ही इच्छा पूर्ण होऊ लागली. गायक-वादक-नर्तक-चित्रकार-शिल्पकार यांच्याबद्दलही मला आकर्षण वाटत होते.

राम पुजारी मुळेच मला पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व, उस्ताद अमीरखाँ, पं. जसराज, पं. वसंतराव देशपांडे यांचा सहवास मिळत गेला. हैदराबादच्या महाराष्ट्र मंडळाच्या वतीने आम्ही पं. भीमसेन जोशी, पं. जसराज, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. वसंतराव देशपांडे, पं. कुमार गंधर्व यांच्या गायनाच्या मैफली आयोजित केल्या. रामच्या सांगण्यामुळेच उस्ताद अमीरखाँ यांची हैदराबादमधील पहिलीच मैफल मी आयोजित करू शकलो. ही सर्व गायक मंडळी माझ्या घरी रामच्या आग्रहामुळेच येऊन गेली.

आप्पासाहेब देशपांडे-कवि अनिल-आ. रा. देशपांडे आणि कविवर्य बा. भ. बोरकर उर्फ बाकीबाब यांच्या सहवासात राहू शकलो. त्यांच्या निवडक-वेचक आणि खास जाणकारासाठीच असलेल्या कविता त्यांनी ऐकवल्या होत्या. सर्वसामान्यांसाठी नसलेल्या या कविता जवळ बसून ऐकल्या. राम पुजारीने या दोन्ही कविवर्यांना माझी भेट घेण्यासाठी सांगितले होते. हे दोघेही कविराज सोलापूराहून हैदराबादला आले होते. रामच्या घरी राहूनच ते हैदराबादला आले असल्याने माझे नांव त्यांनी ऐकले होते.

पं. जसराज, मधुरा जसराज, कंकणा बॅनर्जी इत्यादि मंडळी रामच्या सांगण्यावरून माझ्या घरी आली होती. तीन दिवसांचा पं. मोतीराम संगीत समारोह हैदराबादेत साजरा करण्यात मी त्यांना मनापासून सहकार्य दिले होते.

'स्वामीकार' रणजित देसाई यांचा व माझा परिचय रामच्या घरीच झाला होता. रणजित देसाई आमच्या घरी नाश्ता करूनच हैदराबादहून बेळगावला आपल्या मित्रांच्यासह मोटारीने गेले होते.

आमच्या एकुलत्या एका मुलाच्या विवाहाच्या वेळी, पुण्यातील आनंद मंगल कार्यालयात राम पुजारीने 'मृत्युंजय' कार शिवाजी सावंत यांचा व माझा परिचय करून

दिल्याचे चांगले आठवते.

नाटककार प्रा. वसंत कानेटकर आणि विजय तेंडुलकर यांनी आमच्या घरी जेवायला येऊन मला आणि माझ्या कुटुंबियांना अविस्मरणीय आनंद दिला होता. रामच्या सांगण्यामुळेच हे दोघे माझ्या घरी आले होते.

प्रा. वसंत कानेटकरांचे नाट्यवाचन हैदराबादमध्ये झाल्याचे डॉ. जब्बार पटेल यांनी वाचले होते महाराष्ट्र टाईम्समध्ये. त्यांनीच मला सुचविले होते की विजय तेंडुलकरांचे नाट्यवाचन ऐकणे हा एक अनुभवच असतो. विजय तेंडुलकर यांनी माझ्या हॉलमध्ये 'गिधाडे' या नाटकाचे वाचन केले होते. माझी सर्व मित्रमंडळी नाट्यवाचन ऐकण्यास आवर्जून आली होती. सर्व श्रोत्यांना हा एक थरारक अनुभव वाटला होता.

राम पुजारीच्या विनंती करण्यामुळेच उस्ताद अमीरखाँ माझ्या घरी येण्यास तयार झाले. विशेष म्हणजे त्यांनी माझ्या पत्नीने केलेला उपमा परत एकदा मागून घेतला होता. आम्हां मित्रांच्या बरोबर उभे राहून अमीर खाँ यांनी फोटो काढून घेण्यास होकार दिला होता.

मे १९७८ मध्ये पुण्यातील 'राजस' मासिकाचा हैदराबाद विशेषांक प्रा. प्र. ना. परांजपे यांनी सहसंपादित केला होता. त्या अंकासाठी प्र. ना. यांनी कै. वसंत गोडसे यांच्या विषयी एक लेख माझ्याकडून लिहून घेतला होता. राजस मासिकाचा तो अंक आणि त्यातील माझा लेख केवळ योगायोगाने मला पुण्यात मार्च १९९९ मध्ये मिळाले. कै. वसंत गोडसे यांच्या विषयी आपण सविस्तर लिहावे हा विचार मनात होताच.

हैदराबादेतील डॉ. श्री. रं. कुलकर्णी, डॉ. न. गो. राजूरकर, डॉ. दादेगांवकर, डॉ. अरविंद कोरटकर, सुरेश गंगाखेडकर, कुर्डूकर, माईणकर या सर्वांना माझा तो लेख खूप आवडला. कै. वसंत गोडसे यांच्या आठवणी लिहून काढण्याचा माझा विचार पक्का झाला.

श्री. दिनकर बिंदू यांच्या घरी जाऊन मी कै. वसंत गोडसे यांची त्यांना आलेली पत्रे वाचली. बिंदू यांनी कार्यक्रमाची पत्रके आणि तीनचार लेख मला दिले. त्यानंतर पत्रे पाठवून मला कै. वसंतरावांच्या कल्पक आणि लक्षणीय कार्यक्रमांची सविस्तर माहिती पुरवली. त्यांनी दिलेल्या माहितीचा भरपूर उपयोग झाला. दिनकर बिंदू यांचे हार्दिक आभार.

-कालिदास मोहोळकर

दुर्गा अपार्टमेंट, सुधाकरनगर
जवाहरनगर रोड,
कोल्हापूर ४१६ ०१२

❑ ❑ ❑

त्रिवेणी संगमावर

तीन ख्यातनाम कलावंतांच्या अंतरंगाचा वेध घेणारा हा संग्रह. रूळलेल्या वाटेवरून न जाता लेखकाने या व्यक्ती आपल्याला कशा भावल्या याचे कथन केले आहे. साहित्य-समीक्षा वगळता निराळ्या क्षेत्रातील कलावंतांच्या कलेचे मूल्यमापन करणारे मराठी साहित्य प्रमाणतः कमीच प्रसिद्ध होते. जे साहित्य उपलब्ध आहे त्यात कलावंतांच्या कलाविष्काराचे मूल्यमापन प्राधान्याने होत असते. त्याच्या समग्र चित्रण अशा लेखनातून सामान्यपणे दुर्लक्ष केले जाते. अशा लेखनातून कलावंताचे अंतरंग, त्याची जडण-घडण व त्याचा झालेला परिणाम यांची चर्चा अपवादात्मकच येते.

या संग्रहात कवी, चित्रकार, नट, नाटककार असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले कै. वसंतराव गोडसे, ख्यातनाम गायक अमीरखाँ आणि गानयोगी कुमार गंधर्व यांची संस्मरणे शब्दांकित करताना श्री. कालिदासराव मोहोळकर या कलावंतांचे मूल्यमापन करण्याच्या खटाटोपात पडले नाहीत. या व्यक्तींचा केवळ गुणगौरव करावा अशीही भूमिका त्यांनी घेतली नाही. या कलावंतातील माणूस शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. योगायोगाने या तिघांच्याही सहवासात त्यांना दीर्घकाळ वावरता आल्याने या लेखनाला एक वेगळेपण आलेले आहे. लेखनात सहजताही त्यामुळेच आली आहे. 'मी जे अनुभवले तेंच मला कथीत करावयाचे आहे' या भूमिकेतून ही तीन व्यक्तिमत्वे श्री. मोहोळकर यांनी चित्रित केली आहेत. एका परीने तो स्वतःशीच साधलेला संवाद आहे आणि निकट सहवासात आलेल्या कलावंताचे संस्मरणही.

विवेकवर्धिनी शिक्षणसंस्थेतील विद्यार्थिप्रिय शिक्षक एवढ्यापुरताच त्यांचा माझा प्राथमिक परिचय. एका शहरात दीर्घकाळ वास्तव्य असूनही आम्हाला अधिक जवळ येता आले नाही. परंतु, लक्षात ठेवावा आणि दुरून निरीक्षित राहावा असा हा माणूस आहे हे काही काळानंतर माझ्या लक्षात आले. त्या दृष्टीने सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील त्यांच्या हालचाली मी लक्ष देऊन पाहू लागलो.

हैद्राबाद शहरात मराठी माणसांची संख्या बरीच मोठी असली तरी सांस्कृतिक क्षेत्रात वावरणाऱ्या व्यक्तींचे वर्तुळ मर्यादित असल्याने अनेकांचा परिचय होतो. तोंडओळख कित्येकांची होते. तर ओळख आणि परिचय असूनही काही माणसे अंतरावरच राहतात. त्यांच्यावर लक्ष मात्र असते. श्री. मोहोळाकर माझ्या दृष्टीने या शेवटच्या वर्गात येतात.

कालिदासराव मोहोळकर माझ्या लक्षात राहिले ते गायनाच्या महफिलीतीतून. कलावंतांमध्ये वावरताना पं. जसराज यांचा हैद्राबादी झालेला कार्यक्रम, रवींद्र भारतीत पं. जसराज आणि त्यांचे वडीलबंधू प्रतापनारायण यांची झालेली जुगलबंदी, कुमारगंधर्वांचा कार्यक्रम, भीमसेन जोशी यांची महफिल या सर्व ठिकाणी कलावंतांशी गप्पागोष्टीत रमलेले मोहोळकर माझ्या चांगले लक्षात आहेत. नाटके, स्थानिक कलावंतांनी सादर केलेली

असोत अथवा बाहेरून आलेल्या व्यावसायिक नाटक मंडळींची मोहोळकरांची रंगपटात ये-जा असे. या जगमित्र माणसाचे कौतुक वाटायचे. श्री. मोहोळकर गायक वा नट असल्याचे ऐकिवात नव्हते. तरीही ते या मंडळीत वावरत असताना स्वतःला विसरून जात. हा माणूस संगीत आणि नाटक उभे राहिले की, अंगात काही तरी संचार आल्यासारखं का वागतो हे एक कोडेच होते. या संग्रहातील लेख वाचल्यावर मात्र ते कोडे उलगडले. पण, त्यासाठी कित्येक वर्षे जावी लागली.

मध्यंतरी डॉ. शौचे यांनी एक छोटेसे मंडळ आपल्याच घरी सुरू केले होते. पाश्चिमात्य शास्त्रीय संगीताशी मराठी माणसाचा परिचय व्हावा एवढाच या मंडळाचा हेतू होता. बहुतेक बैठकीत एक विख्यात विज्ञानशास्त्री डॉ. अच्चय्या काही ध्वनिमुद्रकांच्या आधारे या संगीतातील बारकावे सांगत असे. श्री. मोहोळकर या बैठकीस नियमितपणे उपस्थित असत. विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेने पाश्चात्य संगीतातील बारकावे अधिकांश असत. प्रसंगी कागदावर टिपीत असत. व्यवसायाशी संबंधित नसलेल्या विषयी त्यांची जिज्ञासा आणि नवीन ज्ञान संपादन करण्याची तळमळ कोणाच्याही लक्षात भरत असे.

मध्यंतरी काही दिवस श्री. मोहोळकर सार्वजनिक सभातून दिसू लागले ते गळ्याला मफलर लावलेले. गवई आपल्या गळ्याला जपतो हे समजू शकते. परंतु, गायक म्हणून कोणालाही ज्ञात नसलेले मोहोळकर आपल्या गळ्याला एवढे का जपतात हे एक कोडेसे होते. सभोवताली चौकशी केली तेव्हा समजले की 'वेड्याचं घर उन्हात' या नाटकाच्या तालमी कै. वसंतराव गोडसे घेत असून या नाटकातील 'दादांची' महत्त्वाची भूमिका श्री. मोहोळकर करीत आहेत. नाट्यप्रयोगाच्या वेळी आवाज सलामत रहावा यासाठी मोहोळकर आपल्या गळ्याची काळजी घेत आहेत. मला तर तो विक्षिप्तपणा वाटला-

पण, तो समज टिकला नाट्यप्रयोग पाहीपर्यंत ! त्यांनी जपलेले गळ्याचे सामर्थ्य या नाटकात प्रत्यास आले. त्यांच्या अभिनयापेक्षाही त्यांच्या संवादातील आणि स्वगतातील शब्दांची फेक आणि संवादातील आरोह-अवरोह एवढे प्रभावी होते की, त्यांचा मनाशी बांधलेला विक्षिप्तपणा पार विरघळून गेला. मोहोळकर चांगले नट आहेत हे तोवर आम्हाला माहितही नव्हते. त्यामुळे त्यांची भूमिका पाहिल्यावर त्यांच्या जवळच्या मित्रांना देखील आश्चर्याचा धक्का बसला.

या नाटकाचे अगोदर टिपलेल्या मोहोळकरांच्या काही विशेषांचाही उलगडा झाला. त्या निमित्ताने केशवसुतांच्या या कवितेचे स्मरण झाले. त्रिभुवन धुंडूनही 'हरपले श्रेय' केशवसुतांना गवसले नाही. आयुष्यभर शिक्षकाचा व्यवसाय करीत असलेल्या या माणसाला मात्र कलावंतांच्या सहवासात 'हरपले श्रेय' जवळपास असल्याचा प्रत्यय आला असावा.

श्री. मोहोळकरांनी स्वतःच्या बळावर अनेक प्रतिकूल घटकांशी दोन हात करीत हैद्राबादेत अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले. खानसाहेब अमीरखाँ यांचा कार्यक्रम हैद्राबादी ठेवल्यानंतर ज्या आपत्तींना त्यांना तोंड द्यावे लागले याचे वर्णन त्यांनीच केले आहे. या

परिश्रमांचा व खटाटोपांचा त्यांना पश्चात्ताप झाला नाही. कारण या धडपडीतच ते 'श्रेयाचा' अनुभव घेत होते. ही बिकट वाट शारीरिक कष्टाची असली तरी अशा परिश्रमाने ते उत्फुल्ल होत. त्यांच्या या शोधामुळेच नामवंत कलावंतांचा जिव्हाळा त्यांना संपादन करता आला.

हॅम्लेट या नाटकात "Method in Madness' असा शब्दप्रयोग एका संवादात येतो. श्रेयाच्या शोधात असलेल्या मोहोळकरांच्या अंगी देखील एक विशिष्ट शिस्त दिसते. कलावंतांच्या सहवासात वावरताना त्यांना आत्मगौरवावर संतुष्ट होता आले असते. परंतु, मोहोळकर सहवासात आलेल्या कलावंतातला 'माणूस' सारखे शोधीत होते. अमीरखान आणि कुमार गंधर्व यांच्या कलेपेक्षा या कलावंतातील 'माणसाचे' त्यांनी घडविलेले दर्शन अधिक हृद्य वाटते. कै. गोडसे यांच्यासंबंधी त्यांनी लिहिले नसते, तर हा अष्टपैलू कलावंत अंधारातच राहिला असता.

प्रतिभावान आणि मनस्वी कलावंत तसा आत्मकेंद्रित आणि एका परीने स्वार्थी असतो. मित्र कितीही जिव्हाळ्याचा असला तरी तो आपल्या मनाच्या अंतःपुरात त्याचा प्रवेश होऊ देत नाही. अशा प्रतिभावंतांचा जिव्हाळा संपादन करणे, त्यांच्या अंतराचा वेध घेणे ही एक तपस्याच असते. आपल्या श्रेयाच्या शोधात मोहोळकरांनी या बाबतीत बरीच साधना केलेली दिसते. त्यामुळेच या प्रतिभावंतांच्या अंतरात त्यांना प्रवेश करता आला. श्री. मोहोळकर यांनी मात्र आपल्या तपस्येचे फळ केवळ स्वतःपुरते मर्यादित ठेवले नाही. 'त्रिवेणी' च्या रूपात त्यांनी ते वाचकांना उपलब्ध करून दिले आहे. श्री. मोहोळकर यांचे या कार्याबद्दल मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

श्री. मोहोळकर यांच्या हातून वाढती साहित्यसेवा घडो ही शुभेच्छा !

-श्रीधर रंगनाथ कुलकर्णी

२-१-५१२/४, नीलाकुंटा,
हैद्राबाद ५०० ०४४
ऑक्टोबर २६, १९९९

❑ ❑ ❑

अष्टपैलू कलावंत कै. वसंत गोडसे

अष्टपैलू कलावंत वसंत गोडसे

जन्मस्थान : बीड

जन्म साल १९२५

मृत्यू दिन २४ जून १९७७ मुंबई - १.

वसंत पुरूषोत्तम गोडसे यांच्यामध्ये Genius ची सर्व बीजे होती. अभिनय नैपुण्य, कसबी आणि कल्पक दिग्दर्शक, चिकित्सक नेपथ्यकार, उत्तम संगीत दिग्दर्शक, Music producer आणि Composer सुरेल भावगीत गायक आणि हार्मोनियमवादक-अशा इंद्रधनुष्याप्रमाणे सप्त गुणांनी परिपूर्ण असणारे वसंतराव. बहुरंगी, बहुढंगी, बहुगुणी कलावंत. विविध रंगांचा नयनमनोहर आविष्कार करणारे झुंबर ! कलानिकेतनसारख्या सांस्कृतिक कार्य करणाऱ्या अग्रगण्य संस्थेचे एक आधारस्तंभ. सभ्य, सुशील, समंजस, सहिष्णु आणि सुसंस्कृत माणूस. मर्मज्ञ रसिक, चिकित्सक दृष्टीचा आणि चोखंदळ वृत्तीचा कलंदर कलावंत. पहिल्या श्रेणीचा चित्रकार आणि प्रतिभावंत. काहीतरी नवीन, नाविण्यपूर्ण, भव्य कार्यक्रम करण्याची स्वप्ने पाहणारा आणि ती स्वप्ने साकार करण्यासाठी दिवसरात्र तळमळणारा पहिल्या श्रेणीचा कलावंत. जीवनाकडे सौंदर्यवादी दृष्टीने पाहणारा, नाटकाच्या वेडाने झपाटलेला अजब माणूस. जबरदस्त जीवनोर्मी आणि जिजीविषा जपणारा उत्साही तरूण. चिरतरूण वृत्तीचे आणि आरोग्यपूर्ण प्रकृतीचे सारे गुपित आपल्या मनोवृत्तीमुळे आपल्या अंगी बाळगणारा एक निगर्वी माणूस !

वसंतराव अभिजात संगीताच्या गायनवादनाच्या मैफलींना आवर्जून उपस्थित राहत असत. चित्रकला, वास्तुकला यांची प्रदर्शने मर्मग्राही वृत्तीने सौंदर्यशोधक दृष्टीने बघत. हे त्यांचे खास वैशिष्ठ्य होते. हैदराबादच्या नभोवाणीवर स्वलिखित एकांकिका कल्पकतेने आणि कौशल्यपूर्वक सादर करून रसिक आणि जाणकार श्रोत्यांची प्रशंसा मिळवणारा कलाकार. साहित्यिक चर्चा, वाड्.मयीन गप्पा, नाट्यसमीक्षा, परिसंवाद, काव्यवाचन, काव्यगायन आणि कथाकथन यामध्ये त्यांना विलक्षण रस होता. हैदराबादमध्येच नव्हे तर पुण्या-मुंबईत होणारे अनेक कार्यक्रम त्यांना खेचून नेत असत.

ललितकला आणि वास्तुशास्त्र महाविद्यालयात उपयोजित कलाविभागाचे ते प्रमुख होते. कळकळीने शिकवणारा, कर्तव्यदक्ष शिक्षक म्हणून त्यांना त्यांच्या विद्यार्थीवर्गामध्ये मानाचे स्थान होते. सूर, ताल, लय आणि भाव यांची त्यांना सखोल आणि सूक्ष्म जाण होती. ते आपल्या मधुर आवाजात, स्वतः हार्मोनियम वाजवून, ढंगदार भावगीते, पदे आणि अभंग म्हणू शकत. भावपूर्ण चाली लावण्याचे आणि हळुवार गीते तयार करण्याचे त्यांचे कसब चकित करणारे होते.

एखाद्या प्रतिभावंत शिल्पकाराप्रमाणे अवकाशाची त्रिमितीत कल्पना करणे, कल्पक वास्तुकाराप्रमाणे रेखीव रचनेची उभारणी करणे, हे त्यांचे अंगभूत गुण त्यांच्या कार्यक्रमांच्या

सादरीकरणामध्ये प्रकर्षानं दिसून येत असत. अगदी बालपणापासून त्यांचे अनेक उपजत गुण मेळ्यांमध्ये अभिनय करून , गाणी म्हणून चोखंदळ प्रेक्षकांना जाणवले होते. नाटकाची संहिता, पात्रांची निवड, अभिनय, नेपथ्य, प्रकाश योजना अशा सर्व अंगांचा संपूर्ण विचार करूनच ते आपला प्रत्येक कार्यक्रम सादर करीत. सुचलेली सुंदर कल्पना रेखाटणं, तिला देखणं रूप देणं, नि प्रत्यक्षात सादर करणं या सर्व गोष्टी करण्याचे त्यांचे सामर्थ्य विलक्षण होते.

सर्व अभिजात कलांमध्ये रस असणारी, वेगळी दृष्टी असणारी, विचारवंत मित्रमंडळी त्यांनी एकत्र आणली होती. साहित्य, संगीत, चित्रकला, वास्तुकला, गायन-वादन-नर्तन यामध्ये गोडी निर्माण करण्याची क्षमता होती त्यांच्या अंगी. महाराष्ट्रातील अनेक चित्रकार, पहिल्या श्रेणीचे गायक-गायिका, पट्टीचे वादक आणि नर्तक, नामांकित नट आणि नाटककार, कथाकार आणि कादंबरीकार, कवी आणि समीक्षक त्यांच्या घनिष्ट परिचयाचे होते. वसंत कानेटकर, विजय तेंडूलकर, डॉ. श्रीराम लागू, कुमार गंधर्व यांच्याशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. अनेक शिल्पकार, वास्तुकार आणि फोटोग्राफर यांना ते जवळून ओळखत होते.

सतत वाचन, चिंतन आणि मनन करून ते प्रगल्भ आणि परिपूर्ण होण्याच्या प्रयत्नात असत. कलेच्या बाबतीत ते आग्रही Perfectionist होते. कोणत्याही कार्यक्रमाच्या बाबतीत ते समाधानी नसत. अधिकाधिक सुंदर असा कार्यक्रम सादर करण्यासाठी ते जिंवाचे रान करीत असत. ही त्यांची वृत्ती सर्वच बाबतीत दिसून येत असे. एखादे चित्र, एखादी कविता, एखादी एकांकिका, एखादी निर्मिती या प्रत्येक बाबतीत परिपूर्णता आणण्यासाठी ते दिवसरात्र प्रयत्न करीत असत.

प्रायोगिक आणि व्यावसायिक नाट्यसंस्थांशी त्यांचे घनिष्ट संबंध होते. मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी अशा विविध भाषांतून नाटके सादर करणाऱ्या नाट्यसंस्थामधील व्यक्तींचा व त्यांचा चांगला परिचय होता. प्रायोगिक नाटके बसविण्यासाठी सतत धडपडणाऱ्या तरूणांना ते सुयोग्य मार्गदर्शन मनापासून देत असत. नाट्य चळवळ प्रगतीच्या दिशेने जावी यासाठी ते सर्वांनाच प्रोत्साहन आणि प्रेरणा देत असत. सतत काहीतरी नवा विचार, नाविन्य पूर्ण कल्पना त्यांच्या मनामध्ये चालू असे. त्यांची नाविन्याची आणि वैविध्याची हौस जगावेगळी होती यात संशय नाही.

जीवनाकडे ते नेहमी आशावादी दृष्टीने पहात असत. प्रसिद्धीसाठी धडपड करण्यापेक्षा, कार्यक्रमाची परिपूर्णता साधण्याकडे त्यांचा कल होता. दिग्दर्शक म्हणून आपल्याला प्रसिद्धी मिळावी असं त्यांना कधी वाटलंच नाही. आपण दिग्दर्शनाची जबाबदारी स्वीकारली असता, दुसऱ्याचे नांव दिग्दर्शक म्हणून जाहीर केले तरी ते नाराज किंवा निराश होत नसत. प्रत्येक कार्यक्रमाची पातळी उंचावण्यासाठीच ते तळमळीने, कळकळीने सहकार्य देण्यास तयार असत. कोणत्याही संस्थेला मार्गदर्शन करण्यास ते एका पायावर

तयार असत. जाण्यायेण्याचा, चहापाण्याचा खर्च ते स्वतःच करीत. व्यावसायिक दिग्दर्शकाप्रमाणे ते कधीही मानधन मागत नसत.

वसंतराव तसे शौकीन होते. रूबाबदार कपडे घालण्याची त्यांची आवड आणि कलावंतासारखा त्यांचा पोषाख सर्वांच्या लक्षात येत असे. अविवाहित असल्या कारणाने ते स्वयंपाक करण्यात हुषार होते. स्वतः खाण्याची आणि मित्रांना भरपूर खाऊ घालण्याची त्यांची वृत्ती हेवा करण्यासारखीच होती. सर्वच बाबतीत त्यांची रसिकता अफाट होती. काव्यात्मकता, गुणग्राहकता आणि तीव्र संवेदनशीलता यांची विलक्षण साथ होती त्यांच्या रसिकतेला.

बीड या प्राचीन गावातील प्रसिद्ध आणि खानदानी घराणे गोडसे यांचे. बाबासाहेब म्हणजे पुरूषोत्तमराव गोडसे यांचे द्वितीय चिरंजीव म्हणजे वसंत. शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेचे श्रीमंत घराणे. बाबासाहेब हे नावाजलेले कायदेपंडीत आणि हायकोर्ट प्लीडर होते. अध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक बलाने संपन्न असे व्यक्तिमत्व म्हणजे बाबासाहेब गोडसे. सदाचार, सत्प्रवृत्ती, सत्यनिष्टा, धैर्य, परोपकारबुद्धी, विवेक आणि विद्या, स्वत्त्वाचा सात्विक अभिमान, कर्तबगारी, बाणेदारपणा, दानशुरवृत्ती, आदर्श गृहस्थाश्रमी पुरूषोत्तम म्हणजे बाबासाहेब गोडसे, बाबासाहेब अत्यंत कतृत्ववान होते. सामाजिक कार्याची आवड असणारे, गरजू विद्यार्थ्यांना यथाशक्ती मदत करणारे आणि अनेकांना कायद्याचा सल्ला मोफत देणारे बाबासाहेब गोडसे. घराण्याचा वटवृक्षच !

बाबासाहेबांना उत्तम साथ संगत करणाऱ्या आईसाहेब म्हणजे सौ. इंदिराबाई गोडसे. समंजस, सहिष्णु अशा सुगृहिणी, दया-माया-ममता-वात्सल्याचीच कारूण्यमूर्ती असणाऱ्या आईसाहेब ! धर्मपरायण आणि सर्व व्रतवैकल्ये श्रद्धेने आणि निष्ठेने करणाऱ्या आईसोहब. आदर्श पत्नी व आदर्श माता !

बाबासाहेबांचे ज्येष्ठ सुपुत्र म्हणजे चंद्रकांतराव ते हैदराबाद राज्यामध्ये होम सेक्रेटरी पदापर्यंत चढले गेले. मुंबईला राज्यपुनर्रचनेनंतर ते चॅरिटी कमिशनर झाले. त्यांच्या पत्नी म्हणजे सौ. कमलताई. यांना तीन मुलगे होते. मोठा जगदीश, त्याची पत्नी सौ. गीता त्यांचा मुलगा चि. आनंद म्हणजे बाबासाहेबांचा पणतू. सहस्त्रचंद्रदर्शनाचा कार्यक्रमाच्या समयी बाबासाहेबांच्या डोक्यावर सुवर्ण फुले उधळण्यात आली. चंद्रकांतरावांचा दुसरा मुलगा शामसुंदर आणि सुकन्या चि. विद्या. लक्ष्मीनारायणाच्या छायेत-पुरूषोत्तम हे सुंदर चरित्र लिहिले विद्यानेच. तिने काकांच्या प्रोत्साहनामुळे नाटकात सुंदर काम करून अभिनयातील कसब दाखविले. एम. ए. केल्यानंतर टाटामध्ये सामाजिक कार्याचा कोर्स पूर्ण केला. कै. जितेंद्र अभिषेकींच्या सुविद्य पत्नी म्हणजे विद्या चंद्रकांतराव गोडसे.

बाबासाहेबांचे दुसरे चिरंजीव म्हणजे वसंतराव, लहानपणापासूनच ते जिद्दी, महत्वाकांक्षी, अभिनयपटू, स्वावलंबी आणि संगीताचे शौकीन होते. मॅट्रिक झाल्यानंतर त्यांनी आपल्या घराला रामराम ठोकला आणि स्वतःच्या कष्टानेच जे. जे. स्कूल ऑफ

केली. त्या नाटकामध्ये त्यांनी स्वत: एक भूमिकाही केली. नाटक सादर केले त्यावेळी दुसऱ्याच व्यक्तीचे नाव दिग्दर्शक म्हणून जाहीर करण्यात आले. वसंतरावांना नाटक चांगले व्हावे हाच एक ध्यास होता. आपल्या नावासाठी त्यांनी कधीच आग्रह धरला नाही.

या नाटकाच्या वेळीच त्यांचा व दिनकर बिंदू यांचा परिचय होण्याचा योग आला. ते एकमेकांचे जिवलग मित्र बनले. दोघांमधील संबंध जिव्हाळ्याचे झाले. दिनकर बिंदू यांच्याशी मनमोकळी चर्चा करूनच वसंतराव नाटिका, एकांकिका, मोठे तीन अंकी नाटक आणि दुसरा कोणताही कार्यक्रम सादर करू लागले. वसंतरावांच्या सृजनशील वृत्तीला प्रोत्साहन आणि प्रेरणा देणारा असा स्नेही मिळाला. समसमा संयोग झाला.

हुकूमतके आधार या हिंदी नाटकाचा एक प्रयोग दिल्ली नाट्य संघाच्या सहकार्याने दिल्लीमध्ये झाला. या नाटकातील भुमिकेबद्दल वसंतरावांना खास बक्षिस मिळाले होते अभिनयाबद्दलचे. दिल्लीमध्ये या नाटकाची बरीच प्रशंसा झाली. एक कल्पक आणि कसबी दिग्दर्शक म्हणून वसंतराव हैदराबादकरांना माहित होण्याचा योग आला. आपल्या अभिनय कौशल्याचीही चुणुक दाखविली त्यांनी. हैदराबादच्या नाट्य चळवळीमध्ये वसंतरावांचे नाव चमकू लागले.

हौशी रंगकर्मी व्यक्तींनीही नव्या नाट्यतंत्रात अधिकाधिक रस घ्यावा असा त्यांनी आग्रह धरला. त्या दृष्टीने ते विचार करू लागले. सहकाऱ्यांना कळकळीने सांगू लागले. चित्र-शिल्प-वास्तू कलांमधील अमूर्त शैलीचा सुयोग्य वापर नाटकात आवर्जून केला पाहिजे असं त्यांना सतत जाणवू लागलं. हौशी नाटकातून असे प्रयोग करणं अत्यंत आवश्यक आहे, असं त्यांना वाटे. कार्यकमामध्ये या नाविन्यपूर्ण कल्पनांचा उपयोग करण्यास त्यांनी सुरुवात केली. नाटकाचे तंत्र आणि मंत्र यांचा त्यांनी कसून अभ्यास करण्यास आरंभ केला. रसिक व दर्दी प्रेक्षकांना या नव्या गोष्टी सहजासहजी आवडणार नाहीत, पचनी पडणार नाहीत, याची जाणीव होती त्यांना. त्यांचा निर्धार पक्का होता. नव्या नव्या कल्पनांचा उपयोग केल्याशिवाय कार्यक्रमांचं यश वाढणार नाही, याची खात्री होती त्यांना. त्यांच्या कल्पकतेला नवीन धुमारे फुटू लागले. कार्यक्रमाच्या निवडीबद्दल, काम करणाऱ्या प्रत्येक नट-नटीबद्दल ते अत्यंत चिकित्सक आणि चोखंदळ बनले. कार्यक्रमाची उंची वाढविण्यासाठीच ते दिवसरात्र विचार करू लागले. या सर्व बाबतीत कोणतीही तडजोड करण्यास ते मुळीच तयार नसत.

१९५६ च्या सुमारास वसंतराव कलामंडळातून यासाठीच बाहेर पडले. वसंतराव, दिनकर बिंदू, कुर्डुकर, अरगडे, सुशिलाबाई फाटक, उमाशशी भालेराव, मधुकर बडवे अशा सर्वांनी एकत्र येऊन 'कला निकेतन' नावाची एक नवीनच संस्था स्थापन केली. संगीत-नृत्य-नाट्य आणि सर्व अभिजात कलांच्या वृद्धीसाठी आणि नाविन्यपूर्ण प्रयोग सादर करण्याच्या जिद्दीने ही मंडळी एकत्र आली. नव्या नाट्यतंत्रास उत्तेजन देणे, हौशी नाट्यकलावंतांना संधी प्राप्त करून देणे, नेपथ्य-प्रकाशयोजना यामध्ये नव्या नव्या कल्पनांना

प्राधान्य देणे याच कारणांना कलानिकेतनची स्थापना करण्यात आल्याचे एक पत्रक प्रसिद्ध करण्यात आले. नाट्यवाचन, ध्यानीमनी नसता यासारखे नाविन्यपूर्ण कार्यक्रम सादर करावेत हाच एक हेतू होता कलानिकेतनच्या स्थापनेत. कलानिकेतनचा एक खास चाहता वर्ग निर्माण करण्याची वसंतरावांची महत्त्वाकांक्षा होती. कोणतेही अधिकाराचे पद न घेता कलानिकेतनसाठी तळमळीने, कळकळीने, एकनिष्ठेने कार्य करण्याचाच त्यांचा ध्यास होता. तसे ते प्रसिद्धी पराङमुखच होते. प्रत्येक कार्यक्रमाची उंची वाढविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचाच त्यांनी निश्चय केला होता. कलानिकेतनचे एक महत्वपूर्ण आधारस्तंभ होते वसंतराव. १९५६ मध्ये कलानिकेतनची स्थापना केल्यापासून वसंतरावांनी झटून कार्याला आरंभ केला. सर्व अभिजात कलांचे सुविहीत असे कार्यक्रम सादर करण्याचा त्यांचा निर्धार होताच. कलानिकेतनने त्यांना ही संधी प्राप्त करून दिली.

कलानिकेतनने २ मार्च १९५७ रोजी राणीचा बाग हे डॉ. अ. वा. वर्टी लिखित नाटक सादर केले. या नाटकातील उमाकांतची भूमिका करून आपल्या अभिनयाची झलक दाखवली. या नाटकामध्ये वसंतरावांनी एक अफलातून प्रयोग अत्यंत यशस्वी करून दाखविला. नेहमीच्या पद्धतीने फ्लॅटस् न वापरता, खिडकीच्या उंचीचे लाकडी चौकडीचे फ्लॅटस प्रथमच वापरले. भिंतीच्या जागी जाड गुंडाळीचे पडदे वापरून एक नवीन कल्पना प्रत्यक्षामध्ये आणून प्रेक्षकांना विस्मयचकित केले. दरवाजे आणि खिडक्या यांच्या चौकटीवर हे पडदे अलगद येऊन टेकायचे आणि आकर्षक दिसायचे. रंगमंचावर वापरल्या जाणाऱ्या फ्लॅटस्ना रजा दिली.

अशा नव्या कल्पना वसंतरावांनी कौशल्याने यशस्वी केल्या. जाणकार प्रेक्षकांना या कल्पना आवडल्या. त्यांनी वसंतरावांचे मनापासून कौतुक केले. कलानिकेतन या संस्थेने वसंतरावांच्या प्रतिभेला, परिणत प्रज्ञेला वाव दिला. आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना साकार करून वसंतरावांनी आपला असा खास प्रेक्षकवर्ग तयार केला. कलानिकेतनचा कार्यक्रम म्हणजे काहीतरी नवीन तंत्र पाहण्याची संधी अशी प्रतिमा निर्माण केली त्यांनी. १९-२०-२१ डीसेंबर १९५७ अशा तीन दिवसांचा एक आकर्षक कार्यक्रम सादर केला वसंततरावांनी. Winter Festival अशा नावाचा हा कार्यक्रम सादर करून वसंतरावांनी कलानिकेतन या संस्थेला एक खास स्थान मिळवून दिले. यापूर्वी कोणत्याही नाट्यप्रेमी संस्थेने असा विविध अंगांनी परिपूर्ण सांस्कृतिक कार्यक्रम केला नव्हता. रेजीसार पार्श्वनाथ आळतेकर खास या कार्यक्रमासाठी हैदराबादला प्रथमच आले होते. त्यांची उपस्थिती हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. १) स्त्रीजीवन दर्शन-ओव्या, गीते, भजने, अभंग-विशेषत: स्त्रीजीवनाविषयी - यांवर आधारलेली संगीतिका २) आधुनिक गृहस्थी-श्री. मो. ग. रांगणेकरांच्या मराठी एकांकिकेचे हिंदी रूपांतर ३) मेघदूत - हिंदी नृत्य नाट्याचा बहारदार प्रयोग. स्त्रीजीवनदर्शनाच्या संगीतिकेने रसिक श्रोत्यांना कर्णमधुर संगीताची एक आगळीवेगळी मेजवानीच दिली. संगीत नियोजन केले होते वसंतरावांनी. अनेक

पारंपारिक ओव्या, गीते, भजने आणि अभंग नव्या ढंगात सादर करण्याचे श्रेय केवळ वसंतरावांनाच दिले पाहिजे. तालबद्ध गायन आणि मधुर चाली यामुळे ही संगीतिका सर्वांना अतिशय आवडली. आधुनिक गृहस्थी ही हिंदी एकांकिका विचारांना चालना देणारी होती. एक ज्वलंत सामाजिक प्रश्न विचारवंत प्रेक्षकांच्या समोर मांडण्याचे कौशल्य वसंतरावांचेच. केवळ मनोरंजन करण्यापेक्षा प्रेक्षकांचे प्रबोधन झाले पाहिजे, याच हेतूने वसंतरावांनी ही एकांकिका सादर केली. मेघदूत या नृत्य-नाट्याची मूळ कल्पना त्यांचीच. नृत्यामधील भावदर्शन आणि नाट्यातील अभिनय यांचा नवा अविष्कार. नृत्य-नाट्याने भारून गेले रसिक आणि जाणकार प्रेक्षक. एक श्रवणीय आणि प्रेक्षणीय अशी सुंदर कलाकृती! अशा प्रकारचा तिहेरी कार्यक्रम प्रथमच केला कला निकेतनने. संगीत-नृत्य-नाट्य अशा तीन अंगांनी हा कार्यक्रम बहारदार झाला. ओव्या-भजने-स्त्रीगीते यांची निवड वसंतरावांची. त्यांना कर्णमधुर चाली दिल्या होत्या वसंतरावांनीच. नाट्याचे दिग्दर्शन होते त्यांचेच. अशा प्रकारचा नाविन्यपूर्ण कार्यक्रम करून कलानिकेतनने प्रेक्षकांच्या मनामध्ये एक खास स्थान निर्माण केले. उपस्थित रसिक श्रोत्यांनी सुरेख दाद दिली. वसंत गोडसे या नावाला एक वेगळे वलय प्राप्त झाले.

रेजीसार पार्श्वनाथ आळतेकरांनी संपूर्ण कार्यक्रमाची तारीफ केली. त्यांचे भाषण हा एक प्रमुख कार्यक्रम होता या फेस्टिव्हलमध्ये. श्रोत्यांना आळतेकरांचे भाषण ऐकण्याची ही सुवर्णसंधी दिली कलानिकेतन या संस्थेने. नाटकाचे तंत्र आणि मंत्र समजून घेण्यास या भाषणाची खूप मदत झाली. एक दिवस सादर केले आचार्य अ[illegible]यांचे सुंदर नाटक पाणीग्रहण. आकर्षक नेपथ्य आणि सुरेख प्रकाश योजना यामुळे हे नाटक खूपच छान झाले. ध्यानी मनी नसता-हा वसंतरावांच्या कल्पना शक्तीचा नाविन्यपूर्ण असा सुरेख आविष्कार. हा नाट्याचा नवाच प्रकार वसंतरावांच्या कल्पकतेमधून निर्माण झाला. उत्स्फूर्त, सतत फुलत जाणारा, विकसित होत जाणारा नाट्य प्रकार प्रथमच पाहिला उपस्थित प्रेक्षकांनी. या नाट्याचे लेखन केलेले नसते. एका पात्राने रंगमंचावर यायचे आणि एखादा विचार मांडायचा. याच विचाराला धरून दुसऱ्या पात्राने त्याच्याशी संवाद सुरू करायचा - अलिखित संवादातून नाट्य निर्माण करण्याचे कसब दाखवावे लागते प्रत्येक पात्राने.

कोणत्याही नाटकाकडे, नाटिकेकडे, अगदी हलक्या फुलक्याही, केवळ करमणूक आणि प्रेक्षकांचे मनोरंजन करण्याचे एक साधन म्हणून पाहणे, हा त्यांना नाट्यकलेचा अपमान वाटत असे. प्रत्येक नाट्यप्रयोगाचे, कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमाचे ब्रीदवाक्य म्हणजे सर्वांगांची परिपूर्णता असं आवर्जून सांगत वसंतराव. यासाठीच वसंतरावांचा सारा अट्टाहास चाले. प्रत्येक कार्यक्रमाचा एक उच्च दर्जा हवाच असा त्यांचा आग्रह असे., हा दर्जा आणण्यासाठी ते दिवसरात्र परिश्रम करीत असत.

संविधानकाची निवड, पात्रयोजना, या दोन्ही बाबतीत ते अतिशय चोखंदळ होते. नव्या नाटकाच्या, नाविन्यपूर्ण एकांकिकेच्या शोधातच असत वसंतराव. योग्य पात्रं मिळाली

नाहीत म्हणून त्यांचे नाटकाचे कितीतरी संकल्प मनातच राहून गेले. समाधानकारक भरपूर तालमी झाल्या नाहीत म्हणून त्यांनी नाटकाचे प्रयोग लांबणीवर टाकले. उत्तम संविधानक, सुयोग्य पात्र योजना, भरपूर तालमी, आकर्षक नेपथ्य, नाविन्यपूर्ण प्रकाश योजना-यापैकी कोणत्याही बाबतीत तडजोज करणे त्यांच्या स्वभावातच नव्हते. त्यांच्या प्रत्येक नाट्यप्रयोगास, सांस्कृतिक कार्यक्रमाला, म्हणूनच दर्दी प्रेक्षक गर्दी करीत असत.

कलानिकेतनचे सर्व कार्यक्रम उच्च दर्जाचे, अत्यंत नाविन्यपूर्ण असतात, अशी खात्रीच झाली होती रसिक प्रेक्षकांची. प्रेक्षक वसंतरावांच्या कार्यक्रमाकडे डोळे लावून असत. उत्कंठेने वाट पहात असत त्यांच नाटकाची. हेवा करणारे, द्वेष करणारे, मत्सरी लोक आतल्या आत जळत असत त्यांच्या यशावर. वसंतरावांच्या कार्यक्रमामध्ये अडथळे आणण्यांत त्यांना आसुरी आनंद मिळत असावा. विघ्नसंतोषी लोक वसंतरावांना स्त्रीपात्र मिळू नये म्हणून खटपट करीत असत. पात्रे फोडण्याचा त्यांचा कट अनेक वेळा स्पष्ट दिसत असे. पण वसंतराव कुणाबद्दलही अनुदार उद्‌गार काढीत नसत. त्यांच्या अशा दुष्ट कारवायामुळेच Trubenized Love आणि Symphony सारख्या सर्वांगसुंदर नाटिकांचे प्रयोग होऊ शकले नाहीत, या दुर्दैवाला काय म्हणावे ? वसंतरावांचे कार्यक्रम होऊ नयेत, प्रेक्षकांना कार्यक्रमांचा आनंद मिळू नये, नवे नवे प्रयोग पहायला मिळू नयेत असा प्रयत्न करणाऱ्यांना कोणते समाधान मिळते, हेच मला न सुटलेले कोडे होते.

१९५० ऑगस्टपासून मी हैदराबादमध्ये आहे. साधनासंघ, कलामंडळ, विमलनाट्य समाज, कलानिकेतन अशा संस्था नाटके सादर करीत होत्या. मला अशा तीनचार तरी व्यक्ती माहित आहेत की, ज्या व्यक्ती घरी जाऊन तरूण मुलींच्या आईवडिलांना स्वच्छ आणि स्पष्ट सांगत असत. ''आमचं नाटक हलकं फुलकं असतं, चार सहा आठवडेच चालतात आमच्या नाटकाच्या तालमी. आपल्या मुलीला आपल्या घरून घेऊन जाण्याची आणि तालमीनंतर घरी आणून सोडण्याची व्यवस्था आम्ही करू. आपण काळजी करण्याचे कारण नाही. कलानिकेतनचे नाटक गंभीर आणि अवघड असते. म्हणून त्यांना तालमी तीनचार महिने घ्याव्या लागतात. इतका वेळ कशासाठी द्यावा आपल्या मुलीने।''

कलानिकेतनचं नाटक होऊ नये, असा कसून प्रयत्न करणाऱ्या अनेक व्यक्ती हैदराबादमध्ये होत्या. त्यांच्या या कुटील कारस्थांनांना यश मिळत असे. वसंतरावांची अनेक नाटके, त्यांनी लिहिलेल्या एकांकिका याच कारणाने बसविता आल्या नाहीत. वसंतरावांचें कितीतरी नाविन्यपूर्ण आणि कल्पक कार्यक्रम होऊ शकले नाहीत. अशाही काही व्यक्ती होत्या, ज्या कला निकेतन मधील स्त्री पात्रांना काही बाही सांगून नाटकातून बाहेत काढीत. पण त्यांचे नाटक बसविणे त्या व्यक्तींना शक्य होतच नसे. अशी नतद्रष्ट माणसे पाहून माझ्या मनाला अत्यंत दु:ख वाटत असे.

वसंतराव यांचं नाट्यवाचन ऐकणं हा एक अपूर्व असा अनुभवच असे. अत्यंत मधुर, भावपूर्ण आवाजात ते नाट्यवाचन करीत असत. ऐकतच राहावं, असं वाटत असे आम्हा

सर्वांना. एखाद्या नियोजित नाटकांचं संविधानक ते इतक्या सूक्ष्म बारकाव्यासह-संवादासह सांगत असत की, विचारण्याचा मोह होई. ते हस्तलिखित द्या-घरी नेवून वाचीन सवडीनं, स्वस्थपणानं. असं कुणी म्हटलं की, मग समजायचं की ते संविधानक अद्याप लिहायचंच आहे. कल्पनेतील संवाद वसंतराव म्हणून दाखवायचे. एखाद्या व्यक्तीविषयी वसंतराव खूप खूप बोलायचे अन् मग आम्हाला समजायचं की हे त्यांच्या एखाद्या नियोजित-संकल्पित नाटकातलंच एक पात्र आहे. जो प्रसंग त्यांनी सविस्तर वर्णन करून सांगितला तो त्यांच्या संकल्पित नाटकातीलच आहे. अंतर्मनातील पात्रे प्रसंग, संवाद!!

विवेकवर्धिनी शिक्षण संस्थेच्या सुवर्णमहोतस्वाच्या निमित्ताने साधना संघाने एक मराठी नाटक बसविण्याचा निर्धार केला. साधना संघाचे नाट्यदिग्दर्शक होते मा. गो. मैराळ. मैराळ यांनी बाळ कोल्हटकरांचे नाटक दुरितांचे तिमिर जावो पसंत केले आणि त्यासाठी पात्र योजना करण्यास सुरूवात केली.

मैराळ यांनी 'कौंतेय' या वि. वा. शिरवाडकरांच्या नाटकामध्ये मला कृपायचार्यांची छोटी भूमिका करण्याची संधी दिली होती. या नाटकाचा पडदा उघडल्यानंतर पहिलेच वाक्य होते कृपाचार्यांचे. तीन चार वाक्ये म्हणण्याचे काम मी केले होते. नाटकात काम करण्याची माझी इच्छा पूर्ण केली मैराळ यांनी.

साधना संघाने कौंतेय नंतर आचार्य अत्रे यांच्या 'मी उभा आहे' या मराठी नाटकाचे हिंदी रूपांतर 'मुझे वोट दीजिये' सादर केले होते. त्या तीन अंकी नाटकामध्ये मला भीमाशंकरची मोठी भूमिका करण्याची संधी दिली होती मराळ यांनी. माझे पहिले मोठे नाटक होते हिंदी.

'दुरितांचे तिमिर जावो' या नाटकामध्ये काम करण्यासाठी आम्ही अनेक जण उत्सुक होतो. आम्हां सर्वांना मैराळ यांनी त्यांच्या घरी बोलावले. दिगूची मुख्य भूमिका करणार होता सुरेश गंगाखेडकर. खलनायक पंत साकारणार होते स्वतः मैराळ. डॉ. बापूच्या दुय्यम भूमिकेसाठी मैराळ यांनी माझी निवड केली. सौ. भारती मैराळ यांनी पंत यांच्या पत्नीची भूमिका केली होती.

या नाटकाच्या तालमी मैराळ यांच्या घरी सुरू झाल्या. डॉ. बापूची भूमिका ललित कलादर्शच्या व्यावसायिक नाटकामध्ये मास्टर दत्ताराम यांनी केली होती. डॉ. बापू यांच्या संवादामध्ये 'अच्छा' 'अच्छा' हे शब्द अनेक वेळा येत होते. हे शब्द मला अनावश्यक आणि रसभंग करणारे वाटू लागले. मैराळ यांना मी माझी शंका बोलून दाखवली. नाखुषीने मैराळ यांनी माझे म्हणणे ऐकले आणि 'अच्छा' 'अच्छा' हे शब्द कमी करण्यास परवानगी दिली मला.

नाटकाच्या तालमी पूर्ण होत आल्या. नाटकाची तारीख ठरविण्यात आली. विवेकवर्धिनी हायस्कुलच्या मागील पटांगणावर नाटक करण्याचे ठरले. पहिल्या रांगेतील सर्व सोफे पळणिटकर कुटुंबियांनी आरक्षित केले होते.

उत्तमराव पाटील यांनी माझ्या घरी येऊन मला सूचना दिली की त्याच शनिवारी रात्री ९॥ वाजतां उस्ताद अमीर खाँ यांचा नॅशनल प्रोग्रॅम होणार होता ऑल इंडिया रेडिओवर. ज्या दिवशी आमचे नाटक होते, त्याच दिवशी त्याच वेळी ९॥ वाजतां माझ्या आवडत्या गायकाचा नॅशनल प्रोग्रॅम !

आमच्या शाळेत एक उत्तम रेडिओ होता. यादगिरीला मी सकाळीच सूचना दिली की त्याने तो रेडिओ स्टेजजवळच्या खोलीत ९ वाजता आणून ठेवावा.

मैराळ यांना मी म्हणालो की रात्री ८ वाजण्यापूर्वीच मेकअप् करण्यासाठी मी येईन, मेक अप् करून, माझ्या डॉक्टरचा पोषाख घालून तयार होणार बरोबर ९ वाजता. अमीरखाँ यांचा नॅशनल प्रोग्रॅम ऐकण्याची संधी मी सोडणार नाही. नाटक सुरू झाल्यानंतर माझी एन्ट्री होती साधारणपणे अर्ध्या तासानंतरच. मला अमीरखाँ यांच्या गाण्याची सुरूवात ऐकण्यास मिळणार होती. पांढरी पँट, पांढरा शर्ट आणि कोट असा माझा पोषाख होता. पँटला सस्पेंडर्स लावले होते. कोट मागे सारून, सस्पेंडर्स दोन्ही हातात घेऊन संवाद म्हणण्याचा सराव केला होता.

ठरल्याप्रमाणे मी ८ वाजता शाळेत गेलो. मेकअप् करून, डॉ. बापूचा पोषाख करून मी तयार झालो. रेडिओजवळ एक खुर्ची टाकून मी गाणं सुरू होण्याची वाट पहात बसलो. पहिली घंटा झाली ९.२० ला आणि दुसरी ९.२५ ला. आम्ही सर्वांना परस्परांना Best of Luck म्हणून शुभेच्छा दिल्या. ९.३० ला नाटकाची तिसरी घंटा झाली. साधना संघाच्या चिटणीसांनी सर्वांचे स्वागत केले, नाटकाचे नाव, नाटककाराचे नाव, पात्र योजना, नेपथ्य-प्रकाश योजना करणाऱ्यांची नांवे, शेवटी दिग्दर्शकांचे नांव सांगितले. मखमली पडदा उघडला गेला. नाटक सुरू झाले. माझा प्रवेश जवळ जवळ अर्ध्या तासानंतर होता.

मी रेडिओजवळच बसलो होतो. अमीरखाँ यांचा भारदस्त, धीर गंभीर आवाज ऐकून मी भान विसरून गेलो. त्यांच्या विलंपत गायनामध्ये गुंग झालो. गायन ऐकता ऐकता मी कोटाच्या खिशातील रूमाल एक दोनदा काढला व घाम पुसून खिशात ठेवला. कोणत्या खिशात शेवटी रूमाल ठेवला, हेच मला समजले नाही. गाणं ऐकण्याने मी मंत्रमुग्ध झालो होतो.

माझ्या एन्ट्रीची वेळ आल्याची सूचना मिळाली. बरोबर योग्य वेळी मी माझ्या मुलीसह रंगभूमीवर प्रवेश केला. दिगूशी माझा संवाद सुरू झाला. दिगूची आई आतमध्येच असल्यामुळे मला विंगसमोरच उभे राहून बोलावं लागलं. दिगूचे वडील माझे जिवलग मित्र होते. ते माझ्या धाकट्या भावासारखेच होते. थोड्या वेळानंतर मला सांगण्यात आले की दिगूचे वडील निधन पावले आहेत. धाकटा लक्ष्मण अगोदर गेला आणि मोठा राम मात्र अद्याप मागे राहिला आहे, असं दिगूच्या आईला सांगताना माझा आवाज गलबलल्यासारखा झाला. एक हुंदका दिला मी आणि माझे डोळे भरून आले. हातरूमाल शोधण्यासाठी मी माझे दान्ही हात या खिशावर चाचपू लागलो. माझा तो चाचपण्याचा अभिनय छान वठला.

प्रेक्षकांचा समज झाला की म्हातारा गलबलून गेल्यामुळे त्याला हातरुमाल सापडत नाही. सारे प्रेक्षक समरस झाले होते माझ्या भावनेशी. माझा अभिनय, गलबललेला आवाज, डोळ्यात जमलेले अश्रू आणि माझे खिसे चाचपणे पहात होते सारे प्रेक्षक आणि प्रेक्षकांमध्येच बसलेले वसंतराव.

असा हा अत्यंत गंभीर, करूण प्रसंग मी माझ्या अभिनयाने सुरेख वठवला. खास करून पँटला लावलेले सस्पेंडर्स दोन्ही हातांच्या अंगठ्यांनी ओढीत बोलण्याचा माझा अभिनय पहिल्या रांगेतील पळणिटकर कुटुंबियांना विशेषच आवडला-सर्वांनीच डोळे टिपलेले मी पाहिले. माझे बोलणे, चालणे, सस्पेंडर्स ओढून उभे राहणे यामुळे पळणिटकर फॅमिलीतील सर्वांनाच नुकत्याच दिवंगत झालेल्या जस्टिस पळणिटकरांची प्रकर्षाने आठवण करून दिली होती. हे मला नाटक संपल्या नंतर अण्णांनी सांगितले. एन्ट्रीलाच मी प्रेक्षकांवर जबरदस्त छाप पाडू शकलो. माझा मूड छान लागला होता. याचे कारण अमीरखाँ यांचे सुरेल गायन तर नसेल ना ? मला हा प्रश्नच पडला. प्रवेश झाल्यानंतर मी गाणं ऐकण्यात गुंग झालो.

एका पाठोपाठ एक असे तीन्ही अंक अधिकाधिक रंगतच गेले. माझ्या व दिगूच्या अभिनयाला प्रेक्षकांनी भरपूर दाद देऊन टाळ्यांचा कडकडाट केला. नाटक संपल्यानंतर पळणिटकरांच्या तर्फे दिगूला पहिले बक्षिस व मला दुसरे बक्षिस देण्यात आले. माझ्या पहिल्याच मराठी नाटकातील भूमिकेचे कौतुक झाले.

आमच्या या नाटकाचा प्रयोग विवेक वर्धिनी शिक्षण संस्थेच्या मदतीसाठीच सादर केला होता. नाटक संपल्यानंतर आमच्या शाळेचे मुख्याध्यापक स्टेजवर आले. आम्ही नाटकातील सारी मंडळी स्टेजवर एका रांगेत उभे राहिलो. प्रत्येकाच्या समोर येऊन, हस्तांदोलन करून, मुख्याध्यापकांनी अभिनंदन केले व धन्यवाद दिले. पण माझ्या समोरून ते पुढे गेले, माझ्याशी हस्तांदोलन न करता, माझे अभिनंदन न करता. माझे कसले अभार मानायचे ? मी तर त्यांच्या शाळेत काम करणारा शिक्षक होतो ना !

दुसरे दिवशी शाळेत गेल्याबरोबर यादगिरीने मला निरोप सांगितला की मुख्याध्यापक साहेब माझी वाट पहात आहेत. मी त्यांच्या ऑफिसमध्ये गेलो. त्यांना नमस्कार करून उभा राहिलो. सरांनी माझे नाटकातील काम आवडल्याचे मला सांगितले आणि माझी प्रशंसा केली. त्यांच्याच हाताखाली काम करणाऱ्या एका शिक्षकाने, संस्थेच्या शाळेच्याच मदतीसाठी केलेल्या नाट्यप्रयोगात उत्तम भूमिका करून दुसऱ्या क्रमांकाचे बक्षिस पटकावल्याबद्दल माझे मनापासून अभिनंदन केले सरांनी. सर माझे कौतुक करतील असं मला वाटलंच नव्हतं.

एके दिवशी संध्याकाळी माझ्या घरी चारपाच नवीनच मंडळी आली. त्यापैकी फक्त अनंत अरगडे यांना मी ओळखत होतो. अरगडे आत घेऊन आले सर्वांना आणि त्यांनी मला त्यांची नांवे सांगून ओळख करून दिली. वसंतराव गोडसे, जनार्दन कुर्डुकर, लीला सुंदररैय्या यांचा परिचय करून दिला अरगडे यांनी. ओळख करून दिल्यानंतर त्यांनी त्यांच्या येण्याचे

कारण मला सांगितले. नाट्य संमेलनाच्या निमित्ताने त्यांची कलानिकेतन ही संस्था एक नाटक बसविणार होती. नाटकाच्या स्पर्धा जाहीर झाल्या असून त्या स्पर्धेमध्ये कलानिकेतन ही संस्था भाग घेणार आहे असं मला सांगण्यात आलं. मी चौकशी केली की स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी ते कोणतं नाटक बसविणार आहेत. नाटकाचे दिग्दर्शन कोण करणार आहेत. वसंत कानेटकरांचे 'वेड्याचं घर उन्हात' कलानिकेतन स्पर्धेसाठी बसविणार आहे आणि नाटकाचे दिग्दर्शन करणार आहेत वसंतराव गोडसे. वेड्याचं घर उन्हात हे नाटकाचे नांव ऐकताच मी एकदम उडालोच. कारण नुकतेच हे नाटक मी रेडिओवर ऐकले होते आणि त्या नाटकातील मुख्य भूमिका केली होती डॉ. श्रीराम लागू या महान कलावंताने. मी त्यांना सांगितले, मला तरी हे नाटक अतिशय अवघड दिसते. नाटक आहे अत्यंत गंभीर आणि करूण रस पूर्ण. पुण्यातील प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोशिएशन या मान्यता प्राप्त नाट्यसंस्थेने हे नाटक बसविले आहे. दिग्दर्शक आहेत ख्यातकीर्त प्रा. भालबा केळकर. माझ्या सारख्या नवख्याला या नाटकातील कोणती भूमिका आहे ? चटकन वसंतराव गोडसे म्हणाले, 'दादासाहेबांची मध्यवर्ती भूमिका तुम्ही करावी, अशी विनंती करण्यासाठी, आम्ही आलो आहोत. आमची विनंती तुम्ही मान्य करावी.' मी त्यांना म्हणालो, 'एवढी मोठी आणि अवघड मध्यवर्ती भूमिका मला जमेल असं वाटत नाही. मला तरी ही भूमिका मी करणं अशक्यच वाटते. कृपा करून मला माफ करा. या नाटकामध्ये मी काम करू शकणार नाही.' पण ते माझं म्हणणं ऐकून घ्यायलाच तयार नव्हते. त्यांचा आग्रह पाहून मी त्यांना उत्तर दिले, 'प्रथम मला साधना संघाच्या चिटणीसांना विचारले पाहिजे. नाटकात काम करण्याची पहिली संधी मला साधना संघाने दिली. तुम्ही तीन चार दिवसांनी या, मी माझा होकार-नकार सांगेन त्यावेळी.' कलानिकेतनच्या मंडळींना धन्यवाद दिले, चहापाणी केले.

साधना संघाचे चिटणीस होते माझे सहकारी शिक्षक व्यापारी जवळच ते राहत होते. त्यांच्या घरी जाऊन मी त्यांना हा सारा वृत्तांत कथन केला, कलानिकेतन ही नाट्यसंस्था मान्यवर असून ती संस्था उत्तमोत्तम नाटके सादर करीत असते. वसंत गोडसे हे कसलेले, कल्पक दिग्दर्शक आहेत, असं चिटणीस यांनी मला सांगितले. कलानिकेतन या संस्थेचे एकही नाटक पाहण्याची संधी मला मिळालेली नव्हती. वसंतराव गोडसे यांनी दिग्दर्शन केलेले नाटक कसं असेल, याची मला कल्पनाच नव्हती. एकदोन दिवसात मैराळ यांना विचारून सांगतो असं व्यापारी मला म्हणाले, साधना संघाने बसविलेल्या एका हिंदी व दोन मराठी नाटकात मी काम केले होते.

दोन दिवसांनी मला व्यापारी यांनी सांगितले की होणाऱ्या नाट्यस्पर्धेत साधना संघ भाग घेणार नाही. नाटक बसविण्याचा साधना संघाचा विचार नाही, मी कलानिकेतनच्या नाटकामध्ये काम करू शकतो, साधना संघाची हरकत नाही.

माझ्या मनामध्ये मी विचार करू लागलो, आलेल्या या संधीचा फायदा घ्यावा काय?

हे शिवधनुष्य आपण उचलावे काय ? हे आव्हान आपण स्वीकारावे काय ? मुख्य भूमिका करण्याची ही संधी आपण कशासाठी अव्हेरावी ? माझ्या दृष्टीने ही सुवर्ण संधीच होती. ती स्वीकारण्याचाच निश्चय केला मी.

वसंत गोडसे आणि मंडळी ठरल्याप्रमाणे मला भेटण्यासाठी घरी आली. मा त्यांना सांगितले की साधना संघ नाटक बसविणार नाही आणि संघाने मला कलानिकेतन च्या नाटकात काम करण्याची परवानगी दिली आहे. मी त्यांना जाणीव दिली, 'मी फक्त एकाच नाटकात काम केले असून मराठी नाटकाचा माझा अनुभव असा आहे की माझे पाठांतर लवकर होत नाही. मला घडविण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतील. पाठांतर करून घ्यावे लागेल माझे अनेक तालमी घेऊन. तालमीसाठी माझी पूर्ण तयारी आहे. वसंतराव तुम्हीच ठरवा मला ही भूमिका पेलेल का, जमेल का, शक्य होईल का हे.' गोडसे हसले आणि म्हणाले, 'ते सर्व माझ्यावर तुम्ही सोपवा आणि निर्धास्त राहा. मी सर्व काही व्यवस्थित करून घेईन.'

ठरल्याप्रमाणे मी गेलो. माझ्याबरोबर सुरेश गंगाखेडकर, जनार्दन कुर्डूकर विद्या गोडसे, लीला सुंदररैय्या, वसंत वैद्य, मोहन भालेराव आणि स्वतः वसंतराव हे नाटकात काम करणार होते. दादासाहेबांच्या पत्नीचे काम करणार होत्या लीला सुंदरैय्या. दादासाहेबांचा मोठा मुलगा जनार्दन कुर्डूकर, धाकटा सुरेश गंगाखेडकर, मुलगी विद्या गोडसे, मुनीम वसंत वैद्य, वैडादामू आणि दामोदरपंत वसंत गोडसे अशी पात्र योजना करण्यात आली होती. सर्वांचा मी परिचय करून घेतला. पहिल्याच दिवशी वसंतराव यांनी मला नाटकाची एक प्रत दिली. संपूर्ण नाटक मी काळजीपूर्वक वाचावे आणि त्यावरून दादासाहेबांची प्रवृत्ती, त्यांचा स्वभाव, त्यांचा कोपिष्ठ स्वभाव, त्यांचे वेड्या दामूशी होणारे प्रेमळ संवाद त्यांची प्रदीर्घ स्वगते, त्यांच्यामध्ये होत जाणारे बदल, दामोदरपंताशी बोलणे व त्यांच्या संवेदनशील वृत्तीमुळे आलेला वेडेपणा, लक्षपूर्वक ध्यानात घ्यावा, अशी त्यांनी मला सूचना दिली. कलानिकेतन या नाट्यसंस्थेचे अध्यक्ष होते न्यायमूर्ती गोपाळराव एकबोटे असं मला समजलं. कलानिकेतन ही संस्था १९५७ पासून नाटके, एकांकिका, अन्य सांस्कृतिक कार्यक्रम करीत आहे असे कळले.

सुरेश गंगाखेडकर माझ्या घरासमोरच राहत होता. त्याच्याबरोबर मी या नाटकाविषयी मनमोकळी चर्चा केली. आमच्या गप्पा रंगल्या. त्यावरून मला नाटकाबद्दल अधिक माहिती मिळाली. दादासाहेबांची मध्यवर्ती भूमिका मनोहर चिन्नापट्टण करणार होते, असं सुरेशनं मला सांगितलं. ही भूमिका ते करण्यास तयार होते. पण नाटकाच्या तालमी सुरू होण्यापूर्वीच ते बाहेर गांवी गेले आणि ते येण्याची चिन्हे दिसेनात. घरच्या मंडळींनाही सांगून गेले नव्हते. त्यांचा थांगपत्ताच लागत नव्हता. म्हणून कलानिकेतनच्या मंडळींनी मला ही अवघड भूमिका करण्याचा आग्रह धरला. अशा रीतीने केवळ योगायोगानेच ही भूमिका माझ्या वाट्याला आली आहे, हे मला समजले. मनोहर चिन्नापट्टण

हे हैदराबादमधील नावाजलेले, कसलेले, अनुभवी आणि प्रथित यश नट होते. त्यांची दोनतीन नाटके मी पाहिली होती. ते अभिनयपटू म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्यासारख्या अव्वल दर्जाच्या अभिनयपटूची भूमिका मी करणं, म्हणजे शिवधनुष्य उचलणेच वाटले मला. मला ही भूमिका जमली तर ठीक नाही तर हैदराबाद, सिकंदराबाद या जोड शहरांतील नाट्यशौकीन मला भरपूर नावे ठेवतील, माझी छी-थू करतील, अशी मला साधार भीती वाटू लागली. या धसक्यानेच मी अस्वस्थ झालो.

हैदराबादमध्ये आल्यानंतर मी स्थानिक संस्थांनी बसविलेली नाटके बघून नाक मुरडले होते. नायकाची भूमिका करणारे नट माझ्या टीकेने चिडले असल्याचे माझ्या कानावर आले होते. मी त्यांच्या भूमिकेचे श्रेय नाटककारालाच देत असे. विनोदी भाषा असते नाटककाराने लिहिलेली. ती व्यवस्थित पाठ करून म्हणून दाखवली की झाले. प्रेक्षक हसतात आणि टाळ्या मारतात. विनोदी भूमिका साकार करणे फारसे अवघड नसते, हे मी आवर्जून सांगत असे अशा नटवर्यांना. त्यामुळे ते माझ्यावर रागावले, चिडले असल्याचे मला सांगण्यात आले. माझ्या कडवट अशा टीकेमुळे अनेक नट दुखावले गेले होते. या सर्वांना नाट्याभिनय काय असतो, हे कुणीतरी दाखवून दिले पाहिजे, असं मी चारचौघांमध्ये ठासून सांगत आलो. याबाबतीत मी थोडा कुप्रसिद्धच झालो होतो. आता मीच स्वत: एखादी मुख्य भूमिका केली आणि त्यात मी अपयशी ठरलो, तर मला ही संतापलेली नटमंडळी फाडून खातील, यात मला शंकाच वाटत नव्हती. ही मंडळी मला सुखानं जगू देणार नाहीत, अशी मला साधार भीती वाटत होती. अशा प्रकारच्या भीतीने मी त्रस्त झालो. रात्र रात्र मला झोप लागत नव्हती या भीतीमुळे. माझी दादासाहेबांची ही भूमिका जर पडली, तर मला हैदराबादेत तोंड दाखवायला जागाच मिळणार नाही, अशी सतत धास्ती वाटत होती. ही धास्ती, ही भीती म्हणजे माझ्या मनावरील जबरदस्त दडपण वाटत होते मला. मला माझ्या भूमिकेचा अधिक खोल विचार करणे भागच होते. उत्कृष्ठ भूमिका करण्याचे आव्हान होते माझ्यासमोर.

वेड्याचं घर उन्हात या नाटकाचे प्रयोग पुण्या-मुंबईतच चालू होते. हैदराबादमधील बहुसंख्य प्रेक्षकांनी हे नाटक पाहिले असण्याची शक्यता नव्हती. फक्त अनंत अरगडे यांनी पुण्यात झालेला नाट्यप्रयोग पाहिला होता, असं कळले. डॉ. श्रीराम लागू यांनी दादासाहेबांची भूमिका अत्यंत प्रभावी केली होती,असंच अरगडे सांगत होते.

आमच्या नाटकाच्या तालमी ग्रंथसंग्रहालयामध्ये सुरू झाल्या. मनावर प्रचंड दडपण, समोर मोठे आव्हान असल्या कारणाने मी माझ्या भूमिकेचा सखोल व सूक्ष्म अभ्यास करू लागलो. संवादामधील शब्दांची फेक मी अत्यंत जाणीव पूर्वक आणि आत्मविश्वासाने करू लागलो. घरातील सर्व कुंटुंबियांना कठोर, क्रोधी, संतापी वाटणारे दादासाहेब मी मोठ्या ताकदीने दाखवू शकत होतो.

वेड्या दामूचे आगमन म्हणजे दादासाहेबांचे संपूर्ण परिवर्तन ! वेड्या दामूबरोबरचे

माझे प्रवेश अत्यंत हळुवार होऊन, प्रेमळ शब्दामध्ये होण्यासाठी मी अत्यंत प्रयत्नशील होऊ लागलो. एकेक प्रवेश वसंतराव पुन:पुन्हा घेण्यात कोणतीही कसूर करीत नव्हते. त्यांनी दिलेल्या सर्व सूचना मी अत्यंत कसोशीने, लक्षपूर्वक अंमलात आणू लागलो. माझ्या अभिनयाकडे, भाषेतील शब्दांकडे, भावनेच्या आविष्काराकडे गोडसे अधिक लक्ष देत असल्याचे मला प्रकर्षाने जाणवले. इतर सर्व पात्रांना माझ्या कामामध्ये होत जाणारी प्रगती चकित करू लागली. वसंतरावांचे दिग्दर्शन मला अभिनयाच्या उच्च पातळीवर नेत असल्याचे जाणवू लागले.

तालीम संपल्यानंतर सुरेश गंगाखेडकर आणि मी मिळूनच चालत घरी जात होतो. चालता चालता आमची चर्चा होत असे. कोणता शब्द मी कसा फेकावा, कोणत्या वेळी भावनेचा उच्चांक गाठावा, केव्हा कठोर बनावे, याबद्दल आम्ही अधिक खोलात जाऊन विचार करू लागलो. माझ्या मनामध्ये या गोष्टींचा विचार खळबळ माजवू लागायचा.

या आमच्या चर्चेमुळे माझ्या कामामध्ये योग्यतो फरक पडत गेला. प्रवेशाची रंगत वाढत चालल्याची जाणीव होऊ लागली. दादासाहेबांच्या भूमिकेने मी अक्षरश: झपाटला गेलो. नाटकातील संवाद आणि स्वगते या मध्येच मी गुरफटला गेलो. डोक्यामध्ये दादासाहेबांचे शब्द घुमू लागले. एकेका शब्दाचे वजन मला कमी जास्त करता येऊ लागले. भावनेचा उच्चांक गाठणे मला शक्य होऊ लागले. माझी स्वगते थरारून सोडणारी होत गेली.

आमच्या तालमी रात्री १॥-२ वाजेपर्यंत होऊ लागल्या. रात्रीचे माझे जागरण कितीही झाले, तरी सकाळी सात वाजतानाची माझी डॉ. किर्लोस्करांच्या घरची शिकवणी कधी चुकली नाही. नाटक ही माझी हौस होती पण शिकवणे हे माझे कर्तव्यकर्मच होते. शिक्षकी हा माझा धर्म होता. माझी हौस, माझा छंद, माझी आवड यांना माझ्या दैनंदिन कामामध्ये अडथळा आणू देत नसे. माझ्या मनावर मी खूपच नियंत्रण ठेवीत असे. शाळेच्या कामाबद्दल मुख्याध्यापकांनी किंवा वर्गामधील मुलांनी थोडी देखील नाराजी-नाखुषी दाखवू नये, याबद्दल मी खबरदारी दाखवीत होतो. शाळा आणि शिकवण्या हे माझे उदरनिर्वाहाचे, कुटुंबाचे पालनपोषण करण्याचे साधन असून नाटकात काम करणे ही माझ्या फावल्या वेळेची केवळ हौस होती. हे बंधन मी काटेकोरपणाने, निर्धाराने सांभाळले.

पाठांतर करण्यासाठी मला मोकळा वेळ मुळीच मिळत नव्हता. संध्याकाळी आम्ही सर्वजण एकत्र बसून जेवण करीत होतो. जेवण करीत असतांनाच मी माझी स्वगते मोठ्याने म्हणत असे. दीपक आणि ज्योती या माझ्या मुलांना देखील माझी स्वगते पाठ झाली होती. एखादा शब्द किंवा एखादे वाक्य चुकले, की ते माझी चूक बरोबर दाखवीत आणि सुधारणा करून मी स्वगते पुन्हा म्हणत असे. स्वगते पाठ होण्यासाठी मला या पद्धतीशिवाय अन्य तरणोपाय नव्हता. वसंतराव माझे प्रवेश अनेकदा घेत गेल्यामुळे माझे संवाद पाठ होणे सोपे गेले. माझा पाठांतराचा दोष तालमीमुळेच सुधारला जात होता.

वेड्या दामूबरोबरच्या संवादात माझे संवाद मला अत्यंत प्रेमाने, हळुवारपणाने आणि कमालीच्या जिव्हाळ्याने बोलावे लागत होते. वेड्याचे विचित्र चाळे वसंतराव हुबेहूब करीत असत. वेड्या दामूचा अभिनय ते अप्रतिम करीत असत. डोळे गरगरा फिरविणे, तोंडातून लाळ गळत ठेवणे, थोडा मोठा आवाज झाला माझा की एकदम दचकणे, जाण्यासाठी धडपड करणे, हा सारा अभिनय करीत असताना ते माझ्या अभिनयावर सहज मात करीत असत. वेड्या दामूबद्दलची माझी सहानुभूती आणि गोडसे यांचे अभिनय कौशल्य, यामुळे आमचे प्रवेश अति सुंदर होत असत.

माझी दादासाहेबांची स्वगते उत्कृष्ट जमली, तरच प्रेक्षक प्रभावित होणार याची मला पूर्ण जाणीव होती. गोडसे माझे एकेक स्वगत चारचार पाचपाच वेळा घेत असत. मी देखील सफाईदारपणे स्वगते म्हणण्याचा निश्चयच केला होता. माझे स्वगत चढत चढत जाई आणि एकदम वसंतराव म्हणत 'थांबा' माझे वर गेलेले विमान मला परत जमिनीवर आणावे लागे. भावनेचा गाठलेला उच्चांक मला एकदम खाली आणावा लागे. एकदोन सुधारणा करण्याच्या सूचना वसंतराव मला देत. शब्दांची फेक वेगळी व भावपूर्ण करण्यास सांगत. ते सारे ध्यानात घेऊन मी पुन्हा माझे स्वगत सुरूवातीपासून म्हणत म्हणत ते कळसाला नेण्याचा प्रयत्न करीत असे. वसंतरावांचे पूर्ण समाधान करणे ही माझी परीक्षाच होती. या परीक्षेमध्ये मी उतरल्याचे समाधानाने वसंतरावांच्या चेहऱ्यावरून मला स्पष्ट कळून येत असे. एकेक स्वगत असे अनेकवेळा म्हणण्यामुळेच स्वगत उत्तम पाठ होऊन जात असे. तालमी मुळेच माझा आत्मविश्वास द्विगुणीत होत असे. स्वगत उत्तम होत गेल्याने माझा आंतरिक आनंद रोजच्या रोज वाढतच चालला.

आमच्या तालमी सुरू झाल्यापासून रोज उपस्थित राहात होते आमचे हितकर्ते, ऑल् इंडिया रेडिओवरील, मराठी कार्यक्रमाचे निर्माते ल. रा. कान्त. पुढे पुढे तर आमच्या नाटकाच्या तीन्ही अंकांच्या तालमी होऊ लागल्या. कधी कधी तर रात्रीचे दोन वाजत असत. कान्त सुरूवातीपासून शेवटपर्यंत थांबलेले पाहून मला आश्चर्य वाटत असे. एकदा तर मी त्यांना त्याबद्दल विचारले देखील. ते म्हणाले, 'सगळेच प्रवेश मोठे रंगतदार होत असता पहिल्यापेक्षा दुसरा अंक आणि दुसऱ्यापेक्षा तिसरा अंक अधिकच प्रभावी आणि परिणामकारक होतो. तुमची स्वगते ऐकतच रहाविशी वाटतात. इतकी मोठी, भावनेचा उच्चांक गाठणारी स्वगते क्वचितच ऐकायला मिळतात. घरी जाऊन झोपण्यापेक्षां तुमचे काम पहाण्यातच खूप आनंद मिळतो. एक क्षणदेखील कंटाळवाणा होत नाही. नाटक उत्कृष्ट होणार यात शंकाच नाही.' माझा आत्मविश्वास वाढतच जात होता.

आमच्या नाटकाच्या तालमी सुरेख चालल्या आहेत, असं अनेकांना समजलं. अनेक मित्रमंडळी तालीम पहाण्यासाठी येऊ लागली. त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनाचा योग्य तो परिणाम जाणवत गेला. माझे नाटकातील काम ज्यांनी पूर्वी पाहिले होते, ते सर्वजण माझी दादासाहेबांची भूमिका पाहून विस्मयचकित होतं असत. माझे समाधान वाढत

असे. नाटकात काम करणारी दर्दी आणि जाणकार मंडळी आवर्जून तालमीच्या वेळी उपस्थित राहात असत. गोडसे यांचे दिग्दर्शन पाहून ही मित्र मंडळी अवाक् होऊन जात. आम्हा सर्वांचेचे ते कौतुक करीत असत. येणाऱ्या या सर्व मित्रांचे, चाहत्यांचे एकमत होत असे आमच्या नाटकाबद्दल.

कांताप्रमाणेच मधुकर बडवे, अनंत अरगडे, सुशीलाबाई फाटक आणि इतर कितीतरी जाणकार माणसे रोज उपस्थित राहत असत. नाटकाच्या तालमी पाहून सर्वांचे डोळे विस्फारलेले दिसत असत. आम्हा सर्वांच्याच आनंदाला पारावार उरत नसे. गोडसे यांच्या दिग्दर्शनामधील सूक्ष्म सूचना ऐकून व आमचा अभिनय पाहून, सारेजण दिपून जात असल्याचे जाणवत होते.

तालमीची रंगत वाढत असतानाच बातमी आली की स्थानिक नाटकांच्या स्पर्धा घेण्याचा विचार पक्का झालेला असून, परीक्षकांच्या मतानुसार नाटकांना क्रमांक दिले जाणार आहेत. आम्हा सर्वांच्या उत्साहाला उधाण आले. आपल्या नाटकाचा पहिला क्रमांक येण्यासाठी आम्ही सर्वजणच अधिकाधिक काळजीपूर्वक परिश्रम घेऊ लागलो. वसंतराव मात्र शांत आणि स्वस्थ होते. तालमी घेण्यात ते व्यग्र आणि व्यस्त होते. पहिला क्रमांक मिळो वा न मिळो, सर्व प्रेक्षकांना नाटकाचा प्रयोग सर्वांगसुंदर वाटावा, हीच त्यांची इच्छा होती. मामा तांदुळवाडीकर आमच्या नाटकाचे होते परिपार्श्वक - प्रॉम्पटर. आमच्यापेक्षा त्यांचा उत्साह जबरदस्त होता. सर्वांचे पाठांतर होण्यासाठी मामांची उपस्थिती अत्यावश्यकच वाटली आम्हा सर्वांना.

अडीच महिने सतत आमच्या तालमी चालल्या होत्या. तीन्ही अंकांची सलग तालीम सुरू झाली होती. वसंतराव, कुर्डूकर, अरगडे, बडवे यांनी नाटकासाठी लागणाऱ्या प्रॉपर्टीच्या - प्रवेशानुसार याद्या करण्यास सुरुवात केली. हे सर्वजण कलानिकेतन मधील कार्यकर्ते आणि अधिकारी होते. एकटा मी नवीन होतो, पाहुणा कलाकार होतो. पण तसा दुजाभाव कुणीही दाखविला नाही. मी देखील अत्यंत मनापासून सहकार्य दिले त्यांना. कोणताही परकेपणा जाणवू दिला नाही.

रंगीत तालमीची तारीख निश्चित केली वसंतरावांनी. रंगीत तालमीच्या अगोदर, एक आठवडा आधी, माझी आणि आमच्या शाळेतील सावनूर यांची माझ्या नाटकातील भूमिकेविषयी, स्वगतांबद्दल सखोल सूक्ष्म चर्चा झाली हेती. सावनूर होते वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध. एकेकाळी ते पुण्यातील डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी होते. बालगंधर्व, गणपतराव जोशी, गणपतराव बोडस, केशवराव भोसले, केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर, पेंढारकर, लोंढे अशा अनेकांची बहुतेक सर्व नाटके त्यांनी विचारपूर्वक पाहिली होती. नाट्याच नाटकमंडळींची गाजलेली सर्व नाटके त्यांनी चिकित्सक वृत्तीने पाहिली होती. नाट्याचा त्यांचा अभ्यास उत्तमच होता. एकदा मी शाळा सुटल्यानंतर त्यांना माझी स्वगते म्हणून दाखवली होती. त्यावर ते विचार करणार होते.

दुसरे दिवशी शाळा सुटल्यानंतर आम्ही दोघांनी एकत्र बसून माझी स्वगते टेप केली. सावनूर यांनी ती स्वगते अत्यंत लक्षपूर्वक ऐकली. करूण गंभीर अशी ती माझी स्वगते त्यांना आवडली. पण त्यांची सूचना अशी होती की मी माझ्या स्वगताने रसिक श्रोत्यांची अंतःकरणे केवळ पिळवटून टाकण्याने भागणार नाही. श्रोत्यांचे अंतःकरण फाडून टाकण्याइतका करूण भाव मी माझ्या त्या स्वगतामधून निर्माण केला पाहिजे. केवळ श्रोत्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू गोळा होण्याने काय साधणार ? एकच प्यात्यातील सिंधू आणि सुधाकर यांच्या पेक्षांही अधिक सामर्थ्य आहे दादासाहेबांच्या स्वगतांमध्ये, असं त्यांनी मला पटवून दिलं.

घरी गेल्यानंतर मी माझ्या स्वगतामधील शब्दांवर अधिक खोल विचार केला. दुसरे दिवशी मी माझी स्वगते अधिक करूण अशा शब्दांत म्हटली व पुन्हा टेप केली. ती ऐकत असतानाचा सावनूर मला आणखी सूचना देत होते. पुनःपुन्हा स्वगते म्हणवून घेत होते. माझी स्वगते अशा प्रकारे त्यांनी उत्कृष्ट बसवून घेतली. आठ दहा दिवस आमचा हा प्रयोग अखंड चालला होता. सावनूरांचे समाधान करू शकलो मी, यांतच माझा आनंद सामावला होता.

सावनूर मला मार्गदर्शन देत असल्याचे मी कुणालाही सांगितले नाही. त्यांच्या सूचनेप्रमाणे मी माझी स्वगते तालमीमध्ये म्हणू लागलो. वसंतरावांसह सर्वजणच माझ्या स्वगतामधील बदलामुळे आश्चर्यचकित होऊ लागले. मी केलेल्या बदलामुळे माझी स्वगते अतिशय प्रभावी वाटली सर्वांना-पण कुणीही मला त्याबद्दल विचारण्याचे धाडस केले नाही.

वसंतरावांच्या घरी रंगीत तालीम ठरली. सर्व प्रॉपर्टीसह सलग तीन अंक करण्याचे निश्चित झाले. वसंतराव रंगीत तालमीमध्ये एकही सूचना देणार नव्हते. कलानिकेतनची मंडळी आणि अन्य निमंत्रित उपस्थित राहणार होते. आम्ही सर्वजण अत्युत्सुक होतो रंगीत तालमीसाठी. मला म्हाताऱ्याची भूमिका करावयाची होती. धोतरे सोगा सोडलेले आणि लांब बाह्यांचा सदरा याबरच भागणार होते. माझ्या मोठ्या मिशांमुळे माझा चेहरा अधिकच उग्र दिसत होता. दिव्यांची उघडझाप करणार होते अनंत अरगडे. एका कोपऱ्यात वसंतरावांनी एक पर्णहीन, वाळलेल्या वृक्षाची योजना केली होती. रूक्ष, अरसिक, कोरड्या आणि करड्या स्वभावाच्या दादासाहेबांचे प्रतीक म्हणजे हा निष्पर्ण वृक्ष ! पार्श्वसंगीत वसंतरावांनी टेप करून ठेवलेच होते. रंगीत तालमीची जय्यत तयारी झाली.

रंगीत तालमीला आरंभ करण्यापूर्वी नाट्यदेवतेची आणि सरस्वतीची पूजा करण्यात आली. 'सरस्वती शारदा' ही प्रार्थना वसंतरावांनी अत्यंत भावपूर्ण म्हटली. उदबत्तीचा दरवळ सर्वत्र पसरला होता. वातावरण निर्मिती उत्तम झाली.

आम्ही सर्वांनी परस्परांना शुभेच्छा दिल्या. नाटकाला आरंभ झाला. सर्व पात्राचे पाठांतर उत्तम झाले असल्यामुळे कुठेही थांबावे लागले नाही. एकेक प्रवेश छान होत

होता. सर्वांच्या हालचाली देखील शिस्तीत आणि ठरल्याप्रमाणेच होत होत्या. अंधार-उजेड करण्याची व्यवस्था उत्तमच झाली.

माझे पहिलेच स्वगत मी सावनूर यांच्या सर्व सूचना अंमलात आणून म्हटले. एक प्रकारचे अतिगंभीर वातावरण निर्माण करण्यात मला यश आले. माझ्या पहिल्याच स्वगताने सर्वजण दिपून गेले. रोजच्या पेक्षा वेगळे स्वगत !

माझे काम रोजच्या पेक्षा अधिक प्रभावी व परिणामकारक करण्याचा प्रयत्न जीव तोडून मी करीत होतो. दुसऱ्या माझ्या स्वगताने सर्वांच्याच अंतःकरणाला पिळवटून काढले. शेवटच्या स्वगताने कहरच केला. ऐकणाऱ्यांच्या अंतःकरणाच्या चिंध्याच करून टाकल्या मी. सर्वांना आश्चर्याचा धक्काच बसला.

शेवटच्या प्रवेशात माझ्या अभिनयाने उच्चांक गाठला. गरिबाला एक पैसा दे भगवान, असं पदर पसरून, पुढे जात जात, दादा खिडकीबाहेर उडी मारून जाताच, शकूने 'दादा' अशी आर्त किंकाळी फोडली, तर बाकीची पात्रे दुःखावेग न आवरून आत निघून गेली. एकटे दामोदरपंत - वसंतराव डोळ्यांवर बोटे घट्ट ठेवून, आपले अश्रू आवरण्याचा प्रयत्न करीत निश्चल उभे होते. जीवघेणी शांतता पसरली आणि काही मिनिटे कुणाचीच छाती झाली नाही शांतता भंग करण्याची. थोड्या वेळानंतर वसंतराव डोळे पुसतच, मला हलक्या आवाजात म्हणाले, 'मोहोळकर, असं नाटक करायचं नाही परत.' माझी स्वगते रोजच्या पेक्षा वेगळीच झाली होती. आज वसंतराव, लीलाबाई, विद्या गोडसे आणि अन्य सर्व श्रोत्यांना अश्रू आवरणे कठिण झाले. माझ्या स्वगत भाषणांचा परिणाम योग्य असाच झाला. तीन अंक चढत्या श्रेणीने रंगत गेले त्या दिवशी आणि शेवट सुन्न करणारा झाला !

पुढे रोजच तिन्ही अंकांच्या तालमी सलग करीत गेलो आम्ही. नाटक छानच बसले होते. तिसरा अंक झाल्यानंतर, एके दिवशी मधुकर बडवे यांनी एक अफलातून विचार मांडला. ते म्हणाले, 'नाटकाचा तिसऱ्या अंकानंतरचा पडदा पडताच आपण माईकवरून जाहीर करू की मोहोळकरांना खरोखरच वेड लागले असावे. कारण ते कुठंतरी निघून गेले आहेत.' मी त्यांना म्हणालो, 'असं काही जाहीर करू नका. माझे आईवडील येणार आहेत नाटक पाहण्यास. मी वेडा झाल्याचे ऐकून त्यांचे हृदय एकदम बंद पडेल आणि ते मरण पावतील.'

नाटकाच्या स्पर्धा सुरू झाल्या. आमचे नाटक पहिल्या क्रमांकावर येणार याची मला पुरेपूर खात्री वाटत होती. आमच्या नाटकाचा पहिलाच प्रयोग होणार होता महाराष्ट्र मंडळामध्ये. आमच्या नाटकाचा प्रयोग पाहण्यासाठी माझे माईबाबा, अण्णा, सावनूर, व्यंकटराव, लीला, ज्योती, दीपक आणि आणखी अनेक मंडळी आली होती. महाराष्ट्र मंडळातील शामियाना गच्च भरला होता. बहुतेक सर्व तिकीटे विकली गेली होती. कलानिकेतन या संस्थेचे वेड्यांचं घर पहाण्यास उपस्थित होते, हैद्राबाद-सिकंदराबादमधील नाटकाचे दर्दी, मर्मज्ञ जाणकार, नाट्यवेडे कलावंत, दिग्दर्शक आणि कलानिकेतनचा चाहता वर्ग.

नाटकाचा शुभारंभ होण्यापूर्वी नाट्यदेवतेची आणि सरस्वतीची पूजा करण्यात आली. सरस्वती शारदा ही प्रार्थना वसंतराव आणि त्यांच्या सहकारी मंडळींनी इतकी सुरेख आणि सुरेल म्हटली की त्या मधुर आणि भक्तिपूर्ण कोमल स्वरांनी माझे मन आनंदाने भरून आले. वातावरण निर्मिती सुंदर झाली. माझा मूड लागला झकास. प्रार्थनेच्या स्वरांनी मी मंत्रमुग्ध झालो. नाटकातील माझ्या एन्ट्रीसाठी मी तयार झालो.

कलानिकेतनच्या चिटणीसांनी पडदा उघडण्यापूर्वीच सर्व प्रेक्षकांचे, कलानिकेतनच्या चाहत्यांचे मनापासून स्वागत केले. नाटकाचे व नाटककाराचे नाव, पात्रांची नावे, नाटकाचे व्यवस्थापक, नेपथ्यकार, रंगभूषाकार, संगीत दिग्दर्शक, दिग्दर्शक या सर्वांची माहिती सांगत असतानाच सभागृहामध्ये संपूर्ण शांतता पसरल्याचे आम्हाला सहज जाणवले. सारे प्रेक्षक नाटक पाहण्यासाठी अत्यंत उत्सुक झाले असावेत. दिवा-स्वप्नावर आधारलेले नवे नाटक !

नाटक सुरू होण्यापूर्वी खरं म्हणजे प्रत्येक पात्राचा हात हातात घेऊन शुभेच्छा द्यावयास हव्या होत्या. रंगीत तालमीमध्ये माझी भूमिका जबरदस्त झाली. मी बाजी मारणार असल्याची जाणीव झाली असणार सर्वांचीच. नाटकाला आरंभ होण्यापूर्वी मला व्यक्तिशः कुणीही शुभेच्छा दिल्या नाहीत. दिनकर बिंदू, सुशीलाबाई, अरगडे, बडवे यांनी सर्वांनाच शुभेच्छा दिल्या. Best of Luck for all of you असं म्हणून. मला ही गोष्ट खूपच खटकली. मी कलानिकेतनचा सभासद नव्हतो. पाहुणा कलाकार होतो ना मी ! असं करायला नको होतं.

तिसरी घंटा दिली गेली. समोरचा पडदा उघडला गेला. सहजच मी सभागृहाकडे दृष्टी टाकली. महाराष्ट्र मंडळाचे सभागृह खचाखच भरलेले दिसले. नाटक सुरू झाले. एकेक प्रवेश रंगत गेला. दिवा-स्वप्नाचा, वेड्या दिगूचा प्रवेश सुरू होण्यापूर्वीच वठलेल्या निष्पर्ण वृक्षावर प्रखर प्रकाशाचा झोत टाकला गेला. दिव्यांची उघडझाप करण्यात आली. विजेच्या कडकडाटाचा भास व्हावा म्हणून पत्र्याचा आवाज करण्यात आला. सारा प्रेक्षकवर्ग या आवाजाने थरारून गेला असणार. वेड्या दामूच्या आगमनाचीच ही सूचना !

वेडा दामू दबकत, हलक्या पावलांनी, भीतीने थरकापत, वेड्याचे चाळे करीत, डोळे इकडे तिकडे फिरवीत, विचित्र हसत स्टेजवर आला. त्याचे फाटलेले कपडे, तोंडावरील काळा पांढरा रंग, वेड्यासारखा आविर्भाव प्रेक्षकांनी बरोबर टिपला असणार. वेड्या दामूबद्दल कणव निर्माण करण्यात वसंतराव यशस्वी झाले. दिवास्वप्नाचे - दिव्यांची भरभर केलेली उघडझाप - विजेचा कडकडाट - हे सारे पाहून आणि ऐकून सारे सभागृह आश्चर्यचकित झाल्याचे जाणवत होते. माझा आणि वेड्या दामूचा हा प्रवेश इतका प्रभावी झाला की साऱ्या प्रेक्षकांनी कडाडून टाळ्या दिल्या. माझ्या अंगावर मूठभर मांस चढले आणि नाटक खूपच रंगणार याची खात्री पटली.

पहिला अंक संपला. पडदा पडला. अभिनंदन करण्यासाठी प्रेक्षकांनी एकच गर्दी

केली. मी एका कोपऱ्यात शांत बसून राहिलो होतो. परगावहून आलेल्या शांताबाई जोग आणि सुलोचना लिमये, माझा परिचय नसताना देखील, माझ्याजवळ आल्या आणि मला अत्यानंदाने म्हणाल्या, 'तुमचे काम खूपच छान होत आहे, बरं का. अभिनंदन !' अनंत अरगडे, सुशीलाबाई फाटक, दिनकर बिंदू ही मंडळी आली होती. पण त्यांना कुणालाही वाटलं नाही की माझी ओळख करून द्यावी, शांता जोग आणि सुलोचना लिमये यांच्याशी. त्या दोघींचे आनंदाने प्रफुल्ल झालेले बोलके चेहरे मला माझ्या उत्तम अभिनयाची पावतीच देत होते. त्या दोघींचा आनंद दुथडी भरून वाहत होता. मी हात जोडून त्या दोघींना धन्यवाद दिले. इतरांच्यापैकी कुणीही माझे कौतुक करायला पुढे आला नाही. मला तशी अपेक्षाही नव्हती. अत्यानंदाने, अतिशय उत्सुकतेने त्या दोघी दुसरा अंक पाहण्यासाठी बाहेर गेल्या.

दुसरा अंक आमच्या कल्पनेनुसार पहिल्या अंकापेक्षा अधिकच रंगला. माझ्या प्रभावी स्वगताने सारा प्रेक्षक वर्ग विस्मयचकित झाल्याचे स्पष्ट जाणवले. दादासाहेबांचे मानसिक संतुलन बिघडत चालल्याची कल्पना आली सर्व प्रेक्षकांना. बोलत बोलत मी पुढे जाऊन, एका कोपऱ्यामध्ये उभा राहिलो. दादासाहेब वेडे होण्याच्या मार्गावर असल्याचा माझा अभिनय छानच वठला. दामूप्रमाणे डोळे फिरविले, वेडाचा झटका येत असल्याची चुणुक दाखविणारे एक सूचक वाक्य मी म्हटले. जवळच बसलेल्या प्रेक्षकांना मी वेडा होणार याची कल्पना आली असावी. त्यांनी 'चुक' 'चुक' असा प्रतिसाद दिल्याचे मी ऐकू शकलो. माझ्या अभिनयाने आवश्यक तो परिणाम साधला आहे, याची जाणीव झाली मला. खूप समाधान झाले मला. वसंतरावांनी वेड्या दामूचा अभिनय इतका सुरेख केला की माझ्या अभिनयाचा परिणाम साफ पुसला गेला. वेड्या दामूने माझ्या अभिनयाला खाऊन टाकले.

दुसरा अंक पहिल्या अंकापेक्षा वरचढ झाला होता. अभिनंदन करणारी मंडळी धावतच आली. शांताबाई जोग आणि सुलोचना लिमये अत्यानंदाने आल्या माझ्याजवळ आणि म्हणाल्या, 'तुमचे काम फारच सुरेख होत आहे. तुमचा अभिनय जबरदस्त होत आहे.' माझ्या कामाची तारीफ करण्यासाठी त्यांच्याजवळ शब्द नव्हते. इतर बऱ्याच प्रेक्षकांनी मला शाबासकी दिली. हैद्राबादेतील अनेक मान्यवर नट माझ्याजवळ आले आणि त्यांनी माझ्या कामाची तोंडभरून स्तुती केली. माझ्या अभिनयाने ते भलतेच प्रभावित झालेले दिसले. माझ्या श्रमाचे आणि वसंतराव यांच्या दिग्दर्शनाचे सार्थक झाल्याचे समाधान वाटले मला.

तिसऱ्या अंकाची सुरुवातच अप्रतीम झाली. एकेक प्रवेश चढत्या क्रमाने रंगतच गेला. वेड्या दामूच्या ऐवजी आता तो परागंदा झालेला दामू, दामोदरपंत होऊन परत आला होता. दामोदरपंताने आपल्या मधुर वागण्याने, गोड बोलण्याने, विनम्र स्वभावाने दादासाहेबांच्या संपूर्ण कुटुंबाला वश करून घेतले होते. त्यामुळे दादासाहेबांचे मानसिक संतुलन अधिकच बिघडत चालले. वेडेपणाची त्यांची छटा आता खूपच वाढली.

दामोदरपंताचा प्रभाव त्यांना असह्य होऊ लागतो. एका क्षणी दादासाहेब दामोदरपंतास मारण्यासाठी आपली काठी उगारतात आणि एकाएकी काठी हातातून गळून पडते त्यांच्या. वेड्या दामूप्रमाणेच ते आर्ततेने ओरडून म्हणू लागतात, 'नका हो, नका मला मारू.' दादासाहेबांचे वेडेपण सर्व प्रेक्षकांच्या ध्यानात येते. शेवटी दादासाहेब- 'गरिबाला एक पैसा दे भगवान !' असं पदर पसरून, भीक मागत मागतच, मागील खिडकीतून उडी मारून जातात. दामोदरपंत, दादासाहेबांच्या पत्नी, त्यांचे दोन मुलगे, जात असलेल्या दादासाहेबांच्याकडे विस्फारलेल्या डोळ्यांनी पहातच निश्चल उभे राहतात. शकूला, दादासाहेबांच्या मुलीला हा धक्का असह्य होऊन ती 'दादा' अशी आर्त किंकाळी मारून दगडासारखी होते. नाटकाचा पडदा पडतो. पण सारे सभागृह शांत आणि सुन्न होते. एकही प्रेक्षक जागचा उठत नाही. नाटकाचा झालेला भयंकर परिणाम ! नाटक संपले आहे, असं माईकवरून सांगावे लागते. हळूहळू एकेक प्रेक्षक खुर्चीवरून उठू लागतो आणि एक शब्दही न बोलता सभागृहातून बाहेर पडू लागतो.

अण्णा, व्यंकटराव, सावनूर भरल्या डोळ्यांनी आत येतात आणि मिठी मारून आपला आनंद व्यक्त करतात. माईबाबा गर्दीतून हलक्या पावलांनी, माझ्याजवळ येतात आणि माईला अश्रू आवरत नाहीत. ती रडू लागते. बाबा म्हणतात, 'व्वा, फारच छान. नाटक उत्कृष्ट झाले.' त्या सर्वांना मी विनम्रतेने नमस्कार करतो. शांताबाई जोग, सुलोचना लिमये, सुशीलाबाई, दिनकर बिंदू, अरगडे, बडवे, कलानिकेतनचे अध्यक्ष न्यायमूर्ती एकबोटे इत्यादींच्या आनंदाला पारावार उरलेला नसतो. स्तुतिसुमनांचा वर्षाव पडतो माझ्यावर. मला धन्य धन्य होऊन जाते.

आमच्या कलानिकेतनच्या नाटकाबरोबरच हैदराबादमधील आणखी दोन नाट्यसंस्थांची नाटके सादर करण्यात आली. आमच्या नाटकालाच पहिला क्रमांक मिळणार यात दुमत होण्याची शक्यताच नव्हती. पण पडद्यामागे कारस्थान रचण्यात आले. नाटकाच्या स्पर्धा होणार नाहीत असे जाहीर करण्यात आले. चिठ्ठ्या टाकण्याचा पर्याय सुचविला गेला. नाट्यसंमेलन होणार होते फक्त दोन दिवस. आमच्या नाटकाला मिळाला तिसरा क्रमांक. म्हणजे नाट्यसंमलेनाचे सूप वाजल्यानंतरच आमचे नाटक होणार होते. नाट्य संमेलनासाठी खास आलेले, बाहेरगांवचे प्रतिनिधी आपापल्या गांवी परत गेल्यानंतर आमचे नाटक होणार. हैदराबादेतील राजकारण किती खालच्या पातळीवर उतरू शकते, याचा एक नमूनाच सर्व बाहेरच्या प्रतिनिधींना पहायला मिळू शकला. हीन प्रवृत्तीचे , मत्सराग्नीचे सार्वजनिक प्रदर्शन झाले ! आम्हा सर्वांचेच हे दुर्दैव ! नाट्य संमेलनामध्ये भालचंद्र पेंढारकरांच्या ललितकलादर्श या नाट्यसंस्थेचे 'दुरितांचे तिमिर जावो' हे मुंबईचे नाटक सादर करण्यात आले. भालचंद्र पेंढारकरांचा दिगू अविस्मरणीय झाला. मामा पेंडसे यांनी पंतांची निर्दय-निर्घृण दुष्टनायकाची भूमिका लाजवाब केली. भावबंधन मधील घनश्यामानंतर असा खलनायक इतर कोणत्याही नाटकात दिसला नव्हता. चित्तरंजन

कोल्हटकरांनी नाटकातील खटकेबाज संवाद चिरस्मरणीय केले. मास्टर दत्ताराम यांनी बापूची भूमिका करून नाटकाची रंगत वाढवली.

व्यावसायिक नाट्य संस्थेने सादर केलेल्या या नाटकाने दिग्दर्शक मैराळ यांचे दोन गैरसमज पार धुतले गेले. आम्ही हेच नाटक, दुरितांचे तिमिर जावो बसवायला आरंभ केला तेव्हा मैराळ यांनी एक नवाच विचार मांडला. या नाटकातील खलनायक, पंत ही भूमिका ते करणार होते. विनोदी खलनायक मैराळ प्रेक्षकांना दाखवून एक नवाच प्रकार करणार होते. मला आणि सुरेश गंगाखेडकरला हा मैराळ यांचा अट्टाहास मुळीच आवडला नाही. विनोदी खलनायक नाटकातील संघर्ष एकदम फिका करून टाकतो. आम्ही दोघांनी त्यांना खूप सांगून पाहिले. पण ते आपला हेका सोडायला तयार नव्हते. मग आम्ही दोघांनी त्यांना सांगून टाकले की जर ते आपला निर्धार सोडणार नसतील, तर आम्ही दोघे नाटकातून अंग काढून घेणार. मैराळ यांचा नाईलाज झाला आणि ते खरा खलनायक करायला तयार झाले.

मामा पेंडसे यांनी दुष्ट असा खलनायक अत्यंत प्रभावी केला. पंतांचा क्रूर, कपटी आणि निघृण स्वभाव मामांनी असा काही दाखविला की आम्हाला भावबंधन मधील चिंतामणराव कोल्हटकरांचा घनश्यामच आठवला. दिगूची आई निवर्तल्याची वार्ता ऐकता क्षणीच पंतांनी आपल्या गळ्यातील पांढरे उपरणे काढून डोक्याला भराभरा गुंडाळून अंत्ययात्रेची तयारीच दाखवली. मामांच्या या अभिनयाला कडाडून टाळ्या मिळाल्या. आम्ही देखील मैराळांना हेच आवर्जून सांगत होतो. मामा पडसे यांचा खलनायक पाहून मैराळ यांना आपली चूक उमगली. सोनारानेच कान टोचले.

मा. दत्ताराम यांची 'अच्छा' 'अच्छा' असं अनेक वेळा म्हणण्याची रसिकांनी टवाळीच केली. एकदा अच्छा म्हणणे योग्य वाटले. बापूच्या अगोदरच प्रेक्षक अच्छा म्हणू लागले. त्यामुळे मास्टर दत्ताराम शरमले आणि त्यांच्या कामाचा प्रभाव कमी पडला. बापूची भूमिका करीत असतांना ही गोष्ट मी अचूक जाणली आणि अच्छा अच्छा हे शब्द परत परत म्हणण्याचे सहेतुकपणे टाळले. माझा बापू सर्व प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला.

नाटकाचा पहिला अंक संपला आणि बाहेर पडलो. समोरून मैराळ आले आणि मला म्हणाले, 'मोहोळकर, मला माझी कल्पना बदलण्यास तुम्हीच भाग पाडले. तुम्हाला नाटकातील बारकावे बरोबर समजतात. माझ्या चुका मला समजल्या. धन्यवाद. बापूची भूमिका मा. दत्ताराम पेक्षांही तुम्ही अधिक उजवी केलीत.' मैराळ यांच्यासारख्या प्रथितयश दिग्दर्शकाला आपली चूक समजून देण्यात मला यश लाभले. नाटकाबद्दलची माझी जाण उत्तम आणि बिनचूक असल्याची प्रचीतीच आली मला. अभिमान वाटला माझ्या जाणकारीचा. माझा बापू अधिक चांगला वाटला प्रेक्षकांना आणि त्याबद्दल मला बक्षिसदेखील दिले होते.

भालचंद्र पेंढारकरांचा दिगू अप्रतिम वाटला. चित्तरंजन कोल्हटकरांनी दिगूचा मित्र

सुरख उभा केला. मामा पेंडसे यांचा खलनायक पंत हा अंतर्बाह्य खलनायक जाणवला. अशा खलनायकाला जोड्याने मारावे अशी तीव्र इच्छा सर्व प्रेक्षकांच्या मनामध्ये जागविण्यात, मामा यशस्वी झाले होते. घनश्यामानंतर मला मामांचा पंत हाच खलनायक पटला.

नाट्यसंमेलन होतं फक्त दोनच दिवस. आमचं वेड्याच घर आलं तिसरे. नाट्यसंमेलन संपल्यानंतरच आमचे नाटक होणार होते. नाट्यसंमलेनाचे अध्यक्ष होते नटवर्य नानासाहेब फाटक. पुण्यामुंबईतून आणि इतर शहरातून आलेल्या प्रतिनिधींना पहिली दोने नाटके पहाता आली. आमच्या सुदैवाने आमच्या नाटकाचे दिवशी नानासाहेब फाटक हैदराबादेतच असणार आहेत, असं समजले. नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष तरी आमचे नाटक पाहू शकणार आहेत, हीच एक फार समाधान देणारी गोष्ट होती. दुधाची तहान ताकावर. दुःखातले सुख.

नाट्यसंमेलाचे सूप वाजल्यानंतर होणाऱ्या आमच्या नाटकाची तयारी उत्तम झालीच होती. पहिला प्रयोग होता रंगीत तालमीचा. दुसरा प्रयोग झाला होता स्पर्धेच्या निमित्ताने. आता होणारा आमच्या नाटकाचा तिसरा प्रयोग होता. पहिल्या दोन प्रयोगातील त्रुटी आणि उणीवा आम्ही कटाक्षाने भरून काढल्या होत्या. सर्व सुधारणा आम्हांला वसंतरावांनी समजावून दिल्याच होत्या. आमचा हा तिसरा प्रयोग सर्वांग सुंदर आणि प्रभावी होणार, याची खात्रीच वाटत होती आम्हाला.

या प्रयोगाच्या वेळी देखील महाराष्ट्र मंडळाचे सभागृह गच्च भरले हाते. शामीयान्याच्या बाहेर देखील खुर्च्या टाकून प्रेक्षकांची सोय करावी लागली होती. आमच्या नाटकाची चर्चा गावभर भरपूर झाली होती. त्यामुळे नंटाक पहाण्यास उत्सुक अशा प्रेक्षकांनी एकच गर्दी केली होती. कुठेही बसून किंवा उभे राहूनही नाटक बघण्याची तयारी होती रसिक प्रेक्षकांची. हे सारं आमच्या कानावर आलं आणि आम्हाला खूप आनंद वाटला. पहिल्या दोन प्रयोगापेक्षा हा आमचा खास प्रयोग अधिक प्रभावी आणि अविस्मरणीय करून दाखविण्याची आम्ही प्रतिज्ञाच केली. माझ्या कामाची खूपच तारीफ झाली होती. सर्वत्र प्रशंसाच ऐकू येऊ लागली होती. माझे अनेक मित्र, चाहते आणि शिक्षकबंधू आवर्जून आले होते.

या प्रयोगामध्ये फोटो काढण्याचे ठरले होते. फोटोचा खर्च आम्ही सर्वजणच करणार होतो. कलानिकेतनला या खर्चाचा भार पडू देणार नव्हतो. पहिल्याच प्रयोगाला वसंतरावांनी फोटोग्राफरला आवर्जून आणले होते. नाटक पहात असतांनाच त्याला कल्पना आलीच हाती, की कोणकोणत्या प्रसंगांचे फोटो काढायला हवेत. वसंतरावांनी काही खास जागा फोटोग्राफरला स्वतः दाखविल्या होत्या. आमचा उत्साह शतपटीने वाढण्यास या फोटो काढण्याच्या कल्पनेने मदतच केली, आम्ही सर्वजण कसून प्रयत्न करणार होतोच. नाटकाचा हा तिसरा प्रयोग पहाण्यास उपस्थित राहणार होते, नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष नटवर्य

नानासाहेब फाटक. आमचा प्रयोग सर्वोत्कृष्ट होणारच असा आम्हा सर्वांना आत्मविश्वास वाटत होता.

आमचा निर्धार, आमचा विश्वास आणि निश्चय एकदम खरा ठरला. या आमच्या नाटकाचा तिसरा प्रयोग सुरूवातीपासूनच रंगत चालला. वेड्या दामूच्या एन्ट्रीला प्रेक्षकांनी टाळ्या दिल्या. वसंतरावांच्या कल्पकतेला रसिकांनी पावतीच दिली. माझा व वेड्या दामूच्या प्रवेशाने कहरच केला. माझा आवाज अधिकच कोमल, हळूवार आणि प्रेमळ बनला. वसंतरावांचा वेडा दामू पाहूनच त्याच्याबद्दल प्रेक्षकांच्या मनामध्ये असीम करूणा आणि सहानुभूती उत्पन्न झाल्याचे जाणवले. त्यांचा वेड्याच्या मेकअपनेच बाजी मारली. तोंडाला लावलेला काळा रंग, डोळ्यात पांढरी चिपडे दिसावीत म्हणून लावलेला पांढरा रंग, सतत वाहणारी लाळ, गरगर फिरणारे डोळे, फाटके कपडे आणि टोपी, अधून मधून अंग खाजवणे, आवाजाने दचकणे, इकडे तिकडे भयचकित होऊन पाहणे, यामुळे दामू साक्षात वेडाच वाटला. दिव्यांची उघडझाप, पत्र्याचा कडकडाट यामुळे प्रसंग थरारक झाला. नेहमीपेक्षा हा आमचा प्रवेश अधिकच रंगत गेला. दामू गेला. आरडाओरडा , राग आणि क्रोध आम्ही जबरदस्तपणे दाखवू शकलो. पहिला अंक संपला. पडदा पडला. टाळ्यांचा कडकडाट ऐकूनच आम्हाला समाधान वाटले.

पहिल्या अंकानंतर अभिनंदनाचा पाऊसच पडला आम्हा सर्वांवर, अंगावर मूठभर मांस चढले, प्रशंसेने, स्तुतीने, गौरवोद्गाराने कान तृप्त झाले. श्रमांचे सार्थक झाले आमच्या आणि वसंतरावांच्या. दुसऱ्या अंकासाठी आम्हा सर्वांचाच उत्साह दुप्पट वाढला. अन्य नाट्यसंस्थामधील कितीतरी नायक, नायिका, नट, दिग्दर्शक यांनी केलेल्या कौतुकाने मन भरून आले. साधना संघाचे झाडून सारे सभासद खास माझ्यासाठी येऊन गेले. मी साधना संघाच्याच नाटकामध्ये काम केलेला नट होतो ना ! धन्यता वाटली मला. सर्वांना धन्यवाद दिले मी.

दुसऱ्या अंकाची सुरूवात जबरदस्त झाली. एकेक प्रवेश अधिकाधिक प्रमाणात रंगतच गेला. माझ्या स्वगताने प्रेक्षक विस्मयचकित झाल्याचे स्पष्ट दिसले. कडाडून टाळ्या मिळाल्या माझ्या प्रभावी स्वगताला. दामूच्या प्रवेशाने उच्चांकच गाठला. मी भान विसरून काम केले. माझे दुसरे स्वगत उत्कृष्ट जमले. परत टाळ्या मिळाल्या. प्रत्येक प्रवेश झकास होऊ लागला. या दुसऱ्या अंकामध्ये तीनचार वेळा टाळ्यांचा कडकडाट झाला. आमच्या यशाचीच ही पावती होती. दुसरा अंक चढतच गेला.

दुसऱ्या अंकानंतर सभागृह टाळ्यांनी दणाणून गेले. अनेकजण धावले स्टेजकडे. खूपच गर्दी झाली आमच्याभोवती. अभिनंदन करणाऱ्यांची रीघच लागली. वेड्या दामूने कहरच केला होता. त्यांच्याभोवती अनेकजण जमा झाले. शाबासकी देऊ लागले. ओळखीच्या प्रेक्षकांपेक्षा अनोळखी व्यक्तींनी ~~केलेल्या~~ अभिनंदनामुळे, स्तुतीने आम्ही सर्वजणच भारावून गेलो. कितीतरी प्रेक्षकांना मी कधीही पाहिले नव्हते. पण ते मनापासून

पशंसा करीत होते, हे मात्र खरे. ज्या दोन संस्थांची नाटके झाली होती, त्या नाटकातील सर्व नटवर्गाने केलेल्या कौतुकाने त्यांच्या मनाचा मोठेपणा मला स्पर्शून गेला. श्रीकांत पाठक या गाजलेल्या नायकाने तर मला 'दादा' असं म्हणून खाली वाकून नमस्कार केला. डॉ. वसंत साठे यांनी मला मिठीच मारली. आमच्या संस्थेतील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक प्राध्यापक, पदाधिकारी यांनीदेखील तोंडभरून कौतूक केले माझ्या अभिनयाचे. पाठ थोपटली अनेक डॉक्टर्स, वकील आणि नावाजलेल्या व्यक्तींनी. एवढा मोठा प्रतिसाद अपेक्षिला नव्हता मी.

तिसऱ्या अंकानंतर नाटकाचा कळसच गाठला. आम्हां सर्वांच्याच कामाने उच्चांक गाठला. वसंतरावांचा दामोदरपंत प्रेक्षकांनी पसंत केला आणि त्याच्या समंजस, सहिष्णु वृत्तीची सुरेख छाप पडली सर्वांच्या मनावर. आम्ही सर्वजण आश्चर्याने थक्कच झालो त्यांच्या सफाईदार अभिनयाने, मृदु बोलण्याने आणि आकर्षक हालचालींनी. दादासाहेब वेडे होत असल्याची चिन्हे अनेक जाणकार प्रेक्षकांनी अचूक हेरली आणि चुकचुक असे शब्द मला ऐकू आले. शेवटचा प्रवेश तर थरारून टाकणारा झाला. दामोदरपंतांना मारण्यासाठी मी माझी काठी उगारली. तेव्हा दामोदरपंत मान खाली घालून, हात निश्चल ठेवून, विनम्रतेने उभे राहिलेले मी पाहू शकलो. रागाने मी थरथरतच होतो. माझ्या नकळत काठी माझ्या हातातून गळून पडली. माझे हावभाव बदलले. डोळे तिरके झाले. दादासाहेब वेडे झाले, हे प्रेक्षकांना सहजच कळले. गरिबाला एक पैसा दे भगवान असं पदर पसरून म्हणतच दादासाहेब मागील खिडकीकडे जाऊ लागलेले सर्वांनी पाहिले आणि ते अवाक् होऊन दगडासारखे उभे राहिले. शकूला हा धक्का सहन होणे शक्यच नव्हते. तिकडे दादासाहेब खिडकीतून उडी मारून पळून गेले आणि इकडे त्या निरागस-निष्पाप मनाच्या शकूने 'दादा' अशी आर्त किंकाळी फोडली. सर्व प्रेक्षकांची अंतःकरणे विदीर्ण करणारी, फाडून टाकणारी करूण किंकाळी ! तिसरा अंक संपला. पडदा पडला. पण प्रेक्षक सुन्न होऊन खुर्च्यांना खिळून राहिले. कुणीही खुर्चीवरून उठला नाही. संपूर्ण सभागृहात भीषण शांतता पसरली होती. अनेक प्रेक्षकांनी डोळे टिपले, असं मला नंतर सांगण्यात आले. टाळ्या मारण्यास विसरले प्रेक्षक. जड अंतःकरणाने, एक शब्दही न बोलता, हळूहळू एकेकजण सभागृहाबाहेर जाऊ लागला. नाटक संपल्याचे सांगावे लागले व्यवस्थापकांना.

थोड्या वेळानंतर रसिकांच्या झुंडी रंगपटामध्ये घुसल्या. अभिनंदन करण्यासाठी आम्हा सर्वांना त्यांनी गराडाच घातला. अशा तुफान गर्दीतून वाट काढीत काढीत अनंत अरगडे नाट्याध्यक्षांना कसे बसे माझ्याजवळ घेऊन आले. माझ्या पाठीवर शाबासकीचा हात फिरवून नानासाहेब म्हणाले, 'व्वा, अगदी जीव तोडून काम केले तुम्ही. मनापासून अभिनंदन.' आणखीही पुढे नानासाहेब बोलले असते. पण त्यांना खेचून अरगडे यांनी वसंतरावांकडे नेले. नानासाहेबांनी त्यांच्या दिग्दर्शन कौशल्याचे विशेष कौतुक केले. जाताजाता त्यांनी नाटक उत्तम केल्याबद्दल आम्हां सर्वांचेच अभिनंदन केले. नानासाहेब

फाटक यांनी नाटक पूर्ण पाहुन, माझे आणि इतरांचे अभिनंदन केले. एवढे यश आम्हाला रग्गड झाले. आमच्या परिश्रमांचे सार्थकच झाले!

नाट्यसंमेलन संपले, त्यानंतर आमचे नाटक उत्कृष्ट झाले. त्यानंतर माझ्या प्रशंसेला पारावारच उरला नाही. अनेकजण मला 'दादा' म्हणू लागले. सर्वांचाच मी दादा झालो. श्रीकांत पाठक हे उत्तम नट आणि कसबी दिग्दर्शक होते. माझी दादाची भूमिका त्यांना इतकी भावली, की कुठेही भेट झाल्यानंतर ते मला खाली वाकून नमस्कार करीत आणि 'दादा' असेच संबोधीत. लीलाताई यांनी तर 'दादा' हेच माझे नाव ठेवले. त्या मला 'दादा' अशीच हाक मारू लागल्या. हैदराबादमधील अनेक नायक-नायिका-नटवर्य-दिग्दर्शक माझ्या दादाच्या अभिनयाने दिपून गेले. नाट्यसृष्टीतील मी दादाच बनलो. महाराष्ट्र मंडळातील कित्येकजण मला दादा म्हणूनच मान देऊ लागले. दादाच्या भूमिकेमुळेच मी प्रख्यात नट झालो.

अनेक नटांना, नटवर्यांना, प्रख्यात दिग्दर्शकांना नतमस्तक केले या माझ्या दादाच्या अभिनयाने. अभिनयाचा एक आदर्शच समोर ठेवला मी. या माझ्या यशामध्ये सिंहाचा वाटा होता माझ्या दिग्दर्शकांचा-वसंतरावांचा. त्यांनी अविश्रांत कष्ट करून माझ्याकडून अभिनय करून घेतला. सारे श्रेय त्यांचेच, माझ्या सारख्या नवोदित नटाकडून त्यांनी ही अवघड भूमिका भरपूर सुचना देऊन, सुधारणा घडवून आणून, मला कसोशीने शिकविले. गुणी गुणमं वेत्ती- याचीच प्रचीती आली मला. वसंतरावांच्या दिग्दर्शन कौशल्यानेच हा चमत्कार घडवून आणला.

माईबाबांना माझी भूमिका अतिशय आवडली. माई तर म्हणू लागली की, मी या नाटकाचे फार प्रयोग करू नयेत. मला वेड लागेल, अशीच तिला साधार भिती वाटू लागली. बाबांना खुप आनंद झाला. माझे नाटकातील काम बघून माझ्या आईवडिलांनी माझे हे नाटक पाहिले याचाच मला खरा आनंद झाला. या माझ्या आनंदाला सीमाच नव्हती. 'वेड्याचे घर उन्हात' या नाटकानेही एक नवाच इतिहास घडविला.अनेक नाटकातून नायकाच्या भूमिका करून गाजलेल्या कितीतरी नटवर्यांना मी पराभूत केले. हीरोंना खाली पहायला लावले. अनेकांचा अहंकार धुळीला मिळवण्यात मला यश आले. ही सारी कर्तबगारी वसंतरावांची, हे कर्तृत्व वसंतराव गोडसे यांचेच. मी मी म्हणणारे स्थानिक नट माझ्यासमोर नतमस्तक झालेले पाहिले मी. माझ्यासारख्या नवख्याला या शिखरावर नेणारे माझे दिग्दर्शक वसंत गोडसे यांना लाख लाख शुक्रिया!

अण्णा म्हणजे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जी. डी. कुलकर्णी. नाट्याभिनय प्रथम शिकविला साधना संघाच्या मैराळ यांनी पण पैलू पाडण्याचे, अभिनयातील सर्व बारकावे माझ्याकडून कुशलतेने करून घेणारे गोडसे यांनाच सारे श्रेय दिले अण्णांनी. भेटेल त्या व्यक्तीला अण्णा अभिमानाने सांगत सुटले माझ्या दादाच्या भूमिकेबद्दल, माझ्या प्रदीर्घ आणि अविस्मरणीय स्वगतांबद्दल, वेड्याचं घर उन्हातं, या नाटकांन नवा अध्याय

सुरू केल्याबद्दल कलानिकेत या संस्थेच्या यशाबद्दल आणि भाऊने सर्व नटवर्गाचा नक्षा उतरविल्या बद्दल. हैदराबादमध्ये झालेली बहुतेक सर्वच नाटके अण्णांनी पाहिली होती. पण माझ्या तोडीचा एकही नट त्यांना दिसला नव्हता. माझ्यासारखी अप्रतिम भूमिका एकानेही केली नसल्याचे ते सांगू लागले. विनोदी भूमिका करूनच उत्तम नट म्हणून प्रसिद्ध झालेल्यांना भान हरवले आहे, असे ते ठामपणे सांगू लागले. नाटकातील कामाची खरी दृष्टी दिली मला गोडसे यांनीच, असेही ते सर्वांना सांगू लागले.

वेड्याचं घर उन्हात या आमच्या नाटकामध्ये डॉ. मोहन भालेराव यांनी देखील एक भूमिका केली होती, मोहन भालेराव हे नांदेड येथील डॉ. भालेरावांचे ज्येष्ठ चिरंजीव. मोहनच्या आग्रहामुळे आम्ही या नाटकाचा प्रयोग नांदेडमध्ये करण्याचे ठरविले. नांदेड येथील कलामंदीर या नाट्यगृहामध्ये प्रयोग करण्याचा निश्चय केला.

आम्ही नाटकात काम करणारी सारी मंडळी, व्यवस्थापक, आणि इतर सहाय्यक सर्व साधन सामुग्रीसह नांदेडला गेलो. डॉ. भालेराव यांच्या प्रशस्त घरामध्येच आमची उतरण्याची, राहण्याची, खाण्यापिण्याची वगैरे सारी व्यवस्था चोख केली होती. मोहनने त्या सर्वांचे अगत्य, प्रेम, आस्था आणि आपुलकी पाहूनच आम्ही थक्क झालो.

नाटकाच्या प्रसिद्धीचे, तिकिटे छापण्याचे, तिकिटविक्रीचे आणि नाटकाची अन्य व्यवस्था मोहन भालेरावने उत्तम केली होती. कलामंदीर मध्ये रात्री ९ वाजता आमच्या नाटकाचा प्रयोग होणार होता.

नांदेडमधील आमच्या नाटकाचा प्रयोग चांगलाच रंगला, कलामंदीर भरलेले होते. सर्व प्रेक्षकांना आमचा नाट्यप्रयोग अतिशय आवडला. वेड्या दामूचे प्रवेश छान झाले. वसंतरावांच्या वेड्या दामूने सर्वांना चकित करून सोडले. माझी स्वगत भाषणे सुंदर झाली. श्रोत्यांचा प्रतिसाद मनासारखा मिळाला. तीन अंक चढत्या क्रमाने रंगत गेले. अशा प्रकारचे नाटक आणि अभिनय नांदेडकरांनी कधीही पाहिले नव्हते. प्रेक्षकांनी नाटकाची खूप तारीफ केली.

नांदेड येथील प्रयोगाच्यावेळी एक नवाच अनुभव आला. दिवा-स्वप्नावर आधारलेले आमचे नाटक. दिव्यांची उघड-झाप व्यवस्थित होण्यावरच सर्वकाही अवलंबून होते. दिवे बंद करणे आणि स्वगतानंतर लावणे, या गोष्टी नेहमीप्रमाणे होत नसल्याचे मला जाणवले. तरीपण मी दक्षतेने सर्व हालचाली करी होतो. एका क्षणी भलत्याच वेळी दिवे मालविण्यात आले. मी दोन पावले अंधारातच पुढे चाललो पण कसला तरी अडथळा मध्ये आला आणि मी धडकन् खाली पडलो. गुडघ्याला मार लागला, थोडे रक्त आले. त्याकडे लक्ष न देता, मी माझी भूमिका करीत गेलो. नेहमीप्रमाणे आमचे नाटक रंगत गेले.

आपण आपल्या नाटकाचा प्रयोग सोलापूर, गुलबर्गा येथे करू यात, असं आम्ही वसंतराव यांना सतत आग्रहाने सांगत होतो. येण्याजाण्याचा खर्च आम्ही करण्याची तयारी दाखविली. पण वसंतरावांनी या धाडसाला विरोध केला. त्यांना भीती वाटत होती,

महाराष्ट्रातील प्रेक्षकांना आमचा प्रयोग आवडेल की नाही, याची डॉ. श्रीराम लागूंचा दादा. आणि पी. डी. ए. चे नाटक महाराष्ट्रात गाजत होते. आपले नाटक प्रेक्षक उधळून लावतील, अशी धास्ती वाटत होती वसंतराव यांना.

माझ्या निर्भीड टीकेने हैदराबादमधील अनेक नायक, गाजलेले नटवर्य आणि दिग्दर्शक रागावलेले असल्याचे माझ्या कानावर आले होते. कितीतरी नाटकांवर मी कडक टीका केली होती. विनोदी भूमिका करून नाटक गाजविणे यात नटाचे कर्तृत्व नसते. नाटककाराचेच ते श्रेय असते. संवादामुळेच विनोदी भूमिका रंगते. माझ्या मताने हैदराबादमधील अनेक हीरो फुसके होते. ते तरूण होते म्हणूनच ते नायक निवडले जात होते. नाटकाचे यश त्यांच्या डोक्यात शिरले आणि ते भलत्याच तोऱ्याने वागत होते. गर्वाने वागत-चालत-बोलत होते ते. त्या सर्वांना कुणीतरी अभिनय शिकवला पाहिजे, असं मी ठामपणे सांगत होतो.

माझ्या या टीकेने अनेकजण माझ्यावर चिडले होते, संतापले होते, मला बदनाम करण्याच्या संधीची ते आतुरतेने वाट पहात होते. कौंतेय, मुझे वोट दीजिये आणि दुरितांचे तिमिर जावो. या नाटकातील माझी भूमिका अगदीच नगण्य होती. त्या माझ्या भूमिका त्यांच्या दृष्टीने महत्वाच्या मुळीच नव्हत्या.

वेड्याचे घर उन्हात या नाटकातील महत्त्वाची आणि मुख्य भूमिका करण्यांत मी शिवधनुष्यच उचलण्याचे धाडस केले होते. या नाटकातील माझी भूमिका पडली असती, त्यांच्या पसंतीला उतरली नसती, तर त्या लोकांनी मला जगणे अशक्य करून टाकले असते. मला फाडून खाल्ले असते त्यांनी. टोचून, बोचून, खोचून, बोलून मला रक्तबंबाळ केले असते. त्यानंतर मला नाटकात काम करणे अशक्यच करून खोडले असते. या धास्तीमुळेच मी माझ्या कामामध्ये विशेष लक्ष घालीत होतो. अत्यंत काळजीपूर्वक भूमिका समजून घेत होतो. वसंतराव म्हणतील तितक्या तालमी करण्यास आनंदाने राहत होतो.

आमचं हे नाटक झाल्यानंतर अनेक वर्षांनी मला माझ्याच विद्यार्थ्याने, घराजवळच राहणाऱ्या अशोक परळीकरने सारा प्रकार कथन केला. वेड्याचं घर उन्हात या नाटकाचा महाराष्ट्र मंडळात झालेला पहिलाच प्रयोग पहाण्यास अशोक परळीकर आणि असेच चिडलेले त्याचे मित्र आले होते. पिशवीमध्ये सडकी अंडी आणि सडके टोमॅटो घेऊन ! नाटकातील माझे काम बिघडले असते, तर ते माझ्यावर वर्षाव करणार होते सडक्या अंड्यांचा आणि टोमॅटोचा, पण झाले भलतेच. माझ्या अभिनय कौशल्याने ते भारून गेले, भानच विसरले आणि अधिक लक्षपूर्वक माझी भूमिका बघण्यात गुंग झाले. पिशवीत आणलेली अंडी फेकण्याचे साफ विसरून गेले ! माझ्या कामाकडे पहातच राहिले.

गोल्डस्मिथची एक कविता आहे Village Preacher या कवितेत एक ओळ आहे- Those who came to seeoff remained to pray. तो धर्मोपदेशक सरळ, साध्या, सोप्या भाषेत उपदेश करीत असे, प्रवचन देत असे. त्याची टिंगल करण्यासाठी आलेले

मस्तवाल, मवाली तरूण त्याचा नीती-उपदेश ऐकून जागच्या जागी उभे रहात होते, हात जोडून प्रार्थना करण्यात मग्न होत होते. अशीच अवस्था झाली अशोक परळीकर आणि त्याच्या दुखावलेल्या मित्रांची ! नाटक पाडण्यासाठी आलेले नाटक पाहून गेले. या माझ्या विजयाचे कारण म्हणजे वसंतरावांचे दिग्दर्शन !!

वेड्याचं घर उन्हात हे आमचे नाटक झाल्यानंतर, कितीतरी वर्षांनी मी वसंतराव यांना विचारले की दादाच्या भूमिकेसाठी मी त्यांना योग्य कसा दिसलो. त्यांनी मोकळेपणाने मला त्यांच्या मनातील सर्व विचार स्पष्ट करून सांगितले. विवेक वर्धिनीमध्ये झालेले माझे नाटक, दुरितांचे तिमिर जावो पहाण्यास ते आले होते. माझी डॉ. बापूची भूमिका त्यांना स्पर्शून गेली. पहिलाच करूण, गंभीर असा तो माझा प्रवेश त्यांना भावला. दादाचा कोमल आणि मृदू स्वभाव, दादाच्या करड्या आणि कोरड्या अशा वृत्तीच्या खाली अत्यंत प्रेमळ, जिव्हाळ्याने भरलेला असा फुलासारखा मृदुस्वभाव होता. वज्रादापि कठोराणि । मृदूनि कुसुमादपि । वरवरच्या कठोर दादाच्या आतमध्ये एक वेगळाच दादा होता, जो परागंदा झालेल्या दामूसाठी सतत तळमळत होता, व्याकूळ, दुःखी कष्टी होत होता. डॉ. बापू गलबलून जातात आणि गदगदलेल्या आवाजात, अश्रूपूर्ण डोळ्यांनी आंत बघत, आपल्या मित्राची आठवण करतात, हे वसंतरावांनी बरोबर टिपले होते. कारूण्याचा आविष्कार करण्याचे माझे कसब त्यांनी ध्यानात घेतले. माझ्या सुप्त शक्तींची त्यांच्या मर्मज्ञ दृष्टीला अचूक कल्पना आली. नाटक पहात असताना कल्पक आणि कसबी दिग्दर्शकाला असे सुप्त गुण हेरण्याची सखोल दृष्टी असते. योग्य दिग्दर्शन केले तर दादासाहेबांची कठीण भूमिका मला करता येऊ शकेल, अशी त्यांना त्याचं वेळी खात्री वाटली असावी. म्हणूनच दादासाहेबांची भूमिका मला मिळाली.

संविधानकं, पात्रं, प्रतीकं यांच्याप्रमाणेच नेपथ्य-प्रकाश योजना यांचाही उपयोग वसंतराव नाट्यरचनेशी सुसंगत असाच करीत असत. नाटकाच्या मध्यवर्ती विषयाची-पात्राच्या व्यक्तिमत्वाची अभिव्यक्ती, त्यांनी कल्पकतेने केलेले नेपथ्यही प्रकर्षाने प्रतीत करीत असे, यात संशय नाही. Symbolic Representation करण्याची त्यांची हौस विलक्षणच होती. त्यांच्या कल्पकतेचे कौशल्य जाणकारांनाच कळे.

वेड्याचे घर मधील दादासाहेबांचे कोरडं, कठोर आणि अरसिक व्यक्तिमत्व दाखविण्यासाठीच त्यांनी पानं फुलं नसलेलं एक शुष्क झाड रंगमंच्याच्या एका कोपऱ्यात उभं करून त्यावर प्रखर प्रकाश पडेल अशी योजना केली होती. जाणकार व चिकित्सक प्रेक्षकांनी या झाडाच्या सूचकतेचे कौतुक केलेच होते.

वेड्याचे घर मध्ये वसंतरावांनी हालचालींसाठी दोन पातळ्या केल्या होत्या रंगमंचावर. वरच्या पातळीवर दादासाहेब व खालच्या पातळीवर इतर पात्रे. यांच्या हालचाली सुरेख दाखविल्या होत्या. अशा अनेक दृष्टींनी वसंतरावांनी हे आमचे नाटक सर्वांगसुंदर बनविले. प्रकाशयोजनेचा, सूचकतेचा आणि कल्पकतेचा नवा आविष्कार

करण्यात ते यशस्वी झाले. वेड्याचे घर या नाटकामुळे वसंतराव दिग्दर्शक, अभिनयपटू, नेपथ्यकार, प्रकाश योजनाकार अशा विविध बाबतीत श्रेष्ठ ठरले. वसंतरावांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व या अभिनव नाटकाच्या प्रयोगाने सिद्ध झाले. भागानगरीतील जाणकार आणि मर्मज्ञ कलावंतांना वसंतरावांना मानाचा मुजरा करण्याची संधी मिळाली. कलानिकेतनच्या नावांला एक तेजोवलय प्राप्त करून दिले. आपल्या प्रतिभाशाली दिग्दर्शनाने आणि अजोड अशा अभिनयपटुतेने हैदराबादच्या नाट्यसृष्टीत खळबळ उडवून दिली. अशा प्रकारचा नाविन्यपूर्ण नाट्यप्रयोग हैदराबादमध्ये मागे कधी झाला नव्हता आणि पुढे होण्याची शक्यताच नाही. कलानिकेतनची प्रतिमा शतपटींनी उजळून टाकणारे वसंतरावांचे अजरामर 'वेड्याचे घर उन्हात' हे नाटक.

खरं पाहिलं असता आमचे नाटक स्पर्धेमध्ये पहिले आले होते. पण हे कलानिकेतनचे उज्ज्वल यश अनेक संस्थामधील नटांना-नटवर्यांना-नटसम्राटांना बघवले नाही. पडद्यामागे अनेक कट-कारस्थाने करून, चिठ्ठ्या टाकून, आमच्या नाटकाला तिसरा नंबर देण्यात आला. नाट्यसंमेलनाच्या वेळीच प्रयोग झाला असता तर पुण्या-मुंबईतून आणि अन्य मोठ्या शहरांतून आलेल्या दर्दी प्रेक्षकांना आमचे नाटक पहावयास मिळाले असते. वसंतरावांचे दिग्दर्शन कौशल्य त्यांना समजले असते. महाराष्ट्रभर त्यांचे कौतुक झाले असते. पण तसा भाग्ययोग नव्हता त्यांच्या नशिबी. महाराष्ट्रभर गाजण्याची संधी हुकली. तरीही वसंतराव खचले नाहीत, निराश झाले नाहीत, डगमगले नाहीत. हैदराबद-सिकंदराबादमधील दर्दी प्रेक्षकांनी, जाणकार कलावंतांनी त्यांची एकमुखाने तारीफच केली. वसंतरावांच्या नावाचा डंका जोडशहरात जोराने गाजला. एवढे यश पुरे होते त्यांना.

कलानिकेतन बरोबरच वसंतरावांचे देखील हे दुर्दैवच की नाटकाचे लेखक-नाटककार वसंतराव कानेटकर आमच्या नाटकाचा प्रयोग पहाण्यास येऊ शकले नाहीत. पण वेड्याचं घर या नाटकाच्या दुसऱ्या आवृत्तीमध्ये वसंत गोडसे यांच्या नावाचा उल्लेख केला होता. बाकी नाटकाविषयी कोणताही खास उल्लेख केलेला नव्हता. महाराष्ट्रामध्ये, बृहन् महाराष्ट्रामध्ये आमच्या नाटकाची आणि वसंतरावांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची थोडी देखील माहिती नव्हती.

आमच्या प्रयोगानंतर आम्ही दोघांनी पुण्याला जाऊन पी. डी. ए. चा नाट्यप्रयोग पहाण्याचे ठरविले. मी पुण्याला गेलो माझ्या ज्येष्ठ भगीनीच्या घरी. सौ. मधु मालती आणि राजाभाऊ यांना मी आमच्या नाटकाच्या प्रयोगाविषयी भरपूर माहिती दिली. प्रत्येक प्रवेश वर्णन करून सांगितला. वेड्या दामूचे काल्पनिक आगमन दाखविण्यासाठीच दिव्यांची उघड-झाप कशी व्हयची, पत्र्याच्या आवाजाने भास निर्माण कसा केला होता विजेच्या कडकडाटासारखा. वेड्या दामूबरोबरचे माझे प्रवेश कसे रंगायचे. माझा त्यावेळचा अभिनय, माझी अत्यंत मृदु आणि प्रेमळ भाषा, वेड्या दामूचा दरिद्री अवतार त्यांना सविस्तर सांगितला. माझ्या स्वगताचा प्रेक्षकांवर होणारा परिणाम इत्यादी गोष्टी मी त्यांना खुलासेवार

सांगितल्या. दुसऱ्या अंकातील माझे स्वगत, दादांचे मानसिक संतुलन बिघडत कसे जाते, जाणकारांना ते कसे उमजते, हे मी त्यांना व्यवस्थित सांगितले. तिसऱ्या अंकात होणारा दामोदरपंत यांचा प्रत्यक्ष प्रवेश, त्यांनी घरातल्या सर्वांवर मारलेली छाप, दादांचा होणारा राग व तडफडाट, शेवटी दादा खरोखरच कसे वेडे होऊन खिडकीतून उडी मारून घरातून निघून जातात, त्यामुळे शकू कशी किंकाळी मारते, प्रेक्षक कसे सुन्न होऊन खुर्च्यांना खिळून बसतात, नाटक संपले असे जाहीर केल्याशिवाय एकही प्रेक्षक सभागृहाबाहेर जात नाही, अशा सर्व गोष्टी मी त्यांना वर्णन करून सांगितल्या. प्रेक्षकांवर होणारा परिणाम मी खूपच छान वर्णन केला. आमच्या प्रयोगविषयी मी त्यांना तपशीलात जाऊन कल्पना दिली. पी. डी. ए. चा प्रयोग पाहण्यास ते माझ्यापेक्षांही अधिक उत्सुक झाले होते.

आम्हा दोघांच्याबरोबर ते दोघेही नाटक पहाण्यास आले होते. आम्ही चौघांनी तो प्रयोग अत्यंत लक्षपूर्वक आणि एकाग्रतेने पाहिला. त्यादिवशी डॉ. श्रीराम लागू यांचा मूड नीट लागला नसावा. त्यामुळे नाटकाची रंगत कमी झाल्याचे जाणवले आम्हा चौघांना. स्वगतांचा प्रभाव विशेष जाणवलाच नाही. नाटकाचा शेवटचा प्रवेश फारसा परिणामकारक वठला नाही. नाटक संपले. माझी बहिण म्हणाली, 'भाऊ, माझ्यावर, प्रेक्षकांवर सुन्न होण्यासारखा परिणाम झालाच नाही. तुझं नाटक अधिक करूण होत असले पाहिजे'.

नाटकाच्या एकूण प्रयोगविषयी मी वसंतरावांशी मनमोकळी चर्चा केली. नाटकाचं रंगत प्रत्येक अंकानंतर वाढत गेल्याचे जाणवले नाही आम्हा दोघांनाही. आमचा प्रयोग या प्रयोगापेक्षा कितीतरी प्रभावी व परिणामकारक होत होता, यात शंकाच नाही. आमच्या नाटकाचे प्रयोग आम्ही आठवू लागलो.

नंतर आम्ही दोघे नाटककार वसंत कानेटकर, डॉ. श्रीराम लागू आणि दिग्दर्शक प्रा. भालबा केळकरांची भेट घेतली. पी. डी. ए. च्या प्रयोगाची आम्ही त्यांच्याशी सखोल चर्चा केली. डॉ. श्रीराम लागूंनी साकार केलेला दादा अंत:करणाला भिडला नाही, अशी आम्ही दोघांनी प्रत्यक्ष कबुली दिली. नाटक फारसे रंगले नाही. परिणामकारक झाले नाही. असं त्या तिघांनी मान्य केले.

नंतर मी आणि वसंतराव स्वतंत्रपणे भालबा केळकर आणि वसंतराव कानेटकर यांच्या भेटी, वेगवेगळ्या दिवशी घेऊन, आमच्या प्रतिक्रिया मोकळेपणाने सांगितल्या. वसंतरावांनी दिग्दर्शनाबद्दल अधिक खोलात जाऊन त्यांना प्रश्न विचारले. आमच्या प्रयोगाची वैशिष्ठ्ये सविस्तर सांगावीच लागली.

वसंतराव कानेटकरांशी आम्हा दोघांची झालेली चर्चा आणि प्रश्नोत्तरे संस्मरणीय झाली. वसंतरावांनी आणि मी आम्ही सादर केलेल्या नाट्यप्रयोगाबद्दल, रंगत जाणाऱ्या विविध प्रवेशाबद्दल, माझ्या स्वगताविषयी दोन पातळ्यावरील आमच्या होणाऱ्या हालचाली विषयी, वेड्या दामूचे आगमन सूचित करण्यासाठी केलेली दिव्यांची उघड-झाप आणि पत्र्याच्या आवाजाने विजेच्या कडकडाटाचा निर्माण केलेला भास, अनेक बारकाव्यासह

वर्णन करून सांगितला. नाटकातील शेवट वसंतरावांनी कसा बदलला, इतर पात्रे दगडासारखी निश्चल उभी रहातात, पण शकू कशी थरथरू लागते आणि आर्त किंकाळी मारते, या गोष्टी सांगितल्या, प्रेक्षकवर्ग कसा नि:स्तब्ध बसून राहातो, सुन्न होऊन जातो, थोडा वेळ भयंकर शांतता कशी निर्माण होते, खुर्चीला खिळून बसलेला प्रेक्षक वर्ग एक शब्दही बोलत नाही, नाटक संपल्याची सूचना द्यावी लागते. तेव्हांच हळूहळू प्रेक्षक बाहेर जाऊ लागतात, याचे वर्णन केले आम्ही दोघांनी. कानेटकर आम्ही सांगितलेला नाटकाचा तपशील लक्षपूर्वक ऐकत होते. आमचे दोघांचे म्हणणे त्यांना पटल्यासारखे दिसले. आमच्या नाट्यप्रयोगाची आम्ही दोघांनी कानेटकरांना छान कल्पना दिली. आमचं सांगून झाल्यानंतर कानेटकर ठामपणे म्हणाले, माझ्या स्वप्नातला दादा तुम्ही साकार केला असावा. आम्हा दोघांचे समाधाने झाले.

त्यानंतर हैदराबादला आम्ही परत गेलो. वसंतराव यांच्या घरी गेलो मी एके दिवशी रात्री. पी. डी. ए. चा प्रयोग आणि आमचा प्रयोग याबद्दल आम्ही अधिक खोलात जाऊन मनमोकळी चर्चा केली. आमच्या नाटकातील बलस्थाने वसंतरावांच्या निदर्शनास आणली मी. ते शांतपणे ऐकत होते.

नाटकाचे कथानक, नाटकातील मध्यवर्ती कल्पना, पात्रांचा अभिनय, पात्रांच्या हालचाली, प्रकाश योजना, प्रतीकं, प्रतिमा आणि नेपथ्य या सर्व बाबीबद्दल वसंतराव सर्व पात्रांशी आणि जाणकारांशी विश्लेषणात्मक, मनमोकळी व परखड चर्चा करूनच नाटकाचे तंत्र आणि मंत्र यामध्ये योग्य त्या सुधारणा घडवून आणू शकणारे दिग्दर्शक होते.

नाट्यप्रयोगात रंगमंचाचा उपयोग पुरेपूर करून घेतला पाहिजे किंवा एखाद्या भागाचा सहेतुकपणे वापरच केला जाऊ नये, याविषयी ते खास दक्षता घेत असंत. एखाद्या प्रसंगातील हालचालींचं एक सुंदर चित्र वसंतराव आधीच मनाशी तयार करून त्याची सुरेख स्केचेस कागदावर काढून आणीत असत. तालमीच्या वेळी त्यामध्ये योग्य त्या सुधारणा करून त्या हालचाली प्रभावी व्हाव्यात यासाठी ते अपार कष्ट घेत असत. पात्रांची हालचाल अचूक आणि परिणामकारक झाली, तरच त्यांचे समाधान होत असे. पात्राची प्रत्येक हालचाल अर्थपूर्ण आणि रेखीव व्हावी याबद्दल ते जागरूक राहात असत.

संघर्षमय आणि नाट्यपूर्णतेनं भरलेलं कथानक, उत्तम नाट्यमंच, देखणे नेपथ्य, कल्पक सूचकता, सुजाण दिग्दर्शन, सुरेल पार्श्वसंगीत, वसंतरावांनी साकारलेला वेडा दामू आणि शेवटी येणारे दामोदरपंत.यांचा विलक्षण वेगळा अभिनय इत्यादी साऱ्या गोष्टी त्यांच्या मनासारख्या झाल्या. यामुळेच आमच्या नाटकाचा प्रयोग दृष्ट लागण्याइतका देखणा आणि अविस्मरणीय होऊ शकला. वेड्याचं घर हे नाटक रसिक आणि जाणकार प्रेक्षक विसरू शकणार नाहीत, असा ठाम विश्वास वाटतो.

शितावरून भाताची परीक्षा करू शकणारे गोडसे. दुरितांचे तिमिर जावो या नाटकातील माझ्या एकाच प्रवेशावरून त्यांनी माझ्या सुप्तशक्ती ओळखल्या. माझे ते पहिलेच

तीन अंकी नाटक आणि माझ्या वाट्याला आलेली ती पहिलीच मोठी भूमिका. ती भूमिका गोडसे यांनी सूक्ष्मतेने पाहिली आणि माझ्या अभिनयक्षमतेची त्यांना कल्पना आली. मला त्यांनी अचूक जोखले आणि माझी निवड पक्की केली.

मला याबद्दल नेहमीच आश्चर्य वाटत आले होते. वसंतरावांनी केलेले माझे मूल्यमापन बरोबर निघाले. एखादा मूर्तीकार ज्याप्रमाणे अनावश्यक भाग काढून टाकून आंतील गुप्त मूर्ती बाहेर काढू शकतो, त्याचप्रमाणे वसंतरावांनी माझ्या अंगातील सुप्त गुणांना ठोकून ठोकून बाहेर काढले. घासून पुसून त्यांना तेजस्वी बनविले. पाठांतराचे माझे वैगुण्य मी त्यांना प्रथमच सांगून टाकले होते. म्हणूनच त्यांनी माझ्याकडून अनेक तालमी करून घेतल्या. ते फक्त अंतर्भूत भावना समजावून सांगत असत. एकही वाक्य त्यांनी मला म्हणून दाखविले नाही. याच्या उलट मैराळ यांचे दिग्दर्शन होते. 'मी म्हणतो तसे म्हणा' असा त्यांचा धोषा चाललेला असे. एकच वाक्य ते स्वत: अनेकदा म्हणून दाखवीत आणि त्यांच्या प्रमाणेच नटाला म्हणायला लावीत. त्यामुळे हैदराबादमधील अनेक नट म्हणजे मैराळ यांची कार्बन कॉपीच होती. मुझे वोट दीजिये या माझ्या पहिल्याच नाटकात मला मैराळ यांनी ठोकून ठोकून तयार केले. A good soldier only can become a good captain. If you are a good student, you can become a good teacher. पण वसंतराव नटाला अभिनय शिकवीत नसत, नटाच्या आंत असलेल्या अभिनयाला बाहेर काढीत असत.

रात्र - १९६०

विजय तेंडुलकरांच्या प्रभावी लेखणीतून उतरलेली-वाट चुकलेल्या आणि चुकविलेल्या दोन जीवांच्या अन्तर द्वंद्वानं तडकलेली-भंगलेली एक घायाळ 'रात्र'. तेंडुलकरांनी नभोवाणीसाठी खास लिहिलेलें नभोनाट्य ! वसंतरावांनी हे नभोनाट्य प्रत्यक्ष रंगभूमीवर सादर करण्याचे धाडसच केले. ही श्रुतिका रंगमंचावर सादर करणे वाटते तितके सोपे काम नव्हते. या श्रुतिकेमध्ये पात्रे फक्त दोनच-एक पुरूष आणि एक स्त्री-अभिनयाची जुगलबंदी करण्यास पुरेपूर वाव असणारी श्रुतिका. वसंतरावांनी अनेक दृश्यघटकांनी हे नभोनाट्य अधिक जिवंत स्वरूपात सादर करण्याचे ठरविले. या नभोनाट्यात आम्ही दोघेच होतो. लीला सुंदरैय्या आणि मी. वसंतरावांनी या श्रुतिकेसाठी अत्यंत सूचक आणि देखणे नेपथ्य उभे केले होते. नाटक तीन अंकी असो-वा-एकांकी असो, मेहनत तेवढीच घेणं अत्यावश्यक असतं, असं त्यांचं ठाम मत होतं. पूर्ण समाधान झाल्याशिवाय ते नाट्यप्रयोग सादर करीत नसतं.

'विठ्ठल तो आला-आला' ही पु. ल. देशपांडे लिखित उपहासगर्भ विनोदी नाटिका, 'सदू आणि दादू' पु. ल. देशपांडे यांनीच लिहिलेलं, आधुनिक नाट्यतंत्रावर आधारलेलं हास्यरसप्रधान नवनाट्य आणि 'रात्र' ही श्रुतिका एकाच दिवशी सादर करण्याचा त्यांनी

निश्चय केला. त्याप्रमाणे या तीन एकांकिकांचे तंत्र आणि मंत्र एकट्यानेच सांभाळीत होते. विठ्ठल तो आला-आला या नाटिकेला जनार्दन कुर्डुकरांनी वसंतरावांना सुयोग्य साथ देऊन आपल्या कौशल्याची चुणुक दाखविली.

महाराष्ट्र मंडळात आमच्या तालमी रात्री ९ वाजतां सुरू होत असत. रात्र या श्रुतिकेची तालीम सुरू होण्यास जवळजवळ रात्रीचे १२ होत. मी ९॥च्या सुमारास महाराष्ट्र मंडळाच्या सभागृहात उपस्थित राहत असे. एका बाकड्यावर मी झोपून राहात असे. शाळा आणि शिकवण्या करून थकवा येत असे मला. शांत झोप लागे. तेवढी विश्रांती घेतल्यानंतर मी ताजातवाना होत असे. रात्रीची तालीम चालत असे १॥-२ वाजेपर्यंत. माझ्या उत्साहाला उधाण येत असे. या जागरणाचा मला थोडा देखील त्रास होत नसे. दुसरे दिवशीची सकाळी सातची शिकवणी मी कधीही बंद केली नाही. नाटक हा माझा अत्यंत आवडता छंद आणि शिकवणे हा माझा धर्म !

आम्हां दोघांचे संवाद जवळजवळ पाठ होत आले होते. वसंतरावांनी तालीम सुरू करण्यापूर्वीच एक सूचना मांडली. माझी एन्ट्री होती मध्यरात्रीच्या थंड वातावरणात. वसंतरावांची इच्छा होती की मी ओव्हरकोट घालून रंगमंचावर प्रवेश करावा. मला ही सूचना खूप आवडली. ओव्हरकोटमुळे माझे व्यक्तिमत्व एकदम खुलून दिसणार होते. मग विचार करू लागलो की माझ्यासाठी योग्य असा ओव्हर कोट कुणाकडे मिळेल. वसंतराव म्हणाले की डॉ. फाटक यांच्याकडे असा ओव्हरकोट नक्की मिळेल.

दुसरे दिवशीच मी डॉ. फाटक यांच्या घरी गेलो. सुशिलाबाई घरी होत्या. त्यांना मी ओव्हर कोटबद्दल विचारले. डॉ. फाटक यांच्याजवळ असलेला ओव्हरकोट माझ्या अंगावर शोभून दिसला. मला अत्यानंद झाला. उभयतांची परवानगी घेऊन मी तो ओव्हरकोट घेऊन निघालो. प्रयोग होईपर्यंत ओव्हरकोट ठेवून घेण्यास मला त्यांनी संमती दिली. ओव्हर कोटचा प्रश्न सहजासहजी सुटला.

चारपाच दिवस तालमीच्यावेळी मी ओव्हरकोट घालूनच एन्ट्री घेतली. ओव्हरकोट आवडला वसंतरावांना. कोटाच्या खिशात हात घालून उभे रहाण्याने खूपच रूबाबदार दिसू लागलो मी. वसंतरावांची एक इच्छा पूर्ण झाली.

तीनचार दिवसानंतर आणखी एक अफलातून सूचना मांडली वसंतरावांनी. वेळ होती मध्यरात्रीची आणि विजेच्या खांबाजवळून माझी एन्ट्री होणार होती. त्यावेळी मी चिरूटाची धूम्रवलये सोडावीत आणि त्यातून मी रंगमंचावर प्रवेश करावा, अशी इच्छा व्यक्त केली वसंतराव यानी. मी सिगरेटदेखील ओढीत नव्हतो. चिरूट ओढणे म्हणजे माझी परीक्षाच होणार होती. नकार देणे शक्यच नव्हते मला.

डॉ. सातवळेकरांना चिरूट ओढताना पाहिल्याचे आठवले. दुसरे दिवशी मी सकाळीच सातवळेकरांच्या घरी गेलो. भाऊ सातवळेकरांनी माझे हसून स्वागत केले. डॉ. शांताबाई यांनी चहा आणला. मी दोघांना सांगितले आमच्या नाटिकेच्या तालमी बद्दल. दिग्दर्शक

वसंतराव गोडसे यांची इच्छा आहे की मी चिरूटचे फवारे सोडीतच रंगमंचावर प्रवेश करावा. भाऊ एकदम खुष झाले. त्यांनी टेबलावरील डब्यातून एक चिरूट काढून मला दाखविला. कोणत्या बाजूने चिरूट शिलगवायचा हे समजावून दिले. चिरूट ओढायचा कसा, दातामध्ये धरायचा कसा, उजव्या-डाव्या हातात धरायचा कसा आणि चिरूट ओढत असताना बोलायचे कसे, हे सारे स्वत: करून समजावून दिले. त्यांच्या देखतच मी चिरूट घेतला आणि शिलगावला. चिरूटाचा उग्र वास मला सहन न झाल्याने, एकदम खोकला आला. भाऊ मला म्हणाले की चारपांच दिवसात चिरूट ओढता येईल मला. चारपाच दिवस-सकाळीच मी सातवळेकर यांच्या घरी जाऊन चिरूट ओढण्याचा सराव केला. अशा प्रकारे मी वसंतरावांची ती इच्छाही पूर्ण केली. Practice makes a man perfect याची प्रचीती आली.

ओव्हरकोट घालून, चिरूटाचे फवारे सोडीत, मी रंगमंचावर प्रवेश करण्याची तालीम वसंतरावांच्या सांगण्याप्रमाणे व्यवस्थित करू शकलो. बाजूने येणाऱ्या प्रखर प्रकाशामुळे धूम्रवलये शानदार दिसत होती. वसंतरावांचे समाधान झाले.

प्रत्यक्ष प्रयोग पहाण्यासाठी आमच्या शाळेतील सावनूर नावाचे शिक्षक आले होते. आमची एकांकिका संपल्याबरोबर सावनूर धावतच रंगमंचावर आले आणि त्यांनी अत्यानंदाने मला मिठीच मारली. ते मला सर्वांच्या देखत म्हणाले, 'मोहोळकर, आमचा जन्म गेला सिगरेटी ओढण्यात, पण इतकी स्टायलिश सिगरेट ओढता येते, यावर आमचा विश्वासच नव्हता. तुम्ही तर चिरूट असा ओढत होता की तुम्ही पट्टीचे चिरूट बहाद्दर असावेत. व्वा! झकास !! '' त्यांनी मला परत एकदा मिठीत घेऊन माझी पाठ थोपटली आनंदाने. वसंतराव हा नाट्यमय प्रसंग डोळे भरू पहात होते.

दुसरे दिवशीच्या दैनिक डेक्कन क्रॉनिकलमध्ये आमच्या दोघांची कामं अत्यंत सुरेख झाल्याची तारीफ आली होती. एक कॉलम भरून स्तुती केली होती. आमच्या दोघांच्या अभिनयाची जुगलबंदीच झाल्याचे बातमीदाराने स्पष्ट लिहिले होते. एका क्षणाला लीलाताईंचा अभिनय माझ्या अभिनयावर ताण करीत होता. तर दुसऱ्या एका क्षणाला मी माझ्या देखण्या अभिनयाने बाजी मारून नेत होतो. ही बातमी वाचून वसंतराव एकदम खुष झाले. त्यांच्या श्रमांचे आम्ही दोघांनी सार्थकच केले. तेंडुलकरांचे ते नभोनाट्य प्रत्यक्ष रंगमंचावर जिवंत करू शकलो आम्ही केवळ वसंतरावांच्या दिग्दर्शन कौशल्यामुळे. एक पुरूष आणि एकच स्त्री यांनी साकार केलेले ते नभोनाट्य महाराष्ट्रामध्ये कोणत्याही संस्थेने केल्याचे ऐकले नाही कधी. ही कल्पकता आणि नाट्यदृष्टी होती वसंतरावांची !!

रस कलश २०-२-१९६०

वसंतरावांनी तीन एकांकिकांचा एक रसकलश सादर करून हैदराबादच्या नाट्यशौकिनांना एक सुरेख अनुभव दिला. तीन भाषेतील तीन एकांकिका सादर करून संस्कृती-संगम करून दाखविला. हैदराबाद मध्ये एकेकाळी उर्दूही राजभाषा होती. उर्दू भाषेचे अधिराज्य होते या जोडशहरांमध्ये. सप्टेंबर १९४८ मध्ये पोलिस ॲक्शन झाले आणि या उर्दू भाषेचे वर्चस्व आणि प्राबल्य एकदम कमी झाले. तरीपण मुसलमानी संस्कृतीचे अवशेष शिल्लक राहिले. हैदराबादमधील बहुसंख्य हिंदु प्रजेचे प्राथमिक शिक्षण देखील उर्दू माध्यमातून झाले होते. हायस्कूलमध्येही उर्दू माध्यम दिसत होते. एक दोन कॉलेजेसमध्ये उर्दू माध्यम शिल्लक होते. उस्मानिया विद्यापीठामध्येही उर्दू माध्यमातून शिक्षण घेण्याची सोय केली होतीच. त्यामुळे महाराष्ट्रीय मंडळी देखील उर्दू मधील संवाद सहज समजू शकत होते. 'तू-तू, मै-मै' ही उर्दू एकांकिका होती लतिफुन्नीसा बेगम लिखित. ही एक हलकी फुलकी विनोदी एकांकिका असल्यामुळे वसंतरावांच्या परीस-स्पर्शाने तिचे सोने झाले. एक खेळकर उर्दू एकांकिका पाहून प्रेक्षक खुष झाले.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये उर्दूची जागा हिंदीने घेतली. भारताची हिंदी ही राजभाषाच झाली. उर्दू जाणणारे साऱ्या प्रेक्षकांना हिंदी भाषा कळणे अगदी सोपे वाटत होते. म्हणून वसंतरावांनी दुसरी एकांकिका हिंदी भाषेतील सादर केली. या एकांकिकेची नाव होते 'चारूमित्रा', या एकांकिकेचे कथानक मजेदार होते. वसंतरावांच्या दिग्दर्शनामुळे ही एकांकिका प्रेक्षकांना खूप आवडली असल्याचे समजले, मिळालेल्या टाळ्यांच्या गजरामुळे.

उर्दू आणि हिंदी भाषेमध्ये वसंतराव वाकबगार होते. उर्दूचे उच्चार ते अचूक करू शकत होते. वसंतरावांच्या दिग्दर्शनामुळे ही उर्दू एकांकिका फारच सुरेख झाली. अनेक रसिक श्रोत्यांनी उर्दू उच्चाराबद्दल वसंतरावांची प्रशंसा केली. उर्दू भाषेतील अनेक उच्चार तसे अवघड जातात महाराष्ट्रीय कलावंतांना. वसंतराव उर्दूचे जाणकार होते. त्यांचे मित्र होते उर्दू भाषेचे अभ्यासक आणि दर्दी. त्यामुळे उर्दू भाषेतील संवाद खटकेबाज झाले. रसिकांना खूप आवडले.

हिंदी भाषा वसंतराव सहज बोलू शकत असत आणि शिकवू शकत. हिंदी भाषेतील अनेक नाटके, चित्रपट त्यांनी पाहिले होतेच. हिंदी नाटकांचा त्यांचा चांगलाच अभ्यास होता. हिंदी भाषेतील मोहन राकेशसारखे सव्यसाची लेखक वसंतरावांच्या चिंतन-मननाचे विषय होते. हिंदी भाषेतील चित्रपट वसंतरावांनी लक्षपूर्वक, एकाग्रतेने पाहिलेले असल्यामुळे त्यांचे हिंदी भाषेवरील प्रभुत्व कोतुकास्पद बनले होते. आपल्या अनेक मित्रांशी वसंतराव हिंदीतून गप्पा मारू शकत होते आणि पाहिलेल्या नाटकावर, चित्रपटावर सहजपणे चर्चा करू शकत होते. वाचन, चिंतन, मननाबरोबरच ते लेखनही करू शकत होते हिंदीमधून. उर्दू भाषेतील संवाद त्यांना सहज आकलन होत असतं.

तिसरी एकांकिका होती-मराठी-विठ्ठल तो आला आला -पु. ल. देशपांडे लिखित. या एकांकिकेमधील विठ्ठल सुरेश गंगाखेडकरने अप्रतिम सादर केला. वसंतरावांनी या नाटीकेतील संवाद छान बसवून घेतले होते. प्रयोग सुंदर झाला.

१९६० योगवियोग आणि तीन एकांकिका

१५ ऑक्टोबर १९६० रोजी वसंतरावांनी कलानिकेतनतर्फे रसकलश या नावांचा एक सुरेख कार्यक्रम सादर केला. या मध्ये योग-वियोग हा शास्त्रीय संगीताच्या आधाराने एक भाव-नृत्य अगदी अभिनव अशा पद्धतीने सादर करून एक अपूर्व मेजवानीच दिली हैदराबादमधील नर्तनशौकीन मंडळींना. कथ्थक नृत्याचा सुंदर व भावपूर्ण अविष्कार केला होता कलानिकेतनमधील वासुदेव कपात्राल या नर्तकाने. कथ्थक नृत्याचा सखोल अभ्यास करून या नृत्यप्रकारात वासुदेवने खूपच प्रगती केली होती. नृत्याचे अनेक कार्यक्रम त्यांनी सादर केले होते. वसंतरावांच्या बरोबरच ते कॉलेजमध्ये चित्रकला हा विषय शिकवीत असत. योग-वियोग या कार्यक्रमाची कल्पना सर्वस्वी वसंतरावांचीच होती. संगीत नियोजनही त्यांनीच केले होते. गायक कलाकार होते जनार्दन कुर्डूकर. संगीत-गायन-नर्तन तीन कलांचा अनोखा संगम दाखविण्याची कल्पकता वसंतरावांचीच. अशा प्रकारचा कार्यक्रम हैदराबादेत कोणत्याही संस्थेने कल्पिलाच नव्हता. प्रतिभावंत गोडसे यांनी हा कार्यक्रम बसवून आपल्या संगीत-व्यासंगाचा एक नमूना पेश केला. वसंत गोडसे, वासुदेव कपात्राल आणि जनार्दन या त्रिमूर्ती एकत्र येण्याचा हा कार्यक्रम योग-वियोग.

या कार्यक्रमाला जोडूनच वसंतरावांनी दिग्दर्शित केलेल्या तीन एकांकिका करण्यात आल्या. सदू आणि दादू, विठ्ठल तो आला आला, रात्र, सदू आणि दादू, विठ्ठल तो आला आला या दोन्ही एकांकिका होत्या. पु. ल. देशपांडे लिखित. सदू आणि दादू या एकांकिकेमध्ये उपरोधात्मक प्रसंग होते. तशी ती खेळकर सुखात्मिकाच आहे. डेल कार्निजी यांचे How to win friends and influence people हे पुस्तक खूपच गाजले होते. त्या पुस्तकांतील मध्यवर्ती कल्पना म्हणजे मित्र कसे जोडावेत. मित्र जोडण्याचे एक खरोखर कौशल्यच असते. हे सर्वांना साधत नसते. त्यासाठी अनेक पथ्ये आचरणात आणावी लागतात. वाचा सांभाळावी लागते. वाचेमध्ये नम्रता, लीनता आणि ऋजुता अत्यावश्यक असतात. सभ्यता आणि नीतिमत्ता, संस्कृती आणि शिष्टाचार यांचा आविष्कार वाचेमधून व्हावा लागतो. तरच दुधामध्ये साखर पडण्याचे, सुमधुर असा मिलाप होण्याचे कार्य घडून येते. खरं पाहिलं असता, मैत्री जमते आणि होते, केवळ प्रसंगानुसार, योगायोगाने. सहेतुकपणे, स्वार्थ साधण्यासाठी केलेली मैत्री टिकत नसते. Friendeship for profit. हा प्रकार सहज दिसतो.

'विठ्ठल तो आला आला' ही पु. ल. देशपांडे यांची नाविन्यपूर्ण अशी एकांकिका.

भगवंताची भक्ती करणाऱ्या भक्तांच्या मनामध्ये शुद्ध स्वार्थ असतो. काहीतरी मागण्याच्या निमित्ताने माणूस भक्ती केल्याचा केवळ देखावाच करीत असतो. विविध व्यवसायातील व्यक्ती एकत्र आणून, खेळकर भाषा वापरून, पु. ल. देशपांडे यांनी ही एकांकिका लिहिली आहे. प्रत्यक्ष विठ्ठल त्या दगडी मूर्तीमधून बाहेर आल्यानंतर, कोण कोणते प्रसंग येतील, कसले संवाद घडतील, माणसांचे स्वार्थी विचार कसे उघडकीला येतील, हे लेखकाने अतिशय मार्मिकपणाने दाखविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

१९६१ रवींद्रनाथ टागोर जन्म शताब्दी निमित्त

रवींद्रनाथ टागोर यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्त कलानिकेतनने एक अनोखा कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम आयोजित केला होता बंगाली असोसिएशनने आणि संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन, दिग्दर्शन, संगीत दिग्दर्शन केले होते वसंतरावांनी. टागोरांची दोन नृत्यनाट्ये सादर केली होती. चित्रागंदा, बसंत. नृत्याचे झंकार आणि नाट्याचा आविष्कार यांचा सुंदर संगम करून डोळ्यांना आणि कानांना आनंद देणारा नयन मनोहर व सुश्राव्य कार्यक्रम. चित्रांगदा आणि बसंत या नृत्यनाट्याची निवड वसंतरावांनी केली होती. नर्तक होते वासुदेव कपात्राल. वासुदेव यांनी बिरजू महाराजांकडून नृत्याचे शिक्षण घेतले होते. त्यांच्यासारखा नर्तक म्हणजे हैदराबादचे भूषणच होते. वासुदेव हे उत्तम चित्रकारही होते. त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन झाल्याचे ऐकले.

एका बंगाली संगीत तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली बंगाली गीते म्हटली वसंतरावांनीच. वसंतरावांचे उत्तम बंगाली उच्चार ऐकूण बहुसंख्य प्रेक्षकांचा असा गोड गैरसमज झाला की वसंत गोडसे बंगालीच आहेत. बंगाली रसिक श्रोते चक्रावूनच गेले, जेव्हां त्यांना समजले की वसंत गोडसे महाराष्ट्रीयन आहेत.

नृत्य आणि नाट्य यांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्याची मूळ कल्पना होती वसंतरावांचीच. त्यांनी बंगाली असोसिएशनचे सहकार्य घेतले आणि हा कार्यक्रम दिमाखात सादर केला. बंगाली चित्रपट आणि नाटके भरपूर पाहिली होती. सत्यजित रे चे बंगाली चित्रपट पहाण्याचे वेडच होते त्यांना. बंगालीचे उच्चार त्यांनी लक्षात ठेवले होतेच. बंगाली गीते शिकून घेण्यास त्यांना कठीण गेले नाही. स्वर-तालाचे ज्ञान होतेच. त्यामुळे त्यांनी म्हटलेली बंगाली गीते कर्णमधुर आणि सुश्राव्य झाली.

मराठी, हिंदी, उर्दू, बंगाली, इंग्रजी भाषांचा त्यांचा अभ्यास खरोखर प्रशंसनीयच होता. त्यांचे भाषा प्रभुत्व विलक्षण होते. प्रत्येक भाषेचा एक ढंग असतो, एक वेगळी लकब असते, शब्दांचे वजन भिन्न असते, शब्दांमधील नाद खास जाणकारच दाखवू शकतात. वसंतरावांनी या सर्व गोष्टींचा अभ्यास केला होता. या विविध भाषेमधील उत्तमोत्तम कथा, कविता, कादंबऱ्या, नाटके वाचून काढण्याचा त्यांचा छंद जबरदस्त हाता. वाचलेल्या

पुस्तकातील सुंदर कल्पना, चित्रमय प्रसंग आणि संघर्ष बिंदू वहीत नोंद करण्याची त्यांची सवय चकित करून सोडणारीच होती. या भिन्न भाषेतील अनेक कथा केवळ त्यांच्या त्यांच्या अंतर्मनातच घर करून बसल्या होत्या. त्यांना शब्दरूप देणयासाठी त्यांना उसंतच मिळाली नाही. अशी अनेक संविधानकं कागदावर उतरली गेलीच नाहीत. सर्वभाषेतील बरंच लिखाण करायचा त्यांचा संकल्प सिध्दीस गेलाच नाही. एकांकिका, कविता, गद्यकाव्य, नाटकाची कितीतरी टिपणं, त्यांनी जतन करून ठेवली असल्याचे मला दिसून आले. ह्या सर्व गोष्टी कसर लागून वाया गेल्या.

लेखकाचे अनेक संकल्प केले होते वसंतरावांनी. त्यांच्या अंतर्मनामध्येच असलेली पण अलिखित अशी अनेक कथानके होती. काही अर्धवट लिहिलेली गीते, कविता आणि गद्यकाव्ये पुसट होऊन गेलेली दिसली. अनेक संविधानकं, कथानकं, कर्यक्रमाबद्दलच्या नाविन्यपूर्ण कल्पना कसरीने खाऊन टाकल्या. वसंतरावांचं आणि आम्हा चाहत्यांचं केवढं मोठं दुर्दैव !

पधल्या भिंती - १९६२

विजय तेंडुलकर यांचे 'मधल्या भिंती' हे तीन अंकी अतिगंभीर नाटक बसविण्याचा निर्धार केला वसंतराव यांनी. त्यातील कुटुंबप्रमुखाची नानांची भूमिका मी करण्याचे ठरले. लीला सुंदररैय्या यांनी नानांच्या पत्नीची-गृहिणीची भूमिका करावी असेही ठरले. माया धर्माधिकारी, विद्या गोडसे, जनार्दन कुर्डूकर, प्रकाश चिन्नापट्टण आणि कान्त नाईक यांच्याही भूमिका होत्या या नाटकात. आमच्या या नाटकाच्या तालमी नेहमीप्रमाणे नाट्यवाचनाने सुरू झाल्या. चार आठ दिवस चालले होते आमचे नाट्यवाचन. मग उभं राहून आम्ही आमचे संवाद म्हणण्यास सुरूवात केली. तेंडुलकरांचे संवाद अत्यंत खटकेबाज आहेत. संवादातील शब्द रचना अवघड वाटावी अशीच आहे. अनेक तालमी घेतल्याशिराय पाठांतर होणे अशक्यच वाटू लागले. रोज नियमितपणे तालमी होतच होत्या. एकेक प्रवेश घासून पुसून तयार करून घेत होते वसंतराव. खूप मेहनत घ्यावी लागली आम्हा सर्वांना. तीन अंकांच्या तालमी उत्तम झाल्या. सर्वांचेच पाठांतर चांगले झाले होते. अशा प्रकारे तीन अंक सलग करून घेत होते वसंतराव. प्रॉम्पटरची जरूर लागू नये, इतपत आमचे सर्वांचे पाठांतर झाल्याचे जाणवले त्यांना.

त्यानंतर एके दिवशी तालीम सुरू करण्यापूर्वी वसंतराव यांनी शांतपणे बॉम्ब शेल टाकला. मधल्या भिंती या नाटकाचा Intimate Play करण्याचा त्यांचा निर्धार झाला होता. या गंभीर आणि अवघड नाटकाचा Intimate Play करणं म्हणजे आम्हा सर्वांची सत्वपरीक्षाच होणार होती. हे आमच्या सर्वांच्याच समोर एक मोठे आव्हान होते. आम्हा सर्वांचा आत्मविश्वास भूमिती श्रेणीने वाढतच गेला. वसंतरावांचे हे वेडे स्वप्न साकार

करण्यासाठी आम्ही कंबर कसली.

मधल्या भिंती या नाटकाचा Intimate Play मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात करण्याचा वसंतरावांनी निश्चय केला. सभागृहाच्या मोठ्या हॉलचा पुढला भाग हाच रंगमंच. एका वेळी फक्त १२५-१५० प्रेक्षकांचीच सोय होणार होती. प्रेक्षकांची बसण्याची आसने तीन-चार पातळ्यांवर अशा रीतीने केली जाणार होती की सर्वांना विनासायास संपूर्ण रंगमंच सहज दिसावा. अशा सभागृहामध्ये ध्वनिवर्धकाची काय गरज ? वसंतराव दिग्दर्शक असले की कलानिकेतनच्या हौशी पार्श्वसूचकाला-प्रॉम्पटरला-संपूर्ण नाटक पाहण्यास मिळत असे. या नव्या प्रयोगामध्ये मेक-अप तर इतका सूक्ष्म असे की प्रेक्षकांना तो जाणवणारच नाही. नटवर्ग आणि प्रेक्षक यांना दुभागणारा मखमालीचा पडदा नसेल. सभागृहाचे दरवाजे हेच आमच्या घरातील हॉलचे दरवाजे. रंगमंचावर अत्यावश्यक असे अत्यल्प फर्निचर असेल. सभागृहाच्या बाजूचे दरवाजे म्हणजे आमच्या घरामध्ये प्रवेश करण्याचे दरवाजे. प्रेक्षकांच्या आसनांची पहिली रांग रंगभूमीच्या इतक्या जवळ होती की एखादे पात्र बोलत बोलत पुढे गेले की कदाचित त्याच्या हाताचा स्पर्श पहिल्या रांगेतील प्रेक्षकाला सहज होऊ शकेल. अशी असणार रंगमंच व्यवस्था आणि प्रेक्षकांची आसने.

आपल्या प्रत्येक नाटकाची-नाटिकेची-कार्यक्रमाची जाहिरात-पोस्टर्स किंवा फोल्डर्स वसंतराव अतिशय कल्पकतेने करीत असतं. मधल्या भिंतीच्या आमच्या नव्या प्रयोगासाठी केलेल्या फोल्डरवरची भाषा-हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. सामान्य माणसाच्या जीवनात देखील असामान्य नाट्यवस्तूची बीजं असू शकतात. त्यांतूनच एखादी गंभीर, तंग, संथ, कारूण्यपूर्ण आणि थोड्या फार गुंतागुंतीची नाट्यकृती निर्माण होऊ शकते. प्रतिभाशाली विजय तेंडुलकरांनी अशी नाट्यकृती निर्माण केली आहे. अशा नाट्य वस्तूचं दर्शन तितक्याच वास्तव स्वरूपात-अगदी जवळून-घडवावं याच हेतूनं रंगभूमी आणि प्रेक्षक यामधील अमेद्य पण पारदर्शक भिंत नाहीशी केलीय. नेहमीचा झगमगाट टाळून, रंगरंगोटी न करता, कृत्रिम देखावा मुळीच न उभारतां, कसलाही-मखमालीचा सुद्धा-आड पडदा न ठेवता, नाट्यवस्तू आपल्यासमोर निकट आली-जिवलग स्नेह्यासारखी हितगुज करू लागली, तर...तर आपल्याशीही तिचं नातं निर्माण होईल-एक न तुटणारं नातं ! दिग्दर्शनात हाच प्रयत्न आहे. पहिलाच प्रयत्न आहे म्हणून क्षम्य ठरावा अशी अपेक्षा नाही. ही आमची झेप सामर्थ्याबाहेरची आहे. याची जाणीव आहे. हा नवीन दृष्टिकोन एखादेवेळी आपणा प्रेक्षकांना पटला नाही, रूचला नाही, तर त्याचं कारण आमच्या उणीवातही असू शकेल. पण समजून घेण्याचा प्रयत्न केला तर कदाचित सर्व सोपं होऊन जाईल. नवीन वाटेनं पुढं जाण्यासाठी आम्हाला नवे हुरूप येईल.

सूचना-प्रयोगाच्यावेळी पूर्ण शांतता हवी. अंक संपल्याची सूचना पूर्ण अंधार करून दिली जाईल. मध्यंतराच्या शेवटी वाद्य संगीत चालू होईल. त्या अवकाशात प्रेक्षकांनी आपल्या आसनावर अलगद येऊन बसावे ही विनंती. प्रयोगाच्या शेवटी कलावंतांचा मुजरा घ्यावा.

मधल्या भिंती या नाटकातील एकमेव गीत ही वसंतरावांनीच लिहिलं होतं. त्या आपल्या गीताला त्यांनी अतिशय भावनोत्कट आणि चित्ताकर्षक चाल लावली. 'सांजवेळा' या करूण गंभीर गीताचे आर्त स्वर आजही अनेक श्रोत्यांना आठवतात. त्यांच्या मनात घुमत असतात.

मधल्या भिंती या आमच्या Intimate Play चे चार प्रयोग केले आम्ही लागोपाठ चार दिवसं. कमितकमी ६०० प्रेक्षकांनी आमचा हा प्रयोग पाहिला. विजय तेंडुलकरांच्या या गंभीर नाटकाचा असा Intimate Play करण्याची कल्पकता वसंतरावांचीच. आमच्या या प्रयोगानंतर एकदा पुण्यामध्ये माझी व डॉ. जब्बार पटेल यांची रस्त्यामध्ये भेट झाली होती. त्यावेळी डॉ. जब्बार पटेल म्हणाले, ''मोहोळकर, मधल्या भिंती सारख्या अवघड आणि अति गंभीर अशा नाटकाचा Intimate Play गोडसे यांनी कसा काय केला ?''

कलानिकेतन ही हैदराबादमधील संस्था हौशी नाट्यकलावंतांनी नावारूपाला आणली. वेड्याचं घर उन्हात, विठ्ठल तो आला आला, सदू आणि दादू, रात्र, मधल्या भिंती, चौफुली, नंदिनी इत्यादी प्रयोग सादर करून प्रेक्षकांना भरपूर आनंद दिला. महाराष्ट्राबाहेर झालेल्या या कार्यक्रमांना, नाटिकांना, नाटकांना, इंटिमेट प्लेला, मराठी जगतासाठी, वर्तमानपत्रामधून प्रसिद्धी मिळालीच नाही. कलानिकेतनला जाणणारे प्रेक्षक होते हैदराबाद-सिकंदराबादमध्ये. वसंत गोडसे हे नाव प्रसिद्ध होते याच जोड-नगरीत. महाराष्ट्राबाहेर वसंत गोडसे हे नाव माहित असलेले लोक फारच थोडे होते. त्या काळात बृहन् महाराष्ट्र वृत्तासाठी जागा नव्हती महाराष्ट्र टाईम्समध्ये. मग कलानिकेतन आणि वसंत गोडसे ही नांवे महाराष्ट्रातील प्रेक्षकांना माहित कशी असणार ?

मधल्या भिंती या नाटकातील कुटूंबप्रमुखाची-नानांची-भूमिका मी केली होती.नाटकातील माझ्या पत्नीच्या स्वभावाबद्दल मी विचार करू लागलो. एके दिवशी रात्री नेहमीप्रमाणे मी वसंतरावांच्या घरी गेलो. मधल्या भिंती नाटकातील आई जशी वागली, तशी वास्तव जीवनातील आई वागते काय, असा वसंतरावांना मी प्रश्न विचारला. वसंतराव म्हणाले, ''आपल्या मुलाबाळांना, त्यांच्या जन्मापासून तळहाताच्या फोडाप्रमाणे वाढविणारी, त्यांच्यावर प्रेमाची पाखर सतत घालणारी, माया-ममता-करूणा-सेवा-त्याग या गुणांची प्रचीती आपल्या वागण्याबोलण्यातून देणारी आई, आपल्या ज्येष्ठ मुलाने आपल्या इच्छेला अव्हेरून, स्वतःच्याच इच्छेला पटणाऱ्या मुलीशी आपला विवाह ठरविल्याचे कळताच, तीच आई चवताळते, त्याला नाही नाही ते बोलते, आपल्याच मुलाचा संसार उद्ध्वस्त करण्यास उद्युक्त होते, यामध्ये अतिशयोक्ती मुळीच नाही, मोहोळकर, अशी आई मी पाहिली आहे. अशा अहंकारी, आपलाच हेका चालवणाऱ्या, घरातील शांती-सुख-समाधान यांना चूड लावणाऱ्या आया प्रत्यक्षामध्ये असतात. मनुष्यस्वभावाचे असे विचित्र नमुने पहावयास मिळतात.''

महाराष्ट्र मंडळाचा चिटणीस व्हावे लागले मला. खरं म्हणजे आठ वर्षे महाराष्ट्र

मंडळाचा कोणत्याही प्रकारे पदाधिकारी नसतानाही मी खूप काम करीत होतो. पुढे परिस्थिती बदलली आणि मला चिटणीसाची जागा स्वीकारावी लागली. एके दिवशी काही तरी कामानिमित्त मी श्री. द. पं. जोशी यांच्या घरी गेलो होतो. सौ. उषाताई भेटल्या आणि मला म्हणाल्या, ''मोहोळकर, शिवराज्याभिषेकाचा त्रिशत सांवत्सरिक दिन येत आहे. त्यासाठी महाराष्ट्र मंडळाने एखादा कार्यक्रम करायला हवा. नाही का ?'' मलाही त्यांची सूचना योग्य वाटली. डोक्यात विचारचक्र सुरू झाले.

परत येता येता मी माझे पहिले दिग्दर्शक मैराळ यांच्या घरी गेलो. त्यांना ही कल्पना सांगितली. मैराळ यांना असा एखादा कार्यक्रम करावा असंच वाटलं. त्यांनी मला उलट प्रश्न केला, ''तुम्ही किती दिवस मोकळे आहात ? तुमच्या शिकवण्या केव्हा सुरू करणार आहात ?'' मी म्हणालो, ''जून अखेरपर्यंत मी वेळ देऊ शकेन. १ जुलैपासून मी माझ्या शिकवण्या सुरू करीन.'' मैराळ यांच्या मनातील शिवाजीची भूमिका करणारा नट मिळाला, याची जाणीव झाली मला. रायगडाला जेव्हा जाग येते, तुझा तू वाढवी राजा या नाटकातील निवळडक प्रवेश बसवावेत, असं मैराळ यांनी मला सुचवलं. मी या विचाराला होकार दिला आणि त्यांनाच प्रवेश निवडून काढण्यास सांगितले.

हैदराबाद नभोवाणीवर मी संभाजी, शिवाजी, सुधाकर, बॅरिस्टर विश्राम, घनश्याम यांचे एकपात्री प्रयोग केले होते. प्रत्यक्ष रंगभूमीवर आपण शिवाजी साकार करण्याचे माझे स्वप्न होते. ते माझे स्वप्न साकार करण्याची संधी आली.

मैराळ उत्साहाने कामाला लागले. त्यांनी दोन्ही नाटकामधील उत्तम प्रवेश निवडले. त्यासाठी आवश्यक अशी पात्रे मिळविली. मला शिवाजीची भूमिका दिली. हैदराबादमधील विविध नाट्यसंस्थांमधील हौशी कलावंतांना महाराष्ट्र मंडळामध्ये प्रथमच एकत्र आणण्याचे अवघड काम मैराळ यांनी केले.

विविध प्रवेशांच्या तालमी सुरू झाल्या मैराळ यांच्या घरातील हॉलमध्येच. नंतर महाराष्ट्र मंडळामध्ये आमच्या तालमी घेण्यात आल्या. शिवाजीचे प्रवेश त्यांनी असे निवडून काढले की मला माझे कसब पणाला लावता यावे.

रायगडाला जेव्हा जाग येते या वसंत कानेटकरांच्या नाटकातील काही प्रवेश होते. शिवाजी महाराज आपल्या सुनेच्या - येसूबाईच्या महालात जातात आणि त्यांना संभाजी राजांविषयी आपली तक्रार मनमोकळे करून सांगतात असा तो प्रवेश होता. सूनबाईच्या महालात महाराज जेव्हा जातात तेव्हा त्यांच्या डोक्यावर जिरेटोप आणि कंबरेला तलवार असण्याची आवश्यकता नाही, असा माझा विचार मी दिग्दर्शकांच्या समोर ठेवला. मैराळ म्हणाले, ''तुम्ही जाणकार नट आहात. तुम्हाला योग्य वाटेल तसे करा.'' मला डोक्यावरील जिरेटोप आणि तलवार यामुळे मोकळेपणाने काम करता येत नव्हते.

डोक्यावर जिरेटोप नाही, कंबरेला तलवार नाही, असे महाराज जातात सुनेच्या महालात. डोक्यावर ओझे नव्हते आणि हातही मोकळे झाले. त्यामुळे मी माझे संवाद

मोकळेपणाने म्हणू शकलो. माझ्या प्रवेशात महाराजांची दोन प्रदीर्घ स्वगते होती. स्वगत म्हणण्याची मला वेड्याचं घर या नाटकामध्ये चांगली सवय झाली होती. त्यामुळे शिवाजीची स्वगते मीच बसविली.

हे प्रवेश महाराष्ट्र मंडळाच्याच हॉलमध्ये आम्ही सादर करण्याचे ठरविले. प्रेक्षकांना बसण्यासाठी सतरंज्या घालाव्यात. ऐतिहासिक नाटकासाठी आवश्यक ते पोषाख आणि ड्रेपरी भाड्याने आणावी. प्रवेश फी कमीत कमी ठेवावी असाच निर्णय घेतला.

पहिला प्रयोग पाहण्यासाठी प्रेक्षकांनी गर्दी केली महाराष्ट्र मंडळात. केवळ एक रुपया प्रवेश फी ठेवल्याने हॉल भरण्यास वेळ लागला नाही. आमचे प्रवेश प्रेक्षकांना पसंत पडले. माझी स्वगते सर्वांनाच आवडली. शिवाजी साकार करण्याचे माझे स्वप्न शेवटी साकार झाले.

आमच्या या प्रवेशांचे प्रयोग चार पाच झाले. कोणत्या प्रयोगाला वसंतराव आले होते हे मला आज आठवत नाही. डॉ. राजूरकरांसारखे मर्मज्ञ आणि दर्दी प्रेक्षक आले होते आमचे प्रवेश झाल्यानंतर प्रत्यक्ष भेटून अनेकांनी माझे विशेष कौतुक केले. माझ्या स्वगतांची खूप तारीफ झाली.

प्रवेश झाल्यानंतर वसंतराव यांनी माझी पाठ थोपटली आणि घरी येऊन भेटण्यास सांगितले. काही प्रेक्षकांनी मला अशी सूचना केली की आम्ही रायगडाला जेव्हा जाग येते हे पूर्ण नाटक बसवावे. मलाही ही कल्पना आवडली. पण पात्रांची जमवाजमव करण्याचे कौशल्य नव्हते माझ्या स्वभावात. मैराळ यांनाही पूर्ण नाटक बसविण्याइतका वेळ नव्हता. पूर्ण नाटक बसविण्याची कल्पना मनातून काढून टाकावी लागली.

एके दिवशी मी वसंतरावांच्या घरी गेलो. आमच्या प्रवेशांबद्दल बोलणे सुरू झाले. मैराळ यांच्या दिग्दर्शनाबद्दल त्यांनी मला विचारले. मी त्यांना उत्तर दिले की त्यांनी मला नेहमीसारखे दिग्दर्शन केले नाही. मी माझ्या मनाप्रमाणे शिवाजीची भूमिका साकार केली.

वसंतरावांनी मला प्रश्न केला, ''मोहोळकर, तुमच्या शिवाजीच्या स्वगतांमध्ये एक प्रकारची लय स्पष्टपणे दिसून आली. Poetic Prose किंवा Musical Prose अशी वाटली तुमची स्वगते. शेक्सपियरच्या नाटकात अशी लय असते. स्वगतामधील ही लय तुम्ही विचारपूर्वक ठेवली होती का मैराळांनी तशी लय आणण्यास सांगितले.''

मी उत्तर दिले, 'वसंतराव, माझ्या स्वगतामध्ये अशी लय होती, हेच मला खरं वाटत नाही. तुम्हाला ती लय जाणवली, याचंच मला आश्चर्य वाटतं. हेतूपर्वक हे घडलेलं नाही. दिग्दर्शकाने अशी काही सूचनाही मला दिली नव्हती.'

वसंतरावांचं म्हणणं पडलं की अशी लय त्यांना स्पष्ट जाणवली आणि त्या लयीमुळेच माझी स्वगते अत्यंत प्रभावी वठली. वसंतरावांच्या म्हणण्यावर मला स्वत:शीच खूप विचार करावा लागला. असं काही घडलं असेल असं मला स्वप्नामध्ये देखील वाटलं नाही. वसंतरावांचा निरोप घेऊन निघालो.

एकदोन दिवसांनी मी दिग्दर्शक मैराळ यांच्या घरी गेलो आणि त्यांना गोडसे यांनी विचारलेल्या प्रश्नाबद्दल त्यांचे मत विचारले. मैराळ एकदम आनंदित झाले. ते म्हणाले, 'हे पहा मोहोळकर, तुमच्या स्वगतांमध्ये अशी लय होती आणि त्यामुळेच ती स्वगते एकदम सुंदर झाली. मी मात्र तुम्हाला अशा प्रकारचे दिग्दर्शन केले नव्हते. तुम्ही स्वतःच ती लय आणली असावी, यात संशय नाही. हे सारे कसब तुमचेच.'

वसंतरावांच्या म्हणण्याला प्रत्यक्ष दिग्दर्शकानेच दुजोरा दिला. मग मी आणखी काही जाणकारांना याबद्दल विचारले. त्यांनी देखील वसंतरावांचे म्हणणे उचलून धरले. मला मोठेच आश्चर्य वाटले.

एके दिवशी मी डॉ. राजूरकरांची भेट घेतली. त्यांना वसंतरावांचे व मैराळ यांचे म्हणणे सांगितले. त्यांना मी विचारले, 'डॉक्टरसाहेब, खरोखरच आपल्याला अशी लय माझ्या स्वगतामध्ये जाणवली काय ?'

डॉ. राजूरकर मला म्हणाले, 'अशी लय मलाही प्रकर्षाने जाणवली. या खास लयीमुळेच तुमची शिवाजीची स्वगते सर्वांना आवडली. पडदा उघडेपर्यंत मी ऐतिहासिक शिवाजीची प्रतिमा माझ्या मनासमोर आणीत होतो. प्रत्यक्ष तुमचा शिवाजी मी समोर पाहिला आणि माझ्या कल्पना तंतोतंत खऱ्या ठरल्या. तुमचा शिवाजी अप्रतिम झाला, यात दुमत होणारच नाही.'

डॉ. राजूरकरांच्या म्हणण्याचा माझ्यावर विलक्षण परिणाम झाला. विचारचक्राने वेग घेतला. मी याच एका विचाराने झपाटला गेलो.

मग परत मी वसंतरावांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. मैराळ, डॉ. राजूरकर आणि अशाच तीनचार जाणकार प्रेक्षकांनी तुमच्या म्हणण्याला पुष्टी दिली असल्याचे मी त्यांना सांगितले. मग मी हे स्पष्ट केले, 'वसंतराव, माझ्या स्वगतामधील लय नाटककाराच्या भाषेमध्ये नव्हती, दिग्दर्शकानेही तशी लय ठेवण्यास सांगितले नव्हते आणि मीदेखील जाणूनबुजून ती लय आणली नव्हती माझ्या स्वगत भाषणात. माझी स्वगते त्या लयीमुळेच प्रभावी झाली हे मला कबूल करायलाच हवं. मग ही लय शिवाजीच्या माझ्या भाषणात आली कशी ? वसंतराव, मी प्रांजळपणानं हे सांगतो की जर ही लय माझ्या स्वगतामध्ये माझ्या नकळत आली असेल आणि त्या लयीमुळेच माझी स्वगते जाणकार प्रेक्षकांना आवडली असतील, तर याचे सर्वस्वी श्रेय तुमचेच आहे. वेड्याचं घर मधील स्वगते तुम्हीच बसवून घेतलीत. त्या तुमच्या शिकवणुकीमुळेच ती लय माझ्या स्वगतामध्ये आली.'

१९६८ नंदिनी

कलानिकेतनच्या वतीने वसंतराव यांनी 'नंदिनी' हे तीन अंकी अद्भुतरम्य नि धक्का देणारे नाटक सादर करून आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची खात्री पटवली. हैदराबाद, सिकंदराबाद या जोडशहरामधील प्रेक्षकांना या नाटकाचा प्रयोग केला त्यांनी

रवींद्रभारतीमध्ये. यापूर्वी त्यांच्या कोणत्याही नाटकाचा प्रयोग रवींद्रभारतीमध्ये झाला नव्हता. नंदिनी या नाटकाचे भाग्य मोठे म्हणूनच या नाटकाचा प्रयोग रवींद्र भारतीच्या भव्य आणि आलिशान रंगमंचावर करण्यात आला. वसंतराव होते या नाटकाचे (१) रूपांतरकार- लेखक (२) दिग्दर्शक (३) निर्माते (४) नेपथ्यकार (५) प्रकाशयोजनाकार - म्हणजे सर्वेसर्वा !

हार्वे या इंग्रजी नाटकाचे मराठीमध्ये रूपांतर केले वसंतरावांनी. हार्वे या मूळ नाटकात नायकाचा घनिष्ट मित्र असतो एक ससा-जो फक्त त्यालाच दिसतो. त्याच्याशीच बोलतो. थोडासा बदल केला वसंतरावांनी, नंदिनीमध्ये त्यांनी नायकाची मैत्रिण, एक अटकर बांध्याची, पाणीदार मोठाले डोळे असणारी, पांढरीशुभ्र गाय ! ही नंदिनी पाहू शकतो फक्त या नाटकाचा नायक. तोच फक्त तिच्याशी बोलू शकतो, तिच्याशी हितगुज करू शकतो, तिच्याशी संवाद करू शकतो. नंदिनी या नाटकाचा नायक सावळे या तरूण आणि देखण्या नटाने मोठ्या ताकदीने आणि दिमाखात उभा केला होता. नंदिनीमधील मुख्य भूमिका केली होती मंगलाबाई जोशी यांनी.

नाटकाचा नायक असतो अमाप आणि अफाट संपत्तीचा एकुलता एक वारस. त्याची संपत्ती लुबाडण्यासाठी त्याचे जवळचे नातेवाईक त्याला वेडे ठरवायचा प्रयत्न करतात. पण या त्यांच्या कारवायांना मुळीच यश येत नाही. मानसोपचार तज्ञ म्हणतो की वेडेपणाचे एकही लक्षण त्याच्या वागण्याबोलण्यात नाही.

या नाटकातील कल्पकता आणि अद्‌भुतरम्यता प्रेक्षकांना बरोबर जाणवावी, यासाठीच वसंतरावांनी प्रत्येक प्रेक्षकाला एक पत्रक देण्याची व्यवस्था केली. नाट्यगृहात प्रवेश करतांनाच हे पत्रक प्रत्येकाला दिले गेले. या पत्रकातील मजकूर वसंतरावांनीच तयार केलेला होता तो असा -

ती तुम्हाला गोड गुदगुल्या करील - हंसवील - हळूच तुमच्या कानात काही कुजबुजेल तुम्ही क्षणात गंभीर व्हाल - अस्वस्थ व्हाल - वाटेल - 'हे असं कसं ? आणि पण खुदकन हसून ती लगेच निघून जाईल - नाहीशी होईल - त्यापूर्वीच तुम्ही तिला भेटाल - केव्हा - कुठे ते नंतर सांगू - तूर्त एवढाच - तिचं नाव 'नंदिनी' लेखक - दिग्दर्शक - वसंत गोडसे - सादरकर्ते - कला निकेतन हैदराबाद - विसरू नका हं - तिचं नाव 'नंदिनी'

अशा प्रकारचं वैशिष्ट्यपूर्ण फोल्डर वसंतरावांनी खास बनविलं होतं - मधल्या भिंतीचा Intimate Play ,सादर करताना त्या फोल्डरने प्रेक्षकाला समजले Intimate Play कसा असतो - कसा सादर केला जातो, नंदिनी आणि मधल्या भिंती या दोन्ही नाविन्यपूर्ण प्रयोगांच्या सादरीकरणापूर्वीच प्रेक्षकांना जाण देण्याची आवश्यकता जाणवली वसंतरावांना!

वसंतरावांनी १९७० मध्ये भगिनी मंडळाच्या हॉलमध्ये एक बहारदार कार्यक्रम सादर करून रसिकांना भरपूर आनंद दिला. (१) स्त्रीजीवन दर्शन (२) नैन लागी - हिंदी एकांकिका (३) दोन पारवे - एक बारव आणि गंमतजंमत (४) नाट्यवाचन - नाविन्यपूर्ण

वाचनाचा अनोखा कार्यक्रम.

स्त्रीजीवन दर्शनाचा एक कार्यक्रम वसंतराव यांनी १९५७ मध्ये सादर केलाच होता. त्याचीच ही सुधारून वाढविलेली आवृत्ती म्हणायला काही हरकत नाही. बीडकडच्या मायबहिणींकडून मिळालेल्या ओव्या, स्त्रीगीते, लोकगीते यांना वसंतरावांनी स्वतःच सुंदर चाली लावून त्यांचा एक सुंदर कार्यक्रम सादर केला. वसंतरावांनी ही गीते आणि गाणी बसवून घेतली आणि अनेक गायिकांनी गाऊन रसिकांना तृप्त केलं. या एक तासभर चालणाऱ्या कार्यक्रमाचं निवेदन वसंतरावांनीच सुरेख भाषेमध्ये लिहून काढलं होतं. हे निवेदन वाचलं होतं लीलासुंदरैय्या यांनी. त्यांच्या ह्या नाट्यपूर्ण आणि भारदस्त वाचनाने कार्यक्रमाची रंगत खूपच वाढली. संगीत दिग्दर्शन, चाली, ओव्यांची निवड आणि सर्वांगसुंदर असे निवेदन या सर्व गोष्टी वसंतरावांच्याच.

(२) नैनालागी ही एक खुसखुशीत हिंदी एकांकिका. या एकांकिकेचे लेखन आणि दिग्दर्शन वसंतरावांचेच. वसंतरावांच्या प्रतिभेचा हिंदी आविष्कार.

(३) दोन पारवे - एक बारव आणि गंमतजंमत. ही अत्यंत विनोदी आणि खळखळून हसायला लावणारी एकांकिका वसंतरावांनी स्वतःच लिहून दिग्दर्शित केलेली. हिंदी आणि मराठी अशा भाषेमध्ये वसंतराव अत्यंत विनोदी लिखाण करू शकत होते हे सिद्ध करणाऱ्या या एकांकिका. अतिशय हलकंफुलकं आणि रंगतदार लेखन त्यांनी केलं असेल यावर विश्वासच बसू शकत नाही. एखाद्या सिद्धहस्त विनोदी लेखकाच्याच या एकांकिका असणार, अशीच शंका येऊ शकेल. वसंतरावांचे गंभीर लिखाण त्यांच्या एकांकिकेद्वारे आणि त्यांच्या श्रुतिकेतून सर्वांना पहायला आणि ऐकायला मिळाले होते. पण या विनोदी एकांकिकांनी सर्वांचाच भ्रमनिरास झाला. विनोदी लेखन करू शकणारे वेगळेच वसंतराव यातून स्पष्ट दिसतात.

(४) नाट्यवाचनाचा, न भूतो न भविष्यति, असा आगळावेगळा कार्यक्रम करण्याची अफलातून कल्पना वसंतरावांचीच ! नाट्यवाचनाचा नेहमीचा कार्यक्रम सर्वांनाच करता येतो आणि पहाण्यास ऐकण्यास मिळतो. पण हा नवाच नाट्यवाचनाचा प्रकार सर्वांना पसंत पडला. नाट्यवाचन करणाऱ्या पात्राच्या समोर नाटकाचे पुस्तक आणि एक टेबललॅम्प ठेवलेले दिसतात. हॉलमधील सर्व दिवे बंद केले जातात. हॉलमध्ये अंधार. ज्या पात्राची एन्ट्री होणार आहे, त्या पात्राने आपल्या समोरील टेबललॅम्पचे बटन दाबून बल्ब लावायचा. बल्ब लावला की पात्राची एन्ट्री झाली आणि बल्ब बंद झाला की त्या पात्राची एक्झिट झाली अस समजायचं. ही सूचना प्रेक्षकांना नाट्यवाचन सुरू करण्यापूर्वी दिली जायची. प्रेक्षकांचे कुतूहल शिगेला पोचलेले असते, नाट्यवाचन सुरू होण्यापूर्वी. कान टवकारून आणि डोळे फाडून प्रत्येक प्रेक्षक उत्सुक झालेला असतो. नाट्यवाचन करणे ही देखील एक कला आहे. भाषेतील चढउतार, शब्दांची फेक, भाषेतील ओज समजून नाट्यवाचन केले तरच हा प्रयोग यशस्वी होतो.

ध्यानीमनी नसता हा देखील एक अत्यंत नाविन्यपूर्ण असा कार्यक्रम. या कार्यक्रमाची संकल्पना वसंतरावांच्या कल्पक विचारातूनच स्फुरलेली. ध्यानीमनी नसता या कार्यक्रमाला लिखित काहीही नसते. सर्वच कार्यक्रम उत्स्फूर्त आणि सतत फुलत जाणारा, उमलत जाणारा, पुढेपुढे धावणारा.

एका पात्राने रंगभूमीवर प्रवेश करायचा आणि कोणता तरी विषय घेऊन बोलायला सुरुवात करायची. दुसऱ्या पात्राने प्रवेश करायचा आणि पहिल्या पात्राने सुरू केलेल्या विषयाला अनुसरून पहिल्या पात्राशी संवाद सुरू ठेवायचा. योग्यवेळी Exit घ्यायची आणि तिसऱ्या पात्राने Entry घ्यायची. विषयाचा गाभा कायम ठेवून, सूत्र लक्षात घेऊन संवाद चालू ठेवायचे. एका विषयातून दुसरा विषय सुरू करण्याचे कौशल्य दाखविण्याचे महत्वाचे कार्य कोणतेही पात्र करू शकते. संवाद चालू ठेवण्यासाठी पात्राने विचारपूर्वक बोलावे लागते. कितीही पात्रे Entry घेऊ शकतात आणि काही बोलणे झाल्यानंतर Exit घेऊ शकतात. अर्धा-पाऊण तास अशा संवादात कसा निघून जातो हे समजतच नाही. श्रोते शांतपणे ऐकत असतात. हा कार्यक्रम प्रेक्षकांनी पसंत केला. कार्यक्रमाच्या कल्पनेचेच खास कौतुक झाले. या प्रकारचा कार्यक्रम कुठेही, कधीही झाल्याचे ऐकले नाही किंवा वाचले नाही. वसंतरावांच्या नाट्यप्रतिभेतून सुचलेला हा नाट्याचा आगळाच आविष्कार. वसंतरावांच्या विचारमंथनातून असे कार्यक्रम निर्माण होत गेले. कलानिकेतन या संस्थेच्या वतीने त्यांनी ते सादर केले.

वसंतराव सतत नाविन्यपूर्ण, आगळ्यावेगळ्या, इतरांना न सुचणारे प्रयोग करण्याच्या प्रयत्नात असत. नव्या नव्या कल्पना त्यांना सुचत असत. त्या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याची त्यांची धडपड अपूर्व असे. विजय तेंडुलकरांचे नभोनाट्य द्रुकश्राव्य रात्र ही एकांकिका प्रत्यक्ष रंगमंचावरून सादर करण्याची कल्पना त्यांचीच. नभोनाट्याला रंगमचांवरून प्रत्यक्ष दाखविण्याचे धाडस कुणी केले असेल असे वाटत नाही. कलानिकेतन ही संस्था स्थापन करण्याचा हाच मूळ हेतू होता. कलामंडळ या नाट्यसंस्थेने वसंतरावांना नाट्यनिर्मिती आणि नाट्यदिग्दर्शन करण्याची संधी दिली म्हणूनच वसंतराव नाट्यचळवळीमध्ये रमले आणि रंगले. नाटक करण्याच्या वेडाने ते झपाटले गेले होते. पण असे नवे प्रकार हाताळण्याची संधी कलामंडळाने त्यांना देण्यास ठाम नकार दिला. आपल्या कल्पनेचे नवीननवीन धुमारे त्यांना स्वस्थ बसू देईनात. आपल्या कल्पनांना वाव देणारी संस्थाच स्थापन करण्यात त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्याशी सहमत असणारी मित्रमंडळी त्यांच्याभोवती होतीच. आपल्या कल्पना, आपले विचार आणि नाविन्यपूर्ण कार्यक्रम सादर करण्याची तीव्र इच्छा त्यांनी मित्रांच्या समोर आग्रहाने मांडली आणि निर्धारपूर्वक सर्वांच्या गळी उतरविली. यातूनच वसंतरावांची नाट्यकला फुलली, उमलली आणि बहरली.

❑ ❑

1972 Our India Shadow Play

भारतीय स्वातंत्र्ययुद्धाच्या रौप्य महोत्सवानिमित्त हैदराबादमध्ये टेक्निकल एज्युकेशन आणि यूथ सर्व्हिसेस, आंध्रप्रदेश यांच्या संयुक्त सहकार्याने एका Shadow Play चे आयोजन करण्यात आले होते. याचा प्रयोग रवींद्रभारतीमध्ये विशाल पडद्यावर दाखवून वसंतरावांनी आपल्या कल्पकतेने प्रेक्षकांना विस्मयचकित करून सोडले. शासनातर्फे हा छायानाट्याचा कार्यक्रम होणार असल्यामुळे वसंतरावांनी आपले दिग्दर्शनाचे कसब पणाला लावून, भरपूर परिश्रम घेऊन तो सादर करण्याचे ठरविले. वसंतरावांच्या दृष्टीने ही सुवर्णसंधीच प्राप्त झाली होती.

वसंतरावांनी केलेला हा प्रयोग नाविन्यपूर्ण तर होताच, पण असा छायानाट्याचा प्रयोग हैदराबादमध्ये पूर्वी कधीही झालेला नव्हता. या देखण्या प्रयोगात त्यांनी विविधरंगी प्रकाशझोत वापरून, पडद्यावरील छाया केवळ काळ्या किंवा पांढऱ्या न राहता, त्यांना एक निराळीच विविधरंगी आकर्षकता लाभली होती. कमी पात्रांचा वापर करून, पण अनेकदा दोन किंवा तीन प्रकाशझोतांच्या मदतीने अनेक छाया निर्माण करून माणसांची गर्दी असल्याचा भास बेमालूमपणे करण्यात यश मिळविले होते.

छायानाट्याचा या प्रयोगात मला केवळ एक मिनिटासाठी वसंतरावांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांची भूमिका करण्याची संधी दिली होती. लोकमान्य टिळक छायेमध्ये साकार करण्याचे भाग्य मला लाभले. केवळ एका मिनिटाच्या तालमीसाठी मला रोज ठराविक वेळी उपस्थित रहावे लागत असे. तालमी रोज झाल्याच पाहिजेत असा त्यांचा दंडक होता. प्रथितयश नटाला देखील तालमीची आवश्यकता असते, असा वसंतरावांचा आग्रह योग्यच होता. हॉलिवुड किंवा इंग्लंड मधील नामांकित नट, शेकडो प्रयोग झालेल्या नाटकांच्या तालमी कधीही चुकवीत नसत, असं आपण वर्तमानपत्रातून वाचले आहे. लॉरेन्स ऑलिव्हियेसारखा अभिनयसम्राट देखील नियमितपणे तालमी करीत असे. असं ते सर्वांना सांगत.

पगडी, छपरी मिशा आणि उंचावलेले उजव्या हाताचे पहिले बोट छायेत पाहून सर्व प्रेक्षकांना समजले की छाया आहे लोकमान्य बाळ गंगाधरांची. Swaraj is my birth right and I will have it. हे एकच वाक्य ठासून बोललो आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. या टाळ्या माझ्यासाठी नव्हत्या. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या ठाम निश्चयाला होत्या यात काय संशय ?

छायानाट्याचा हा प्रयोग शासनाधिकाऱ्यांना एकदम पसंत पडला. या छायानाट्याचा प्रयोग भारताच्या राजधानीत - दिल्लीमध्ये झालाच पाहिजे, असं अनेक मोठ्या अधिकारी मंडळींना वाटले. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न सुरू केले होते. दिल्लीत हा प्रयोग होणार अशी बातमी सर्वत्र पसरली. पण वसंतरावांच्या यशाला काळिमा लावणारे, कृष्णकारस्थान

करणारे, मत्सरी लोक एकदम जागे झाले. त्यांच्या कटाला यश आले. छायानाट्यांचा प्रयोग दिल्लीत होऊ शकला नाही. दुर्दैव त्यांचे !

कलानिकेतनचे कार्यक्रम फारसे होईनात. वसंतरावांची कुचंबणा होऊ लागली. मला फार वाईट वाटू लागले. वसंतराव यांनी हैदराबाद सोडून जावे आणि पुण्यामुंबईसारख्या ठिकाणी नाटके दिग्दर्शित करावीत, असा विचार माझ्या मनात सतत येऊ लागला. प्रा. वसंत कानेक्टकरांना मी हा विचार एकदा सांगितला. त्यांनी वसंतरावांना सुचविले, 'गोडसे, तुम्ही चला मुंबईला. मी तुमची ओळख करून देतो तेथील नाट्यसंस्था चालविणाऱ्यांशी. नाटके करण्याची संधी तुम्हाला मिळवून देईन मी.' वसंतरावांना या बाबतीत ठाम निर्णय घेणे अवघड वाटत असे.

एका नाटकासाठी प्रभाकर पणशीकर हैद्राबादला आले असताना मी त्यांच्याशी बोललो गोडसे यांच्याबद्दल. ते गोडसे यांना म्हणाले, 'हे पहा गोडसे, तुम्ही चला मुंबईला. नाट्यसंपदेची सारी प्रॉपर्टी तुमच्यासाठी मी देतो. तुम्ही तुमच्या मनाप्रमाणे नाटक बसवा. नाट्यसंपदेतर्फे नाटक आपण सादर करू.' वसंतराव गोडसे यांचा यावर विश्वास बसत नव्हता. त्यांची साशंकता त्यांना अस्वस्थ करीत असे. पणशीकरांनी असं आश्वासन देऊनही गोडसे मुंबईला जाण्याची संधी घेण्यास धजावले नाहीत.

लोकसत्तेला टाळा असतांना विजय तेंडूलकर आले होते हैदराबादला. वसंतराव गोडसे यांच्या घरीच उतरले होते. एकदा आम्ही दोघेच असताना मी हा विषय काढला तेंडूलकरांच्यासमोर. त्यांनी देखील वसंतरावांना आग्रह केला मुंबईला येण्याविषयी. तेंडुलकरांचा अनेक नाट्यसंस्थांशी संबंध होता. ते गोडसे यांना सर्व प्रकारची मदत करण्यास मनापासून तयार होते. पण गोडसे यांना भीती वाटत असे की मुंबईला गेल्यावर त्यांना नाटक बसविण्याची संधी मिळेल का ? त्यांना खात्री वाटत नव्हती मुंबईमधील नाट्यसंस्थांविषयी.

पंडित अभिषेकीची पत्नी म्हणजे वसंतराव गोडसे यांची पुतणीच. मी अभिषेकींना सुचविले, 'गोडसे यांना आपण पुण्यामुंबईला घेऊन जा. येथे त्यांच्या कसबाला वाव नाही आता. हा गुणी कलावंत येथे निष्क्रीय होत आहे.' अभिषेकी यांनी देखील वसंतराव यांना आश्वासन दिले मुंबईत संधी देण्याचे.

एकदा तर वसंतराव खूप रागावले माझ्यावर. ते म्हणाले, 'मोहोळकर, हे काय चालविले आहे तुम्ही ? मला मुंबईला घेऊन जा असं कशासाठी सांगत आहात सर्वांना ? ही मंडळी येथे हो म्हणतात. मुंबईला मला नेल्यानंतर ते खरोखरच एखादे नाटक बसवू देतील असं मला वाटत नाही.' वसंतराव यांनी मुंबईला जाऊन पहायला हरकत नव्हती. एखाद्या मे महिन्याच्या सुटीत. पण ते गेले नाहीत. आत्मविश्वास कमी पडला त्यांचा. माझा विचार त्यांना आवडला नाही. जुन्या नाटकाचा प्रयोग करण्यासही त्यांची तयारी नव्हती. प्रत्येक वेळी नवीन आणि उत्तम नाटक कसं मिळणार ?

कलानिकेतनचे कार्यक्रम कमी होऊ लागले. कलानिकेतनमधील कार्यकर्त्यांच्या उत्साहाला उतरती कळा लागली. वसंतरावांनी बसवलेली नाटके खूपच गंभीर असतात अवघड असतात. आणि तीन महिने तालमीसाठी आणि प्रयोगातील तांत्रिक बाबीसाठी खर्चही भरपूर येतो, अशा अनेक तक्रारी सुरू झाल्या. वसंतराव खूपच निराश झाले. त्यांची उमेद व उभारी कमी झाली. कलानिकेतन थंडावल्याचे त्यांच्या लक्षात येण्यास वेळ लागला नाही.

वसंतरावांना चैन पडेना. योग्य संधीची आणि उत्साही कलाकारांची ते अत्यंत आतुरतेने वाट पहात होते. काही धडपड्या, उमेदीने. उत्साहाने नाट्यप्रयोग करणाऱ्या तरूण मंडळींशी वसंतरावांचा परिचय होण्याचा योग आला. भास्कर शेवाळकर, सुहास पळशीकर, नरेंद्र काटकर, भास्कर कुलकर्णी, विजू परळीकर, अनंत कुलकर्णी या तरूणांची 'रंगधारा' ही नाट्यसंस्था नावारूपाला येत होती. ही सारी तरूण मंडळी नाटके करण्याच्या जोशाने झपाटलेली दिसली. वसंतराव या रंगधारेच्या प्रवाहात सामील झाले. या तरूणांशी मनमोकळ्या चर्चा करू लागले. या तरूणांच्या नाट्याबद्दलच्या वेडाने आणि निष्ठेने वसंतराव प्रभावित झाले. त्यांचा उत्साह द्विगुणीत झाला. नाटक सादर करण्याची संधी मिळावी हीच एक इच्छा मनामध्ये धरून वसंतराव रंगधारेच्या कार्यक्रमात रस घेऊ लागले.

ध्यानीमनी स्वप्नी नसलेली एक सुंदर संधी रंगधारेने वसंतरावांना दिली. बेकेटचे Waiting For Godot हे नवनाट्य ननाट्य - महाराष्ट्र राज्य स्पर्धेसाठी मुंबईला नेण्याचे रंगधारेने ठरविले. गोदो के इंतजारमे या नावाचं गोदोबद्दलचेच एक संक्षिप्त हिंदी रूपांतर वसंतराव यांनी याआधीच सादर केलं होतं. या ननाट्याविषयी त्यावेळी वसंतराव यांनी भरूपर चिंतन-मनन केले होते. स्पर्धेसाठी तेच नाटक सादर करण्याच्या रंगधारेच्या इराद्याला वसंतरावांनी योग्य ते सहकार्य आणि मार्गदर्शन करण्याची तयारी दाखविली.

वेटिंग फॉर गोदो या नवनाट्याच्या प्रयोगासाठी वसंतरावांनी लिहिलेली छोटीशीच पण अर्थपूर्ण प्रस्तावना, मुद्दाम तयार केलेला झाडाचा एक अमूर्त आकार, विस्तीर्ण सायक्लोरामाचा करून घेतलेला सुरेख उपयोग, या सर्वच गोष्टींमुळे नाटक अधिकच परिणामकारक होण्यास मदत झाली. सतत तीन महिने आत्मविश्वासाने आणि जिद्दीने वसंतराव या ननाट्याच्या तालमी घेण्यास तयार झाले. वेशभूषा आणि संगीताची त्यांनी केलेली जुळवाजुळव यामुळे प्रयोगाचे मूल्य खूप उंचावले यात शंकाच नाही. वसंतराव होते दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक.

प्राथमिक स्पर्धेमध्ये वेटिंग फॉर गोदो परीक्षकांना पसंत पडले. खूपच तारीफ झाली. रंगधारेच्या या प्रयोगाची. अंतिम नाट्यस्पर्धा झाल्या मुंबईमध्ये. रंगधारेच्या प्रयोगाने मुंबईकर जाणकार प्रेक्षक विस्मयचकित झाले. प्रयोग झाला सर्वांगसुंदर. सर्व परीक्षकांनी आणि दर्दी प्रेक्षकांनी प्रशंसा एकमताने केली. या प्रयोगाचा क्रमांक पहिला आला. रंगधारेने भरघोस यश प्राप्त केले.

हैदराबादचे रंगधारा या नाट्यसंस्थेचे आणि वसंत गोडसे यांचे नाव महाराष्ट्रात सर्वतोमुखी झाले. वसंतराव यांनी एक नवा इतिहासच घडविला. त्यांच्या कुशल आणि कल्पक दिग्दर्शनामुळे वेटिंग फॉर गोदोचा प्रयोग दर्जेदार झाला. अंतिम स्पर्धेमध्ये वेटिंग फॉर गोदोचा प्रयोग सर्वोत्कृष्टच ठरला. सर्व परीक्षकांनी याला प्रथम क्रमांक दिला. एवढेच नव्हे तर वेटिंग फॉर गोदोने दिग्दर्शन, अभिनय, नेपथ्य आणि प्रकाशयोजना यांचीही बक्षिसे पटकावली. अशी एकूण पाच बक्षिसे याच एका नाटकाने मिळवून एक नवाच विक्रम प्रस्थापित केला. स्पर्धेच्या इतिहासामध्ये हा नवीनच विक्रम होता. महाराष्ट्राबाहेरील बृहन्महाराष्ट्रातील हैदराबादसारख्या एका शहरातील रंगधारा या तरूणांच्या हौशी संस्थेने हा बहुमान मिळविला. रंगधारेच्या या यशामध्ये वसंतराव यांचा सिंहाचा वाटा होता याबद्दल दुमत होणे शक्यच नव्हते. गोडसे यांची मोठी महत्वाकांक्षा पूर्ण जाली. एक भव्य स्वप्न साकार झाले.

वसंत गोडसे हे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि संपूर्ण बृहन्महाराष्ट्रातही एकदम सर्वांच्या समोर आले आणि दिग्दर्शक वसंतरावांना लोकमान्यतेबरोबरच राजमान्यताही प्राप्त झाली. वसंतरावांची अनेक वर्षांची नाट्यसाधना सफल झाली. पहिल्या क्रमांकाचे नाट्य दिग्दर्शक म्हणून गोडसे गाजले. वसंतरावांचे अनेक वर्षांचे अथक प्रयत्न आणि अविश्रांत कष्ट सार्थकी लागले. यशोमंदिराचे शिखर पादाक्रांत केले वसंतरावांनी!

यानंतर मी एके दिवशी नेहमीप्रमाणे वसंतरावांच्या भेटीसाठी गेलो होतो. ते सचिंत बसलेले पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. सचिंत बसलेले मी त्यांना कधीच पाहिले नव्हते. म्हणून मी त्यांना विचारले, "वसंतराव काय झाले ?" ते शांतपणे म्हणाले, "मुंबईला माझा बायाडेटा पाठवायचा आहे. नाट्य परीक्षक मंडळाने माझा बायोडेटा मागविला आहे. पण मला माझाच बायोडेटा तयार करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे सापडतच नाहीत. काय करू ?" मी वसंतराव यांना म्हणालो, "वसंतराव, या रविवारी सकाळी बरोबर ८ वाजता मी येथे येतो. आपण दोघे मिळून सर्व पेट्यांमधील, ड्रावर्समधील कागदपत्रे बाहेर काढू. सर्व कागद तुम्ही वाचून पहा. उपयोगी असणारे कागद वेगळेच ठेवू. इतर सर्व कागद काळजीपूर्वक वाचून बघा. मग बायोडेटा तयार करू या."

रविवारी सकाळी ठरल्याप्रमाणे मी वसंतरावांच्या घरी गेलो. शोधाशोध सुरू केली. सर्व पेट्या, चेस्ट ऑफ ड्रॉवर्स यामधील प्रत्येक कागद काढून बाजूला ठेवला. कसरीने आणि वाळवीने कितीतरी कागद नष्ट झालेले दिसले. त्यांच्या एकांकिका, नाटकाची टिपणे भावगीते आणि संगीतरचना वाळवीने खाऊन टाकल्या होत्या. कपाटातील, पेटीतील चेस्ट ऑफ ड्रॉवर्समधील तळाशी असलेले कागद बाहेर काढण्यास ते अक्षरशः विसरून गेले होते. नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगमंच सूचना लिहून ठेवलेले सर्व कागद जीर्णशीर्ण होऊन गेले होते.

नाटकाच्या जाहिराती, फोल्डर्स असे आवश्यक ते कागद सापडल्यामुळे त्यावरून

बायोडेटा तयार करणे सोपे गेले. आम्ही दोघांनी मिळून त्यांचा बायोडेटा तयार केला. वसंतराव मला म्हणाले, ''मोहोळकर, तुम्ही आला नसता तर हे किचकट काम माझ्या एकट्याने पूर्ण झाले नसते. लाख लाख शुक्रिया.'' वसंतरावांचा बायोडेटा करण्यासाठी मी त्यांना थोडीफार मदत करू शकलो, याचा मला आनंद लाभला. वसंतरावांचा चेहरा समाधानाने फुलला.

वसंतराव मुंबईला गेले रंगधारेच्या सर्व कार्यकर्त्यांच्या बरोबर. बक्षिस समारंभाचे आयोजन सुंदर करण्यात आले होते. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचे बक्षीस घेण्यास वसंतराव उठले, तेव्हा संपूर्ण सभागृहामध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला. इतर चार पारितोषिके घेण्यास रंगधारेच्या त्या त्या व्यवस्थापकाला बोलावण्यात आले. एकाच संस्थेने एकूण पाच बक्षिसे पटकावल्याचे दुसरे उदाहरण नव्हते. रंगधारेने हे नाव कमावले.

वेटिंग फॉर गोदोचा प्रयोग हैदराबादमध्ये करण्याचे रंगधारेने ठरविले. भगिनी मंडळाच्या सभागृहात वेटिंग फॉर गोदोच्या तालमी सुरू झाल्या. एके दिवशी वसंतराव यांनी मला तालीम पाहण्यासाठी बोलावले असल्याचा निरोप मिळाला. तालीम पहाण्यासाठी मी भगिनी मंडळाच्या सभागृहामध्ये वेळेवर गेलो. वसंतरावांच्या बाजूला एक खुर्ची घेऊन बसलो. वेटिंग फॉर गोदोची तालीम लक्षपूर्वक पाहू लागलो. सॅम्युएल बेकेटचे हे ननाट्य समजण्यास अवघड होते. संवाद एकाग्रतेने ऐकल्याशिवाय त्यातील नाट्य आकलन होणे कठिण वाटले.

काही भाग झाल्यानंतर वसंतराव यांनी तालीम थांबविली. चहासाठी सर्वजण खुर्च्या टाकून गोल बसले. नाटकाबद्दल वसंतराव काही सूचना देत होते. थोडा वेळ गेला आणि वसंतराव सुहास पळशीकरांकडे पाहू लागले. सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पहिले पारितोषिक सुहास पळशीकरने मिळविले होते. वसंतराव त्यांच्या नेहमीच्या शांत-सौम्य आवाजात सुहासला म्हणाले, ''सुहास, यांना तू ओळखतोस ना ?'' माझ्याकडे बोट दाखवू वसंतराव यांनी सुहासला विचारले. सुहासने उत्तर दिले, ''होय, हे मोहोळकर आहेत. वेड्याचे घर उन्हात या नाटकात प्रमुख भूमिका करणारे - मोहोळकर.'' वसंतराव म्हणाले, ''सुहास, ही यांची पूर्ण ओळख नव्हे. मी गेली अनेक वर्षे नाटके करीत आलो. पण यांच्यासारखा अनेक तालमींना मुळीच न कंटाळणारा दुसरा माणूस माझ्या पाहण्यात नाही.''

वेटिंग फॉर गोदोचा प्रयोग विवेकवर्धिनीच्या सभागृहामध्ये झाला. तो पाहण्यास मी आवर्जून गेलो होतो. प्रयोग अप्रतिम झाला. पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळविण्यास योग्य असाच तो प्रयोग होता. हैदराबाद - सिकंदराबाद या जोडशहरातील चिकित्सक आणि चोखंदळ प्रेक्षकांना तो प्रयोग एकदम पसंत पडला. प्रयोग संपल्यानंतर अनेक दर्दी प्रेक्षकांनी रंगमचांवर जाऊन दिग्दर्शक वसंतरावांचे, अभिनयपटू सुहास पळशीकरचे. नेपथ्यकाराचे, प्रकाशयोजना करणाऱ्याचे हार्दिक अभिनंदन केले.

वसंतरावांच्या दिमाखदार दिग्दर्शनामुळे, त्यांच्या अभिनयपटुत्वामुळे आणि त्यांनी

केलेल्या अभिनव नाट्यचळवळीमुळे त्यांना मान्यताप्राप्त झाली. नाट्य विद्यालय, आंध्रप्रदेश या नाट्यसंस्थेमध्ये त्यांना Visiting Lecturer म्हणून सन्मानपूर्वक घेण्यात आले. त्याचप्रमाणे त्यांना Member of Sangeet Natak Academy A. P. आणि Member of Lilit Kalla Academy A. P. असा सन्मान मिळाला. वसंतराव यांनी मराठी, हिंदी आणि उर्दू भाषेमध्ये Radio Plays लिहिले. आणि हैदराबादच्या नभोवाणी केंद्रामधून सादर केले गेले. त्यांनी बऱ्याच एकांकिकांचे लेखन केले, नभोवाणीवरून प्रसृत केलेल्या एकांकिकांमध्ये काम केले आणि आपल्या इतर अनेक कार्यक्रमामुळे ते मान्यता पावले.

रंगधारेच्या कार्यक्रमामध्ये वसंतराव अधिकाधिक रस घेऊ लागले. मॅक्सम्युलरभवनच्या वतीने नॉर्बर्ट मायर या सुविख्यात जर्मन दिग्दर्शकाच्या बरोबरीने सहदिग्दर्शकाचे काम करू लागले. दोघांनी मिळून एका जर्मन नाटकाचे हिंदी रूपांतर रंगभूमीवर आणले. हे नाटक म्हणजे लहान मुलांसाठी लिहिलेलं 'छुकछुक भैय्या तालम् ताल' या बालनाट्याचे सहदिग्दर्शक, नेपथ्यकार, संगीत दिग्दर्शक होते वसंतराव. बालगीतांना दिलेल्या त्यांच्या चाली सोप्या व श्रुति मनोहर होत्या. त्यामुळे बालगायकांच्या तोंडी ती गीते सहज बसली. या बालनाट्याचे ८-१० प्रयोग झाले. या बालनाट्याचे काही प्रयोग मॅक्सम्युलर भवनने पुण्यामुंबईतही केले. या बालनाट्याला मुलांमुलींचा मिळालेला प्रतिसाद न भूतो न भविष्यती असाच होता.

यानंतरच्या काळात वसंतराव कार्यक्रमांच्या ऐवजी नाट्यलेखनात गुंतले. वसंतराव जोमाने व जोशाने लेखन करू लागले. त्यांच्या वृत्तीमधला सर्जनशील कलावंत उफाळून आला. हे त्यांचे नाट्यलेखन अपूर्णच राहिले. या दुर्दैवाला काय म्हणावे ? रंगधारेसाठी त्यांनी अल्बीच्या Zoo Story चा उर्दू अनुवाद केला होता. चिडिया घर की कहानी दुर्दैवाने या नाटकाच्या तालमी सुरू होऊ शकल्या नाहीत. उन्हाळ्याच्या सुटीनंतर हे नाटक करण्याचा निर्धार आपल्या मनाशी करूनच ते मुंबईला गेले.

त्यांचं दैव असं की याचवेळी त्यांना 'इंडियन नॅशनल थिएटर' साठी दोन नाटकांचे दिग्दर्शन करण्याची संधी चालून आली. तसा लेखी करार देखील झाला होता. त्यांनी ही सुवार्ता आपल्या जिवलग मित्राला - दिनकर बिंदू यांना पत्राने कळवली. याविषयी हैदराबादला परत आल्यानंतर आपण सविस्तर चर्चा करू, तपशीलात जाऊन विचार करू, असाही एक नव्या आशेचा किरण त्या पत्रांमधून दिसला होता. पण हे घडायचे नव्हते. नियतीने खरोखरच सूड घेतला. इंडिनय नॅशनल थिएटरने देऊ केलेल्या मोठ्या संधीमुळे कदाचित त्यांना हर्षवायूच झाला असावा. करारावर सहीशिक्का झाल्यानंतर संध्याकाळी ते आपल्या दादांच्या घरी आनंदाने परत आले. ही आनंदवार्ता त्यांनी घरच्या मोठ्या मंडळींना उत्साहाने सांगितली, आणि ते निद्रादेवीची आराधना करीत करीतच अंथरूणावर पडले. २४ जून १९७७ ची ती सकाळ म्हणजे काळाच्या आगमनाचीच सकाळ ठरली. दुपारच्या गाडीने वसंतराव मुंबईहून हैदराबादला येण्यास निघणार होते. आपले अर्धवट

राहिलेले सारे संकल्प सिद्धीस नेणार होते. पण सकाळी पेपर वाचता वाचताच एकाएकी हृदयक्रिया बंद पडून वसंतराव अकाली, अनपेक्षितपणे हे जग सोडून गेले. हा हन्त हन्त नलिनीम् गज उज्जहार !!

❑❑

राजस मासिकात छापला गेलेला लेख

निषाद मारवी झुरे

२४ जून १९७७ या दिवशी वसंत गोडसे वयाच्या केवळ ५२ व्या वर्षी मुंबईत मरण पावले. या घटनेवर अद्याप विश्वास बसत नाही. अजूनही अंत:करण गलबलते. मानवी जीवनाचे नश्वरत्व आणि क्षणभंगूरत्व अशावेळी प्रकर्षाने पटते. वसंतरावांच्या सहवासाला आता आपण कायमचे मुकलो ह्या विचाराने विचित्र घालमेल होते.

प्यारोंकी मौतने मेरी दुनिया उजाड दी।
यारोंने कितनी दूर बसायी है बस्तियां ॥

वसंतराव बीडच्या एका खानदानी कुळात जन्माला आले. अगदी बालपणापासूनच त्यांच्यावर चांगले संस्कार झाले. विचार करण्याची आणि अंतर्मुख होऊन विवेक विचार करण्याची सवय लागली. शालेय जीवनात त्यांच्या अभिनय कौशल्याची चुणुक दिसून आली. गणपती उत्सवामध्ये अनेक मेळ्यांतून त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका केल्या आणि गाणी म्हटली. यातूनच त्यांच्या कलासक्तीला धुमारे फुटू लागले. चित्रकार होण्याचे स्वप्न ते पाहू लागले. मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर वसंतरावांनी आपले स्वप्न घरच्यांना सांगितले. घरच्या वडीलधाऱ्या मंडळींना हे आवडले नाही. त्यांनी वसंतरावांना सल्ला दिला की शिक्षण घेत असतानाच चित्रकलेचा अभ्यास चालू ठेवावा. पण स्वप्नाळू, महत्वाकांक्षी आणि जिद्दी वसंतरावांना तो मानवला नाही. महाविद्यालयीन शिक्षणाच्या प्रथम वर्षी त्यांनी शिक्षण अर्धवट टाकून कोणालाही न सांगता सवरता मुंबई गाठली. आपल्या आवडत्या छंदाला वाहून घेण्याचा निर्धार केला. कोणाही नातेवाईकाच्या घरी आसरा घेण्याची त्यांची तयारी नव्हती. चिल्लर कामे करून स्वतंत्र वृत्तीने ते पोट भरीत. त्यांनी चित्रकलेची साधना करण्यास सुरुवात केली. दैन्य, हालअपेष्टा आणि गरिबी ओढवून घेतली. भूक, उपासमार आणि पायपिटी सहन केली. या सर्व कष्टांचा, हलाखीच्या परिस्थितीचा सुगावा त्यांनी आपल्या आईवडिलांना आणि जवळच्या नातलगांनाही लागू दिला नाही. कलंदरवृत्तीने चित्रकलेचा अभ्यास पुरा करून ते G. D. Art झाले.

आपल्या कलाविष्काराला आणि नाविन्याच्या उर्मीला चित्रपटाचे माध्यम योग्य होईल असं वसंतरावांना वाटले. योगायोगाने मद्रासकडील जेमिनी या चित्रपटसंस्थेमध्ये मान्यता पावलेल्या रंजन या अभिनेत्याचा आणि वसंतरावांचा परिचय झाला. वसंतरावांच्या प्रयोगशील प्रयत्नवादाला रंजन यांनी वाव दिला. त्यांनी वसंतरावांकडून विविध प्रकारची

कामे करून घेतली. या प्रत्यक्ष अनुभवाचा फायदा पुढील आयुष्यात मिळणार आहे, याची वसंतरावांना मुळीच कल्पना नव्हती. रंजन यांच्या प्रोत्साहनामुळे ते सहदिग्दर्शकाच्या पायरीपर्यंतही पोचले. पण वसंतरावांसारख्या सरळ मनाच्या आणि प्रामाणिक तरूणाला चित्रपटाच्या मायावी सृष्टीमध्ये योग्य संधी मिळणार नाही आणि मानाने जगता येणार नाही असं रंजन यांना वाटू लागले. त्यामुळे साऱ्या गोष्टी स्पष्टपण सांगून त्यांनी वसंतरावांना त्या मार्गापासून परावृत्त केले. मग घरी परतण्याशिवाय वसंतरावांना अन्य मार्गच नव्हता.

हैदराबादला परतल्यावर त्यांची स्वतःच्या पायावर उभे राहण्याची धडपड, धावपळ सुरू झाली. घराण्याच्या प्रतिष्ठेचा आणि वैभवाचा फायदा करून घ्यावा असे त्यांना वाटतच नव्हते. आपल्या वडीलबंधूच्या वशिल्याने त्यांना एखादी मानाची जागा सहज मिळविता आली असती. पण हेच नेमके त्यांना नको होते. त्याविषयी ते कोणाशीही चर्चा करीत नसत. आपला स्वतःचा असा एक वेगळाच मार्ग असावा असं त्यांना वाटे.

हैदराबादेतील ललितकला आणि वास्तुकला महाविद्यालयामध्ये वास्तुकलेचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याची त्यांची इच्छा होती. महाविद्यालयामध्ये नाव दाखल करण्यासाठी ते गेले आणि त्यावेळी वास्तुकला विभागात असलेल्या श्री. दिनकर बिंदू यांच्याशी त्यांचा परिचय झाला. वास्तुकला शिकलेल्या वसंतरावांचा G. D. Art चा अभ्यासक्रम पूर्ण जाला असल्याने प्राचार्यांनी त्यांना त्याच महाविद्यालयामध्ये नोकरी देऊ केली. वेतन फारसे समाधानकारक नव्हते. पण स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी तळमळणाऱ्या वसंतरावांनी ती संधी स्वीकारायचे ठरविले. ललितकला आणि वास्तुकला महाविद्यालयामध्ये ते शिक्षक म्हणून काम पाहू लागले. शेवटपर्यंत याच महाविद्यालयात ते काम करीत होते.

अशा प्रकारे उपजीविकेचा प्रश्न सुटला. मग आवडीच्या गोष्टींकडे वसंतराव वळले. वाचनाची आवड होतीच. वाचन, चिंतन, मनन आणि समव्यावसायिकांबरोबर केलेली चर्चा यातून लेखनाची हौस बीज धरू लागली. व्यासंग वाढू लागला. सांस्कृतिक कार्य करणाऱ्या स्थानिक संस्थेकडे वसंतराव आकर्षित झाले. 'कला मंडळ' नावाच्या संस्थेमध्ये ते दाखल झाले. समान आवडीनिवडीचे मित्र मिळाले. नाटक, चित्रकला, संगीत, काव्य आणि ललित साहित्य याबद्दल वसंतरावांना विशेष आवड होती. मित्रांशी मनमोकळ्या गप्पा होऊ लागल्या. सौंदर्यदृष्टीमधूनच सौंदयवृत्ती वाढीला लागली. सौंदर्यास्वाद घेण्यासाठी ते धडपडू लागले. कलामंडळाने वसंतरावांना योग्य संधी दिली. 'हुकूमतके आधार' हे हिंदी नाटक म्हणजे श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'अंमलदार' चे हिंदी रूपांतर होय. या नाटकापासून वसंतरावांच्या 'नाटकी' जीवनास आरंभ झाला. विविध प्रकारची कामे करण्याची संधी मिळाली. कलामंडळाच्या वतीने नाटके सादर करण्यात आली. त्यांना दिग्दर्शकाची सखोल व सूक्ष्म दृष्टी आली. त्यांच्या चिकित्सक व चोखंदळ वृत्तीला पोषक वातावरण निर्माण झाले. स्वतंत्र प्रतिभेला आणि कल्पकतेला वाव मिळू लागला. प्रत्येक

कलाकृतीस आवश्यक आणि अपेक्षित दर्जा प्राप्त करून देण्यासाठी वसंतराव सतत प्रयत्नशील असत. कलेच्या सर्वच क्षेत्रामध्ये त्यांना विशेष दृष्टी होती. सहकाऱ्यांशी ते दिलखुलास चर्चा करीत, उलटसुलट मते ऐकून घेत आणि आपला वेगळा विचार इतरांना पटविण्याचा आवर्जून प्रयत्न करीत. यातूनच नाविन्याचा हव्यास सुरू झाला.

पण एका बाबतीत वसंतराव अबोल होते. स्वतःची खाजगी दुःखे, यातना आणि वेदना ते कोणालाच सांगत नसत. स्वतःच्या साऱ्या व्यथा आणि वेदना आतल्या आत दाबून ठेवण्याचा त्यांचा हा स्वभावच त्यांना नडला काय ?

कळा ज्या लागल्या जीवा। मला की ईश्वरा ठाव्या.

वसंतरावांच्या अंतर्मनामध्ये शिरून त्यांचे दुःख कमी करण्याची संधी त्यांनी एकाही मित्राला मिळू दिली नाही. आतल्या आत ते जळतच राहिले.

फावल्या वेळात वसंतरावांनी काही रेखाटने केली, पण त्यांची संख्या मर्यादितच आहे. भरपूर कमाईची कामे मिळण्याची संधी त्यांनी अनेकदा अव्हेरली. कलेविषयी कदर नसलेली व्यक्ती पाहून ते निराश होत असत. मग हाती घेतलेल्या कामातील त्यांचा उत्साह ओसरू लागायचा. आर्थिक सुबत्तेविषयी त्यांना विशेष पर्वा नव्हती. प्रदर्शनाची सुव्यवस्थित मांडणी करण्याचे आणि संमेलनाची व्यासपीठे सुशोभित करण्याचे काम मात्र वसंतराव अत्यंत मनापासून करीत. प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीमध्ये होणाऱ्या संचलनातील आंध्र प्रदेशचे Floats त्यांनी लागोपाठ चारपाच वर्षे अत्यंत कलापूर्ण तयार करवून घेतले आणि चिकित्सक रसिकांकडून शाबासकी मिळविली.

वसंतराव आपल्याच भावविश्वामध्ये सतत रंगून जात असत. 'प्रीतीहून प्रीतीचा शोधचि की रम्य असे' हाच त्यांचा बाणा होता. वृत्तीने कवी असले तरी त्यांचा कलाविष्कार काव्यापेक्षा गद्यामध्येच अधिक आहे. Trubenized Love आणि Symphony अशी इंग्रजी नावे असलेल्या मराठी एकांकिका विलक्षण काव्यमय आणि सुंदर आहेत. 'अतिथी' आणि 'असाच एक कुणीतरी' या त्यांच्या नभोनाटिका रसिक श्रोत्यांना खूप आवडल्या होत्या. 'विद्रोही' ही बांगला देशाविषयीची नभोनाटिकाही अत्यंत प्रभावी आहे. वसंतराव नाट्यवाचन अनोख्या ढंगाने आणि भावपूर्ण रीतीने करीत. त्यांच्या तोंडून त्यांच्या नाट्याचे वाचन ऐकणे हा एक सुखद अनुभव असे. पात्रांची जाण आणि पारख अतिशय योग्य होती. आपल्या त्या काव्यमय आणि भावपूर्ण नाटिका बसविण्याचे अनेकदा प्रयत्न झाले. पण योग्य पात्रांच्या अभावी त्या सादर करता आल्या नाहीत. किंबहुना वसंतरावांनी बसवावयास घेतलेल्या नाटिकांसाठी योग्य पात्रे त्यांना मिळू नयेत अशी खटपट काही 'हितचिंतक' आवर्जून करीत असत. Trubenized Love या नाटिकेमध्ये त्यांनी तीन पिढ्यांमधील स्त्रीपुरुष प्रेमाचे तीन आगळे प्रकार रंगविले आहेत. सिंफनी ही नाटिका म्हणजे एक मूर्तिमंत गद्यकाव्यच आहे. सिंफनीचे नाट्यवाचन वसंतरावांच्या तोंडून ऐकल्यानंतर प्रख्यात नाट्य अभिनेत्री सौ. शांता जोग इतक्या प्रभावित झाल्या की, खास या नाटिकेतील मध्यवर्ती

भूमिका करण्यासाठी त्या मुंबईहून हैदराबादेस येण्यास तयार होत्या. पण वसंतरावांचे दुर्दैव हे की हीदेखील नाटिका बसवली गेलीच नाही. सिंफनीचा नायक केदार याने म्हटलेली कविता नितांत सुंदर असून त्या कवितेत वसंतरावांच्या कवीहृदयाची ओळख पटते.

तरंग मी	उरात मी
तरंग मी	सुरात मी
अशांत धुंद बिंदू मी	सुरात 'मा निषाद' मी
मंद मंद गंध मी,	निषाद मारवी झुरे
फुलात गुंग भृंग मी	झुरे तसा उरी उरे
नभात उंच उंच मी	स्मितात अश्रू लोपला
स्वैर मुक्त हंस मी	अनंग रंगी गोठला

रिक्त मी, अनंत मी, असीम नव तरंग मी

१९५७ च्या आरंभी वसंतराव आणि त्यांच्या मित्रांनी वेगळा नाट्यसंसार मांडण्याचा निर्णय घेतला. संगीत, नृत्य आणि विशेषत: नाट्य ह्या कलांबद्दल आत्मीयता बाळगणाऱ्या व त्यांच्या सर्वांगीण विकासाची तळमळ असणाऱ्या रसिकांची व हौशी कलावंतांची संघटना करून नाट्यवाचन, परिसंवाद, नाट्यप्रयोग, संगीतिका, अभिनयस्पर्धा इत्यादीद्वारा ह्या कलांविषयी जनतेत आस्था, प्रेम व आदर निर्माण व्हावा म्हणून परस्पर सहकार्याने प्रयत्न करावा या उद्देशाने 'कला निकेतन' या नवीन संस्थेची स्थापना केली. अभिनय, संगीत योजना, रंगभूमीची सजावट, प्रकाशयोजना वगैरे नाट्यनिर्मितीच्या विविध अंगांकडे विशेष लक्ष पुरवण्याचा कलानिकेतनचा निश्चय होता.

मार्च २, १९५७ रोजी कलानिकेतनची पहिली नाट्यनिर्मिती सादर करण्यात आली. डॉ. अ. वा. वर्टी लिखित 'राणीचा बाग' या नाटकामध्ये उमाकांतची भूमिका वसंतरावांनी साकार केली आणि आपल्या अभिनयगुणाचा प्रत्यय दिला. अनेक दृष्टींनी हा नाट्यप्रयोग प्रेक्षकांच्या लक्षात राहिला आणि साहजिकच कलानिकेतनबद्दल रसिकांच्या अपेक्षा उंचावल्या. त्या दृष्टीने वसंतराव तयारी करू लागले.

डिसेंबर १९५७ मध्ये कलानिकेतनतर्फे Winter Festival साजरे करण्यात आले. तीन दिवसांचा भरगच्च कार्यक्रम देण्यात आला. रेजीसार पार्श्वनाथ आळतेकरांची उपस्थिती हे या कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण होते. 'आधुनिक गृहस्थी' हे मो. ग. रांगणेकरांच्या नाटकाचे हिंदी रूपांतर, 'स्त्रीजीवन दर्शन' ही ओव्या, गीते, भजने, अभंग यावर आधारलेली संगीतिका, संगीत नियोजक होते वसंतराव. 'मेघदूत' या नृत्यनाट्याची मूळ कल्पना त्यांचीच. या संपूर्ण कार्यक्रमाची, खास करून नृत्य नाट्याची निर्मिती खरोखर दृष्ट लागण्यासारखी होती. वसंतरावांनी दिलेले संगीत श्रुतिमनोहर होते. त्यांच्या दर्दभऱ्या

आवाजातील गाणी अविस्मरणीय झाली. आचार्य अत्रे यांच्या 'पाणी ग्रहण' या नाटकाच्या प्रयोगामध्ये वसंतरावांनी नेपथ्य आणि प्रकाशयोजनेमध्ये दाखविलेली कल्पकता वाखाणण्यासारखी होती. 'ध्यानी मनी नसता' हा वसंतरावांच्या कल्पनाशक्तीचा आणि नाविन्याचा हव्यासाचा एक आविष्कार ! एक उत्स्फूर्त आणि सतत विकसित होत जाणारा नाट्याचा अनोखा प्रकार. निर्मिती व नेपथ्य, प्रकाशयोजना, अभिनय, संगीत नियोजन, तालबद्ध आणि सुरेल गायन अशा सर्व बाबतीत वसंतरावांचे अष्टपैलुत्व या प्रयोगाने सिद्ध केले.

वसंतराव पात्रनिवडींच्या बाबतीत अतिशय चिकित्सक असत. योग्य पात्र मिळेपर्यंत नाटकाच्या तालमी सुरू करीत नसत. नाटकांच्या तालमी वेळेवर आणि भरपूर घेण्याबद्दल ते नेहमी काळजी घेत. सर्व अंगांनी परिपूर्णता आणण्यासाठी वसंतराव अहोरात्र कष्ट करीत असत. नाटक बसवण्यास आरंभ केल्यानंतर त्यांना दुसरे काही सुचत नसे. नाटकातील अनेक प्रसंग ते स्वतः चित्रे काढून - रेखाटने करून कलाकारांच्या डोळ्यांपुढे उभे करीत असत. नाटकातील Compositions, पात्रांच्या हालचाली किती महत्त्वाच्या असतात, याची त्यांना पुरेपूर कल्पना होती. म्हणूनच वसंतरावांची नाट्यनिर्मिती अत्यंत देखणी असे. वसंतरावांचा प्रत्येक कार्यक्रम नाविन्यपूर्ण आणि कल्पकतेने सादर केलेला असे. सर्वांगसुंदर अशा नाटिका, एकांकिका, नाटके सादर करणे ही वसंतरावांची खासियत होती.

१९५८ साली कलानिकेतनने सादर केलेल्या 'वेड्याचे घर उन्हात' चा सर्वांगसुंदर प्रयोग म्हणजे वसंतरावांच्या परिणतप्रज्ञेचा परिपाक होता. प्रा. वसंत कानेटकरांचे हे नाटक दिग्दर्शकास आणि नटांना आव्हान देणारे आहे. वसंतरावांनी या नाटकातील दादासाहेबांची मध्यवर्ती आणि अवघड भूमिका माझ्यासारख्या नवोदित नटाला दिली आणि वेड्या दामूची भूमिका स्वतः केली. ४१ वे मराठी नाट्यसंमेलन हैदराबाद येथे घेण्याचे निश्चित झाले होते. त्या निमित्ताने स्थानिक नाटकांच्या स्पर्धा जाहीर करण्यात आल्या. स्पर्धेत 'वेड्याचे घर उन्हात' चा पहिला क्रमांक आला. वसंतरावांचे हे यश अनेकांना पाहवले नाही. मत्सरी आणि विघ्नसंतोषी व्यक्तींनी कारवायांना सुरुवात केली. या प्रभावी नाटकाचा प्रयोग नाट्यसंमेलनामध्ये होऊ नये अशी खटपट करण्यात आली. शेवटी चिठ्या टाकून नाटकांना क्रमांक देण्यात आले. त्यात आमच्या नाटकाचा क्रम तिसरा लागला. संमेलनप्रसंगी एक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्यामध्ये असा उल्लेख करण्यात आला होता की 'कलानिकेतन' ही संस्था इतर नाट्यसंस्थेमधील कसबी नटवर्ग घेऊन स्वतःची नाटके सादर करते. माझ्या निवडीबद्दलच ही टीका होती. पण माझ्यासारख्या नवोदित नटाला इतकी महत्वाची भूमिका इतर कोणत्याही संस्थेने देऊ केली नसती हे मात्र निर्विवाद !

कलानिकेतनचा नाट्यप्रयोग पडावा या 'सदिच्छे' ने काही मंडळी प्रयोग पाहण्यास

आली होती. दादासाहेबांची आव्हानात्मक भूमिका माझ्या वाट्याला आलेली पाहून स्थानिक नटसम्राट आणि नटवर्य संतापले होते. प्रयोग पाडण्यासाठी सडकी अंडी आणि टमाटे घेऊन ही मंडळी प्रेक्षकामध्ये दबा धरून बसली होती. पण Those who came to scoff remained to pray अशी त्यांची अवस्था झाली. दर्दी आणि रसिक प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिपूर्णतेच्या कसोटीला उतरणारा नाट्यप्रयोग होता तो. हैदराबादेतील नाट्यचळवळीमध्ये नवा इतिहास घडविणारे नटाक !

'वेड्याचे घर उन्हात' या नाटकाचे सहा प्रयोग झाले. एक प्रयोग नांदेड येथे करण्यात आला. पुण्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देखील एक प्रयोग करण्यात आला. नटवर्य नानासाहेब फाटक हे नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांना आमचा नाट्यप्रयोग पाहण्यास मिळाला. त्यांना आमचे नाटक खूप आवडले. त्यांनी आमच्या नाटकाचे मुक्तकंठाने कौतुक केले. सौ. शांता जोग यांनी आमच्या प्रयोगाचे कौतुक पुण्या-मुंबईमध्ये आवर्जून केले.

१९६० च्या फेब्रुवारीमध्ये कलानिकेतनने तीन एकांकिका सादर केल्या. श्री. पु. ल. देशपांडे लिखित 'विठ्ठल तो आला आला', 'सदू आणि दादू' , श्री. विजय तेंडूलकर यांचे 'रात्र' हे नभोनाट्य रंगभूमीवर सादर करण्याची जिद्द आणि हौस वसंतरावांचीच. या नभोनाट्यासाठी त्यांनी स्वतःच्या कल्पनेने एक विलक्षण सुंदर देखावा प्रेक्षकांना पहाण्यास दिला.

वसंतरावांना संगीत फार आवडत असे. अभिजात संगीताच्या मैफिली ते न चुकता ऐकत असत. पाश्चिमात्य संगीत देखील ते फार काळजीपूर्वक ऐकत असत. संगीत नियोजनामध्ये ते अनेक नाविन्यपूर्ण व श्रवणीय प्रयोग करीत असत. इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू या भाषेतील नावाजलेली नाटके वाचून त्यांमधील वैशिष्ट्ये ते आपल्या मनात नोंदवून ठेवीत असत. शंभूमित्रांची सर्व नाटके त्यांनी अभ्यासली होती. सत्यजित रे यांचे चित्रपट पाहून ते प्रफुल्लित होत. कारंथ यांची कानडी नाटके पाहून ते बेहद्द खूष झाले होते. अल्काझींचे प्रयोग खास मुंबईला जाऊन ते बारकाईने पहात असत. पुण्याला जाऊन ते अनेक नाटके पहात आणि त्याविषयी आपल्या मित्रांशी चर्चा करीत असत. अनेक पदांना, भावगीतांना, भजनांना त्यांनी अतिशय मधुर चाली दिल्या होत्या. प्रथितयश गायिका सौ. मालिनी राजूरकर यांना वसंतरावांनी तुकारामाचे दोन अभंग आगळ्या ढंगात शिकविले. वसंतराव यांची संगीतसाधना अखंड चालू असे. हार्मोनियम स्वतः वाजवून ते गाणी म्हणत असत. १९६१ मध्ये वसंतरावांनी रवींद्र संगीताचा अनोखा कार्यक्रम सादर करून आपल्या संगीतसाधनेची झलक दाखविली.

१९६३ साली वसंतरावांनी 'मधल्या भिंती' या विजय तेंडूलकर लिखित तीन अंकी नाटकाचा प्रयोग अत्यंत नाविन्यपूर्ण रीतीने सादर केला. त्याबद्दल ते म्हणाले होते, 'हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे. सामान्य माणसांच्या जीवनातही असामान्य नाट्यवस्तूची बीजं असू शकतात. त्यातूनच एखादी गंभीर, तंग, संथ, कारूण्यपूर्ण आणि थोड्याफार

गुंतागुंतीची नाट्यकृती निर्माण होऊ शकते. तेंडुलकरांना हे नाट्य गवसले. त्यांनी ते 'मधल्या भिंती' हे नाटक लिहून सर्वांना दाखविले. अशा नाट्यवस्तूचं दर्शन तितक्याच वास्तव स्वरूपात जवळून घडवावं म्हणूनच रंगभूमी आणि प्रेक्षक यामधील अभेद्य पण पारदर्शक भिंत नाहीशी केली. नेहमीचा झगमगाट टाळून, रंगरंगोटी न करता, कृत्रिम देखावा न उभारता, कसलाही मखमालीचा सुद्धा आडपडदा न ठेवता नाट्यवस्तू आपल्यासमोर निकट आली. जिवलग स्नेह्यासारखी हितगुज करू लागली. तर ... तर आपल्याशीही तिचं नातं निर्माण होईल. एक न तुटणारं नातं !' दिग्दर्शनात हाच प्रयत्न आहे. प्रयत्न नवीन आहे, पहिलाच आहे, प्रयोगावस्थेत आहे - म्हणून क्षम्य ठरावा अशी अपेक्षा नाही. ही झेप सामर्थ्याबाहेरची आहे. याची जाणीव आहे. हा नवीन दृष्टीकोन एखादेवेळी प्रेक्षकांना पटला नाही, रूचला नाही, तर त्याचं कारण आमच्या उणीवांतही असू शकेल. पण समजून घेण्याचा प्रयत्न केला तर कदाचित सर्वच सोपं होऊन जाईल. नवीन वाटेने पुढे जाण्यासाठी आम्हालाही हुरूप येईल.' अशा प्रकारे प्रेक्षकांशी हितगुज करणारा प्रयोग यापूर्वी महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रामध्येही कोणत्याही नाट्यप्रेमी संस्थेने सादर करण्याचे धाडस केले नव्हते.

१९६६ साली वसंतरावांनी हार्वेचे रूपांतर 'नंदिनी' या नावाने सादर केले. हे रूपांतर केले होते स्वतः वसंतरावांनीच. या तीन अंकी नाटकाबद्दल वसंतरावांना सार्थ अभिमान होता. या नाटकाचे लेखक, दिग्दर्शक, नेपथ्यकार संगीत नियोजक, प्रकाश योजनाकार होते वसंतराव !

१९७० मध्ये वसंतरावांनी 'चौफुली' हा रंगदार कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये वसंतरावांच्या दोन हलक्याफुलक्या एकांकिका होत्या. नाट्यवाचनाचा अनोखा कार्यक्रम कल्पकतेने सादर करण्याचे हे धाष्ट्र्य वसंतरावांचेच !

१९७२ च्या ऑगस्ट महिन्यात भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्य महोत्सवानिमित्त सर्व भारतभर अनेक कार्यक्रम करण्यात आले. त्यासाठीच Our Struggle for Freedom हे छायानाट्य सादर करण्याची सुवर्णसंधी वसंतरावांना लाभली. त्या संधीचा पुरेपूर फायदा घेऊन वसंतरावांनी आपले कसब सर्व प्रेक्षकांना दाखवून चकित केले. शासनातर्फे हा प्रयोग मोठ्या दिमाखाने सादर करण्यात आला. वसंतरावांच्या या निर्मितीने हैदराबादकरांना एक वेगळाच आनंदाचा धक्का दिला. सर्वांनीच या छायानाट्याचे भरपूर कौतुक केले. हा प्रयोग भारताच्या राजधानी दिल्ली येथे होण्याची चिन्हे दिसत होती. पुन्हा राजकारण, डावपेच, कारवाया, दुष्टावा यांना ऊत आला आणि वसंतरावांची कीर्ती भारताच्या राजधानीपर्यंत दरवळण्याचा योग हुकला. या दुर्दैवाला काय म्हणावे ?

यावेळपर्यंत कलानिकेतनच्या चळवळी थंडावल्या होत्या. 'रंगधारा' या नव्याच नाट्यसंस्थेची स्थापना झाली होती. हौशी, नाट्यप्रेमी अशा तरूण आणि होतकरू कलावंतांचे सहकार्य वसंतरावांना मिळण्याचा अपूर्व योग आला. Waiting For Godot चे

मराठी रूपांतर राज्य नाट्य स्पर्धेमध्ये सादर करण्याचे रंगधारेने ठरविले. त्यासाठी वसंतरावांना रंगधारेने आवर्जून बोलावले. प्राथमिक स्पर्धा जिंकून हे नाटक १३ व्या महाराष्ट्र राज्य स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी मुंबईला नेले. या नाटकाने खरोखर विक्रमच केला. पाच पारितोषिके पटकावून हैदराबादची शान राखली. उत्कृष्ठ नाटक, उत्कृष्ठ दिग्दर्शक, उत्कृष्ठ नट, उत्कृष्ठ प्रकाशयोजना, उत्कृष्ठ नेपथ्य अशी एकूण पाच पारितोषिकं या प्रयोगास मिळाली. या सन्मानाच्या मागे होते वसंतरावांचे अविश्रांत कष्ट, त्यांची जिद्द आणि त्यांची दिग्दर्शन शैली. त्यांना महाराष्ट्राने मानाचा मुजरा केला. वसंतराव श्रेष्ठ दिग्दर्शक ठरले. त्यांच्या कीर्तीचा सुगंध महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरला. पण याही प्रसंगी वसंतरावांना मानसिक ताण आणि ताप सहन करणे आले. या नाटकाचे दिग्दर्शन आपणच केले असा दावा एकाने केला. मुंबईपर्यंत धाव घेतली. तेथील वर्तमानपत्रामधून तक्रारी केल्या. वसंतरावांच्या धवल यशाला कलंक लावण्याचे लाजिरवाणे प्रयत्न हेतूपूर्वक केले. पण वसंतराव मूक-शांत राहिले. त्यांच्या संवेदनशील अंतःकरणाला वेदना झाल्याच असणार. मनस्तापाने ते होरपळले असणार, दुभंगले असणार. पण वसंतरावांनी तक्रार केली नाही. खेद दर्शविला नाही की कोणासमोरही ते खंतावले नाहीत.

यानंतर मात्र वसंतराव अनेकांना उदास व थकल्यासारखे दिसू लागले. त्यातच नोकरीमध्ये एक बिकट समस्या उभी राहिली. मनस्तापात आणि उलघालीत भरच पडली. अपेक्षाभंगाचे दुःख पदरी आले. स्वार्थी आणि आपमतलबी डागाचा आणि एक, अंतःकरण विदीर्ण करणारा अनुभव आला. सुदैवाने या समस्येतून वसंतराव सहिसलामत बाहेर पडले.

१९७५ मध्ये रंगधाराने त्यांना आणखी एक आव्हानात्मक बालनाट्य निर्मिती करण्याची सँधी दिली. मॅक्सम्युलर भवनमध्ये या बालनाट्याच्या तालमी होत होत्या. या बालनाट्याचे दिग्दर्शक होते डॉ. मायर, सहनिर्देशक होते वसंतराव. 'छुक छुक भैय्या तालम् ताल' या बालनाट्याला भारतीय रूप दिले वसंतरावांनीच. संगीत संयोजन त्यांनी केले. या नाटकाचे अनेक प्रयोग झाले. 'कलानिकेतन' थंडावल्यानंतर वसंतराव रंगधारेशी एकरूप झाले होते. रंगधारेमुळेच वसंतराव महाराष्ट्रभर नावाजले गेले.

वसंतराव शेवटपर्यंत अविवाहित होते. विवाहित होऊन, संसार थाटून, मुलाबाळांच्या खस्ता खात खात, कलानिर्मितीकडे डोळेझाक करण्यापेक्षा स्वान्त सुखाय का होईना, पण नाट्यनिर्मितीचा प्रपंच करणे त्यांना अधिक आवडत होते. एका निकटच्या कलावंताची विवाहानंतर झालेली होरपळ पाहून वसंतराव खिन्न झाले. विवाह झाल्यानंतर आपलीही अशीच अवस्था होईल अशी भीती त्यांना वाटली असावी. आर्थिक दृष्टीने विचार करून त्यांनी विवाहाचा प्रश्न टाळला. सहचारिणीविषयीच्या त्यांच्या कल्पनाच वेगळ्या होत्या. परिचय व्हावा, सहवास घडावा, आवडीनिवडी जमाव्यात, छंद सारखे असावेत आणि सहवासोत्तर प्रेम निर्माण व्हावे असंच त्यांना वाटे. प्रेमाचीच परिणती विवाहामध्ये व्हावी हेच त्यांच्या कविहृदयाला भावणारे होते.

एक स्त्री त्यांच्या तरूणपणी त्यांच्या जीवनात आली होती असे म्हणतात. पण शिक्षण अर्धवट टाकून संसार थाटण्यास वसंतरावांनी नकार दिला. शिक्षण संपवून, आत्मनिर्भर होऊन विवाह करावा अशीच त्यांची इच्छा होती. पण त्या स्त्रीचे आईवडील वाट पाहण्यास तयार नव्हते. वाट पहाण्याची त्यांची तयारी होती. पण तिने वाट पहावी असा त्यांचा आग्रह नव्हता, हट्ट नव्हता.

वसंतराव आपले तारूण्य जपत असत. काव्यशास्त्रविनोदामध्ये ते दंग असत, कपड्यांचा शोक करीत, केसांना कलप लावीत. अधूनमधून मालिश करून घेऊन आपल्या शरीराची निगा राखीत. पण हे झाले बाह्योपचार, अंतर्मनाचे काय होत असेल त्यांच्या ? परिचित स्त्रियांशी ते मोकळेपणाने वागत असत. कधीकधी एकाच सायकल रिक्शामधून जात असत. हे पाहून वसंतरावांविषयी अनेक वावड्या उठत, कंड्या पिकत आणि त्यांच्या शुद्ध चारित्र्यावर डाग पडण्याचे सहेतुक प्रयत्न होत हे पाहून त्यांच्या अगदी निकटच्याही मित्रांना त्रास होत असला पाहिजे.

सुख मज जगण्यात नसे, सुख मज मरण्यात नसे ।
प्रीति असे विसराळू भीति जिवा वाटतसे ॥

अशी खंत त्यांना आतून पोखरत असलीच पाहिजे हे कुणालाही सांगत नसत.

कलेच्या विशाल सरोवरामध्ये डौलाने विहार करणारा राजहंस होता. वसंतराव म्हणजे. कावळ्यांच्या बेताल बडबडीकडे त्यांनी लक्ष देण्याचे मुळीच कारण नव्हते. हाथी चलता है अपनी गत सें, कुतर भुकत वाकू भुकवा दे । याच वृत्तीने त्यांनी जगायला हवे होते. पण त्यांच्या अंतःकरणाचा हळुवारपणा, संवेदनाशीलत्व आड आले. अनेक घटनांचे चरे त्यांच्या अंतःकरणावर पडले असणार. जिवाची विलक्षण घालमेल झालीच असणार त्यांच्या. प्रत्येकाच्या सहनशक्तीला मर्यादा असतेच. वसंतरावांनी अनेक मानसिक धक्के पचविले, मानहानी सहन केली, अपमान गिळले. दुःखाचे, अपमानाचे धक्के घेत घेत वसंतराव शांतपणाने कलेच्या विश्वामध्ये रंगून गेले. पण कधीकधी त्यांना वाटत असणारच - मन मीत जो घाव लगाये । उसे कौन बचाये ॥

२४ जून १९७७ हा दिवस किती विचित्र होता ! वसंतरावांना इंडियन नॅशनल थिएटरची दोन नाटके दिग्दर्शित करण्याची अमूल्य संधी त्यांच्या सुदैवाने आणि गुणांनी चालत आली. सर्वच गोष्टी वसंतरावांच्या मनाप्रमाणे जमून आल्या. त्यांच्या सर्व अटी मान्य झाल्या. सर्व करारमदार झाले. सह्या देखील झाल्या. वसंतराव समाधानाने आपल्या मोठ्या बंधूच्या घरी परत आले. पण सुखाचा हा धक्का त्यांना सहन करता आला नसावा. व्यावसायिक नाटके दिग्दर्शित करण्याचे त्यांचे भाग्यच नव्हते. जुळून आलेला डाव नियतीने उधळून लावला. वसंतरावांच्या नशिबाने त्यांना दगा दिला. २४ जून रोजी सकाळीच हृदयक्रिया बंद पडून वसंतरावांचे प्रोणात्क्रमण झाले. अचानक, अकस्मात अनपेक्षितपणे. त्याच दिवशी दुपारी ते हैदराबादला यावयास निघणार होते. नवीन नाटक लिहिणार

होते. आम्ही सर्वजणच त्यांच्या परत येण्याची वाट पाहात होतो. पण तसा योगच नव्हता. वसंतराव गेले आम्हा सर्व मित्रांना पोरके करून !

साहित्याप्रमाणेच संगीत हा वसंतरावांचा अत्यंत आवडता छंद होता. बालपणापासूनच ते मेळ्यामधून गाणी म्हणत होते. सुर आणि ताल यांचे ज्ञान त्यांना तेव्हापासूनच असावे. तरूणपणी त्यांनी संगीत भरपूर ऐकले. त्यांना भजनांची, ओव्या, गीते श्लोकांच्या जुन्या पारंपरिक चालींची मनस्वी आवड होती. सुगम संगीत, नाट्यसंगीत, भक्तिसंगीत, गझल, ठुमरी, तराणा, भावगीते, काव्यवाचन, काव्यगायन, ख्याल संगीत, गायन-वादन-नर्तन या सर्व प्रकारांमध्ये त्यांना गोडी होती. पाश्चिमात्य संगीतामधील केवळ अभिजातच नव्हे तर पॉपसंगीत देखील मनापासून ऐकत असत. Western Music ऐकण्याचा एक क्लब सुरू केला होता. डॉ. शौचे यांनी बीथोवेन, श्यूमान, बाख अशा अनेक जगप्रसिद्ध Composers च्या रेकॉर्ड ऐकण्यासाठी माझ्याबरोबर गोडसे येत असत. कुमार गंधर्व, भीमसेन जोशी, प्रभा अत्रे, गंगूबाई हनगल, किशोरी आमोणकर, जितेंद्र अभिषेकी, पं. जसराज यांच्या मैफलींना ते आवर्जून उपस्थित असत. ते स्वत: हार्मोनियम वाजवून छान गात असत. संगीताची जाण सखोल व सूक्ष्म असल्याने ते Composer झाले होते. तुकारामाच्या अभंगांना ज्ञानेश्वरीतील ओव्यांना नाविन्यपूर्ण आणि भावमधुर चाली लावून ते अभंग आणि ओव्या सुरेख आणि सुरेल म्हणत असत. त्यांनी मराठवाड्यातील आणि महाराष्ट्रातील मायबहिणींची कितीतरी लोकगीते, ओव्या, भजने, मोठ्या हौसेने जमविल्या होत्या. त्यामुळेच ते स्त्रीजीवन दर्शनाचा एक अपूर्व आणि आगळावेगळा कार्यक्रम सादर करण्यात यशस्वी होऊ शकले.

वसंतराव गोडसे यांनी आपल्या स्वत:च्या अनेक एकांकिका हैदराबाद रेडिओवर सादर केल्या. कितीतरी एकांकिकामध्ये त्यांनी भूमिका केल्या होत्या. दिग्दर्शक म्हणून ते चांगलेच नावाजले गेले होते. त्यांनी केलेल्या भूमिका रेडियोवर गाजल्या होत्या. संगीतिका सादर करून त्यांनी संगीत दिग्दर्शकाचे उत्कृष्ठ काम केले होते.

असा हा अष्टपैलू कलावंत म्हणजे हैदराबादचे एक भूषणच होते. मुंबईहून परतल्यानंतर नवीन नवीन कार्यक्रम करण्याच्या त्यांच्या कल्पना होत्या. पण त्यांच्या अकाली, अकस्मात, अनपेक्षितपणे झालेल्या निधनाने त्या कल्पना त्यांच्याबरोबरच गेल्या.

वसंतराव हे कसबी, कल्पक दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, नेपथ्यकार आणि प्रकाश योजनाकार होते. पण त्यांच्या या गुणांना हैदराबादमध्ये मिळावा तितका वाव मिळाला नाही. त्यांच्या स्वत:च्या एकांकिका सादर करण्याची संधी त्यांना मिळू शकली नाही. हे खरोखर आम्हा हैदराबादकरांचेच दुर्दैव !

मला त्यांचा सुगंधी सुरेल सहवास मिळू शकला हे माझे भाग्यच होते. माझ्या जीवनावरील हा एक अत्यंत संस्मरणीय काळ होता आता फक्त त्यांची आठवण करायची आणि मनातल्या मनात झुरायचे !

वसंतराव गोडसे यांना माझी ही श्रद्धांजली !

❑ ❑ ❑



उस्तादोंके उस्ताद खाँसाहेब अमीर खाँ

उस्तादोंके उस्ताद - अमीर खाँ

जन्म : इंदोर येथे १९१२ मृत्यु : कलकत्ता. १३ फेब्रुवारी १९७४

अतिविलंपित गायकीचा सम्राट - मैफिलींचा बादशहा.

इंदोर घराण्याला रसिकप्रिय करणारे महान गायक. अमीर खाँ म्हणजे उत्कृष्ठ आलापी करुन मंत्रमुग्ध करुन सोडणारा, मान्यताप्राप्त गायक. इंदोर घराणे म्हणजे अमीर खाँ यांचे आगळेवेगळे, लुब्ध करणारे गायन. स्वर आणि लय या संगीताच्या दोन टोकांना जोडणाऱ्या खास दमदार शैलीचे गायन इंदोर घराण्याचे. खाँसाहेब अब्दुलकरीम खाँ यांच्यापासून सुरू झालेले किराना घराणे - स्वर प्रधान गायकीचा आदर्श. पतियाळा घराना म्हणजे खाँसाहेब बडे गुलाम अली यांची पंजाबी गायकी. लय प्रधान गायकीचे पतियाळा घराणे मान्यताप्राप्त केले गुलामी अली यांनीच. एका बाजूला स्वरप्रधान गायकी, दुसऱ्या बाजुला लयप्रधान गायकी आणि या दोन्ही गायकींच्या सुवर्णमध्याकडे झुकणारी गायकी अमीर खाँ यांची. किराना घराण्यातील गायक-गायिका स्वरांच्याच धुंदीत मस्त असतात. किरानेवाले लयकारीच्या बाबतीत थोडेसे उदासीनच दिसतात. किराना घराण्यातील स्वरसौंदर्य मनाला मोहित करणारे. पतियाळा घराण्यातील लयीचा ढंग विलोभनीय आणि श्रोत्याला डोलायला लावणारा.

आपल्या गळ्याला काय झेपेल, काय सुंदर दिसेल, कशामुळे आपल्या आवाजातील गानसौंदर्य वाढेल, श्रोत्यांना काय मंत्रमुग्ध करु शकेल, रसिकांना काय आवडेल, याची जाणीव झाली, तरच घराणेदार गायकाचे गाणे होते अधिकाधिक कर्णमधुर आणि चित्ताकर्षक. इंदोर घराण्यात स्वर आणि लय यांना समान महत्त्व. अमीर खाँ यांचे वडील शाहमीर खाँ यांना तालीम मिळाली होती नजीरखाँ यांची. त्यांच्या घराणेदार गायकीची. शाहमीर खाँ यांची महत्त्वाकांक्षा होती की अमीरने गायक व्हावे.

मुंबईत भेंडीबाझार नांवाचा एक मोहल्ला आहे. तेथील मुस्लिम गायकांच्या गायकीला भेंडीबझार गायकी म्हणतात. तेथे तीन भाऊ होते महान सारंगिये - नजीर, छज्जू, आदिम, नजीर खाँ गायक देखील होते. शहामीर खाँ यांनी नजीर खाँचे शिष्यत्व पत्करले. शहामीर खाँ यांची ग्रहणशक्ती प्रचंड होती. संगीत शास्त्र हा त्यांचा ध्यास होता. शहामीर खाँ संगीत शास्त्रामध्ये निपुण होते. ते आले इंदोरला. शहामीर खाँ यांनी अमीरकडून मेरुखंडाची जबरदस्त तालीम करुन घेतली. पण अमीरने गाणे ऐकले रजबअलींचे आणि ते प्रभावित झाले त्यांच्या गान शैलीने. तानबाजीत रजबअलींचा हात धरणारा कुणीही नव्हता. रजबअलींची तान गळ्यात बसवून अमीर आला मुंबईत. अमानत हा रजबअलींचा पुतण्या. या अमानतची द्रुत गायकी विद्युल्लतेप्रमाणे चपल होती. अमानतची ही द्रुत गायकी अमीरने तंतोतंत उचलली. तान आणि द्रुत हा गाण्याचा मुख्य भाग. पण विलंपतमध्ये सर्वश्रेष्ठ होते वहीद खाँसाहेब. त्यांच्यासारखी विलंपत करण्याचा निर्धार केला अमीरने. ऐकून ऐकूनच

अमीरने वहीद खाँ यांची विलंपत शैली आत्मसात केली. अतिविलंपत गायन करणे त्याला अधिक भारदस्त वाटले. अतिविलंपत गायकीने श्रोते मंत्रमुग्ध होतात, याची प्रत्यक्ष प्रचीति घेतली अमीरने आणि अतिविलंपत गायकीचा मनापासून स्वीकार केला. हीच त्याने आपल्या गाण्याची खासियत बनवली.

असं सांगतात की, आचार्य बृहस्पती यांनी अमीर खाँ यांना विचारले,' आपण वाघासारखे गात होता - मग आता तसे कां गात नाहीं' अमीर खाँ यानी चटकन उत्तर दिले. 'ऐसा है भाई, अब मैं जानवर नही रहा'

आपल्या वडिलांच्या शिकवण्यामुळे अमीर खाँ यांना खास घराण्याचाच वारसा मिळाला. पण अमीर खाँ यांच्यावर वहीद खाँ यांच्याच गायन शैलीचा विलक्षण प्रभाव पडला. अत्यंत भावलेली गायनशैली. अब्दुल वहीद खाँ स्वत: किराणा घराण्यातील ख्यातनाम गायक. त्यांचे सारे लक्ष असे स्वरांच्या सच्चाईकडे. परंपरागत रीतीचा अभिमान बाळगून गात असत वहीद खाँ. त्यांची स्वरांची धुंदी अमीर खाँ यांनी अचूक उचलली. अमीर खाँ यांची आलापी वहीद खाँ सारखीच, स्वर सौंदर्याचा अत्यंत विलोभनीय आविष्कार करणारी. त्यांची विलंपत अत्यंत भरदार, शांत, धीरगंभीर आणि धीम्या लयीचे असे. रसिकांची अंत:करणे अत्यंत प्रभावित होत. लयकारी विषयी उदासीन राहाता आले की, स्वरविलासाची धुंदी सहजतेने साधता येते. तरीपण त्यांच्या द्रुतलयीकडे झुकणाऱ्या मध्यलयीत आपल्या खास भेंडीबाजारवाल्या नृत्यात्मक गायकीचाच प्रत्यय आणून देण्यात ते यशस्वी होत.

अमीर खाँ यांची अतिविलंपत गायकी, धीम्या लयीतील, भरदार आणि झूमरातालातील, श्रोत्यांना मोहित करी, त्यांना माना डोलावण्यास लावे. अशा आलापीलाच भरपूर वाव देणारे रागच ते मैफलीत पेश करीत असत आणि मैफल जिंकीत असत. त्यांचे आवडते राग म्हणजे शुद्धकल्याण, दरबारी कानडा, अभोगी कानडा, हंसध्वनी, मालकंस, मेघ, मिया मल्हार, बैरागी, ललत, तोडी, मारवा, आसावरी. ख्याल गातांना फक्त ठेका धरावा लागे त्यांच्या तबलजीला. ख्याल गायकीतील आलापचारीतच मग्न झाल्यामुळे मध्यम-पंचमापर्यंत पोचण्याला अर्धा पाऊण तास लागत असे त्यांना. अमीर खाँ तीन्ही सप्तकात आपल्याच खास गतीने अत्यंत सफाईदारपणे फिरू शकत असत.

सध्याच्या जमान्यातल्या, शोमनशिपसाठी हपापलेल्या, रसहानी करणाऱ्या, चमत्कृतिवादापासून, तबल्याशी होणाऱ्या जुगलबंदीच्या मोहापासून अमीर खाँ नेहमी दूर राहात असत. तबलजीचा धांगड धिंगा त्यांच्या गायकीला शोभणारा नसे. अनेक गायक-वादकांना हा गॅलरी गेम करावासा वाटे. केवळ टाळ्यांसाठी सवंग लोकप्रियतेसाठी. अमीर खाँ या मोहाला कधीही बळी पडत नसत. त्यांची भारदस्त आलापचारी धुंद करते, बेभान बनविते. उन्नत पातळीवर नेऊ शकते, स्वर-सौंदर्याची विशेष प्रचीती देते. त्यामुळेच रसिक श्रोत्यांना त्यांच्याविषयी आदर जाणवत असे. दादरा, ठुमरी, भजन असे प्रकार ते

कधीही गात नसत. आपल्या गायन शैलीशी ते इमानदारी पुरेपूर राखतात. म्हणूनच त्यांची खास गायकी पसंत करणारे जाणकार मोठमोठ्या संगीत परिषदेमध्ये असंख्य असत. मस्त आलापीमध्ये धुंद होऊन, स्वरानंद घेणारे, मर्मज्ञ श्रोते हेच खरे जाणकार रसिक असतात. ठुमरी गाऊन मैफल जिंकण्याची त्यांना कधीही जरुरी वाटली नाही. त्यांच्या कलात्मक, घराणेदार, इमानदारीने भरलेल्या, अस्सल गायकीचा, सच्चा सुरांचाच हा प्रत्यक्ष पुरावा आहे. प्रत्येक संगीत परिषदेत दिसणारा तबलजीचा धांगडधिंगा, त्याच्याबरोबर होणारी जुगलबंदी, हा चमत्कृतीवादाचा मोहच असतो. या सर्व प्रकारांतून अमीर खाँ यांचा एकाकी अपवाद हाच एक आशेचा किरण दिसून येत होता. अमीर खाँ यांच्या अपघाती मृत्यूने या सर्व आशांचा चक्काचूर झाला. आशेचा एकुलता एक किरणही अंधाराने गिळून टाकला, हे दुःख केवळ असह्यच !

अमीर खाँ आणि कुमार गंधर्व यांच्याविषयी खोलवर जाऊन विचार करु लागलो, तेव्हां या दोन महान गायक-नायकामध्ये विलक्षण साधर्म्य जाणवू लागले मला.

अमीर खाँ यांचा जन्म इंदोरचा, साल १९१२. १३ फेब्रुवारी १९७४ रोजी त्यांचे अपघाती निधन झाले कलकत्यात. मोटारीतून वेगाने जात असतांना उत्तर रात्री भीषण अपघात झाला. दवाखान्यात पोचविण्याचे काम केले हैदराबादच्या सुपुत्राने व्ही. व्ही. जोशी यांनी. पण सकाळी वर्तमानपत्रातून बातमी देण्यात आली की अमीर खाँ यांचे अपघाती निधन झाले. मरणाच्या पूर्वी त्यांच्या ओठावर अखेरचे शब्द म्हणजे - फक्त रागांचीच नावे - दरबारी, मालकंस, मारवा. रागाचं नाव घेत घेत मृत्यूला मिठी मारणारा अमर गायक अमीर खाँ ! असं सांगितलं जातं की अमीर खाँ झोपेतदेखील गात असत. एकदा झोपेतच ते वसंतमुखारी गात होते, असं खात्रीपूर्वक सांगितलं जातं. झोपेत, अखेरचा श्वास घेण्यापूर्वीदेखील, संगीताचीच आठवण ठेवणारा गान-सम्राट सदैव स्वरांच्या धुंदीतच असण्याची शक्यता वाटते.

कुमार गंधर्व यांचा जन्म ८ एप्रिल १९२४ चा आणि १२ जानेवारी १९९२ रोजी ते देवास येथील भानुकुलमध्ये निधन पावले. राजयक्ष्म्यासारख्या असाध्य रोगाने जर्जर झाल्यामुळे त्यांना गाणं म्हणण्याची मुळीच परवानगी नव्हती. अंथरुणावर पडल्या पडल्या ते संगीताबद्दल चिंतन करु लागले. हळूहळू ते स्वतःशीच गुणगुणू लागले. संगीत-चिंतनाची आणि गुणण्याची सवय झाली. आजारातून बरे झाल्यानंतर देखील ते सतत आंतल्या आत गाणं म्हणत असत आणि एखादी चांगली जागा निघाली की 'व्वा', 'क्या बात है' अशी स्वतःलाच दाद देत असत.

अमीर खाँ यांनी 'सूररंग' अशा नावाने अनेक नवीन राग निर्माण केले, सुरेल बंदिशी बांधल्या. या सर्व बंदिशी त्यांच्यच गळ्याला अनुरुप होत्या. या सर्व बंदिशी गाताना ते अतिविलंपत आलापी करुन श्रोत्यांना तृप्त करीत असत. ते स्वतः आत्म-तृप्त होत असत. कर्नाटकी रागावरून त्यांनी बऱ्याच बंदिशी बांधल्या. प्रियाकल्याण, चारूकेशी,

राममनोहारी, जनसंमोहिनी - असे कितीतरी नवीन राग त्यांनी दाक्षिणात्य संगीताच्या गाढ्या अभ्यासातून निर्माण केले. प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत असणारे उस्ताद अमीर खाँ !

कुमार गंधर्व यांनी 'शोक' या नावाने अनेक नवे राग निर्माण केले, जुन्या पारंपारिक रागांच्या नव्या बंदिशी बांधल्या, जोड रागातही अनेक नव्या बंदिशी उत्स्फूर्तपणे तयार केल्या. मालवती, मधसुरजा, बहिड भैरवसारखे अनेक नवीन राग निर्माण केले आणि बैठकीमध्ये गाऊन लोकप्रिय करण्यात यशस्वी झाले. धुन उगमरागांची निर्मिती विस्मयचकित करणारी आहे. धुन म्हणजे स्वर तत्व. धुन लागणं म्हणजे स्वतःमध्ये-आत्मतत्वामध्ये रममाण होणं. हेच असते आध्यात्मिक उद्दिष्ट कुमार गंधर्व आणि अमीर खाँसारख्या महान गायकांचे. स्वरसंगती - स्वरांचा सच्चेपणा - स्वरांचा लगाव - स्वरांचा जिवंतपणा - साधण्यासाठीच स्वर-साधना करणारे कुमार गंधर्व आणि अमीर खाँ !

Robert Frost या अमेरिकन श्रेष्ठकवीची एक सुंदर कविता आहे Two Roads नावाची. बहुसंख्य लोक जातात मळलेल्या, रुळलेल्या वाटांनी. रॉबर्ट फ्रॉस्टसारखा एखादाच प्रतिभावंत कवी आपली नवीनच वाट स्वतःच शोधून काढतो आणि त्याच वाटेने धैर्याने, धीराने, आत्मविश्वासाने पुढे पुढे जात राहातो. लोक कितीही नावे ठेवोत, कुत्सित टीका करोत, निंदा नालस्ती करोत, रॉबर्ट फ्रॉर्स्टसारखे कलावंत आपल्या मार्गाने निर्धाराने, जिद्दीने, ईर्ष्येने जातात आणि लोकप्रिय होऊ शकतात. असा बंडखोरपणा, क्रांतिकारकवृत्ती दाखविणारे रॉबर्ट फ्रॉर्स्ट, केशवसुत, तुकाराम, ज्ञानेश्वर यांना अलौकिक म्हटले जाते. लौकिक प्रगती - उन्नती - उत्कर्ष त्यांना परावृत्त करु शकत नसतात.

आपल्या भारतीय संगीताच्या पारंपारिक कल्पनेला न जुमानता, तेच तेच दळण न दळता, आमूलाग्र बदल करुन, आपलीच नवीन गायन शैली गाण्यातच धन्यता मानणारे, क्रांतिकारक गायक म्हणजे कुमार गंधर्व आणि अमीर खाँ. या दोन्ही महान गायकांनी आपल्या प्रतिभेच्या, परिणत प्रज्ञेच्या कौशल्याने आपली स्वतःचीच एक आगळीवेगळी गायनशैली निर्माण केली. सुरुवातीला बहुसंख्य रसिकांनी मत्सराने कडवट टीका केली त्यांच्यावर. पण त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. संगीत समीक्षक, चिकित्सक टीकाकार, वेगवेगळ्या घरण्यांचे श्रेष्ठ व ज्येष्ठ गान गुरू आणि रसिक जाणकार श्रोते यांना तृप्त करुन आपल्या गायकीला मान्यता, प्रतिष्ठा आणि राजमान्यताही मिळविली. मर्मज्ञ आणि जाणकारांकडून अफाट लोकप्रियता मिळवून आपलं श्रेष्ठत्व सिद्ध करण्यात महान यश प्राप्त केलं. कुमार गंधर्व यांचा खास असा चाहता वर्ग गांवोगावी, शहरोशहरी तयार झाला. अमीर खाँ यांची अति विलंपत धीम्या लयीची - झुमरा तालातील - धीरगंभीर आणि अंतःकरणाला स्पर्श करणारी गायनशैली आवर्जून ऐकण्याच्या संधीची चातकाप्रमाणे वाट पाहणारे रसिक श्रोते मोठमोठ्या शहरातून दिसू लागले.

कुमार गंधर्व आणि अमीरखाँ यांना संगीत शास्त्राचा आत्मा गवसला होता. गान समाधीचा स्वानुभव ते स्वतः घेत असत आणि रसिकश्रोत्यांना गान समाधीची प्रचीती

आणून देत असत. एकाग्रता, तन्मयता, तादात्म्यता या गुणांच्या सामर्थ्याने हे दोघेही श्रोत्यांना एका अत्युच्च पातळीवर नेऊ शकत आणि खऱ्या आत्मिक आनंदाचा त्यांना साक्षात्कार घडवून आणीत असत. दोघांनी तराण्यांचा गाढा अभ्यास करुन, सखोल चिंतन करुन, कितीतरी नवीन तराणे बांधले आणि शब्दहीण वाटणारे तराणे भावपूर्ण केले. ख्याल म्हणजे विचार-चिंतन-सांगीतिक चिंतन-ईश्वराकडे आत्म्याला खेचून नेणारे चिंतन-आध्यात्मिक विचाराकडे सहज नेणारा ख्याल - आत्मानंद - आत्मसंतोष - आत्मतृप्तीचा आत्मानुभव देणारा ख्याल - असाच ठाम विश्वास होता या महान गायकांचा. लोकानुरंजन हे या दोघांचं उद्दिष्ट कधीच नव्हतं.

कुमारगंधर्व यांनी स्वतःच्या गायकीनं एक वेगळंच घराणं निर्माण केलं. अमीर खाँ यांनी आपल्या दमदार गायकीने इंदोर घराण्याला प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली. भारतीय संगीतामधील कुमार गंधर्व आणि अमीरखाँ ही दोन अत्युच्च शिखरे ! दोघेही महान गायक आणि नायक. दोघांचे तराणे श्रवणीय आणि विस्मयकारी असत. दोघेही स्वभावाने होते अतिशांत, गंभीर आणि सतत विचारमग्न. कुमार गंधर्व यांना सर्वच अभिजात कलांमध्ये रस होता. त्यामुळे चित्रकार, वास्तुकार, कादंबरीकार, कवी, नाटककार, समीक्षक, टीकाकार यांचा गराडा असे त्यांच्याभोवती.

अनेक शास्त्रीय गायक गातांना तोंडं वेडेवाकडी करतात, विचित्र हातवारे करीत राहतात. कुणी गाता गाता मागे सरकत राहातात, कुणी तबलजी बरोबर साठमारी करुन सवंग लोकप्रियता मिळविण्याची धडपड करतात, अशा सर्व प्रकारांमुळे त्यांचं 'गाणं' श्रवणीय तर होत नाहीच, पण प्रेक्षणीय देखील होत नाही. सर्वसामान्य प्रेक्षकांची करमणूक फक्त होते. काही गायक गाणं थांबवून इतर घराण्याच्या गायकांची टिंगल टवाळी करतात. काही गायक आत्मस्तुतीपर बढाया मारण्यांतच आनंद मानतात. केवढी आत्मवंचना !

अमीर खाँ यांची पहिली मैफल ऐकण्यासाठी खास सोलापूरला गेलो होतो. त्यांच्यासमोर बसून त्यांचं गाणं ऐकण्याचं 'अनोखं' भाग्य मला लाभलं होतं. अमीर खाँ त्यांच्या भव्य आणि देखण्या व्यक्तिमत्वानं आणि अलौकिक गान नैपुण्यानं श्रोते विस्मयचकित होत होते. अमीर खाँ एखाद्या ध्यानस्थ योग्याप्रमाणे मांडी घालून बसलेले मी पाहिले. मैफल संपेपर्यंत तसेच बसून राहिले होते. उजव्या हाताचा पंजा जमिनीवर ठेवून, डाव्या हाताने ते हातवारे माफक करीत होते. प्रसन्न मुद्रा ठेवून ते अखेरपर्यंत गात असलेले पाहूनच मला आश्चर्यानंद झाला होता. विचित्र हातवारे करतीलच कसे ? शांत आणि गंभीरस्वराने ते गात होते. दोन तंबोऱ्यांच्यामध्ये बसलेले अमीर खाँ पहाणे हाच एक अनुभव होता.

हैदराबादमधील अमीर खाँ यांची पहिलीच मैफल आयोजित करण्याची सुवर्णसंधी माझ्या वाट्याला आल्यामुळे अनेकांना माझ्या भाग्याचा हेवा वाटला होता. सहा फूट उंच. गोरेपान, सोन्याच्या काडीचा चष्मा घावलेले, काळी शेरवाणी आणि चुडीदार पायजमा घातेलल देखणे अमीर खाँ याना पाहूनच माझ्या डोळ्यांचे पारणे फिटले होते.

कुमार गंधर्व देखील गोरेपान आणि विलक्षण देखणे होते. अमीर खाँ यांच्या प्रमाणेच कुमारजींचे केस काळेकुळीत आणि चमकदार होते. माझ्या घरी पिठलं भाकरी खाण्यासाठी आले होते, त्या संध्याकाळी कुमारजींनी काळी शेरवाणी आणि पांढरा स्वच्छ पायजमा घातलेला आजही मला माझ्या डोळ्यासमोर दिसतो. कुमार गंधर्व यांच्या दोन्ही हातांच्या हालचाली अत्यंत आकर्षक होत असत. ती हैद्राबादमधील आय्. एम्. ए. च्या सभागृहातील कुमारगंधर्व यांची मैफल आम्हीच महाराष्ट्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेली होती. मी वसंतराव गोडसे यांच्याशेजारी, कुमार गंधर्वांच्या समोरच बसलो होतो. बागेश्री हा अतिसुंदर ख्याल कुमारजींनी आळवण्यास सुरुवात केली होती. गाता गाता, एका क्षणी, कुमार गंधर्व यांनी आपल्या दोन्ही हातांनी, डोळ्यातील भावांनी असा काही अभिनय अनाहुतपणे केला की मी आणि गोडसे एकमेकांकडे पाहून आश्चर्य व्यक्त करु लागलो. त्यांच्या देखण्या अभिनयाने आम्ही दोघे चाटच पडलो.

अमीर खाँ आणि कुमार गंधर्व या दोघांचीही परमेश्वरावर नितांत श्रद्धा होती. एका अर्थाने ते दोघेही धार्मिक होते. पण कर्मकांडावर त्या दोघांचाही मुळीच विश्वास नव्हता. अमीर खाँ नमाज पडण्यासाठी क्वचितच मशिदीत जात असत. कधी तरी मशिदीत जाऊन नमाज पढत. कुमारजींना देवदर्शनाची तीव्र ओढ होती. त्यांच्या बरोबर आम्ही सोलापूरचा सिद्धेश्वर, अक्कलकोटचे स्वामी, तुळजापूरची भवानी देवी, पंढरपूरचा विठोबा, वाडीचे जागृत दैवत, औदुंबर येथील पादुका, माचणूर येथील बाबा महाराज यांची समाधी, यांचे श्रद्धेने दर्शन घेतले होते, ही आठवण विसरू कसे ? अमीर खाँच्या तोंडी 'अल्लामियांकी मर्जी नही है' असे उस्फूर्त उद्‌गार मी स्वतः हैदराबादमध्ये ऐकलेले आहेत. कुमारगंधर्व आणि अमीर खाँ हे दोघेही अंधश्रद्धेपासून शेकडो योजने दूर होते, यात शंकाच नाही.

किराना घराण्याचे मशहूर आद्य गायक अब्दुल करीम खाँ यांना मृत्यूची चाहूल लागली शेवटच्या प्रवासात. एका स्टेशनवर ते डब्यातून खाली उतरले. चादर पसरली प्लॅट फॉर्मवर आणि 'दरबारी' या धीरगंभीर ख्यालाचे स्वर आळवीत अल्लामियाँची प्रार्थना करीत करीत अखेरचा श्वास सोडला. त्याचप्रमाणे १३ फेब्रुवारी १९७४ च्या उत्तररात्री रागांची नांवे घेत घेत अंतिम श्वास सोडणारा गायक अमीर खाँ.

कलकत्त्यामध्ये अमीरखाँचे असंख्य चाहते, भक्त, शिष्य, मित्रही होते. २४/२५ फेब्रुवारीला ते अमेरिकेला जाण्यास निघणार होते. त्यांच्याबरोबर जाणार होते निखिल बॅनर्जी. सारी तयारी होत आली होती. अमीर खाँचा मोठा मुलगा अकरम कॅनडात राहात होता. तो आपल्या वडिलांना सतत आग्रह करीत होता, अमेरिकेला येण्याचा. पण अमेरिकेला निघण्यापूर्वीच अमीरखाँ यांचे अपघाती निधन झाले.

कंठसंगीताचा Meditative Aspect जाणलेले केवळ दोनच गायक होते. इंदोर घराण्याचे गायक अमीर खाँ आणि देवासचे कुमार गंधर्व. हे महान गायक आपले आर्त स्वर नाभीच्या देठांपासून काढू शकत असत. त्या सच्च्या स्वरांच्या झंकारांनी ते स्वतः आणि

त्यांचे श्रोतेदेखील प्रार्थनेच्या आत्मस्थितीचा अनुभव घेऊ शकत असत. गायक आणि श्रोते एकाचवेळी परमेश्वराच्या पूजेमध्ये आत्मलीन होऊ शकत असत. उदात्ततेच्या अत्युच्च पातळीवर स्वत: जात होते आणि श्रोत्यांनाही नेत होते अशा प्रकारे गूढ समाधीत श्रोत्यांना गुंगवून ठेवण्याचे सामर्थ्य आपल्या भारतीय कंठसंगीतात आहे, असं हे दोन्ही उच्च श्रेणीचे गायक आवर्जून सांगत असत. त्यांचा तो अनुभवही होता.

अमीर खाँ सर्वांना अभिमानाने सांगत की भारताचा सच्चा आणि निष्ठावान सांगीतिक दूत म्हणजे सतार-सम्राट पं. रवि शंकर ! या प्रसिद्ध वादकाने भारतीय वाद्य संगीत अमेरिकेसारख्या पुरोगामी राष्ट्रात देखील आपल्या प्राचीन रीतिरिवाजानुसार आणि पारंपारिक पद्धतीने शिकवण्याच्या हेतूनेच 'गुरुकुल' स्थापन केले. असंख्य शिष्य शिकवून तयार केले.

अमीर खाँ नेहमी सांगत असत की कलेच्या आणि विज्ञानाच्या सर्वच क्षेत्रामध्ये नवे नवे प्रयोग चाललेले दिसतात. त्यामुळे त्या सर्व बाबतीत होणारी प्रगती लक्षात येण्यासारखी होत आहे. सर्व जगभर असे प्रयोग चालू असल्याचे आपण रोज वर्तमानपत्रांमधून वाचतो. संगीतामध्ये देखील असेच नवीन प्रयोग करण्याची नितांत आवश्यकता आहे. आपल्या भारतामधील अनेक जुन्यापुराण्या संगीताचार्यांनी, संगीत-सम्राटांनी संगीताचा जो अमूल्य ठेवा दिला आहे, त्यात आपण आपल्या प्रतिभेने - प्रज्ञेने - विवेकविचाराने नव्या सुधारणा करुन आपले संगीत अधिकाधिक प्रभावी, परिणामकारक आणि हृदयस्पर्शी करण्याचा सतत प्रयत्न केला पाहिजे. अशी तळमळ आणि कळकळ असणारे अमीर खाँ आणि कुमार गंधर्व. दोघांनीही आपल्या परिणत प्रज्ञेच्या, प्रगल्भ आणि प्रबुद्ध विचारांच्या मदतीने, नवीन नवीन क्षितिजे धुंडाळली आणि भारतीय कंठ संगीत एका वेगळ्याच पातळीवर नेण्यात नेत्रदीपक यश प्राप्त करुन घेतले. अमीर खाँ यांची विलंपत गायकी, भरदार आलापी, सुरेल ताना, भावपूर्ण तराणा या सर्व बाबतीत अनेक नवीन नवीन स्वरसौंदर्य वाढविणारे प्रयोग केले. कुमार गंधर्व यांचे प्रयोग खरोखरच विस्मयचकित करणारे होते. हे त्यांचे कार्य चिरस्मरणीयच झाले.

कंठसंगीतामध्ये स्वरांना असते. लय, शब्दांमध्ये असतो भाव आणि हेच भाव अंत:करणाला स्पर्शून जातात. हे जमू शकते फक्त प्रतिभावंत गायकालाच. आपल्या वेदामधील, धार्मिक ग्रंथामधील मंत्र जर स्पष्ट, स्वच्छ, तालबद्ध, विशिष्ट लयीत म्हटले गेले. तरच त्यांतील सुप्त सामर्थ्याचा साक्षात्कार सहज जाणता येतो. मंत्रांमध्ये जशी ताकद असते, तशीच शक्ती असते स्वरांमध्येही. याच स्वर-सामर्थ्याने भगवंताची आराधना करीत करीत श्रोत्यांच्या अंत:करणामध्ये देखील पूज्यभाव निर्माण करता येतो. स्वर-समाधीचा अनुभव घेता येतो.

नादब्रह्माचा सच्चा उपासक म्हणजे सर्वोत्कृष्ठ गायक किंवा वादक. यंत्राच्या-रेल्वेच्या खडखडातही स्वरसौंदर्याचा शोध घेण्याचा ध्यास घेणारे कुमारगंधर्व आणि अमीर खाँ.

नादानुसंधान ही एकाग्रतेने आणि तन्मयतेने केलेली परमेश्वराची भक्तिपूर्ण पूजा मानीत असत हे दोघेही महान गायक. वसंत मुखारीची लय चालत्या ट्रामच्या आवाजाशी मिळती जुळती आहे, म्हणूनच तर अमीर खाँ कलकत्त्यात मुक्काम असेपर्यंत ट्राममध्ये बसून तास न् तास प्रवास करीत असत. ट्रामची खास लय आत्मसात करण्याचा जिद्दीने प्रयत्न करीत होते. प्रवासात, घरी दारी, चालतांना देखील अमीर खाँ आपल्या संगीत विश्वामध्ये दंग असत. याही बाबतीत कुमार गंधर्व अमीर खाँ सारखेच होते.

अमीरखाँ यांना काव्याचे, त्यांतील मर्माचे उत्तम ज्ञान होते. ते मर्मज्ञ जाणकार होते. काव्यहीन संगीत म्हणजे संगीत नव्हेच, असं ते आवर्जून सांगत असत. कोणत्या रागामध्ये कोणतं काव्य भावपूर्ण आणि श्रवणीय वाटेल हे ते अचूक जाणत होते. शेरोशायरीचा उपयोग आपल्या गायनात करण्याचे सामर्थ्य त्यांनी सहेतुकपणे निर्माण केले होते. फारसी व उर्दू काव्याची त्यांना अतिशय आवड होती आणि त्यांतील भाव जाणू शकत असत. अशा काव्याचा उपयोग आपल्या गायनामध्ये कसा करता येईल, याचंच सतत चिंतन चाले त्यांचे.

अमीरखुसरोचा प्रभाव विशेष पडला होता अमीरखाँच्या वृत्तीवर. खुसरोचा एक खास पाच भागांचा ताल त्यांनीच जिवंत ठेवला होता, असे खुसरोचे अभ्यासक अभिमानाने सांगतात. आध्यात्मिकता प्रगट करण्यासाठी अमीरखाँ खुसरोचा उपयोग यशस्वी साधन म्हणून कौशल्याने करीत असत. आध्यात्मिक मीलनासाठी अमीरखाँ जोड राग सुरेख आळवीत असत. 'कलंबाना' ही खुसरोची प्रसिद्ध बंदिश पुनरूज्जीवित करण्याचे श्रेय त्यांचेच. अमीरखाँ नेहमी गात असलेली दरबारीची बंदिश- 'यारे मन बोया बोया, मेरे दोस्त आजा' खुसरोचीच.

फारसीचा प्रसिद्ध कवी हाफिज यांचा सखोल अभ्यास केला होता त्यांनी. फारसी काव्याला विलंपत गायकीत आविष्कृत करण्याचा प्रयत्न करणारा हाच एकमेव अपवाद- अमीरखाँ. यमन कल्याण मध्ये ते हाफिजचीच 'शहाजे करम' ही बंदिश आळवून श्रोत्यांना अलौकिक आनंद देत असत. अनेक फारसी आणि उर्दू शायर त्यांना आवडत होते. सरमत हा त्यांचा अत्यंत आवडता शायर. प्रिया कल्याण या स्वतःच बांधलेल्या बंदिशीमध्ये सरमतचीच सुंदर शायरी चपखल बसविण्यात ते यशस्वी झाले.

अमीरखाँ यांचे तराणे म्हणजे अल्लातालाची प्रार्थनाच होती. भक्ति संगीत तराण्याच्या रूपात गाणारा हा एकमेव मुस्लिम गायक. अनेक तराणे बांधले त्यांनी.

हे भक्तिरसपूर्ण तराणे व्यवस्थित लिहून ठेवून पुढील पिढ्यांसाठी हे धन जपून ठेवणारा एकही शिष्य त्यांना लाभला नव्हता, या त्यांच्या दुर्दैवाला काय म्हणावे ? अमीरखाँ यांचे तराणे गेले त्याच्याबरोबरच. अमीरखाँ यांना असंख्य भक्त, चाहते मिळाले. पण नोटेशनसह लिहून ठेवणारा एकही शिष्य त्यांना मिळाला नाही. तराणा हा शब्दहीन-अर्थहीन-भावहीन नाही असं ते ठणकावून सांगत असत. तराणा देखील ते ईश्वरी किमयेच्या अंतःस्पर्शाने

भारित होऊन, अतिशय तन्मयतेनं, बेभान बनून गात असत. तू तानि-तू जाणतोस. ओ दानि-तो जाणतो. यालालूम या जाली-हे सारे आहेत तुर्यावस्थेतील अंतर्भाव. त्यांच्या सारखा भावपूर्ण तराणा गाणारा गायक केवळ दुर्मिळच !

अमीरखाँ हा गायक होता अत्यंत हळुवार मनाचा, मानवतावादी, कृतज्ञतेने तुडुंब भरलेला, संवेदनशील कवी वृत्तीचा माणूस. बुद्धी होती तल्लख, स्मरणशक्ती होती जबरदस्त आणि वृत्ती होती अखंड गायनाचेच चिंतन-मनन करण्याची. सनातन भारतीय संस्कृतीमधूनच उत्तरभारतीय संगीत आलं आणि समृद्ध बनलं, असी त्यांची श्रद्धा होती. भारतीय संस्कृतीप्रमाणेच शास्त्रीय संगीताचा मूळ गाभा-अंतर्गत सूत्र-आध्यात्मिकच आहे, असं ते नेहमी सांगत असत. संगीत म्हणजे भगवंताकडे जाण्याचे साधन. भक्तिरसपूर्ण, करूण रसाचा आविष्कार करणारी अशी त्यांची अतिविलंबत मधील आलापी ऐकूनच श्रोते मुग्ध होत असत. त्यांच्या गाण्यानं सांसारिक काळज्या-चिंता-विंवचना-कटकटी-व्याधी-वेदना विसरून श्रोते भान विसरून जात, ऐहिक जगातून वर उठून आध्यात्माभिमुख होत असत. तल्लीन-एकचित्त होऊन, तादात्म्य साधून त्यांची भावपूर्ण आलापी ऐकण्याने आपण एका उंच, उन्नत पातळीवर पोंचतो, हे अनुभवाने सांगणारे श्रोते असंख्य. अथ पासून इतिपर्यंत शास्त्रीय संगीत आध्यात्मिक.

एके काळी अभिजात शास्त्रीय संगीत बदिस्त झालं होतं राजदरबारात. राजे रजवाड्यांना, सरदार कदरदानांना भक्तिरसाची, करूण रसाची कसली कदर ? राजदरबारामध्ये शृंगारसाने वर्चस्व गाजविण्यास आरंभ केला. राजे-महाराजे संगीताचे शास्त्र जाणत होते. पण संगीताचा आत्मा त्यांना कसा कळणार ? म्हणूनच राजदरबारातील गायन झाले चमत्कृतिपूर्ण-वैचित्र्यपूर्ण-नुसताच शृंगाररसाचा किळसवाणा प्रकार. संगीताचा आत्माच लुप्त झाला.

अमीरखाँ यांनी आपल्या ख्याल गायकीत अति विलंपताला प्राधान्य दिले. त्यांच्यासारखी आलापी करण्यासाठी अनेक घराणेदार गायक दिवस रात्र रियाज करू लागले, जिवाचा आटापिटा करू लागले. याच एका ध्यासाने अनेक गायक बेजार झाले. अमीरखाँ यांच्या अतिविलंपत गायकीचा मोह होतो अनेकांना, पण हे साध्य होण्याची शक्यताच नाही. मुनव्वर अलीखाँ, विलायतखाँ यांच्यावर अमीरखाँचा परिणाम विलक्षण दिसतो. त्यांच्यासारखी आलापी करण्याचा त्यांचा प्रयत्न चाललेला स्पष्ट दिसतो. सलामत-नज़ाकतच्या, झुमरा तालातील गायकीवर अमीरखाँची छाप सहज जाणवते. अमीरखाँ यांनी अतिविलंपत गायनशैलीचा एक मोठा आदर्श गायकांसमोर ठेवला आहे. अमीरखाँच्या सारखी आलापी करण्यातच धन्यता मानतात अनेक गायक. अमीरखाँ यांची गायनशैली अशा प्रकारे अमर राहणार आहे, ही दगडावरची रेघ !

अमीरखाँ आणि त्यांच्यासारख्या कित्येक गायक-वादकांना थारा दिला गेला दिल्लीसारख्या मोठमोठ्या शहरामधील कोठ्यांमध्ये. अमीरखाँ आणि त्यांच्याच सारख्या

गायक-वादकांच्या कलेची, कौशल्याची खरी कदर केली तवायफांनीच. त्यांच्या संगीत कलेचं कौतुक करून, रसिकांसमोर त्यांच्या कलेचा आविष्कार करण्याची संधी देऊन, आपल्या घरी आलेल्या चाहत्यांना तृप्त करण्यातच धन्यता मानणाऱ्या या स्त्रिया. गाणाऱ्या तवायफांनी गुणी गायकांना आपले गुरूपद बहाल करण्याचे मोठेपण दाखविले. अमीरखाँसारख्या गायकांना आपल्या कोठीवर ठेवून घेऊन, त्यांना खाऊपिऊ घालून, त्यांच्याकडून गाणं शिकून घेण्याचा प्रयत्न करीत असत. अमीरखाँ लहानाचे मोठे झाले अशा तवायफांच्या घरी. कोठीवर देखील ते आपला रियाज नियमितपणे चालू ठेवीत असत. कोठीच्या बाहेर पडून आपल्या कलेचा आविष्कार करण्याच्या संधीची वाट पाहत असत. संगीतातील गायन वादन कलेच्या वाढीमध्ये, प्रगतीमध्ये या तवायफांनी दिलेल्या आश्रयाचे, प्रेरणेचे, प्रोत्साहनाचेच मोल खूप मोठे आहे हे निर्विवाद. याच तवायफांनी ठुमरी-दादरा-कजरी-टप्पा-गझल या गानप्रकारांची शान वाढविली हे नाकारता येणारच नाही. संगीताच्या इतिहासात तवायफांच्या कार्याचे स्थान फार मोठे आहे, असं अमीरखाँ ठामपणे आणि अभिमानाने सांगत असत. अमीरखाँ यांचं पहिलं लग्न झालं एका गाणाऱ्या बाईशीच. मुन्नीबाई हे तिचं नाव होतं. अमीरखाँ यांचं पहिलं गाणं झालं एका कोठीवर ! १९३८ साली हे गाणं झालं. त्यांचा पहिला मुलगा-अकरम. अमीरखाँ यांचे नेहमीचं वास्तव्य असे इंदोर या त्यांच्या जन्मस्थानी. १९४६ पासून दरवर्षी ते येऊ लागले कलकत्त्याला. त्यांचा मुक्काम असे कोठीवाल्यांचेच घरी. कलकत्त्यामधील अनेक शौकिनांनी, संगीत रसिकांनी त्यांना पाहिलं होतं अशा तवायफांच्या महालात. पण ते कमलपत्राप्रमाणे अलिप्त राहू शकले, हे पाहून आश्चर्य वाटते.

जर कुणी मानवतेचा- माणुसकीचा-दया क्षमा शांतीचा-खरा अधिकारी असेल, तर तो कलंदर कलाकारच, असा त्यांचा ठाम विश्वास होता. श्रेष्ठ आणि घराणेदार कलावंताने माणुसकीचा सच्चा आविष्कार आपल्या वागण्याबोलण्यातून दाखविलाच पाहिजे, असं ते नेहमी सांगत असत. मिर्झा गालिब प्रमाणेच त्यांची ईश्वरावर गाढ श्रद्धा होती. सोवळं-ओवळं, शिवाशिव ते मानीत नसत. बुद्धीच्या अत्युच्च पातळीवर ते जाऊन पोचले होते. अल्लामियाँच्या मर्जीशिवाय काहीही होत नाही, ही त्यांची श्रद्धा होती.

मला चांगले आठवते की एकदा दिल्ली नभोवाणी केंद्रावरून कुणीतरी एक गायक गात होता आणि त्याची विलंपत सहीसही अमीरखाँ सारखीच वाटली. द्रुतमध्ये तानाचे पलटे घेताना मात्र तो एकदम कमी पडला. लक्षात आले की हा गाणारा अमीरखाँ मुळीच नाही. शेवटी समजले की हा गाणारा गायक होता पं. अमरनाथ. पं. अमरनाथ यांनी आपली सारी हकीकत एका वर्तमान पत्रामध्ये प्रसिद्ध केली होती.

१९४४-४५ मध्ये कधी तरी पं. अमरनाथ यांनी गाणं ऐकलं अमीरखाँ यांचं. ते एकदम प्रभावित झाले. अक्षरशः भारून गेले. अमीरखाँ यांच्याकडून असं गायन शिकायचं, त्यांचंच गाणं आत्मसात करायचं, असं त्यांनी निर्धारानं ठरवलं.

फाळनीनंतर अमरनाथ आपल्या कुटुंबासह आले दिल्लीला. अजमेरी गेटवर जाऊन त्यांनी भेट घेतली अमीरखाँ साहेबांची. त्यांचं शिष्यत्व घेण्याची इच्छा प्रदर्शित केली. अमीरखाँ यांनी याला साफ नकार दिला. अमरनाथ यांनी पिच्छा सोडला नाही. चिकाटीने ते त्यांच्या घरी जातच राहिले. अमरनाथ नेहमी घरी येऊ लागल्यामुळे, भेटीगाठी होतच राहिल्या कारणाने, आस्था-आपुलकी-जवळीक वाढतच गेली. अमीरखाँ त्यांच्यावर खुष झाले आणि त्यांना आपला मित्र मानू लागले पण शिष्यत्व देण्यास मुळीच तयार नव्हते.

त्यानंतर एकदा अमीरखाँ आले होते कलकत्त्याला. कुणीतरी अमीरखाँ यांना सांगितलं की आकाशवाणीवरून कुणा अमरनाथचं गाणं ऐकलं, तो आपली नक्कल छानच करतो. आपल्या सारखीच त्याची विलंपत सुरेल आणि ढंगदार होते. दिल्लीला परत आल्यानंतर अमीरखाँ यांनी अमरनाथला आपलं शिष्यत्व बहाल केलं. पंचवीस वर्षे अमरनाथ अमीरखाँ साहेबांच्या घरी जात-येत होते. पण अमीरखाँ यांनी अमरनाथला समोर बसवून कधीही शिकवलं नाही.

अमीरखाँ सतत दौऱ्यावर असत. अनेक ठिकाणी ते गाण्याच्या निमित्ताने जात होते. दिल्लीला परत आल्यानंतरही ते आपल्या कुटुंबियांमध्ये, मित्रमंडळीत मग्न असत. शिकवायला वेळच होत नसे त्यांना. एकदा तर त्यांनी अमरनाथला बरोबर घेऊन मुंबईला गेले. तेथे त्यांनी दोन आठवडे अमरनाथला काय शिकवलं-तर दरबारी या ख्यालाची फक्त अस्ताई ! या शिकवण्याचा खूपच फायदा झाला आणि अमरनाथ आलापी करू लागले. नकळत, बोलता बोलता, चर्चा करीत असतांना, अमीरखाँ बरंच काही शिकवून जायचे. पण ते अचूक समजून घेण्याची ताकद हवी शिष्याला. अनेक दिवसांच्या अनुभवानं अमरनाथ हे शिकले आणि अमीरखाँ याच्यासारखं गाण्याचा प्रयत्न करू लागले. मित्रांशी गप्पा करीत असताना अमीरखाँ संगीतशास्त्रामधील, कंठ संगीताविषयी मोलाच्या गोष्टी सांगत असत. अमरनाथ एकाग्रतेने, लक्षपूर्वक ऐकून त्या गोष्टी लक्षात ठेवू लागले. अमीरखाँ शिकवायचे फार कमी. शिष्याने स्वतःच शिकत राहावे. अमरनाथनं बरोबर जाणलं की दौऱ्यावरून परत येताना, गुरूजी दरवेळेस काही तरी नवा विचार बरोबर घेऊन येतात. तो नवा विचार, नव्या जागा, नवी आलापी, नव्या कल्पना अमरनाथ ग्रहण करीत असत. या गोष्टी अमरनाथ आत्मसात करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असत. यावरून हे स्पष्ट दिसतं की गानविद्येत पारंगत असलेला गायकच अमीरखाँ साहेबांचा शिष्य बनण्यास योग्य असे. अमीरखाँ होते अतिशय लहरी. चारचौघामध्ये शिष्याने प्रश्न विचारणं त्यांना मुळीच आवडत नसे. पण खाँसाहेब एकटे असतांना, अगदी विनम्रतेने काही विचारणा केल्यास, ते मनापासून समजावून सांगत असत. अमीरखाँ यांच्याकडून काही शिकणं सोपं काम नव्हतं.

सर्व घराण्यांतील गायक-वादक त्यांनी लक्षपूर्वक ऐकले. गायनातील उणीवा, द्वेष, गुण एकाग्रतेने आपल्या मनाशी अजमावीत. आपल्या गळ्याला साजेशी, खुलून दिसणारी गायकी त्यांनी बरोबर हेरली. अतिविलंपत अशा गायकीने, सुरेल आलापीने श्रोत्यांची मने

प्रभावित होतात हे त्यांनी जाणले. तबलजीला फक्त ठेका लावायला सांगत. धीम्या लयीने बढत करीत जात. आपलं अंतर्गत व्यक्तिमत्व अति विलंपित गाऊनच ते श्रोत्यांसमोर प्रकाशमान करीत असत. आपल्या धीरगंभीर आलापींच्या मदतीने भारतीय आध्यात्माचा खरा अविष्कार करून दाखविण्यात ते यशस्वी होत असत. आपल्या बरोबरच ते एकचित्त होणाऱ्या श्रोत्यांना देखील आध्यात्मिक पातळीच्या उच्च स्तरावर सहज घेऊन जाऊ शकत. करूण रसाचा आविष्कार करण्यासाठीच केवळ आपलं संपूर्ण गाणं अति संथ लयीत सादर करीत असत. अशा मंद-संथ लयीचा परिणाम श्रोत्यांच्या अंत:करणावर अचूक होतो, हे त्यांनी बरोबर जाणलं होतं. मंद लयीतील त्यांच्या गायनातून बीनचेच स्वर ऐकू येत असत. बीनकाराची कोमल स्वर काढण्याची कुशलता ते आपल्या गळ्यातून काढून दाखवीत. करूण रसाचा अत्युच्च आविष्कार करण्याचे अमीरखाँ यांचे कसब केवळ अपूर्व आणि अद्वितीय!

ठुमरी, गझल, भावगीत, भक्तिगीत, भजन वगैरे कधीही मैफलीत न गाणारा, असा हा एकमेव महान गायक. लोकांच्यासाठी, त्यांना खुष करण्यासाठी कधीही न गाणारा असा हा एकुलता एक ख्याल-गायक! या गायकाला म्हणतात उस्तादोंका उस्ताद. आपण जे गाणार, तेच रसिक श्रोत्यांनी मनापासून, एकचित्ताने, एकाग्रतेने, तादात्म्याने, तद्रूप होऊन ऐकावे, अशीच तीव्र इच्छा असणारा महत्वाकांक्षी गायक अनेक गायक-वादक श्रोत्यांच्या फर्मायिशींना मान देतात, त्या गाऊन वाजवून त्यांना खुष करतात, टाळ्या मिळवितात आणि सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठीच जिवाचे रान करतात. प्रशंसा व्हावी, गौरव करावा, स्तुती करावी हाच त्यांचा एकमेव हेतू असतो. त्या साऱ्या मोहापासून, प्रलोभनापासून अमीरखाँ जिवाच्या कराराने हेतुपूर्वक दूर राहिले. धीम्या लयीतील, अति विलंपतमधील आपली आलापीयुक्त अशी गायकी त्यांनी अत्यंत सुरेल, सर्वांगसुंदर, मधुर अशी बनविली की त्यांचा देखील फार मोठा चाहता वर्ग त्यांनी आत्मविश्वासपूर्वक निर्माण केला. गांवोगांवी आणि शहरोशहरी. ठुमरी दादरा न गाणारा, केवळ ख्याल गायकी गाऊन रसिक श्रोत्यांना श्रुतिमनोहर गाणं ऐकवून स्वर्गीय आनंद देऊ शकणारा असा दुसरा गायक झालाच नाही. पुढे कधी होण्याची सुतराम शक्यता दिसत नाही. केवळ भारदस्त ख्याल गाऊन एवढी प्रसिद्धी, प्रतिष्ठा, लोकमान्यता, राजमान्यता मिळवू शकणारे अमीरखाँ!

अमीरखाँ यांच्या रूबाबदार आणि राजबिंड्या व्यक्तिमत्वाला संपूर्ण साजून दिसेल असेच त्यांचे दरबारी-गायन होते. दोन तानपुरांच्या मध्ये शांत, संथ आणि अतिगंभीर स्वरात, सर्वांगसुदर अशा रागविस्ताराने, आपली अपूर्व, अनोखी आलापी सुरू करून ते मैफल आपल्या ताब्यात घेऊ शकत होते. हजारो रसिक श्रोत्यांना स्वरसमाधीत विलीन करण्यामध्ये सहजच ते यशस्वी होत असत. त्यांच्या गायनशैलीमधील अजब जादू श्रोत्यांना भारून टाकीत असे. अतिशय नाजूक कलाकुसर, स्वरांचे स्वर्गीय नर्तन, आपल्या आगळ्यावेगळ्या शैलीत सादर करून श्रोत्यांना दिव्यानुभूतीचा साक्षात्कारच घडवीत

असत. त्यांचा द्रुतख्याल तालाच्या विलोभनीय लयीबरोबर एखाद्या दरबारी हत्तीप्रमाणे डुलत डुलत डौलाने पुढे पुढे जात असे. सर्व दर्दी श्रोत्यांच्या मुखातून 'अहाहा', 'वाहव्वा', 'बहोत अच्छे', 'क्या बात है' अशी अनाहूतपणे आणि नकळत येणारी भरघोस दाद सर्व मैफलभर घुमत असे.राजदरबारीच शोभून, साजून दिसेल असे भारदस्त गाणे होते अमीरखाँचे !

आपल्या गानशैलीने, डौलदार आलापीने, तिन्ही सप्तकात अतिशय सहज फिरू शकणाऱ्या आपल्या दमदार, कसदार आवाजाने अमीरखाँ यांनी एक अत्युच्च स्थान निर्माण केले होते. सतत २५-३० वर्षे संगीताचे चिंतन-मनन करून, अखंड रियाज करून, नवीन नवीन कल्पना आणि स्वरांचे देखणे रूप सादर करून अमीरखाँ यांनी रसिक आणि जाणकार श्रोत्यांच्या मनामध्ये अत्यादराचे स्थान आत्मविश्वासाने तयार केले होते. अमीरखाँचे सुमधुर गायन ऐकणे ही एक मेजवानीच वाटत असे श्रोत्यांना. अमीरखाँसाहेब म्हणजे एक दैवी, असामान्य, अलौकिक गंधर्वलोकीचे कलाकार आहेत, असंच वाटे त्यांच्या असंख्य चाहत्यांना.

प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित उच्चाधिकाऱ्यांचा परिचय व्हावा, मान्यवरांच्या गराड्यात असावे, सिनेमासृष्टीतील ताऱ्यांच्याप्रमाणे आपल्याभोवती देखील एक तेजोवलय असावे, सरकारदरबारी मान्यता मिळावी, उच्च पदवी लाभावी, अशा ग्लॅमरचा अमीरखाँ यांना मुळीच ध्यास नव्हता. आपल्या संगीतसाधनेने त्या सर्वश्रेष्ठ अल्लातालाची श्रद्धेने पूजा करण्यातच त्यांना खरे समाधान मिळत होते.

मारवा, दरबारी, मालकंस, ललत, मेघ, आसावरी अशा भारदस्त रागातील त्यांच्या ध्वनिमुद्रिका प्रसिद्ध झाल्या आणि त्या ध्वनिमुद्रिका खरेदी करण्यासाठी रसिकांची प्रचंड झुंबड उडाली. अनेक जाणकार रसिकांच्या घरी अमीरखाँ यांच्या ध्वनिमुद्रिका स्वर-संपत्ती म्हणूनच जपून ठेवलेल्या दिसतात. कलकत्ता येथे एका धनाढ्य रसिकाने एक Sound Proof अशी वातानुकूलीत खोली तयार केली आहे. त्याच्या या खोलीमध्ये अमीरखाँसाहेबांचे Life size असे रंगीत Portrait आहे. या चाहत्याने अमीरखाँसाहेबांच्या जगामध्ये झालेल्या असंख्य मैफिलीतील Live ध्वनिफिती एकत्र जमा करून एक अमोल खजिनाच तयार करून ठेवला आहे. श्रीमती कंकणा बॅनर्जी या शिष्येच्या पित्याने मला या धनाढ्याच्या भेटीसाठी नेले होते १९७४साली. अमीरखाँ यांच्या अपघाती निधनानंतर मी कलकत्तयाला गेलो होतो. त्या धनवंताची भेट घेतली, अमीरखाँ यांचा देखणा फोटो पाहिला आणि काही निवडक ध्वनीफिती ऐकून पुन:प्रत्ययाचा आनंद लुटला.

गायकीचा एक नवा फॉर्म म्हणजेच कंठसंगीतातील एक प्रयोग !अमीरखाँ यांनी असाच एक सर्वस्वी नवा प्रयोग करण्याचे ठरविले. गायकीचा एक अनोखा, आगळावेगळाच प्रयोग त्यांनी अपार कष्ट घेऊन तयार केला आणि रसिकांसमोर ठेवला. प्रथम त्यांच्या मैफलभर केलेल्या आलापीची जादू रसिकांच्या अंत:करणाला मुळीच भावली नसावी. हळूहळू त्यांच्या

गायकीने भारून गेलेला रसिकांचा वर्ग वाढू लागला. त्यांच्या अगणित सुरेल मैफली आयोजित केल्या जाऊ लागल्या भारतभरातील मोठमोठ्या शहरात. प्रत्येक संगीत परिषदेमध्ये अमीरखाँचे गायन हे एक खास आकर्षण होऊ लागले. अमीरखाँसाहेबांच्या ध्वनिमुद्रिका आणि ध्वनिफिती यांचा ग्राहकवर्ग प्रचंड प्रमाणात वाढत गेला. अमीरखाँ यांना धनप्राप्ती होऊ लागली अमर्याद. आर्थिक परिस्थिती सुधारली आणि त्यांनी पेडर रोडवरील 'वसंत' या आलिशान इमारतीत- स्वतःच्या मालकीच्या जागेत ते समाधानाने राहू लागले. गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या 'प्रभुकुंज या बंगल्यात अमीरखाँसाहेबांची मैफल आयोजित करण्यातच प्रतिष्ठा मानली जात असे. अगणित गायक अमीरखाँची नक्कल करण्यात धन्यता मानीत आहेत.

सोलापूर येथील माझे बालमित्र श्रीराम पुजारी याला माहित होते की मला अमीरखाँ यांचे गायन अतिशय आवडते. त्यांची गायनशैली असामान्य असून त्यांच्या आलापीने अलौकिक असा आंतरिक आनंद मिळतो. आकाशवाणीवरून झालेले त्यांचे कार्यक्रम मी लक्षपूर्वक ऐकत असे. माझ्यासारखेच गायक उत्तमराव पाटील आणि त्यांचे घनिष्ट मित्र अमीरखाँचे गाणं ऐकण्यासाठी नेहमीच उत्सुक असत. आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती देणारी पत्रके ते आठवणीने पाहत असत. अमीरखाँ यांच्या गाण्याचा दिवस, वेळ आणि केंद्र याबद्दल ते मला एकदोन दिवस अगोदरच पूर्वसूचना देत असत.

माझ्या घरी एच्. एस्. व्ही. चा एक रेडिओसेट तर होताच. पण तो सेट एका स्वतंत्र खोलीत ठेवलेला असल्यामुळे आणि त्या खोलीतील दारे-खिडक्या लावून टाकल्यानंतर, माझ्या कुटुंबियांना किंवा वाड्यातील इतर सर्व लोकांना गाण्याचा त्रास होण्याची शक्यताच नसे. माझे कुटुंबीय समोरच्या हॉलमध्ये शांतपणे झोपू शकत असत. झोपमोड होण्याची भीती मुळीच नव्हती. असे आकाशवाणीवरून प्रसारित होणारे कितीतरी कार्यक्रम ऐकून आम्ही मुग्ध होत होतो. अमीरखाँ यांचं गाणं प्रत्यक्ष समोर बसून ऐकण्याचं माझं स्वप्न कधी साकार होणार, असा प्रश्न माझ्या मनामध्ये नेहमीच येत असे.

एके दिवशी मला सोलापूरहून श्रीराम पुजारीची तार आली. त्याने मला कळवले की उस्ताद अमीरखाँ यांची मैफल सोलापुरात आयोजित केली होती. मी त्यासाठी सोलापूरला यावे यासाठीच त्याने मला तार करून कळवले. सोलापुरला जाण्याचा मी निश्चयच केला. शक्य झालं तर अमीरखाँ यांची मैफल हैदराबादमध्ये करण्यासाठी त्यांना आग्रह करावा असा माझा हेतू होताच.

दुसरे दिवशी मी साधना संघाचे चिटणीस यांच्या घरी गेलो व अमीरखाँ यांची मैफल ऐकण्यासाठी मी सोलापुरला जाणार असल्याचे त्यांना सांगितले. अमीरखाँ यांच्याशी बोलणी करून त्यांची हैदराबादमध्ये ऐक मैफल आयोजित करण्याच्या माझ्या विचाराशी ते सहमत झाले. साधना संघ मला संपूर्ण सहकार्य करण्यास तयार असल्याचे चिटणीसांनी सांगितले.

त्यांच्या या आश्वासनामुळे मला मोठाच धीर आला, माझा उत्साह दुणावला.

संध्याकाळी मी वसंतराव गोडसे यांच्या घरी जाऊन त्यांचीही भेट घेतली. माझा सोलापुरला जाण्याचा आणि अमीरखाँ यांचा कार्यक्रम ठरविण्याचा विचार मी त्यांना सांगितला. कला निकेतन या संस्थेच्या वतीने मी अमीरखाँ यांच्याशी बोलणी करायला त्यांनी आनंदाने परवानगी दिली मला. दोन संस्था माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या. माझ्या उत्साहाला उधाण आले. उदंड आशा उराशी बाळगून मी सोलापुरला निघालो.

सोलापुरला पोचल्याबरोबर मी श्रीराम पुजारीच्या घरी प्रथम गेलो. माझ्या येण्याने त्याला अतिशय आनंद झाला. श्रीरामने मला सांगितले की अमीरखाँ यांना स्टेशन जवळच्या विकास हॉटेलमधील एक स्वतंत्र खोली देण्यात आली आहे. श्रीराम पुजारी आणि मी विकास हॉटेलमध्ये जाण्यास निघालो. श्रीरामने माझा परिचय करून दिला आणि खुलासा केला, हा माझा मित्र आपले गाणे ठरविण्याच्या इराद्याने हैदराबादहून आला आहे.

रामभाऊ म्हणाला, 'खाँ साहब, ये मेरा खास दोस्त है। आप इसके लिये जरूर, जाइये हैदराबादको. आपकी सब खातिरदारी ये मेरा मित्र अच्छी करेगा।' मी केवळ खाँसाहेबांचे गाणं ऐकण्यासाठी आणि त्यांना हैदराबादला येण्याचं आग्रहाने सांगण्यासाठी, हैदराबादहून आल्याचं ऐकूनच ते अत्यंत खुष झाले. हैदराबादला आपलं गाणं व्हावं अशी त्यांची अनेक वर्षांपासूनची इच्छा होती. माझ्यासाठी ते हैदराबादला येण्यास तयार असल्याचे त्यांनी मला वचनच दिले. रामभाऊ पुजारीने माझ्याविषयी सांगितल्यामुळे अमीरखाँचा होकार ताबडतोब मिळाला. रामभाऊसाठीच ते हैदराबादला येण्यास तयार होते. खाँसाहेबाबरोबर आलेल्या व्यक्तीने मला त्यांचा पत्ता दिला. जानेवारी मध्ये त्यांना पत्र पाठविण्याची त्या व्यक्तीने मला सूचनाही केली. माझ्या इतकेच समाधान अमीरखाँ यांना झाल्याचे स्पष्ट दिसले मला आणि रामभाऊला. धन्यवाद देऊन आम्ही दोघे अत्यानंदाने परत गेलो.

माझ्या आवडत्या गायकाला मी प्रथमच पाहिले विकास हॉटेलमध्ये. त्यांचा गोरापान चेहरा, काळेभोर केस, सोनेरी काडीचा चष्मा, सौजन्यपूर्ण संभाषण, लुंगी आणि सँडो बनियन् अशा घरगुती पोशाखात ते दिसले होते, एकदम रूबाबदार आणि खानदानी घराण्यातील. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने मी खूपच प्रभावित झालो. मी हैदराबादहून आल्यामुळे त्यांना आश्चर्य वाटल्याचे स्पष्ट जाणवले मला. त्यांच्या मधुर बोलण्यावरून त्यांची सभ्यता स्पष्ट झाली. नमस्कार करताना ते माझ्याकडे पाहून मोकळेपणाने हसले, तेव्हा त्यांचे पांढरेशुभ्र दात चांगलेच चमकले. त्यांच्याबरोबर आलेला सहकारी देखील अमीरखाँ सारखाच सभ्य आणि शांत वाटला मला. अमीरखाँ यांच्या सर्वांगसुंदर गायनासारखेच त्यांचे व्यक्तिमत्त्वही चित्ताकर्षक वाटले मला.

अमीरखाँसारख्या महान गायकाला इतक्या जवळून पाहण्याची व त्यांच्याशी बोलण्याची संधी कधी काळी मिळेल, असं मला स्वप्नातदेखील वाटलं नव्हते. श्रीराम

पुजारी या माझ्या जिवाभावाच्या मित्रामुळेच मला ही संधी लाभली होती. मनोमनी मी रामभाऊला हार्दिक धन्यवाद दिले. रामभाऊला एकदोन महत्वांची कामं होती, म्हणून तो गेला आणि मी विचार करीत करीत रामच्याच घरी आलो. रात्री गाडीतून येताना मला नीट झोप लागली नव्हती. आपल्याला स्वर्गीय संगीताचा आनंद देणारा हा आपला आवडता गायक कसा असेल, कसा बोलेल, आमचा परिचय करून दिल्यानंतर तो माझ्यासारख्या सर्वसामान्य रसिक श्रोत्याबरोबर कसा वागेल याच विचारांनी मी संपूर्ण रात्रभर शांतपणे झोपू शकलो नव्हतो. रामभाऊ येईपर्यंत आराम केला मी.

आठच्या सुमारास रामभाऊ आला. अमीरखाँसाहेब यांचे कर्णमधुर गाणे, त्यांचे आकर्षक देखणे व्यक्तिमत्त्व याविषयी बोलता बोलता आम्ही जेवण केले. रात्री बरोबर ९।। वाजता अमीरखाँ यांच्या गायनाची मैफल सुरू होणार होती. कार्यक्रमाची सारी तिकिटे विकली गेल्याचेही रामभाऊने मला सांगितले. मग गाणं ऐकायला मिळणार कसं ? हा एकच प्रश्न मला सतावू लागला. एकही तिकीट शिल्लक नसल्यामुळे सभागृहामध्ये प्रवेश कसा मिळवायचा, याच एका विचाराने मनाला रुखरुख लागून राहिली माझ्या.

विकास हॉटेलमध्ये जाण्यासाठी आम्ही दोघे निघालो. चालत चालत जात असतांना रामभाऊच्या डोक्यातून एक अफलातून कल्पना निघाली. अमीरखाँ यांना दोन तानपुरे लागतात. हॉटेलमध्ये तानपुरे सकाळीच आणून ठेवण्यात आले होते. आम्ही एकेक तानपुरा हातात घेऊन खाँसाहेब आणि त्यांच्या व्यवस्थापकाच्या मागे जाण्याचे ठरविले. याशिवाय अन्य मार्गच नव्हता सभागृहामध्ये प्रवेश मिळविण्याचा.

अमीरखाँ यांना मुंबईहून आणले होते कुलकर्णी नावाच्या सोलापूरच्याच एका गृहस्थाने. त्यांचा व आमचा परिचय होता चांगला. त्यांनाच आम्ही विश्वासात घेतले. दोन्ही तानपुरे घेऊन आम्ही दोघे त्यांच्या गाडीत बसलो. अमीरखाँ आणि व्यवस्थापक यांना घेऊन जाण्यासाठी संयोजकांनी दोघांना पाठविले होते. त्यांच्या गाडीच्या मागेच आमची गाडी निघाली. सभागृहाच्या समोर आमच्या गाड्या थांबल्या.

भयंकर गर्दी लोटली होती. सभागृहामध्ये शिरणे म्हणजे एक दिव्यच वाटू लागले. संयोजकांचे ते दोन प्रतिनिधी वाट काढीत काढीत पुढे निघाले. त्यांच्या मागून अमीरखाँ आणि त्यांचे व्यवस्थापक कसेबसे गर्दीतून वाट काढीत होते. रामभाऊच्या हातात एक तानपुरा आणि दुसरा माझ्या हातात, असे आम्ही त्यांच्या मागोमाग गेलो आणि सभागृहामध्ये शिरलो. सभागृह खचाखच भरले होते प्रेक्षकांनी. आमच्या हातातील तानपुरे पाहूनच, आम्हाला वाट करून देण्यात आली. कुणीही आम्हाला तिकिट विचारण्याचे धैर्य दाखविले नाही. तानपुरे वाजविणारे अगोदरच आत येऊन बसले होते. अमीरखाँच्या मागे बसले त्यांचे व्यवस्थापक आणि त्यांच्या दोन्ही बाजूला बसले तानपुरे वाजविणारे. आम्ही दोघांनी अमीरखाँच्या समोरची जागा कशीबशी मिळवली. इतक्या जवळून अमीरखाँ यांचे गायन ऐकण्यास मिळेल असं मला मुळीच वाटलं नव्हतं. माझा भाग्ययोगच होता ! आपल्या

आवडत्या गायकाचे गायन प्रथमच ऐकणार होतो मी आणि तेही इतक्या जवळ बसून.

संयोजकांच्या वतीने सर्व प्रेक्षकांचे, अमीरखाँ, त्यांचे तबल्यावरील, हार्मोनियमवरील, तानपुरे वाजविणारे साथीदार यांचे मनापासून स्वागत करण्यात आले. अमीरखाँसाहेब यांचा सुरेख परिचय करून देण्यात आला. त्यांच्या साथीदारांचीही ओळख करून देण्यात आली. तानपुऱ्यावरील व्यक्तींची नावे सांगण्यात आली. त्यानंतर पहिला भरगच्च मोठा असा हार अमीरखाँसाहेबांना घालण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष पुढे आले. अमीरखाँ उठून उभे राहिले आणि त्यांनी विनम्रतेने आपले दोन्ही हात जोडले. अध्यक्ष हार घालीत असतांनाच फोटो काढण्यात आले. अमीरखाँ यांचे दिलखुलास हास्य पाहूनच मला धन्य धन्य वाटले. मग साथीदारांनाही हार घातले अध्यक्षांनी. तानपुऱ्यावरील व्यक्ती आणि खाँसाहेबांचे व्यवस्थापक यांना पुष्पगुच्छ देण्यात आले. सर्वांचे फोटो काढण्यात आल्याने, साथीदार तानपुऱ्यावरील व्यक्ती, व्यवस्थापक ही सारी मंडळी प्रसन्न झाली. टाळ्यांचा कडकडाट चालूच होता. फुलांचा सुगंध दरवळत होता. आम्ही दोघे अत्यानंदाने स्वागत पाहण्यात भान विसरलो. अमीरखा यांचे देखणे व्यक्तिमत्त्व, मागे वळविलेले काळेभोर केस, सोनेरी काडीच्या चष्म्यातून दिसणारे चमकदार- भावपूर्ण डोळे, काळीशार शेरवाणी आणि चुडीदार पायजामा घातलेले अमीरखाँ राजबिंडे दिसत होते.

तानपुरे झंकारू लागले. तानपुऱ्यांच्या झंकारांनी अमीरखाँसाहेबांची एकदम तंद्री लागली, क्षणभर त्यांनी डोळे मिटले आणि अदबीने सर्वांना त्यांनी नमस्कार केला. डोळे बंद असतानाच त्यांनी गाणे सुरू केले.

गाणं सुरू झालं आणि मी कान टवकारून ऐकू लागलो. सूर छान लागला होता. केदार रागाची आलापी सुरेख करीत होते अमीरखाँ. इतका भारदस्त केदार कधीच ऐकला नव्हता. केदारच्या अतिविलंपत अशा आलापीने सारे श्रोते मुग्ध बनून माना डोलावीत होते. तबलजीने फक्त ठेका देण्याचेच काम सुरू ठेवले होते. हार्मोनियम वरील साथीदाराची साथ छान चालली होती. अधूनमधून अमीरखाँबरोबरच त्या हार्मोनियमच्या साथीला भरघोस दाद मिळत होती. अमीरखाँ यांची सोलापुरातील पहिलीच मैफल असल्यामुळे त्यांच्या चाहत्यांनी गर्दी केली होती. हॉल तर भरलाच होता, पण बाहेर गॅलरीमध्ये अनेक श्रोते उभे राहून गाण्याचा आनंद घेत असलेले पाहून आश्चर्याचा धक्काच बसला. अमीरखाँचे दमदार, कसदार, अतिविलंपत आलापीने भरलेले गाणे ऐकण्यासाठीच श्रोते उभे राहून गाणं ऐकीत होते. हा अनुभव अगदी नवीनच वाटला मला. जवळजवळ एक तासभर केदार राग खाँसाहेबांनी आळवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. रामभाऊने दिलेली दाद खाँसाहेब मनापासून घेत होते. उजवा पंजा जमिनीवर ठेवून फक्त डाव्या हाताने अमीरखाँ माफक हातवारे करीत होते. तोंड वेडेवाकडे करण्याचा प्रश्नच नव्हता. डोळ्यातील भाव मात्र आम्हाला स्पष्ट जाणवत होते. एखाद्या योग्याप्रमाणे ते मांडी घालून बसले होते. संपूर्ण गायन त्यांनी एकाच ठिकाणी बसून केले, आसन बदलण्याची जरूरीच वाटली नाही त्यांना.

त्यांची संगीतसाधना म्हणजेच तपश्चर्याच आहे असं मला सारखं जाणवू लागलं. इतकी गंभीर गायकी, भरदार आलापी ऐकणे ही श्रोत्यांची देखील परीक्षाच वाटली मला. थरारून टाकणारे स्वर्गीय गायन ! पहिला ख्याल संपल्यानंतर खुष झालेल्या रसिक श्रोत्यांनी टाळ्या वाजवून सभागृह दणाणून सोडले. दर्दी श्रोत्यांचे समाधान झालेले पाहून ऐकूनच, माझ्या आनंदाला पारावारच उरला नव्हता. आनंदाश्रूंनी माझे डोळे भरून गेले.

केदार रागानंतर अमीरखाँ यांनी हॉलमधील सर्व श्रोत्यांवरून दृष्टी फिरविली आणि आपल्या गाण्याचा झालेला परिणाम पाहून घेतला. आता ते कोणता ख्याल घेतात, हा प्रश्न माझ्या मनामध्ये रुंजी घालू लागला. त्यांनी गायला सुरूवात केली आणि लक्षात आले की त्यांनी आपला हातखंडा ख्याल घेतला होता. मालकंस रागाची आलापी ऐकली आणि अनेकांनी टाळ्या वाजविल्या. श्रोत्यांचा आनंद शिगेला पोचला. केदार या रागापेक्षा मालकंस रागाची आलापी अंत:करणाला स्पर्शून जात होती. मालकंसमधील स्वरसौंदर्याने सर्वच श्रोत्यांना एक वेगळाच अनुभव दिल्याचे जाणवले मला. तानपुऱ्यांच्या सुरेल झंकाराने आणि अमीरखाँ यांच्या धीरगंभीर स्वरांनी हॉलमधील वातावरण भरून गेले. जीव कानात आणून ऐकत होते सारे श्रोते. मालकंस हा राग बहुतेक सर्वच श्रोत्यांचा आवडता राग असतो. 'वाहव्वा', 'क्या बात है', 'बहोत अच्छे' अशी दाद देऊन श्रोत्यांनी आपला अत्यानंद व्यक्त केला. रामभाऊने दिलेली दाद मला खूपच आवडली. 'ओहोहो' अशीच हलकी दाद माझ्या तोंडातून निघत होती. त्यावेळी अमीरखाँसाहेब माझ्याकडे किंचित असा दृष्टिक्षेप टाकीत असल्याचे पाहून मला खूप समाधान होत होते. आपण दिलेली दाद गायकाने स्वीकारल्याचे पाहूनच मी रोमांचित होत होतो. मालकंस रागाची विलंपत जवळजवळ पाऊण तास करीत होते अमीरखाँ.

मालकंस रागाचा आकृतिबंध आपल्या सुरेल आलापीतून आविष्कृत केल्यानंतर अमीरखाँ यांनी 'आज मोरे घर आइ रे बलमा' ही द्रुतचीज सुरू केली. सर्व श्रोत्यांची ती आवडती बंदिश असल्याने, अत्यंत आनंदाने कडाडून टाळ्या मिळाल्या. पेटीची सुरेल साथ आणि तबल्याचा ठेका यामुळे गाण्याची रंगत खूपच वाढली. सारे श्रोते धुंद होऊन गेले. कितीतरी ठिकाणी त्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. मालकंस हा मधुर आणि भावपूर्ण ख्याल संपताच, श्रोत्यांनी टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त केला. समाधानाने खाँसाहेबांचा चेहरा खुलला.

मालकंसनंतर त्यांनी सुरू केलेला राग आज मला आठवत नाही. रागाचे नाव, वादी-संवादी स्वर, स्वर-संवाद, त्या त्या रागाची रचना, यापैकी काहीही माहित नसले तरी संगीताचा आनंद घेण्यात कोणतीही बाधा निर्माण होत नाही. भावपूर्ण स्वर अंत:करणाला भिडतात. आतून उत्स्फूर्तपणे 'व्वा' अशी दाद सहजच येते आणि मान डोलू लागते. संगीतश्रवणाचा हाच खरा आनंद !

तीन ख्यालानंतर अमीरखाँ यांनी मध्यंतर केले. बारा वाजून गेले होते. मध्यंतरामध्ये

बाहेर गेलो तर आपली मोक्याची जागा जाईल, या भीतीने जागेवरच बसून राहिलो मी. सभागृहामध्ये इतकी गर्दी होती की बाहेर जाणे अशक्यच वाटले. शेजारच्याच खोलीत संयोजकांनी चहापाण्याची सोय केली होती. अमीरखाँ, त्यांचा व्यवस्थापक, त्यांचे साथीदार, तानपुरे वाजविणारे यांना त्या खोलीत नेण्यात झाले. अमीरखाँ यांनी जाता जाता रामभाऊला आत येण्याची खूण केली. त्याला त्यांच्याबरोबर जावेच लागले.

बसल्या बसल्या मी विचार करू लागलो अमीरखाँ यांच्या सिद्धहस्त गाण्याचा, त्यांच्या स्वरांचा आणि योग्यप्रमाणे निश्चल बसून राहण्याचा. संगीतसाधनेत एक किमान अपेक्षा असते, की एका आसनावर, स्वस्थपणे,सहजतेने, एकाग्रचित्तने आणि धीरगंभीरतेने किमान दोन तास बसता आले पाहिजे. अमीरखाँ यांची संगीतसाधना म्हणजे एक प्रकारची तप:साधनाच वाटली मला. कंठसंगीताचा भावनाविष्कार कशामुळे होत असतो, स्वरांच्या सच्चेपणाने की शब्दांच्या मदतीने ? संगीत आपल्या शुद्ध स्वरूपात, स्वत:च्याच स्वरसाम्राज्यामध्ये सर्वच अंगांनी फुलत उमलत जाते. स्वतंत्र थाटात विहरत असते, आणि रसिक श्रोत्याला आनंद देत राहते. संगीतामधील निखळ स्वरसौंदर्य जाणकार आणि संवेदनशील श्रोता सहज समजू शकतो. स्वरविहारात श्रोता नकळत सहभागी होत जातो, संगीतमय होत जातो. एका उदात्ततेचा अनुभव घेतो. हाच तर नादब्रह्माचा साक्षात्कार नसेल ? असे विचार करीत असतानाच अमीरखाँ आणि त्यांचे साथीदार आसनावर येऊन बसले.

अमीरखाँ यांनी त्यांच्या अतिविलंपत आलापीला शोभून दिसणारा, स्वरसौंदर्य शतपट करणारा, आम्हा सर्व रसिक श्रोत्यांचा रागदरबारी कानडा मध्यंतरानंतर सुरू केला. दरबारामध्ये, सम्राटासमोर राजेमहाराजे यांच्याकरिता अत्यंत योग्य असा ख्याल म्हणजे दरबारी कानडा आणि हाच राग त्यांनी आपल्या धीम्या लयीत सुरू केला. संपूर्ण हॉलभर शांतता पसरली होती आणि दरबारीचे आलाप हॉल भरून टाकीत होते. दरबारी कानडा गावा तर अमीरखाँसाहेबांनीच. ठाय लयीमध्ये आरंभ केलेला हा राग ऐकताना माझ्यासारखे संवेदनाशील रसिक चाहते थरारून जातात. भारदस्त आणि मनाला झुलविणारा दरबारी कानडा अमीरखाँ यांच्याकडून ऐकायला मिळणे हा केवळ नशिबाचाच भाग. इतक्या जवळ बसून ऐकला मी. दरबारीचे आर्त स्वर काळजाला अक्षरश: भिडत होते. अमीरखाँ हा राग एक तासभर आळवीत होते. सर्व रसिक श्रोत्यांना धन्यधन्य वाटायला लावणारा दरबारी कानडा ! माझे अंत:करण तर भरून आले. माझे डोळे पाणावले. संपूर्ण वातावरण भारल्यासारखे झालेले दिसले. दरबारी कानडा अविस्मरणीयच वाटला.

दरबारीनंतर त्यांनी आणखी एक बडा ख्याल घेतला. तो राग मला ओळखता आला नाही. रामभाऊला विचारण्याचे धाडस होत नव्हते. तो दाद देण्यात रंगला होता. स्वरांचा स्वर्गीय आनंद मनापासून लुटत होता. हॉलमधील सारे श्रोते स्वरसौंदर्याचा आस्वाद घेत होते. अमीरखाँसाहेब यांनी तो बडा ख्याल गाऊन आपली बैठक संपवली. रात्रीचे दोन

वाजत आले होते.

मैफल संपल्यानंतर अनेक श्रोते अमीरखाँशी बातचीत करण्यासाठी जमले त्यांच्याभोवती. मी त्यांच्या व्यवस्थापकांना एका बाजूला नेवून अमीरखाँसाहेबांच्या आवडीनिवडी विचारून घेतल्या. त्यांना मासे आवडतात हे त्यांनी मला सांगितले.

विकास हॉटेलमध्ये पोचविले त्यांना संयोजकांनी. मी आणि रामभाऊ कुलकर्णी यांच्या मोटारीतून आमच्या घरी - माणिकचंद चाळीत गेलो. कुलकर्णी यांनी देखील मला बजावून सांगितले की अमीरखाँ यांना मासे पसंत पडतात. मासे आवडतात खाँसाहेबांना असं मी चांगलं लक्षात ठेवलं.

सकाळी कुलकर्णी यांच्या कारमधून अमीरखाँ जाणार होते मुंबईला. म्हणून मी आणि रामभाऊ गेलो विकास हॉटेलमध्ये. अमीरखाँ जाण्यासाठी तयार होऊन बसले होते. आम्ही दोघांनी त्यांना नम्रतापूर्वक नमस्कार केला. रात्रीच्या गाण्याबद्दल आम्ही त्यांना आनंदाने सांगितले की रात्रीची मैफल अप्रतीम आणि संस्मरणीय झाली होती. अनेक रसिक श्रोत्यांनी समक्ष भेटून त्यांना हे सांगितले असल्याचे त्यांनी आम्हाला सांगितले. अमीरखाँ मला म्हणाले, 'मोहोळकर, तू रामभाऊका खास दोस्त है। मै सिर्फ तेरे खातर हैदराबादको जरूर आऊंगा गानेके लिये। मेरा पता तुझे मिला ना ? जानेवारी में मुझे खत भेजना। मैं उस खत के जवाब में सब कुछ लिखूंगा तुझे।' माझ्याजवळ त्यांचा पत्ता आहे आणि मी त्यांना जानेवारीमध्ये पत्र लिहीन, असं आश्वासन दिलं मी. अमीरखाँ यांना आनंद झाल्याचे स्पष्ट दिसले.

थोडा वेळ इकडच्या तिकडच्या गप्पा केल्या कुलकर्णी यांच्याबरोबर. मग ते सर्वजण मोटारीत बसले. सर्व सामान मोटारीच्या टॉपवर व्यवस्थित बांधण्यात आले. आम्ही दोघांनी त्या सर्वांचा निरोप घेतला. मुंबईच्या दिशेने मोटार गेली.

रामभाऊ आणि मी गप्पा मारीत त्यांच्या घरी गेलो. रामभाऊची आणि अमीरखाँ यांची ओळख मुंबईत झाली होती. रामभाऊच्या मनमोकळ्या स्वभावामुळे खाँसाहेब त्याच्यावर खूष होते. रामभाऊने अशा प्रकारे माझ्या सोलापुरला येण्याचे सार्थकच केले. अमीरखाँ यांना इतक्या जवळून पाहू शकलो आणि जवळ बसून त्यांचं गाणं ऐकू शकलो. रामभाऊमुळेच खाँसाहेबांनी मला हैदराबादला गाण्यासाठी येणार असल्याचे अभिवचन दिले. आणखी काय पाहिजे ?

रामभाऊला धन्यवाद देऊन मी त्याचा निरोप घेतला. अमीरखाँ यांच्या देखण्या व्यक्तिमत्त्वाबद्दल, त्यांच्या बहारदार गाण्याबद्दल आणि त्यांच्या सौजन्यपूर्ण वागण्याबद्दल विचार करीतच मी घरी गेलो. रात्रीच्या गाडीने मी हैदराबादला जाण्यास निघालो. अविस्मरणीय भेट आणि संस्मरणीय गाणं !

मुंबई हैदराबाद एक्सप्रेसमध्ये झोपण्यासाठी जागा मिळूनही मला झोप लागेना. डोळ्याला डोळा लागेना. डोक्यामध्ये विचार चालू असले की झोप लागणे कठिण असते.

ध्यानीमनी स्वप्नी नसलेला अपूर्व असा अनुभव घेऊन मी परत निघालो होतो. अमीरखाँ यांचे सर्वांगसुंदर गाणं प्रत्यक्ष ऐकायला मिळेल असं मला चुकूनही वाटल नव्हतं. समोर बसून, त्यांचं भारदस्त गाणं ऐकण्याचा स्वर्गीय आनंद मला मिळाला होता. रामभाऊची तार आल्यापासून माझ्या आनंदाला सीमाच नव्हती. आपल्या अतिशय आवडत्या गायकाचं गाणं ऐकायला मिळणार याच एका विचाराने मी थरारून गेलो होतो. खरं देखील वाटत नव्हतं की, आपल्याला अमीरखाँ यांची मैफल ऐकायला मिळणार आहे, आपल्या जन्मभूमीत, सोलापूरात.

रामभाऊ पुजारीशी गप्पा करीत असताना समजले की उद्या रात्री होणारी अमीरखाँ यांची ही सोलापुरातील पहिलीच मैफल आहे. साहजिकच त्यांच्या गाण्याला तोबा गर्दी होणार याची खात्रीच वाटत होती आम्हा दोघांना.

स्टेशन रोडवरील विकास हॉटेलचे मालक आणि चालक होते सुधाकरराव आणि हिराबाई चौधरी. त्या उभयतांचा आणि माझा चांगलाच परिचय झाला होता. हिराबाई यांचा धाकटा भाऊ माणिक साठे हा माझा बालपणीचा वर्गमित्र होता. एक नंबरच्या म्युनिसिपल शाळेत आम्ही एका वर्गात शिकत होतो.

रामभाऊ पुजारीने मला अमीरखाँ यांच्या भेटीसाठी विकासमध्ये नेले. मला अत्यानंद झाला होता. सुधाकरराव आणि हिराबाई यांना खूप बरे वाटले मी गाणं ऐकण्यासाठी आलो असल्याचे पाहून. त्या दोघांनी आमचे मनापासून स्वागत केले.

अमीरखाँ ज्या खोलीत उतरले होते, त्या खोलीकडे जात असतानाच मला कमालीचा हर्ष झाला. आपल्या आवडत्या महान गायकाला समक्ष भेटण्याची ही संधी मला रामभाऊनेच दिली. या सुवर्णसंधीचा फायदा घेण्यासाठीच मी हैदराबादहून आलो होतो. अमीरखाँ दिसायला कसे असतील ? माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तीशी बोलतील कसे ? माझ्या भेटीने त्यांना काय वाटेल ? ते माझ्याकडे नीट पहातील की नाही ? अशा अनेक विचारांनी मी अस्वस्थ झालो होतो. खोलीमध्ये प्रवेश करीपर्यंत माझ्या मनाची दोलाचल अवस्था झाली होती.

खोलीमध्ये आम्ही प्रवेश केला. खोलीमध्ये दोन व्यक्ती होत्या. अमीरखाँ यांना मी पहाताच ओळखले. त्यांना आम्ही विनम्रतेने नमस्कार केला. रामभाऊची व त्यांची ओळख होतीच. माझ्याकडे त्यांनी दृष्टी वळवली आणि मुद्रा प्रश्नांकित केली. रामभाऊ म्हणाला, 'खाँसाहेब, ये है मेरा बचपनका दोस्त, कालिदास मोहोळकर. आपका गाना सुनने के लिए आया है हैदराबादसे। आपका कार्यक्रम हैदराबादमें करनेकी भी तमन्ना लेके आया है।' अमीरखाँ खुष झाले आणि त्यांनी माझे मंदस्मित करून स्वागत केले, बसण्यास सांगितले. त्यांच्या प्रसन्न हसण्यामुळे मला एकदम बरे वाटले. माझ्या मनावरचे दडपण एकदम सैल झाले.

गाडीतून प्रवास करीत असताना या साऱ्या घटना मला चलच्चित्रपटाप्रमाणे

डोळ्यासमोर दिसू लागल्या. माझे भाग्य मोठे म्हणूनच हे सारे घडून आले होते. कधी काळी असं माझं भाग्य उजळेल, असं मला वाटलंच नव्हतं. इतर काही स्वप्नांप्रमाणेच हे माझं स्वप्नही साकार झालं होतं. आता फक्त एकच गोष्ट व्हायची शिल्लक होती. ती म्हणजे अमीरखाँची हैदराबादमधील मीच आयोजित केलेली अनोखी मैफल !

हैदराबादेत घरी पोचल्याबरोबर मी घरच्या सर्वांना, माझी सोलापुरची ट्रीप किती यशस्वी झाली हे वर्णन करून सांगितले. अमीरखाँ यांनी मला पत्ता दिलेला असून त्या पत्त्यावर जानेवारीमध्ये पत्र टाकणार मी. त्या माझ्या पत्राच्या उत्तरामध्ये ते सर्व गोष्टी कळवतील. अमीरखाँ यांची हैदराबादमधील पहिलीच मैफल आयोजित करण्याचा मान मला मिळणार, हे ऐकून सर्वजण आनंदाने फुलून गेले.

अण्णा आणि भावेकाकांना ही सुवार्ता सांगण्यासाठी मी धावलो. वाटेतच आबासाहेब टिळकांचे घर असल्यामुळे मी प्रथम त्यांच्या कानावर ही सारी हकिकत घातली. अमीरखाँ यांचे गायन ऐकायला मिळणार आणि याचे सर्व श्रेय मिळणार भाऊंना. आबासाहेबांनी मला चक्क शाबासकी देऊन माझे कौतुक केले.

अण्णांच्या घरी जाऊन प्रथम त्यांना खाली वाकून नमस्कार केला. अण्णांना झालेला आनंद त्यांच्या प्रसन्नतेवरून आणि खळखळून हसण्यामधून स्पष्ट झाला. अण्णा मला म्हणाले, 'अरे भाऊ, आता तू अमीरखाँ या विख्यात कलाकाराची, ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायकाची हैदराबादमधील पहिलीच मैफल आयोजित करण्याचा मान पटकावणार आहेस. तुला या कामात भरघोस यश लाभणार यात शंकाच नाही. पण लक्षात ठेव, तुझ्यावर जळणारे, तुझा मत्सर करणारे असे अनेक शत्रू त्यानंतर निर्माण होणार. त्या सर्वांच्या नाकावर टिच्चून तू पुढे पुढे जाऊ शकतोस.'

आमचं बोलणं ऐकून भावेकाका, मधू, मुकुंदा ही मंडळीदेखील माझे विचार ऐकून घेण्यासाठी अण्णांच्या घरी जमा झाली. अमीरखाँसारख्या विख्यात कलावंताला मी जवळून पाहिलं. त्यांच्याशी बोललो आणि अगदी समोर बसून मी त्यांचं गायन ऐकू शकलो, हे मी वर्णन करून सांगितलं. भावेकाकांनी माझ्या पाठीवर थाप मारली आणि म्हणाले, 'आगे बढो.' मधूचा आनंद दुथडी भरून वाहू लागला. त्यांनी मला अमीरखाँ यांच्या देखणेपणाबद्दल आणि स्वर्गीय गाण्याविषयी वर्तमानपत्रातून वाचल्याचे सांगितले. मी त्यांचा रूबाबदार चेहरा, त्यांचं शांत, सौम्य बोलणं, त्यांचं भारदस्त सर्वांगसुंदर ख्याल गायन याविषयी माझ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. मुकुंदाने विचारले, 'अमीरखाँ यांची मैफल साधारणपणे केव्हा होणार आपल्या हैदराबादमध्ये ?' जानेवारीत मी त्यांना पत्र पाठविल्यानंतर त्यांचे उत्तर येईल मला. त्या उत्तरात हा सारा खुलासा असेल.

शाळेत गेल्यानंतर मी काटीकर, स. भ. देशपांडे आणि इतर सर्व सहकारी शिक्षकांना ही बातमी आवर्जून सांगितली. काटीकर एकदम खुष झाला. स. भ. यांनी मला अमीरखाँ यांच्या गायनकौशल्याची कल्पना दिली. इतर सर्व शिक्षक माझ्याकडे विस्फारलेल्या

डोळ्यांनी पाहू लागले. सोलापूरचा माझा दौरा यशस्वी झाल्याची बातमी मी ऑफीसमध्ये जाऊन के. डी. आणि एल्. डी. यांना दिली. के. डी. मला म्हणाले, 'मोहोळकर, अमीरखाँ यांना सर्वत्र गायकांचे गायक मानतात. या गवयाचं गाणं ऐकणं हे येरागबाळ्याचे काम नाही. असं धीम्या लयीतील गाणं ऐकणं सोपं नाही. तुम्हाला हा गायक आवडावा, याचंच आश्चर्य वाटतं.' मी त्यांना म्हणालो, 'अमीरखाँ या प्रसिद्ध गायकाचं गाणं मी रेडिओवर ऐकत असतांना, गुंग होऊन जातो, मंत्रमुग्ध होऊन गाणं ऐकत राहतो. त्यांच्या गाण्यामध्ये काहीतरी खास जादू असावी, ज्यामुळे मी भारल्यासारखा होऊन जातो.'

दिवस, आठवडे आणि महिने गेले. जानेवारी महिना जवळजवळ येऊ लागला. माझ्या मनाची अधीरता सतत वाढत गेली. अमीरखाँ साहेब यांना पत्र पाठविण्याचा दिवस केव्हा येतो, असं मला होऊन गेले. माझी उत्सुकता शिगेला पोचली. शेवटी जानेवारी महिना आला. त्यांनी दिलेल्या पत्त्यावर मी सविस्तर पत्र लिहून पोस्टात टाकले. त्यांच्या उत्तराची वाट पहात एकेक दिवस जात होता. अमीरखाँ दौऱ्यावर गेले असण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. मग माझे पत्र त्यांच्या हाती पडण्यास वेळ लागणार, असा विचार माझ्या मनामध्ये येऊ लागला. दहा दिवसानंतर त्यांचे पाकीट माझ्या पत्त्यावर आले. धडधडत्या अंत:करणाने मी पाकीट फोडले. सध्या मला वेळ नाही, पुढे कधीतरी बघू असं पत्रात लिहिले असेल काय ? अशा भीतीने माझा हात थरथर कापू लागला. पत्र वाचू लागलो मी. माझे पत्र त्यांना पोचले होते. मार्च महिन्यातील ६ तारीख त्यांनी मला दिली होती. त्या दिवशी मैफल व्हावी, असं त्यांनी लिहिलं होतं. बिदागीची रक्कम १८०० रू. त्यांनी मागितली होती. येण्याजाण्याचा खर्च या बिदागीमध्येच सामावला होता. साथीदारांची व्यवस्था आम्ही करायची होती. त्यांची बिदागी आम्हीच द्यायची. कार्यक्रमाच्यासाठी त्यांनी ३०० रू. ची रक्कम अॅडव्हान्स म्हणून मागितली होती. त्याच पत्त्यावर मनीऑर्डर करण्यासंबंधी सूचनाही केली होती.

अमीरखाँसारख्या सर्व देशभर प्रसिद्ध आणि मान्यवर गायकाची हैदराबाद मधील पहिलीच मैफल आयोजित करण्याचे भाग्य माझ्यासारख्याला लाभावे याचेच मला अप्रूप वाटले. अभिमान वाटला मला आणि अमीरखाँ वचनाला पक्के आहेत, याचेही कौतुक वाटले. अमीरखाँ यांचे आलेले पत्र बरोबर घेऊन मी घराबाहेर पडलो.

प्रथम मी साधनासंघाचे चिटणीस यांच्या घरी गेलो. त्यांना अमीरखाँचे पत्र वाचायला दिले. गायकाचे मानधन १८०० रू, तबला आणि हार्मोनियम वादकांची वेगळी बिदागी, सभागृहाचे भाडे, तिकिटे आणि जाहिराती छापण्याचा खर्च असा एकूण खर्च त्यांनी ध्यानात घेतला. साधना संघाला एवढा मोठा खर्च करणे शक्य नाही, असं त्यांनी मला स्पष्टच सांगितले. साधना संघाने नकारच दिला अमीरखाँ यांच्या मैफलीच्या संयोजनाला. मला आश्चर्याचा धक्काच बसला. करणार काय ?

वसंतराव गोडसे यांच्या घरी जाऊन मी त्यांची भेट घेतली. अमीरखाँ यांचे पत्र

त्यांच्यासमोर ठेवले. वसंतराव यांनी ते पत्र शांतपणे वाचले. वसंतराव म्हणाले, 'मोहोळकर, गायकाचे मानधन, साथीदारांची वेगळी बिदागी, मैफलीसाठी करावा लागणारा अन्य खर्च विचारात घेतला तर इतका मोठा खर्च संगीताच्या एका मैफलीसाठी करणे, कलानिकेतनला परवडण्यासारखे नाही. कलानिकेतन हा कार्यक्रम करू शकत नाही.'

साधना संघ आणि कला निकेतन या दोन्ही संस्थांनी आश्वासन दिले होते, म्हणूनच मी सोलापूरला गेलो होतो. अमीरखाँ यांच्या पहिल्याच मैफलीचे स्वप्न पाहत होतो. या दोन्ही संस्थांनी खर्चाचा विचार करून मैफल आयोजित करण्याच्या सूचनेला साफ नकारच दिला. माझ्यासमोर एक बिकट प्रश्न उभा राहिला. माझे स्वप्न भंग पावले.

शाळेत गेल्यानंतर मी शिक्षकांच्या समोर हा सर्व खुलासा केला. दोन्ही संस्था हा मोठा कार्यक्रम घेण्यास असमर्थ होत्या. काटीकर, स. भ. देशपांडे आणि इतर सहकारी शिक्षकांना याबद्दल विचार करण्याची मी विनंती केली. खर्चाची रक्कम चांगलीच मोठी होती. कुणालाही काय करावे, हे सुचेना. माझ्यासमोरील प्रश्नचिन्ह तसेच होते.

संध्याकाळी मी अण्णा, भावेकाका, मधू, मुकुंद यांच्याशी मनमोकळी चर्चा केली. इतका मोठा खर्च करू शकणारी व्यक्ती किंवा संस्था कुणालाही दिसेना.

काय करावे, कुणाला विचारावे हे मला समजेना. प्राथमिक शाळेत जाऊन मी, अण्णा, महागावकर आणि इतर शिक्षकांच्यासमोर हा भेडसावणारा प्रश्न ठेवला. एकही संस्था समोर दिसत नव्हती, जी एवढा मोठा खर्च करू शकेल. एकही गाण्याचा शौकीन धनवान माणूसही आठवेना, जो हा सारा खर्च करण्याची तयारी दाखवील. खूप विचार करून देखील हा प्रश्न समाधानकारकरीत्या सुटण्याची चिन्हे दिसेनात.

एक नवीनच संस्था सुरू करावी, या संस्थेचा चिटणीस मीच व्हावे आणि या नव्या संस्थेच्या वतीने ही गायनाची मैफल करावी, असा निर्णय मी स्वतःशी घेतला. हे काम एकट्याने होणारे नाही, याची मला पूर्ण कल्पना नाही. अनेकांचे सहकार्य घेणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय हा जगन्नाथाचा जड रथ पुढे जाणार नाही.

अण्णा, भावेकाका, महागावकर, काटीकर, स. भ. देशपांडे यांना हा निर्णय सांगावाच लागला. या कल्पनेला सर्वांनी पाठिंबा दिला. मला धीर आला आणि मी अधिक खोलवर विचार करण्यास सुरुवात केली. तसा मी हैदराबादमध्ये नवीनच होतो. माझ्या ओळखीचे लोक कमीच होते. चिटणीस म्हणून माझ्या नावाला मान्यता आणि प्रतिष्ठा लाभेल का ? हैदराबाद व सिकंदराबाद या जोडशहरातील गाण्याचे शौकीन तिकिटे विकत घेण्यास तयार होतील का ? अशा प्रश्नांनी मी अक्षरशः हैराण झालो. या नवीन संस्थेला भारदस्तपणा येण्यासाठी, कुणाला अध्यक्ष करावे ? सर्वांच्या संमतीन एकच नाव निश्चित केले डॉ. सातवळेकर. आमच्या विवेकवर्धिनी शिक्षणसंस्थेचे सेक्रेटरी आणि विवेकवर्धिनी कॉलेजचे प्राचार्य देखील होते. या आमच्या नव्यानेच स्थापन केलेल्या संस्थचे ते अध्यक्ष होण्यास तयार झाले, तर आमचे पुढील कार्य सुकर होईल, अशीच मला खात्री वाटली.

विचार पक्का ठरला.

सकाळी ८ च्या सुमारास मी डॉ. सातवळेकरांच्या घरी गेलो. सौ. डॉ. शांताबाई घरीच होत्या. त्या दोघांनी माझे आनंदाने स्वागत केले. भाऊ सातवळेकर प्रसन्नतेने हसले आणि माझ्या येण्याचे कारण त्यांनी विचारले. अमीरखाँसारख्या मोठ्या गायकाचे गायन हैदराबादमध्ये करण्याचा माझा विचार होता आणि केवळ त्यासाठी मी सोलापुरला जाऊन त्यांची भेट घेतली होती, असा खुलासा केला. साधनासंघाने आणि कलानिकेतन या संस्थेने कार्यक्रम करण्याची तयारी दाखवली होती मी सोलापूरला जाण्यापूर्वी. अमीरखाँचे पत्र आलेले असून त्यांनी ६ मार्च ही तारीख दिली आहे. कार्यक्रमाचा एकूण खर्च परवडण्यासारखा नाही, म्हणून या दोन्ही संस्थांनी नकार दिला आहे असं मी स्पष्ट केलं. इतर कोणती संस्था हा मोठा कार्यक्रम घेण्यास तयार होण्याची शक्यताच दिसत नसल्यामुळे, एक नवीनच संस्था स्थापन करून, मी त्या संस्थेचा सेक्रेटरी व्हावे, असा विचार भावेकाका, जी. डी. कुलकर्णी, महागावकर, काटीकर, स. भ. देशपांडे इत्यादिकांच्या संमतीनेच पक्का केला आहे. आमच्या या नव्या संस्थेचे अध्यक्ष भाऊंनी व्हावे, अशी विनंती करण्यासाठी मी आलो असल्याचे त्या उभयतांना मी सांगितले. कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन आणि आयोजन आम्ही सर्व शिक्षक मिळून करणार आहोत. भाऊंनी आमच्या या संकल्पाला आशीर्वाद देऊन आम्हा सर्वांना प्रोत्साहन द्यावे हीच कळकळीची विनंती आहे. या नवीन संस्थेचे अध्यक्षस्थान भाऊंनी भूषविल्यास आमचा उत्साह शतपटीने वाढणार आहे, असाही खुलासा मी केला. भाऊ आणि सौ. शांताबाई या उभयतांनी कोणतेही आढेवेढे न घेता, तात्काळ संमती दिली आणि माझ्यासमोर बशी भरून मिठाई ठेवली. मिठाई खाता खाता मी उभयतांचे विनम्रतेने आभार मानले आणि त्यांचा निरोप घेतला.

अण्णा, भावेकाका, काटीकर, देशपांडे आणि अन्य सहकारी शिक्षकांना मी अध्यक्ष होण्यास डॉ. सातवळेकर यांनी मनापासून होकार दिल्याची आनंद-वार्ता स्वतः जाऊन सांगितली. सर्वांनाच खूप बरे वाटले. नव्या संस्थेचा चिटणीस म्हणून माझी निवड सर्वांनी एकमताने केलीच होती. अध्यक्ष म्हणून भाऊ सातवळेकरांचे नावही सर्वांच्या अनुमतीने निश्चित झालेच होते. दोन मोठे प्रश्न समाधानकारक असे सुटले.

आता मनामध्ये विचारचक्राने वेग घेतला की नव्या संस्थेचे नाव काय असावे. बराच विचार केला मी माझ्या मनाशीच, तीनचार नावे सुचली होती. विचाराअंती मी 'रसिक मंडळ' हे नाव मनातल्या मनात पक्के करून टाकले. या माझ्या कल्पनेला दुजोराच मिळाला माझ्या सर्व मित्रांचा आणि सहकारी शिक्षकांचा. रसिक मंडळ हे सुयोग्य नाव वाटले आम्हा सर्वांना. प्राचार्य सातवळेकरांची संमती घेतली मी कॉलेजमध्ये जाऊन.

रसिक मंडळ या नावाचा आणि चिटणीसाचा मिळून एकच रबर स्टॅम्प करून घेतला मी. आता जाहीरात करण्यासाठी मजकूर तयार करण्याचे काम करावयाचे होते. शाळेत गेल्यानंतर हा मजकूर आम्ही सर्वांनी एकत्र बसून तयार केला. शाळा सुटल्यानंतर मी

लक्ष्मी आर्ट प्रेसमध्ये जाऊन हा मजकूर दिला. चार दिवसांनी हँडबिल्स मिळणार होती. कामाला वेग येत चालला आणि एकेक काम पूर्ण होत चालले.

सर्व सहकारी शिक्षकांना, मित्रांना, संगीताच्या चाहते मंडळींना संस्थेचे सभासद होण्याची मी विनंती केली. अण्णा, भावेकाका, काटीकर, देशपांडे, महागांवकर, सावनूर आणि इतर अनेक सहकारी शिक्षक सभासद होण्यास आनंदाने तयार झाले. या सर्व सभासदांची एक सभा शाळेतच आयोजित केली आणि अमीरखाँ यांच्या सर्व अटी मी सभेसमोर मांडल्या. तबल्याच्या साथीसाठी उस्ताद दाऊदखाँ यांना, हार्मोनियमसाठी अंबाप्रशाद यांना विचारण्याचे सर्वानुमते ठरले. अमीरखाँसाहेब यांना तीनशे रूपयांचा ॲडव्हान्स चिटणीसांनी आपल्या खिशातून पाठवावा असे ठरले. स. भ. देशपांडे यांनी दाऊदसाहेब आणि अंबाप्रशादजी यांना समक्ष भेटून मैफलीची तारीख सांगावी आणि मानधनाबद्दल विचारणा करावी असेही ठरले. सोफ्यांची, खुर्च्यांची तिकिटे काय ठेवायची याचीही चर्चा होऊन, तिकिटाचे दर निश्चित करण्यात आले. प्रत्येक सोफ्यावर तीन प्रेक्षक बसतील आणि याप्रमाणे सोफे १०० ठेवावेत असेही ठरले. सोफे आणि खुर्च्या भाड्याने आणायची व्यवस्था करावी; लक्ष्मी आर्ट प्रेसमधून विविध दराची तिकिटे छापून घेण्यात यावीत असा एकमताने ठराव पास झाला. अशा प्रकारे ६ मार्च रोजी होणाऱ्या मैफलीची सर्व प्राथमिक तयारी झाली.

आम्ही सर्व सभासदांनी घेतलेले हे निर्णय मी अध्यक्ष डॉ. सातवळेकरांच्या घरी जाऊन सांगितले. त्यांनी कामाला आलेला वेग पाहून आनंद व्यक्त केला. त्यांना तिकिटाचे दर योग्यच वाटले. सर्व सोफ्यांची तिकिटे विकली गेली तरच खर्चासाठी आवश्यक इतकी रक्कम गोळा होणार होती. विवेकवर्धिनी हायस्कूलच्या मागील बाजूला शामियाना घालायचा आणि सोफे, खुर्च्या भाड्याने आणण्याचेही ठरले होते. शामियाना, त्याचे लाइटिंग, सोफे, खुर्च्या, लाऊडस्पिकर्सची व्यवस्था, तिकिटांची व हँडबिल्सची छपाई, कार्यक्रमाची माहिती देणाऱ्या पाट्या अशा अनेक गोष्टी होत्या खर्चाच्या. एकूण सर्व खर्च बराच मोठा होणार हे स्पष्ट दिसून येऊ लागले.

पेंटरकडे जाऊन मी चार पाट्या तयार करून घेतल्या. मी स्वतः सायकलवरून त्या पाट्या नेल्या आणि सुलतानबाजार, काचीगुडा, ग्रंथसंग्रहालय आणि गौळीगुडा अशा चार ठिकाणी ठेवल्या. काटकसरीने वागायला हवेच होते.

लक्ष्मी आर्ट प्रेसने कार्यक्रमाची जाहीरात करण्यासाठी हँडबिल्स छापून दिली. हँडबिल्स वाटण्यासाठी तीनचार मुलांचा शोध घेतला मी. त्यांच्याजवळ ती दिली व गौळीगुडा, सुलतानबझार, बँक स्ट्रीट, काचीगुडा, रामकोट, नारायण गुडा अशा मुख्य रस्त्यावरील सर्व दुकानात आणि येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना देण्याची व्यवस्था केली. वर्तमानपत्रातून एकेक हँडबिल टाकण्यासाठी त्या एजंटना विनंती केली मी. प्रचार आणि प्रसार केल्याशिवाय कार्यक्रमाची तिकिटे विकली जाण्याची शक्यताच नसते. मी स्वतः जाऊन महाराष्ट्र मंडळ,

ग्रंथ संग्रहालय, विवेकवर्धिनी शिक्षणसंस्थेच्या सर्व शाखा यामध्ये नोटिसबोर्डावर कार्यक्रमाची जाहिरात लावण्याची व्यवस्था केली. साधना संघातील, कलानिकेतनमधील माझ्या सर्व मित्रांना कार्यक्रमाबद्दलची माहिती इतरांना देण्याची आणि प्रचाराला हातभार लावण्याची विनंती केली. ही सारी व्यवस्था केल्यामुळे माझा आत्मविश्वास चांगलाच वाढला.

जाहीरात करण्याचे काम छान झाले. लक्ष्मी आर्ट प्रेसमध्ये तिकिटे छापायला टाकलीच होती. वेगवेगळ्या दराची तिकिटे भिन्न रंगात छापण्यास सांगितले होते मी. एका सोफ्याचे एकच तिकिटे ठेवले होते. एका सोफ्यावर तीन प्रेक्षक बसू शकत होते. प्रथमी सर्व तिकिटांची पुस्तके घरी आणली. प्रत्येक तिकिटावर रसिक मंडळाचा आणि चिटणीसाचा शिक्का मारण्याचे काम मीच घरी बसून पूर्ण केले. एका दोनशे पानी वहीत या सर्व तिकिट पुस्तकामधील नंबर्स व्यवस्थित लिहून ठेवले.

या सर्व नोंदी झाल्यानंतर मी सर्व सभासदांना, मित्रांना, सहकारी शिक्षकांना त्यांना हवी तेवढी तिकिटे दिली आणि त्याची नोंद व्यवस्थितपणे वहीत करून ठेवली. तिकिट विक्रीला आरंभ मनासारखा सुरू झाला. फक्त एकच काळजी माझ्या काळजाला सतत कुरतडत होती- ती म्हणजे मी पाठविलेल्या तीनशे रूपयांची पोच आली नव्हती. पहिले पत्र पोचले होते. तीनशे रूपये त्याच पत्त्यावर पाठविले होते. ॲडव्हान्स मिळाला असावा, असेच समजून मी कामाला लागलो.

जाहिराती लागल्या, पाट्या ठेवल्या, तिकिटे वाटून दिली मी सर्वांना आणि तिकिटविक्री देखील सुरू झाली. आता माझी उमेद आणि उभारी उदंड वाढली. आशा पल्लवीत झाल्या. ही भगवंताचीच कृपा, अशी माझी श्रद्धा होती.

जानेवारी महिना संपला. सर्वत्र मैफलीच्या पाट्या लागल्या. जाहिराती वाटल्या जाऊ लागल्या. तिकिटविक्री सुरू झाली. अशावेळी माझ्या कानावर भलत्याच बातम्या येऊ लागल्या. हैदराबादमधील अनेक धनवान गाण्याचे शौकीन लोक आपापसात चर्चा करू लागले. हा कोण मोहोळकर ? काल परवा तर आला हैदराबादला. एक सर्वसामान्य शिक्षक. याच्या सांगण्यावरून अमीरखाँसारख्या ख्यातकीर्ति गायकाची गाण्याची मैफल होणार म्हणे हैदराबादमध्ये. हे कसं शक्य आहे ? एका दीडदमडीच्या, पोराच्या विनंतीमुळे हा महान गायक कधी येईल का ? अशा अनेक बातम्या सर्वत्र पसरल्या. विचित्र अशा वावड्या सगळीकडे उठू लागल्या. माझी तर बोबडीच वळली. माझ्या पायाखालची जमीनच सरकली. काय करावे हेच सुचेना मला. जिथं जिथं मी तिकिटविक्रीसाठी जात होतो, तिथं तिथं मला हेच ऐकायची पाळी आली. मी त्या मंडळींना काय सांगणार ? गायन ठरले असल्याचा कोणता पुरावा होता माझ्याजवळ ? ॲडव्हान्सची पावतीसुद्धा आली नव्हती. माझ्याविरुद्ध वातावरण झपाट्याने पसरू लागले सर्व हैदराबादभर. समाधानकारक असे उत्तर नव्हते माझ्याजवळ. गप्प बसून राहण्याशिवाय अन्य तरणोपायच नव्हता माझ्याजवळ.

अनेक जाणकार, मान्यवर, प्रतिष्ठित आणि गाण्याच्या शौकीन व्यक्तींना मी त्यांच्या घरी जाऊन भेटण्यास सुरुवात केली. त्यांच्यासमोर मी माझी कैफियत मांडू लागलो. त्या सर्वांनी कार्यक्रमाविषयी ज्या ज्या शंका उपस्थित केल्या, त्या त्या शंकेचे समाधान करण्याचा मी आटोकाट प्रयत्न करू लागलो. त्या सर्वांना मी सांगू लागलो- अहो मी सोलापुरला गेलो होतो. तेथे विकास हॉटेलमध्ये मी अमीरखाँसाहेबांची समक्ष भेट घेतली होती. मला त्यांनी त्यांच्या व्यवस्थापकाच्या मार्फत पत्ता दिला. जानेवारीमध्ये त्यांच्याशी संपर्क साधण्याविषयी मला सूचना देण्यात आली होती. सोलापुरातून निघतांना मी त्यांची परत भेट घेतली होती. हैदराबादला गाण्यासाठी येण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. त्यांच्या सूचनेप्रमाणे मी जानेवारीत त्यांना पत्र पाठविले. त्यांचे आलेले उत्तर माझ्याजवळ आहे. हे पहा ते पत्र. या पत्रामध्ये त्यांनी ६ मार्च या तारखेचा, त्यांच्या बिदागीचा, साथीदारांच्या बिदागीचा, येण्याजाण्याच्या खर्चाचा स्पष्ट उल्लेख आहे. आपण तो वाचून पाहू शकता. त्यांच्या इच्छेप्रमाणे मी त्याच पत्त्यावर तीनशे रूपयांचा अॅडव्हान्स देखील पाठवून दिला आहे मी. अॅडव्हान्सची पावती आली नाही, म्हणून काय झाले ? मी माझ्या खिशातून पैसे खर्च केले, पाट्या रंगवून घेतल्या. तिकिटे आणि हँडबिल्स देखील छापण्यासाठी पैसे खर्च केले. तिकिटविक्री देखील सुरू केली. एवढा सारा खर्च मी विनाकारण कसा करू शकेन ? आपण माझ्या शब्दांवर विश्वास ठेवावा. आमच्या रसिक मंडळाचे अध्यक्ष होते प्राचार्य सातवळेकर. त्यांना फोन करून आपण शहानिशा करून घेऊ शकता. माझ्या शब्दांवर विश्वास ठेवून तिकिटे विकत घेणारी मंडळी फार कमीच निघाली. मी मात्र चिकाटीने, जिद्दीने, घरोघरी जाऊन माझी बाजू मांडू लागलो, खुलासा करू लागलो.

प्राचार्य सातवळेकर, मुख्याध्यापक, भावेकाका, स. भ. देशपांडे यांनी देखील प्रचार करण्यास सुरुवात केली. सर्वांना ते ठासून सांगू लागले की हा कार्यक्रम निश्चित होणार आहे. मोहोळकर सांगतात ते सारे खरे आहे. जे जे लोक यांच्या परिचयाचे होते, त्यांचे समाधान होऊ लागले.

माझे शत्रू आणि मित्रदेखील माझ्याविरुद्ध प्रचार आणि प्रसार करण्यात पुढाकार घेऊ लागले. कितीतरी धनाढ्य लोक, अमीरखाँ साहेबांची मैफल करण्यासाठी प्रयत्न करीत असतांना, मोहोळकर सारख्या दीडदमडीच्या माणसाने हे कसे करू दाखविले ? माझी सर्व टिंगलटवाळी, हेटाळणी करू लागले. काय करावे हेच मला कळेना. माझा जीव घाबरा होऊ लागला. मला अन्न गोड लागेना. रात्री शांत झोप लागेना. या कुशीवरून त्या कुशीवर होण्यातच रात्र जाऊ लागली. अशांत, अस्वस्थ, बेचैन अवस्थेत माझे दिवस जात होते.

एका पाकिटात छापून घेतलेली दोनतीन हँडबिले, प्रत्येक दराचे एकेक तिकिट आणि तयारी जोरात चालू असल्याचे एक पत्र लिहून, ते पाकिट माझ्याजवळ असलेल्या पत्त्यावर पाठवून दिले मी. तरी मला चैन पडेना. पाण्याबाहेर फेकलेल्या मासोळीप्रमाणे माझा जीव तडफड करू लागला. विलक्षण कासाविशी होऊ लागली माझ्या प्राणाची.

पण एके दिवशी एक आशेचा किरण मला दिसू लागला. मनाला धीर देणारी एक छान बातमी कानावर आली. शेख दाऊद इंदोर येथून आले होते. ते सर्वांना सांगत होते अमीरखाँ यांनी बोललेल्या शब्दांविषयी. शेख दाऊद आकाशवाणीकेंद्रावर गेले आणि त्यांनी आपल्या सहकारी व्यक्तींना, अधिकाऱ्यांना, मित्रांना, चाहत्यांना अत्यानंदाने सांगितले की ते इंदोर येथे झालेल्या म्युझिक कॉन्फरन्समध्ये तबल्याची साथ करून परत आले होते. त्यामध्ये अमीरखाँ यांच्या गायनाचा कार्यक्रम ठेवलेला होता. अमीरखाँ यांनी माईकवरून श्रोत्यांना सांगितले की त्यांना हैदराबादमध्ये गायचे आहे. गळ्यावर ताण पडू नये यासाठीच ते इंदोरमधील रसिकांना गाणं ऐकवू शकत नाहीत. त्याबद्दल त्यांना श्रोत्यांनी माफी करावी. पुढे कधी तरी मी गाणं ऐकवून सर्वांना आनंद देईन, असं अभिवचन त्यांनी जमलेल्या श्रोत्यांना दिलं. शेख दाऊद यांनी हे मनमोकळे करून सांगितलं. याचं एक महत्त्वाचं कारण असं होतं की ते स्वतःच अमीरखाँ साहेबांच्या हैदराबाद मध्ये होणाऱ्या गाण्याला तबल्याची साथ करणार होते. शेख दाऊद यांच्या या प्रांजल सांगण्यावरून हे स्पष्ट झालं की अमीरखाँ ६ मार्चच्या कार्यक्रमाला नक्की येणार आहेत. हैदराबाद आकाशवाणीमध्ये हजर असलेल्या त्या श्रोत्यांनी ही आनंदाची बातमी फोन करून संगीत शौकीनांना सांगितली. अमीरखाँ साहेब यांचे कर्णमधुर गायन ६ मार्च रोजी ऐकायला मिळणार याची खात्रीच पटली.

एकाकडून दुसऱ्याला, दुसऱ्याकडून तिसऱ्याला, असं होत होत ही उत्साहवर्धक बातमी आम्हाला शाळेमध्ये मिळाली. माझ्या जिवात जीव आला. एक प्रदीर्घ निश्वास निघाला. काटीकर, स. भ. देशपांडे यांना बरोबर घेऊन मी शेख दाऊद यांच्या घरी जाऊन भेट घेण्याचे ठरविले. प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ही गोष्ट ऐकण्यास मी अत्युत्सुक झालो होतो. काटीकर आणि देशपांडे हे दोघेही येण्यास तयार झाले. आम्ही आमच्या घरी जमण्याचे ठरविले.

संध्याकाळी आम्ही प्रथम रेडिओ स्टेशनवर फोन करून चौकशी केली. आम्हाला समजले की दाऊदसाहेब त्यांच्या घरी गेले आहेत. आम्ही तीघेजण ऑटो करून दाऊदसाहेबांचे घर शोधण्यासाठी निघालो. घराचा पत्ता आम्हाला जुजबी माहित होता. अनेक ठिकाणी चौकशी करीत, अनेक बोळ ओलांडून आम्ही गेलो. शेवटी एकदा त्यांचे घर सापडले आम्हाला. घर शोधण्यासाठी आम्हाला खूप वेळ लागला आणि माझी अधीरता शिगेला पोचली. दाऊदसाहेबांच्या घरासमोर उभे राहून काटीकरांनी त्यांना मोठ्याने हाका मारल्या.

दाऊदसाहेब बाहेर आले. पण त्यांचा एकूणच अवतार आणि त्यांची बेभान-बेहोष अवस्था पाहूनच आम्ही हबकलो. अंगविक्षेप करीत, अस्पष्ट शब्दामध्ये त्यांनी इंदोर येथे घडलेली सारी कथा कशीतरी वर्णन करून आम्हाला सांगितली. त्या संगीत संमेलनामध्ये ते प्रत्यक्ष हजर होते. अमीरखाँ यांचे बोलणे त्यांनी स्वतः ऐकले होते. हैदराबादमध्ये ते गाणार असल्याचे त्यांनी माईकवरून जाहीर केले. सर्व उपस्थितांची त्यांनी हात जोडून

क्षमा मागितली. पुढे कधीतरी ते गाणं ऐकवून भरपाई करणार होते.

दाऊदसाहेबांनी आम्हाला हे सारं वर्णन करून खात्रीपूर्वक सांगितलं. पण त्यांच्या शब्दांवर आम्ही विश्वास ठेवायचा कसा? त्यांची ती अवस्था आम्ही पाहिली आणि मनामध्ये चरकलो. दाऊदसाहेबांना लाख लाख धन्यवाद देऊन आम्ही त्यांचा निरोप घेतला. ऑटोमधून आम्ही परत निघालो.

आम्ही संभ्रमित अवस्थेत होतो. थोडी आशा अंकुरली माझ्या मनात. अशा अवस्थेत माणूस खरं तेच बोलतो, असं ऐकलं होतं. दाऊदसाहेब अशा अवस्थेत आम्हाला खोटं सांगणार नाहीत, असं आम्ही आमचंच समाधान करून घेतलं. दाऊदसाहेबांच्या बोलण्यावरून आमची खात्री पटली की गाणं ऐकविण्यासाठी अमीरखाँ हैदराबादला येणार आहेत. आमच्या हितशत्रूंनी कितीही अपप्रचार केला, तरीही आता मला नवीनच उत्साह वाटू लागला. मी तिकिटविक्रीसाठी नव्या हुरुपानं घरोघरी फिरू लागलो. दाऊदखान यांनी सांगितलेली हकीकत सर्वांना समजावून देऊ लागलो. दाऊदसाहेबांवर मात्र बहुसंख्य गानशौकीनांचा विश्वास बसला. ते आनंदाने तिकिटे खरेदी करू लागले.

आता बाजू उलटली होती. आमच्या कार्यक्रमाची तिकिटविक्री तडाखेबंद होऊ लागली. अनेक प्रतिष्ठित आणि मान्यवर रसिकांनी सोफ्याची तिकिटे खरेदी करण्यासाठी गर्दी केली. मी सर्वांना तिकिटविक्रीचा अनुभव सांगत फिरू लागलो. माझ्या सहकारी शिक्षकांचा उत्साह भलताच वाढला. भेटीअंती मला समजून आले की लोक तिकिटे विकत घेऊ लागले आहेत. माझी भीती कुठल्या कुठे पळाली.

एके दिवशी एक तार माझ्या हातात आला. त्या तारेवरून हे स्पष्ट झाले की अमीरखाँ आणि त्यांचा व्यवस्थापक ४ मार्च रोजी सकाळी हैदराबादला पोचत आहेत. मला अत्यानंद झाला. ती तार घेऊनच मी अण्णांच्या घरी धावत गेलो. त्यांना ती तार दाखवली. अण्णांचा आनंद आकाशाला पोचला. भावेकाकांनी मला जोरदार शाबासकीच दिली. मधू, मुकुंद, प्रभाकर यांनी माझे अभिनंदन केले तोंडभरून. आग्रहाने मला चहा पाजवला भावेकाकांनी.

शाळेत गेल्यानंतर मी ती तार मुख्याध्यापकांना दाखवली. ते एकदम खुष झाले आणि मला त्यांनी बजावले, 'मास्तरसाहेब, फार मोठं धाडस करीत आहात. शामियाना उभारणार, लाइटिंग करणार, सोफे व खुर्च्या भाड्याने आणणार, माईकची व्यवस्था करणार, गायकाला १८०० रुपये देणार, साथीदारांना त्यांची बिदागी देणार, आणि इतर अवांतर खर्च होणार. हा एकूण खर्च केवढा मोठा होणार आहे, याची कल्पना आहे ना ? जरी तुम्हाला या अनेक सहकारी व्यक्तींनी सहकार्य देण्याची हमी दिली असली , तरी उत्पन्न पुरेसे न झाल्यास, ही मंडळी मागे सरकतील आणि मग तुम्हाला एकट्यालाच सारा भार उचलावा लागणार आहे, हे लक्षात ठेवा.' मी त्यांना म्हणालो, 'सर, मी हे धाडस करण्याचा विडाच उचलला आहे. आता मागे फिरणार नाही. नफा नुकसान काय होणार तो होवो. मी एकटा तयार आहे सारं सहन करायला.' माझा हात हातात घेऊन त्यांनी मला शुभेच्छा

दिल्या. त्यांना धन्यवाद देऊन मी मोठ्या आत्मविश्वासाने शिक्षकांच्या खोलीत पाय ठेवला. सर्व शिक्षकांना मी ती तार वाचून दाखवली आणि तिकिटविक्रीस मनापासून सहकार्य देण्याची हात जोडून मी विनंती केली. काटीकर आणि देशपांडे यांचा विश्वासच बसेना त्या तारेवर ! त्यांचा आनंद आणि प्रसन्नता त्यांच्या डोळ्यातून मला प्रकर्षाने जाणवली. खूप झालं. अनेक शिक्षकांनी माझे तोंड भरून कौतुक केले. मला शुभेच्छा दिल्या.

संध्याकाळी मला दुसरी तार आली की ते दोघे ५ मार्च रोजी सकाळी येत आहेत. आणखी एक दिवस मिळाला सारी तयारी करण्यासाठी. दाऊदसाहेब हे तबल्यावर आणि अंबाप्रशाद हार्मोनियमवर साथ करण्याचे ठरलेच होते. अमीरखाँ यांच्या स्वराचे दोन तानपुरे आणणार होते स. भ. देशपांडे. त्यांच्याच विद्यालयातील दोघेजण तानपुरे वाजवण्यास तयार झाले असल्याचे मला सांगण्यात आले. गायनाची सर्व व्यवस्था झाल्यामुळे खूप बरे वाटले मला.

संध्याकाळी शामियाना घालणाऱ्याच्या दुकानी गेलो आणि ५ मार्च रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत शामियाना घालण्यास बजावले. माईकस आणि ट्यूबलाईटस ६ तारखेला सकाळी १० पर्यंत तयार करण्यास मी सांगून आलो. सोफे १०० आणि खुर्च्या ६ रोजी सकाळी १० पर्यंत व्यवस्थित लावण्यास सांगितले.

एवढा विरोध, टिंगलटवाळी आणि निंदानालस्ती होऊनही आता मैफल होणारच अशी खात्री पटली होती. माझ्या उत्साहाला उधाण आले. सायकलवरून मी तिकिटविक्री करणाऱ्या सहकार्यांच्या घरी जाऊन, तिकिटविक्रीचा झालेला सारा हिशेब घेऊन आलो. जमा झालेले पैसे नोंद करून घेऊन आलो. पैसे गोळा करणे हे महत्वाचे काम होते. त्याशिवाय मनाला शांती कशी मिळणार ?

जाता जाता एक खूप मोठा हार गायकासाठी, दोन चांगले हार दोघां साथीदारांसाठी आणि दोन गुच्छ तानपुरे वाजविणाऱ्यांकरिता सांगितले.

आबिद रोडवरील ग्रीन्स हॉटेलमध्ये दोघांना उतरण्याची सोय करण्याचे ठरविले होतेच. एक डबल रूम ५ तारखेच्या सकाळपासून आरक्षित करून ठेवली.

शामियाना, माईक, सोफे, खुर्च्या, लाईट, हार इत्यादी सर्व व्यवस्था केल्यानंतरच मी घरी आलो. माईबाबा माझ्या येण्याची वाट पाहात होते. माझे जेवण झाले नसल्याने ते काळजी करीत होते. माईबाबांना केलेल्या सर्व कामाची पूर्ण माहिती देत देत मी जेवण केले. माझी चाललेली धावपळ, घाईगर्दी, गडबड ते पहात होते. एवढे श्रम मी एकटाच घेत असलेले पाहूनच ते चकित झाले. इतरांनी तिकिटविक्री आणि शामियानाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर एकेक जबाबदार व्यक्ती उभी करण्याचे काम दिले होते. महत्वाचे काम माझ्याकडे ठेवले.

५ मार्च रोजी सकाळी एक हार घेऊन नामपल्ली स्टेशनवर मी एकटाच गेलो. अमीरखाँ आणि त्यांचे व्यवस्थापक यांचे यथोचित स्वागत करण्याचे काम मी घेतले. काटीकर आणि

स. भ. देशपांडे परस्पर ग्रीन हॉटेलवर येणार होते. डबल रूम झाडून-पुसून स्वच्छ करून घेण्याचे काम ते बघणार होते.

मुंबईहून निघालेली गाडी आली. पहिल्या वर्गाचा डबा शोधत शोधत मी प्लॅटफॉर्मवर धावत राहिलो. अमीरखाँसाहेब यांची रूबाबदार, भरदार शरीरयष्टी पाहूनच मला आनंद झाला. दोघेही डब्यातून उतरले. हमालाला मी त्यांचे सामान घेण्यास सूचना केली. अमीरखाँसाहेबांच्या गळ्यात हार घालून मी त्यांचे स्वागत केले. व्यवस्थापकाशी शेकहँड करून त्यांनाही विनयपूर्वक मी नमस्कार केला. त्या दोघांना बरोबर घेऊन मी हमालांच्या मागोमाग निघालो. आम्ही सर्वजण बाहेर आलो. हमाली दिली. टॅक्सी ठरविली. आम्ही ग्रीन हॉटेलमध्ये येऊन पोचलो. हॉटेलच्या नोकराने सर्व सामान त्यांच्या खोलीत नेऊन ठेवले. काटीकर आणि देशपांडे यांनी अमीरखाँ यांचे सहर्ष स्वागत केले. टॅक्सीवाल्याचे बिल देऊन मी खोलीत आलो. काटीकर व देशपांडे शाळेत गेले. मी रजा घेतली होती. मॅनेजरने चहा पाठविला. आम्ही तीघांनी बोलत बोलत चहा घेतला. अमीरखाँना मी मोकळेपणाने सांगितले की आपल्याला हवे असलेले सर्व पदार्थ घ्या. मी मॅनेजरना तशी सूचना देऊन ठेवलीच आहे.

अमीरखाँ साहेबांना नाश्ता करून, आराम करा, पाहिजे ते जेवण मागवून घ्या, पोटभर जेवा, मी ४ वाजता येतो. तोपर्यंत आपण छानपैकी विश्रांती घ्या. असं सांगून त्या दोघांचा मी निरोप घेतला.

मॅनेजरसाहेबांना सांगितले की खाँसाहेब यांना चहा, कॉफी, दूध आणि ते मागतील ते पदार्थ द्या. त्यांना मासे विशेष आवडतात. सर्व काही द्या त्यांना. बिलाची काळजी करू नका. बिल मीच देणार असल्याचे स्पष्ट केले.

प्रथम शाळेत जाऊन मुख्याध्यापकांना खबर दिली अमीरखाँसाहेब आल्याची. त्यांना अतिशय आनंद झाल्याचे स्पष्ट दिसले. मग शिक्षकांच्या खोलीत गेलो मी. काटीकर आणि देशपांडे या दोघांनी सर्वांना सांगितले होते अमीरखाँ आल्याचे. सर्व शिक्षकांनी हसून माझे स्वागत केले. काटीकर आणि देशपांडे हे दोघे ५ वाजता येणार होते हॉटेलमध्ये. मी ४ वाजता हॉटेलवर जाणार असल्याचे त्या दोघांना सांगितले. सर्व शिक्षकांना नमस्कार करून मी बाहेर पडलो.

शाळेच्या मागील बाजूस काय काय व्यवस्था झाली आहे, हे पहाण्यासाठी गेलो. शामियाना, सोफे, खुर्च्या, कनाती इत्यादी सामान आलेले पाहून मला बरे वाटले. खुर्च्या व सोफे व्यवस्थित लावण्यास सांगून मी निघण्याच्या बेतात होतो. तेवढ्यात ट्यूबलाईटस, मायक्रोफोनची व्यवस्था करणारे लोक आले. स्टेजवर गायकासाठी एक, साथीदारांसाठी दोन आणि सूचना देण्यासाठी एक असे चार माईकस् तयार ठेवण्याची सूचना दिली मी. शामियानाच्या दोन्ही बाजूला समोरासमोर ट्यूबस लावण्यास सांगितले. स्टेजवर आतील बाजूला एकूण चार ट्यूबस लावण्याची सूचना दिली. स्टेजवर सतरंजी टाकून पांढऱ्या

चादरी टाकण्यास बजावले. स्टेज आणि शामियाना याबद्दलची जबाबदारी यादगिरीवर सोपवून मी शाळेच्या बाहेर पडलो.

अण्णांच्या शाळेत जाऊन अण्णा, महागावकर आणि इतर शिक्षकांना अभिमानाने सांगितले अमीरखाँ सकाळीच येऊन पोचल्याचे. त्यांची व्यवस्था आबीद रोडवरील ग्रीन्स हॉटेलमध्ये केल्याचेही सांगितले. तिकिटविक्री व्यवस्थित चालली असल्याची माहिती मला मिळाली. आणखी काय हवे ?

ग्रीन्स हॉटेलवर जाण्यास निघालो मी. चार वाजून थोडा वेळ झाला होता. अमीरखाँ आणि त्यांचे व्यवस्थापक आराम करून ताजेतवाने झाल्याचे दिसले. जेवण ठीक होते नां, अशी मी विचारणा केली. दोघांनीही जेवण उत्तम असल्याचे सांगितले. चहा मागवला मी आणि आम्ही गरम चहा घेता घेता गप्पा मारू लागलो. तेवढ्यात काटीकर आणि देशपांडे देखील आले. देशपांडे यांनी अमीरखाँशी गप्पा करण्यास सुरुवात केली. अधूनमधून काटीकरही त्यांच्या बोलण्यात भाग घेऊ लागले. खाँसाहेब छान मूडमध्ये होते. आमच्या गप्पा छान रंगल्या.

पन्नालाल पित्ती या धनवंतांना बरोबर घेऊन दंताळे आले खाँसाहेबांना भेटण्यासाठी. त्यांच्याबरोबर तीनचार लोक होते. ते माझ्या मुळीच परिचयाचे नव्हते. सर्वांचे स्वागत अमीरखाँसाहेबांनी मनापासून केले. गप्पा मारण्याच्या ओघांत पन्नालाल पित्ती यांनी अमीरखाँसाहेबांना विनंती केली की त्यांच्या गायनाचा कार्यक्रम आपल्या घरातील हॉलमध्ये व्हावा. अमीरखाँसाहेबांनी त्यांना सांगिततले की उद्याच्या कार्यक्रमानंतर ते मोकळेच होते. कोणत्याही वेळी कार्यक्रम ठेवण्यास सांगितले खाँसाहेबांनी. दंताळे यांची इच्छा होती की अमीरखाँसाहेब यांचे गाणे ७ मार्च रोजी संध्याकाळी त्यांच्या म्युझिक कॉलेजमध्ये व्हावे. त्यांनाही होकार दिला अमीरखाँसाहेबांनी. दोघेही फार खुष झाले. कार्यक्रमासंबंधी उद्या फोन करून सांगण्याचे कबूल करून ही मंडळी निरोप घेऊन गेली. अशा प्रकारे किती तरी गानशौकीन माणसे अमीरखाँच्या भेटीसाठी येतच राहिली. तीनचार व्यक्तींनी खाँसाहेबांचे गाणे त्यांच्या घरी व्हावे अशी इच्छा प्रदर्शित केली. त्यांनाही होकार दिला अमीरखाँ यांनी हसत हसत. खाँसाहेब सर्वांनाच होकार देत होते. मी चकित होऊन ते संवाद ऐकत होतो. अमीरखाँसाहेब कुणालाच नकार देत नाहीत, नाराज करीत नाहीत, हे बघून काटीकर व देशपांडे अक्षरशः चक्रावून गेले.

होकार मिळाल्यामुळे आलेली मंडळी आनंदात परत गेली. थोडावेळ थांबून देशपांडे आणि काटीकर हे देखील खाँसाहेबांचा निरोप घेऊन परत गेले. मी एकटाच उभा होतो खाँसाहेबांच्यासमोर, आश्चर्यचकित झाल्यासारखा. अमीरखाँसाहेब शांतपणे मला म्हणाले, 'भाई मोहोळकर, मैं तेरे लिये आया हूँ। तेरे लिए गाकरही जाऊंगा। मेरा तिकिट तो रिझर्व्ह किया हैं ना ?' हे एकून तर मला धक्काच बसला. मी माझं आश्चर्य व्यक्त करून त्यांना मोकळेपणाने विचारले, 'खाँसाहेब, आपने तो सबको आपका प्रोग्रॅम रखने के लिये

की त्यांनी चारपाच शिक्षकांचे सहकार्य मिळवावे. तिकिट तपासण्यासाठी मुख्य प्रवेशद्वारावर, सोफ्यासाठी दोन, खुर्च्यासाठी दोन शिक्षक घ्यावेत. अशा सूचना देऊन मी सभागृहाकडे धावलो. शामियाना सुंदर लागला होता. ट्यूबलाईटची रोषणाई छान केली होती. व्यासपीठावर पांढऱ्या चादरी टाकून स्टेजची शोभा वाढविणार असल्याचे पाहून फार बरे वाटले. स्वच्छ चादरी पाहूनच मनाची प्रसन्नता वाढणार होती. सर्व कामाची वाटणी स्मरणपूर्वक करून मी निघालो.

ग्रीन्स हॉटेलमधील खोलीत प्रवेश केला. अमीरखाँसाहेब आणि व्यवस्थापक प्रसन्न दिसले. खाँसाहेबांची आस्थेने चौकशी केली. सर्व काही मनासारखे असलेले ऐकून समाधान वाटले. आज रात्रीचे गाणे उत्तम होणार याची खात्रीच वाटत होती.

घरी येता येता फुलांचे हार आणि गुच्छ तयार ठेवण्यासंबंधी सूचना दिली फुलवाल्याला आणि घरी आलो. आठवणीने सर्व काम पूर्ण केल्यामुळे मन शांत होते. माईबाबांच्या बरोबर गप्पा करीत जेवण केले. बाबांच्या जवळ तिकिटे आणि पैसे व्यवस्थित मोजून देण्याचे काम महत्त्वाचे होते. अमीरखाँसाहेबांना आणण्यासाठी मी ८ वाजता जाणार होतो. जाण्यापूर्वी हार आणि गुच्छ यादगिरीच्या ताब्यात देणार होतो.

शिक्षकांच्या खोलीत जाऊन आनंदात गप्पा मारीत बसलो. शिक्षकांनी मला कार्यक्रम अत्यंत यशस्वी होवो, अशा शुभेच्छा दिल्या. सर्वांना मनापासून मी धन्यवाद दिले. माझा आनंद आकाशाला भिडला.

काटीकर, देशपांडे, सहकारी शिक्षक यांना सर्व सूचना दिल्या. सभागृह कसे सुशोभित झाले आहे, हे पाहण्यासाठी मी मागील बाजूस गेलो. शामियाना पाहून माझे मन आनंदाने आणि प्रसन्नतेने नाचू लागले. अप्रतिम दिसत होता शामियाना. सभागृहामध्ये आम्ही आपापसात गप्पा मारीत, हास्यविनोद करीत उभे होतो.

५ च्या सुमारास अचानक, अनपेक्षितपणे, अकालीच असा पाऊस आला. आम्हा सर्वांच्या उत्साहावर पाणीच पडले. निसर्गाचा होणारा हा कोपच वाटू लागला. अक्षरशः हवालदिल झालो आम्ही सर्वजण. शामियाना भिजून चिंब झाला आणि पाण्याच्या धारांनी सोफे चांगलेच ओले झाले. खुर्च्या देखील ओल्या झाल्या. आमच्या तोंडचे पाणीच पळाले. पाऊस थांबण्याची चिन्हे दिसेनात. आमचे काहीतरी चुकले असावे, असं वाटू लागलं. डबडबलेल्या डोळ्यांनी आम्ही परस्परांकडे पाहू लागलो. घसा कोरडा झाला माझा. या दैवी आपत्तीने आम्हाला मान खाली घालण्यास भाग पाडले. ध्यानीमनी स्वप्नी नसणारा तो पाऊस कोसळतच होता. परमेश्वराची आराधना करण्याशिवाय अन्य मार्गच नव्हता माझ्यासमर. आकाशच कोसळत होते आम्हा सर्वांवर. उगीचच वाटू लागले की पावसाचा जोर कमी होईल.

असा बराच वेळ गेला. भगवंताची करूणा भाकूनही काही उपयोग होईना. पावसाचा जोर थोडादेखील कमी होत नव्हता. आम्ही परस्परांकडे पहात गप्प उभे होतो. आमच्या

हाती काहीच नव्हते. हतबल आणि हताश होऊन बघतच राहिलो. आम्हा सर्वांची सत्वपरीक्षाच घेत होता परमेश्वर. आजची गाण्याची मैफल पार वाहून गेली पावसाच्या सरींनी. आजची मैफल रहित करणे, हाच एक मार्ग होता. शाळेच्या मुख्य फाटकाजवळ दोघांना उभे केले, आजचे गाणे उद्या होईल असं सर्वांना सांगण्यासाठी. आठ वाजून गेले होते. श्रोते येऊ लागले असण्याची शक्यता होतीच. देशपांडे, काटीकर इतर सहकारी शिक्षक यांना सांगून मी हॉटेलकडे निघालो.

माझा जीव अगदी रडकुंडीला आला होता. पण मी काय करू शकत होतो ? भगवंताची इच्छा नव्हती, आजचा कार्यक्रम व्हावा. पावसाची रिपरिप चालूच होती. मी खोलीत हलकेच प्रवेश केला. अमीरखाँसाहेब काळीशार शेरवाणी आणि पांढरा स्वच्छ चुडीदार पायजमा घालून खोलीत फेऱ्या मारीत होते. त्यांची मुद्रा सचिंत होती. मांझ्याकडे पाहून ते म्हणाले, 'भाई मोहोळकर, अल्लामियाँकी मर्जी नहीं आज गानेकी मैफिल हो। घबराओ मत, कल सुबहका गाना रखो, शामका रखो, रातका रखो। मैं तुम्हारे लिए आया हूँ, गाकर ही जाऊँगा। अल्लातालाकी मर्जी दिखती है की मेरा गाना कल हो।' अमीरखाँसाहेबांचे हे धीर देणारे, मनोधैर्य वाढविणारे आशादायक शब्द ऐकूनच मी गलबलून गेलो. डोळे पाण्याने डबडबले. केवढ्या मोठ्या मनाचा हा महान माणूस! अमीरखाँच्या समोर मी नतमस्तक झालो. अत्यंत कृतज्ञतेने त्यांना नमस्कार केला आणि त्यांना धन्यवाद दिले. सर्वांचा विचार घेऊन मी ९ वाजता आपल्याला आमचा निर्णय सांगतो, असं सांगून मी त्यांचा निरोप घेतला.

ऑटो करून शाळेत आलो. अण्णा, भावेकाका, काटीकर, देशपांडे इतर सहकारी शिक्षक बंधू, यादगिरी मानाखाली घालून खिन्न उभे होते. सर्वांना सूचित केले की आजची मैफल रद्द करून, उद्या रात्री गाणं गाण्यास खाँसाहेब तयार आहेत. सर्वांनी या सूचनेला होकार देण्याशिवाय तरणोपायच नव्हता. उद्या रात्री गायनाचा कार्यक्रम करण्याचे ठरले.

अमीरखाँसाहेबांना हा आमचा निर्णय सांगण्यासाठी मी हॉटेलकडे निघालो. अमीरखाँच्या येरझारा चालूच होत्या. पण ते शांत आणि निश्चल होते. कोणत्याही प्रकारची अस्वस्थता किंवा निराशा दिसली नाही त्यांच्या मुखावर. आजची मैफल उद्या रात्री करण्याचे सर्वानुमते ठरले असल्याचे मी सांगितले. खाँसाहेबांनी होकार दिला आणि त्यांनी शेरवाणी काढून ठेवली. सोफ्यावर ते बसून राहिले. त्यांना धन्यवाद देऊन मी त्यांचा निरोप घेतला.

खिन्न मनाने आणि निराश भावनेने मी अण्णांच्या घरी गेलो. अण्णा आणि भावेकाका यांना अत्यंत खेद झाला होता. पावसाच्या अकस्मात आलेल्या नैसर्गिक संकटापुढे माणूस काहीही करण्यास असमर्थ होतो. ही आपत्ती अटळ असते. अण्णा मला म्हणाले, 'अरे भाऊ, एवढा मोठा कार्यक्रम आयोजित केलास तू. सर्व काही व्यवस्थित केलेस. शामियाना देखणा करून घेतलास. व्यासपीठ सुंदर करून घेतलेस. सर्व काही चोख करून घेतलेस. अरे भाऊ, पण देवाची पूजा करण्यास विसरलास. त्यामुळेच देवाचा कोप झाला आणि

पावसाने संपूर्ण कार्यक्रम पार धुवून गेला. भगवंताची कृपा असणे अत्यावश्यक असते. त्या भगवंताची पूजा भक्तिभावाने करण्याची अत्यंत जरुरी होती. पूजेचे महत्त्व तुझ्या लक्षात आले नाही.' यावर मी काय बोलणार ? निरुत्तर बनून मी थोडा वेळ सुन्न झालो. तोंडातून एकही शब्द फुटेना. अपराधी वाटू लागले मला. अण्णांना काकुळतीने म्हणालो, 'अण्णा, उद्या सभागृहामध्ये तुम्ही स्वतःच यथोचित मनापासून पूजा करा. ही सर्व जबाबदारी तुम्हीच सांभाळा. इतर व्यवस्था मी पाहतो.' अण्णांनी माझ्या सूचनेला होकार दिला. प्रत्येक कार्याला भगवंताचे आशीर्वाद लागतात, याची प्रचीतीच घेतली मी.

रात्रभर माझ्या डोळ्याला डोळा लागला नाही. डोक्यामध्ये विचारांचे वादळ घोंघावत होते. आजचा कार्यक्रम पावसाने धुवून काढला. उद्याचा कार्यक्रम तरी व्यवस्थित पार पडावा. जीवाचे रान करून एवढ्या मोठ्या कार्यक्रमाचे संयोजन केले. आता उद्या तरी कोणतीही आपत्ती येऊ नये, म्हणून भगवंताला प्रार्थना केली.

सकाळी लवकरच जाग आली. हात जोडून परमेश्वराची प्रार्थनाही केली. बाबांनी देखील पूजा केली आणि आजचा कार्यक्रम यशस्वी करावा अशी देवाची करुणा भाकली. कालचा कार्यकम होऊ शकला नाही. आज रात्री ठीक ९।। वाजता मैफल सुरू करण्याचा आमचा निर्णय साथीदारांना कळविणे भाग होते.

प्रथम मी ऑटो करून शेख दाऊद यांच्या घरी गेलो. काल रात्री पाऊस आल्यामुळे गाणं होऊ शकलं नाही. कालचा कार्यक्रम आज करण्याचे ठरले आहे. आपण आज रात्री ८।। च्या सुमारास यावे, अशी मी त्यांना विनंती केली.

रिक्शातून मी अंबाप्रशाद यांच्या घरी जाण्यास निघालो. वाटेमध्ये जे कुणी भेटले, त्यांना आज रात्री ९।। वाजता गाणं होणार आहे, असं सांगतच निघालो. अंबाप्रशादजी घरीच होते. त्यांनाही रात्री ८।। च्या सुमारास येण्यास सांगून त्यांचा निरोप घेतला. जाता येता ओळखीच्या लोकांना कार्यक्रमाबद्दल सांगण्याचे काम मी केले. पावसामुळे रहित करावी लागलेली गाण्याची मैफल आज रात्री ठिक ९।। वाजता सुरू होईल असं मी ओळखीच्या लोकांना म्हटलं.

सकाळी १० च्या सुमारास मी अमीरखाँसाहेबांच्या भेटीसाठी हॉटेलमध्ये गेलो. त्यांना भेटण्यासाठी काही मंडळी आलेली दिसली. त्यापैकी काही व्यक्तींना मी मुळीच ओळखत नव्हतो. अमीरखाँ त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा करीत होते. खाँसाहेबांचं गाणं ऐकण्यास ती सारी मंडळी उत्सुक होती. काही व्यक्ती त्यांना गायनाचे निमंत्रण देण्यासाठी आलेल्या आहेत, हे माझ्या लक्षात आले. उद्या आपला कार्यक्रम ठेवायला हरकत नाही, असं खाँसाहेबांनी त्यांना सांगितल्याचं मी ऐकलं. थोडावेळ इकडच्या तिकडच्या गप्पा करून ती मंडळी निघून गेली.

मी ८ मार्चची सकाळच्या गाडीची दोन तिकिटे अमीरखाँच्या हातात दिली. त्या दोघांना खूप बरे वाटले. अनेकांना त्यांनी उद्या त्यांच्या घरी गाण्याची मैफल करू या, असं

आश्वासन देऊन टाकलं होतं. उद्याच्या प्रवासाची तिकिटे पाहिली आणि त्या दोघांनी समाधानाने माझ्याकडे बघितले. परतीची तिकिटे पाहूनच त्यांनी मला धन्यवाद दिले. आता ते दोघे निर्धास्त झाले. रात्री बरोबर ८॥ वाजता येतो, असं सांगून मी त्यांचा निरोप घेतला.

संपूर्ण दिवसभर अशीच उघडीप राहील, अशीच चिन्हे दिसत होती. अस्वस्थ आणि अनिश्चित अवस्थेत दिवस जात होता माझा. सर्वांच्या घरी जाऊन मी तिकिटे आणि जमा झालेली रक्कम घेतली. सर्व नोंदी करून ठेवल्या.

शाळेत जाऊन सर्व शिक्षकांना भेटलो. काही शिक्षकांनी तिकिटे आणि पैसे देऊन त्यांचे हिशेब पूर्ण केले. मला खूप बरे वाटले त्यांचे सहकार्य पाहून. आजतरी कोणतीही अस्मानी आपत्ती येऊ नये, अशीच प्रार्थना केली सर्वांनी.

घरी परत गेलो. माईबाबांच्या बरोबर बसून शांतचित्ताने जेवण केले. जमा झालेले पैसे बाबांच्या ताब्यात दिले. खूपच थकल्यासारखे वाटत होते मला. म्हणून आराम करीत पडून राहिलो दोन तास. झोप लागणं शक्यच नव्हतं.

संकल्प आणि सिद्धी यामध्ये भगवंताची इच्छा उभी असते. कितीही मनापासून प्रार्थना केल्या, देवाची करुणा भाकली, याचना-विनवण्या केल्या, तरीही होणारे ते होणारच. सायंकाळी पाच वाजता मी शाळेत गेलो. अण्णांनी हळदकुंकू, अक्षदा-फुले इत्यादि साहित्य आणलेले दिसले. अण्णांनी मनोभावे देवाच्या फोटोची पूजा यथासांग केली. हात जोडून, डोळे मिटून प्रार्थना केली भगवंताची. आम्ही सर्वजण उभे होतो. सर्वांनीच प्रार्थना केली डोळे मिटून आणि हात जोडून. आकाशाकडे डोळे लावून आम्ही उभेच राहिलो.

आश्चर्य याचेच वाटले की सहाच्या सुमारास परत पवासाने हजेरी लावली. हातपाय गळून गेले माझे. अस्मानी आपत्तीचा हा दुसरा अनुभव. आलेला पाऊस फार जोराचा वाटला नाही. परमेश्वराची प्रार्थना करण्याशिवाय दुसरा कोणताही उपाय नव्हता.

आम्हा सर्वांच्या सुदैवाने सात वाजण्याच्या सुमारास पाऊस पूर्णपणे थांबला. भगवंतानेच कृपा केल्याचे समाधान वाटले. सोफे आणि खुर्च्या ओल्या झाल्याचे स्पष्ट दिसले. यादगिरीला माझ्या घरी पाठवून सोफे-खुर्च्या पुसण्यासाठी कपडे आणविले. आम्ही सर्वांनी मिळून सोफे आणि खुर्च्या पुसण्यास सुरुवात केली. सहज पाहिले, तर आकाश निरभ्र असल्याचे दिसून आले. समाधानाचा दीर्घ निःश्वास सोडला मी.

शामियाना झगमगत होता. माईकवरून बिस्मिल्लाखाँच्या सनईचे मंजुळ-मधुर-सुरेल स्वर ऐकू येऊ लागले. यादगिरीने प्रसंगावधान दाखवून आम्हा सर्वांना आनंदाचा अनुभव दिला. आता पावसाची भीत वाटेनाशीच झाली. प्रफुल्ल मनाने आम्ही सर्वजण आपापल्या जागा घेतल्या. श्रोते मंडळी येण्यास सुरुवात झाली. मला आनंदाचे भरतेच आले.

दोन सुंदर तानपुरे स्टेजवर आणून ठेवलेच होते. प्रथम आले शेख दाऊद . त्यांची

तबल्याची पेटी स्टेजवर नेऊन ठेवण्याची व्यवस्था केली. ऑटोचा किराया दिला मी. थोड्याच वेळात अंबाप्रशादजींची रिक्शा आली. त्यांचे स्वागत केले पुढे जाऊन. हार्मोनियमची पेटी स्टेजवर नेण्यास सांगितले. शेख दाऊद आणि अंबाप्रशादजी प्रसन्न दिसत होते. उत्साहाने मी त्यांचे स्वागत केले. दोघेही मग स्टेजवर जाण्यासाठी निघाले तानपुरे वाजविणारे साथीदार आलेच होते. सर्वांना स्टेजवर नेण्यासाठी काटीकर-देशपांडे पुढे सरसावले. अमीरखाँसाहेब यांना आणण्यासाठी मी निघतच होतो. डॉ. भाऊ सातवळेकर, डॉ. सौ. शांताबाई यांना घेऊन भावेकाका लगबगीने येत असलेले दिसले. त्या सर्वांचे स्वागत करण्यासाठी मी पुढे धावलो. सातवळेकर पतीपत्नींचे आणि भावेकाकांचे नमस्कार करून मी हार्दिक स्वागत केले. एक सहकारी मित्राने त्यांना सभागृहाकडे नेले. इतर सहकारी शिक्षक बंधूंना सांगून मी हॉटेलकडे निघालो.

अमीरखाँ काळीभोर शेरवाणी आणि चुडीदार पायजमा घालून तयारच होते. राजबिंडे आणि रूबाबदार दिसत होते अमीरखाँ. खानदानी माणूस ! त्या दोघांना घेऊन मी खोलीच्या बाहेर पडलो. खोलीला कुलूप लावून काऊंटरवर किल्ली दिली. मॅनेजरसाहेबांना रात्रीच्या जेवण्याची व्यवस्था करण्यास सांगूनच मी बाहेर पडलो. टॅक्सीवाला उभाच होता. त्या दोघांना मागे बसवून मी पुढे बसलो. टॅक्सी शाळेच्या आवारात शिरली. मी टॅक्सीचा दरवाजा उघडला. अमीरखाँ आणि त्यांचे व्यवस्थापक उतरले. डॉ. सातवळेकर त्यांच्या स्वागतासाठी पुढे आले. डॉ. सातवळेकरांची अध्यक्ष म्हणून ओळख करून दिली. भावेकाका, अण्णा, काटीकर आणि देशपांडे यांनी अमीरखाँसाहेबांचे उत्तम स्वागत केले.

उस्ताद अमीरखाँसाहेब , त्यांचे व्यवस्थापक यांना घेऊन मी स्टेजवर गेलो. शेख दाऊद आणि अंबाप्रशादजी यांनी त्यांना अभिवादन केले. अंबाप्रशादजींचा परियय करून दिला मी. अमीरखाँ, त्यांचे व्यवस्थापक, दाऊदसाहेब, अबाप्रशादजी आणि तानपुरे वाजविणारे स्थानापन्न झाले.

समोरचा पडदा हलकेच उघडला गेला. अमीरखाँसाहेबांनी सर्वांच्याकडे दृष्टिक्षेप टाकून नमस्कार केला आनंदाने. शामियाना खचाखच भरलेला दिसला. टाळ्यांचा कडकडाट झाला. दाऊदसाहेब यांनी तबला व्यवस्थित लावला. अंबाप्रशादजींनी हार्मोनियमवर सूर धरला. तानपुरे सुरेल स्वरात झंकारू लागले. वातावरण एकदम प्रसन्न झाले. सगळीकडे शांतता पसरली. रसिक श्रोते अत्यंत उत्सुकतेने वाट पहात असलेले स्पष्ट दिसले.

मी फोनसमोर उभा राहिलो. कुणीतरी कॅमेराचा फ्लॅश केल्याचे दिसले. सर्व रसिक आणि जाणकार श्रोत्यांचे मी रसिक मंडळाच्या वतीने हार्दिक स्वागत केले. खास करून रसिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सातवळेकर आणि त्यांच्या पत्नी सौ. डॉ. सातवळेकर-शांताबाई यांना धन्यवाद दिले. एवढा मोठा कार्यक्रम आयोजित करणे हे माझ्यासारख्या नवोदिताला एकट्याने शक्यच नव्हते. अण्णा, भावेकाका, देशपांडे, काटीकर आणि अन्य शिक्षक बंधूंचा गौरवाने उल्लेख करण्यास चुकलो नाही मी. अनेकांच्या सहकार्याबद्दल

धन्यवाद दिले मी.

अमीरखाँसाहेब यांचा परिचय करून देतांना मी हे स्पष्ट केले की, या महान गायकाचे गाणं ऐकणं हा एक अविस्मरणीय अनुभवच असतो. घरंदाज गायकी म्हणजे काय, हे यांच्या गाण्यावरून सहज ध्यानात येते. अमीरखाँसाहेब यांची आलापी ऐकण्याने श्रोते कसे लुब्ध होतात, हे मी आवर्जून सांगितले. केवळ ख्याल गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध करू शकणारा हाच एक गायक ! हे माझे प्रास्ताविक खाँसाहेब एकाग्रतेने ऐकत असल्याचे मला जाणवले. अतिविलंपत गायकीचा एक अनोखा आणि आगळावेगळा प्रकार ऐकायला मिळणार आहे, असं मी सांगताच, टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. श्रोत्यांनी दिलेली ही दाद मला सुखावून गेली. अमीरखाँसाहेबांना मी प्रचंड मोठा हार घालून त्यांचे रसिक मंडळातर्फे हार्दिक स्वागत केले.

तबला नवाझ शेख दाऊद हे अमीरखाँसाहेबांना साथ करणार आहेत. हार्मोनियमची ढंगदार साथ करणार आहेत, आपणा सर्वांचे आवडते अंबाप्रशादजी. शेख दाऊद आणि अंबाप्रशादजी म्हणजे हैदराबादची शान आहे. असं म्हटल्याबरोबर परत श्रोत्यांना टाळ्यांचा कडकडाट करून माझ्या म्हणण्याला आपली संमतीच दर्शविली. शेख दाऊद आणि अंबाप्रशादजी यांना हार घालून त्यांचेही स्वागत केले मी. तानपुरे वाजविणाऱ्या दोघांची ओळख करून दिली. त्या दोघांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचाही मान राखला. स्वागत समारंभ संपला.

मी हलकेच अमीरखाँसाहेबाना ते कोणत्या ख्यालाने गायनाला आरंभ करणार आहेत, हे विचारले. अमीरखाँसाहेबांना माझ्या विचारण्याचे विशेषच कौतुक वाटले. रागाचे नाव जाहीर करण्याचा अमीरखाँ यांचा पहिलाच अनुभव असावा. ते दिलखुलासपणे हसले. माईकवरून मी जाहीर केले, की अमीरखाँ आपल्या गाण्याचा शुभारंभ अभोगी कानड्याने करणार आहेत.

अभोगी कानड्याचे भरदार आणि भारदस्त स्वर अमीरखाँसाहेबांच्या आवाजात ऐकण्यात श्रोते भान विसरले. अनेक ठिकाणी दर्दी व जाणकार श्रोत्यांनी सुयोग्य दाद दिली. 'वाहव्वा,' 'क्या बात है' असा प्रतिसाद दिला श्रोत्यांनी. एवढं धीरगंभीर, धीम्या लयीतील गायन प्रत्यक्ष ऐकण्याचा भाग्ययोग प्रथमच आला होता. श्रोते मनापासून माना डोलावीत होते. अंबाप्रशादजींची साथ अमीरखाँ यांना पसंत पडली असावी, असं त्यांच्या पाहण्यावरून जाणवले. दाऊदसाहेबांनी लावलेला ठेका अप्रतीम होता. अभोगी कानडा एक तासभर आळवला अमीरखाँ यांनी. श्रोते गाण्याचा आनंद मनमुराद घेत असलेले पाहूनच मला अत्यानंद झाला.

घाईघाईने मी घरी गेलो. बाबांच्या जवळची रक्कम मी मोजू लागलो. नोटा मोजता मोजता माझे हात कापू लागले. खर्च होता मोठा आणि कार्यक्रमाला विघ्ने आली होती. खर्चाला आवश्यक तितकी रक्कम जमा झाल्याचे आढळले. मी एक प्रदीर्घ श्वास सोडला.

बाबांना सुद्धा सुटल्यासारखे वाटले. ते माझ्याकडे कौतुकाने पहात होते. अमीरखाँ यांना द्यावयाच्या रकमेची पावती मी तयार केली. एकूण बिदागीमधून त्यांना पाठविलेली ॲडव्हान्सची रक्कम आणि तिकिटींचा किंमत वजा करून बाकीची रक्कम बरोबर मोजून एका पाकिटात ठेवली. त्या पाकिटावर संपूर्ण हिशेब लिहून टाकला. पावतीवर स्टॅम्प लावण्यास मी विसरलो नाही. ते पाकीट माझ्या पिशवीत ठेवून मी शाळेत गेलो.

अमीरखाँ यांच्या गायनाची मैफल झकास रंगली आहे हे पाहून मला धन्यता वाटली, कृतकृत्यता जाणवली. श्रमांचे सार्थक झाले होते माझ्या. दुसऱ्या रागानांतर त्यांनी कोणता ख्याल सुरू केला हे मला आज आठवत नाही. जवळजवळ दोन तास घेतले त्यांनी मध्यांतर करण्यास. मध्यांतर झाल्याचे मी श्रोत्यांना सांगितले.

चहाची व्यवस्था स्टेजजवळच्या खोलीत यादगिरीने कलीच होती. अमीरखाँ, त्यांचे व्यवस्थापक, शेख दाऊद, अंबाप्रशादजी आणि तानपुरे छेडणारे यांना मी जवळच्या खोलीत चहासाठी नेले. यादगिरीने सर्वांना चहा दिला. सातवळेकर, भावेकाका, अण्णा, महागावकर, काटीकर, देशपांडे इतर सहकार्य देणारे शिक्षक या सर्वांना मी बोलावून आणले. सर्वांनी हास्यविनोद करीतच चहा घेतला.

मध्यांतरानंतरची मैफल सुरु झाली. अमीरखाँसाहेबांनी त्यांचा आवडता आणि हातखंडा राग मालकंस सुरू केला. भरपूर आलापी करण्यासाठी मालकंस या रागाची निवड बरोबर ठरली. स्वरांच्या झुल्यावर बसून सर्व श्रोते स्वरानंद घेत होते. भरपूर दाद मिळत होती खाँसाहेबांना. रागाच्या माधुर्याने सारा श्रोतृवृंद डोलत असल्याचे पाहून मला स्वर्गानंद झाला. अतिविलंपत रागाची बढत खाँसाहेब धीम्या लयीमध्ये करीत होते. एक तासभर घेतला त्यांनी विलंपत आणि द्रुत बंदिश पेश करण्यासाठी. अमीरखाँ कधीही ठुमरीसारखे हलकेफुलके गाणं गात नाहीत. केवळ ख्याल गायकीसाठी प्रसिद्ध असणारा हा एकुलता एक ख्यातकीर्ति गायक !

मालकंसच्या मोठ्या ख्यालानंतर अमीरखाँ यांनी दोन छोटे ख्याल गाऊन आपली मैफल संपवली. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. रसिक श्रोत्यांनी अमीरखाँ यांना जवळून पाहण्यासाठी एकच गर्दी केली. काही लोक त्यांची सही घेण्यासाठी पुढे सरसावले. अमीरखाँसाहेबांनी विनम्रतेने नकार दिला सही करण्याला. अमीरखाँसाहेबांनी शेख दाऊद आणि अंबाप्रशादजींना मनापासून धन्यवाद दिले.

दाऊदसाहेब आणि अंबाप्रशाद यांची बिदागीची पाकिटे तयारच होती. मी त्यांच्या हातात ती पाकिटे देऊन त्यांना धन्यवाद दिले. ऑटोचे भाडे देऊन मी त्या दोघांना जाण्यासाठी ऑटोचे भाडे दिले. अध्यक्ष सातवळेकर, डॉ. शांताबाई, भावेकाका, अण्णा काटीकर, महागावकर आणि इतर सहकार्याचा हात पुढे देणाऱ्या शिक्षकबांधवांचा मी निरोप घेतला. यादगिरीला खास धन्यवाद दिले मी.

टॅक्सी आणलीच होती यादगिरीने. देशपांडे यांना बरोबर घेऊन मी टॅक्सीतून

अमीरखाँसाहेब आणि त्यांचे व्यवस्थापक यांना घेऊन ग्रीन्स हॉटेलमध्ये गेलो. अमीरखाँसाहेबांची हैदराबादमधील ही पहिलीच मैफल सर्वांगसुंदर झाली असल्याचे त्यांना म. भ. देशपांडे यांनी योग्य शब्दात सांगितले. खाँसाहेबांनाही मैफल रंगलेली दिसलीच होती. त्यांच्या प्रफुल्ल मुद्रेवरून त्यांना झालेले समाधान आम्हाला स्पष्ट जाणवत होते. आम्ही दोघांनी अमीरखाँ यांच्या गायनाची भरपूर प्रशंसा केली. असा भाग्ययोग्य पुन्हा यावा अशी मी अमीरखाँच्या समोर इच्छा व्यक्त केली. अमीरखाँ प्रसन्नपणे हसले. आम्ही चौघेजण एका टेबलाभोवती खुर्च्यांवर बसलो.

मी आणलेले पाकीट अमीरखाँच्या हातात दिले. त्या पाकिटावर संपूर्ण हिशेब लिहिला आहे. असा मी खुलासा केला. आम्ही दोघांनी मोठ्या नम्रपणाने सुचविले की त्यांनी रक्कम मोजून घ्यावी. अमीरखाँ यांनी पैसे न मोजता, ते पाकीट खिशात ठेवले. आम्हा दोघांना खूप आश्चर्य वाटले. त्यांचा फार वेळ न घेता, आम्ही दोघे त्यांचा निरोप घेऊन निघालो. सकाळी गाडीवर पोचविण्यासाठी येतो, असं त्यांना सांगून मी त्यांचा निरोप घेतला.

स. भ. देशपांडे यांनी रिक्शा ठरवली आणि आम्ही दोघे रिक्शात बसलो. जामबागच्या चौरस्त्यावर मी उतरलो. रिक्शाचे भाडे देशपांडे यांच्या हातात दिले. मी त्यांना धन्यवाद दिले त्यांच्या सहकार्याबद्दल.

सकाळी ७ च्या आधीच उत्तमराव पाटील माझ्या घरी आले. आम्ही दोघे गेलो हॉटेलवर. प्रथम मॅनेजरसाहेबांना भेटलो. त्यांनी बिल तयारच ठेवले होते. मी बिलाची रक्कम पाहून अवाक् झालो. अमीरखाँसाहेबांनी जेवणामध्ये एकही जादा डिश घेतली नसल्याचे आणि चहा-कॉफी कुणालाही न दिल्याचे स्पष्ट दिसले. ते बिल घेऊन मी उत्तमरावासह खोलीत गेलो. आत गेल्याबरोबर मी अमीरखाँसाहेबांना आश्चर्यचकित होऊन विचारले की त्यांनी जेवणासाठी एक डिश का मागवली नव्हती आणि त्यांनी भेटीसाठी येऊन गेलेल्या व्यक्तींना चहा-कॉफी देखील का दिली नाही. शांतपणे अमीरखाँसाहेब मला म्हणाले, 'अरे भाई, खानेमें जो भी आता था, वो सब काफी था। फिर ज्यादा लेनेकी जरूरतही नही थी। मुझे मिलने के लिए इतने लोग आके गये की मैने उनको च्याय कॉफी देना अच्छा नहीं समझा। फझूल था वो च्याय पानीका खर्चा।' मी आणि उत्तमराव हे त्यांचे उत्तर ऐकून चकित झालो. एवढ्या समंजसपणाने आणि विवेकविचार करून वागणारे कलावंत मला तरी दुर्मीळच दिसतात. अमीरखाँसाहेबांना मासे फार आवडतात. म्हणून मी मॅनेजरसाहेबांना सांगून गेलो होतो की त्यांना हवे तितके मासे द्या आणि इतर कोणत्याही डिशेस द्या. अमीरखाँसाहेब म्हणजे आगळेवेगळेच व्यक्तिमत्व निघाले. माझ्यावर खर्चाचा बोजा पडू नये हाच त्यांचा एकमेव उद्देश !

हॉटेलच्या बाहेर टॅक्सी उभी होतीच. मी आणि उत्तमराव पुढे बसलो. अमीरखाँ आणि त्यांचे व्यवस्थापक मागे बसले. आम्ही नामपल्ली स्टेशनवर पोचलो. टॅक्सीचे भाडे दिले. हमालाला हाक मारली आणि त्या हमालाच्या मागोमाग आम्ही निघालो. अमीरखाँ

आणि त्यांच्या व्यवस्थापकास त्यांच्या आरक्षित जागेवर बसविले. उत्तमराव आणि मी बसलो त्यांच्यासमोर. काल झालेल्या मैफलीविषयी आम्ही बोलू लागलो. अमीरखाँच्या अप्रतीम गायनाने हैदराबादमधील श्रोते दिपून गेले होते. गाण्याची तारीफ करू लागले उत्तमराव पाटील. गाडी सुटण्याच्या बेतात होती. तेव्हा अमीरखाँ मला म्हणाले, 'भाई मोहोळकर, मैने सब कुछ देखा है। तू अकेला ही सब भागदौड करता था। तेरी परेशानी और बढती, अगर मैं तुझे ज्यादा पैसे मांगता। समझ गये ना ?' मी त्यांना लाख लाख शुक्रिया दिले, मनापासून त्यांचे आभार मानले आणि खाली वाकून त्या महान आत्म्याला वंदन केले. डब्यातून खाली उतरलो आम्ही. गाडीची शिट्टी झाली. गाडी सुरू झाली. आम्ही दोघांनी हात हालवून अमीरखाँसाहेबांचा निरोप घेतला.

उस्ताद अमीरखाँसाहेबांनी माझ्यावर विशेष प्रेमाचा वर्षावच केला. त्यांनी मला खूपच चांगले वागविले. माझ्या धावपळीकडे काळजीपूर्वक ते पहात होते. पहिल्या दिवशी चारमीनारकडे एका मित्राकडे भेटायला गेले आणि बरोबर ८॥ वाजता हॉटेलवर परत आले. कितीतरी प्रतिष्ठित आणि धनवंत व्यक्ती येऊन गेल्या त्यांच्या भेटीला. त्यापैकी काही व्यक्तींनी खाँसाहेबांचे खाजगी गायन त्यांच्या घरी करण्याची गळ घातली त्यांना. पुण कुणालाही ते गायला येतो असं म्हणाले नाहीत. भेटीसाठी आलेल्या एकाही व्यक्तीला त्यांनी चहाचा एक कपदेखील दिला नाही. त्या चहाचा खर्च माझ्या शिरावर पडू न देण्याची त्यांची इच्छा पूर्ण झाली. तीन दिवस त्यांचा मुक्काम होता हॉटेलमध्ये. एकदाही त्यांनी आवडणारी अशी एकही डिश मागवून घेतली नाही. समोर आलेले भोजन त्यांना पुरेसे वाटले. मासे अधिक पसंत होते त्यांना. पण त्यांनी माझा विचार करून काही देखील मागवून घेतले नाही. अमीरखाँच्या या वागण्याने, त्यांच्या विनम्र बोलण्याने आणि एक दिवस वाया जाऊनही, अधिक बिदागी न मागण्याच्या त्यांच्या सौजन्याने मला एक धक्कादायक पण चिरस्मरणीय अनुभवच दिला. शेवटी उरलेल्या रकमेचे पाकीट मी त्यांच्या हातात दिले आणि मोजून घ्या ती रक्कम असं सांगूनही, त्यांनी ते पाकीट, पैसे न मोजून घेता, खिशात ठेवून दिले. त्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास अविश्वसनीयच होता.

धनाढ्य आणि प्रतिष्ठित माणसे देखील माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसाचा मत्सर करू शकतात, हाही एक नवाच अनुभव घेतला मी. अमीरखाँ यांच्या विशाल हृदयाची आणि उदार अंतःकरणाची प्रचीतीच आली.

उत्तमराव पाटील यांना जामबाग चौरस्त्यावर सोडून मी रिक्शा पुढे नेण्यास सांगितले. त्याचा किराया दिला आणि शाळेत गेले. यादगिरीने मला पाहताच साहेबांनी भेटायला बोलावल्याचे सांगितले. मुख्याध्यापकांच्या खोलीत गेलो. त्यांना नमस्कार केला. सर मला म्हणाले, 'मास्तरसाहेब, हार्दिक अभिनंदन! कालचा कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा झाला. देशपांडे भेटून गेले मला. एवढ्या मोठ्या गायकाने तुमच्यावर दाखविलेल्या नितांत विश्वासाबद्दल खरोखर फार कौतुक वाटते. आम्ही या धाडशी संयोजनातून सहीसलामत,

धैर्याने बाहेर पडलात.'

अमीरखाँ यांची पहिलीच मैफल आयोजित करण्याची सुवर्णसंधी मला मिळण्याचे मुख्य कारण म्हणजे माझे सोलापूरचे बालमित्र श्रीराम पुजारीच आहेत. त्यांच्याबद्दल अमीरखाँच्या मनामध्ये अपार प्रेम होते. त्यांचा मी मित्र म्हणूनच अमीरखाँ तयार झाले हैदराबादला येण्यास. रामभाऊप्रमाणेच अमीरखाँ यांनी मला प्रेमाचा, आपुलकीचा अनोखा नमूना दाखविला. जेवढी कृतज्ञता वाटली अमीरखाँच्या लोभाबद्दल, त्याच्या दसपट कृतज्ञ आहे मी श्रीराम पुजारी यांचा.

त्यानंतर अमीरखाँसाहेब गाण्यासाठी जेव्हा जेव्हा हैदराबादला आले, तेव्हा तेव्हा मी त्यांच्या मैफलीला उपस्थित राहात असे. नामपल्ली स्टेशनसमोरील रॉयल हॉटेलमध्येच उतरत असत अमीरखाँ. रॉयल हॉटेलमध्ये जाऊन मी आवर्जून भेट घेत असे. त्यांच्याशी पाचदहा मिनिटे बोलल्याने मला अपूर्ण आनंदाचाच लाभ होत असे. प्रत्येक वेळी मी त्यांना माझ्या घरी चहाला येण्याचे निमंत्रण देण्यास चुकत नसे. पण ते प्रत्येक वेळी मला नकार देत होते. मी माझी चिकाटी आणि प्रयत्न सोडले नाहीत. दरवेळी त्यांना चहाला येण्याचा आग्रह करीत असे.

अमीरखाँसाहेब यांच्या त्या अपघाती मृत्यूच्या पूर्वी ते हैदराबादला आले होते. त्यांची गाण्याची मैफल होती रवींद्रभारतीमध्ये. मैफलीला मी आवर्जून उपस्थित होतो. त्यांची मैफल नेहमीप्रमाणेच सुंदर झाली. अमीरखाँच्या भेटीसाठी मी रॉयल हॉटेलमध्ये गेलो. तीनचार लोक बसलेले होते त्यांच्या खोलीत. एकजण त्यांचे पाय दाबीत होता. सहज बोलता बोलता विषय काढला मी त्यांनी स्वतःच बांधलेल्या तराण्याविषयी. ते आनंदाने म्हणाले की त्यांनी तराण्यांचा अभ्यास भरपूर केला होता. अनेक पारंपारिक तराणे त्यांना पाठ होते. स्वतः विचारपूर्वक त्यांनी अनेक तराणे तयार केले होते. तराण्यातील शब्द-व्यंजने निरर्थक असतात, असा सर्वसामान्य समज होता. अमीरखाँ म्हणत की व्यंजनातूनही स्वर शोधता येतात. त्यांनी बांधलेले तराणे असेच अर्थपूर्ण - भावपूर्ण असल्याबद्दल त्यांनी आत्मविश्वासपूर्वक सांगितले. मी त्यांना म्हणालो की हे तराणे नोटेशनसह लिहून ठेवले तरच पुढील पिढ्यांना एक मोठे धनच मिळू शकेल. अमीरखाँ यांनी माझ्या मताला दुजोरा दिला. नोटेशनसह तराणे लिहून ठेवण्यास ते असमर्थ होते. त्यांचे पाय दाबण्यात मग्न असलेल्या आप्पासाहेब कागे नावाच्या शिष्याला त्यांनी माझ्या सांगण्याचा विचार करायला पाहिजे असे समजावले. मी आप्पासाहेब कागे यांना ठासून सांगितले की पाय दाबण्याची सेवा करण्यापेक्षा अमीरखाँनी बांधलेले तराणे, इतर रागांच्या बंदिशी लिहून ठेवण्याने त्यांची मोठीच सेवा होणार आहे. अमीरखाँ आप्पासाहेब कागे यांना म्हणाले, 'आप्पा, सुन ये मोहोळकर, क्या कहता हैं । मेरे पैर दबाने में क्या रक्खा है ?' आप्पासाहेब कागे सारखे अनेक शिष्य-शागीर्द मिळाले अमीरखाँ यांना. पण कुणीही त्यांचे तराणे, नव्या चिजा, नव्या बंदिशी नोटेशनसह लिहून ठेवल्याचे, माझ्या तरी ऐकण्यात नाही. गुरूमुखातून

निघणाऱ्या नव्या चिजा, नव्या बंदिशी, नवे तराणे, नोटेशन करून लिहून ठेवणे, ही गुरूला अमरत्व देणारी सेवा होय, हे शिष्याला उमजेल, तोच खरा सोन्याचा क्षण. अशी सेवा करण्यात तत्पर असणारे शिष्य अमीरखाँ यांना लाभले नाहीत, हे त्यांचे फार मोठे दुर्दैवच!

हैदराबादमध्ये अमीरखाँसाहेबांचा मुक्काम चार दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणून मी त्यांना माझ्या घरी चहासाठी येण्याचे निमंत्रण दिले नहमीप्रमाणे. यापूर्वी त्यांनी मला नकारच दिलेला होता. पण या खेपेस त्यांनी मला आश्चर्याचा धक्काच दिला. दुसरे दिवशी माझ्या घरी येण्यास ते तयार झाले होते. बरोबर १० वाजता मी त्यांना घेऊन जाण्यास येतो, असे अभिवचन देऊन घरी जाण्यास निघालो.

घरी आल्यानंतर मी सर्वांना सांगितले की उद्या सकाळी उस्ताद अमीरखाँसाहेब आपल्या घरी येणार आहेत चहाला. माझी अनेक वर्षांची तपश्चर्या फळाला आली. सर्वांना सुखद आश्चर्याचा धक्काच बसला. मला तर अत्यानंदाने वेडच लागायची पाळी आली.

संध्याकाळी मी नेहमीप्रमाणे जोशीकाकांच्या घरी जाऊन त्यांना ही वार्ता सांगितली. त्यांना देखील आश्चर्याचा धक्काच बसला. थोड्याच वेळात आले राजूरकर, घोटीकर, के. एस. कुलकर्णी ही नेहमीची मित्रमंडळी.सर्वांना मी दुसरे दिवशी सकाळी १० वाजता माझ्या घरी चहाला येण्याचे आमंत्रण दिले. इंदोर घराण्याचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायक उस्ताद अमीरखाँसाहेब माझ्या घरी चहाला येणार असल्याचे मी सर्वांना सांगितले. हे ऐकून सर्वांनी एकत्र जल्लोष केला. जोशी काकांच्या घरी गप्पा रंगल्या.

त्यानंतर मी दताळे यांच्या घरी जाऊन त्यांनाही सकाळी १० वाजता माझ्या घरी चहाला येण्याचे निमंत्रण दिले. दंताळे पतीपत्नींना खूप आनंद झाला. अमीरखाँ माझ्या घरी येणार असल्याचे ऐकून त्यांना खूप बरे वाटले. जोशीकाका, घोटीकर, राजूरकर आणि के. एस. कुलकर्णी देखील येणार असल्याचे त्यांना सांगितले.

अमीरखाँची पहिलीच मैफल जेव्हा मी आयोजित केली होती, त्यावेळी फोटोग्राफरला न बोलावण्याची चूक झाली होती माझी. यावेळी हीच चूक पुन्हा करणे मला योग्य वाटले नाही. अमीरखाँबरोबर काढलेले फोटो ही माझ्या मर्मबंधातील चिरस्मरणीय ठेव होणार होती. गौळीगुड्यामध्ये जाऊन मी अनिल फोटो स्टुडिओच्या मालक-चालक यांना दुसरे दिवशी सकाळी ११ च्या सुमारास माझ्या घरी फोटो काढण्यासाठी येण्यास सांगितले. उस्ताद अमीरखाँसाहेब येणार असल्याचे मी त्यांना सांगण्यास विसरलो नाही.

दुसरे दिवशी सकाळी घरी सर्वजण चहाला येणार असल्याचे सांगितले होते. रात्रीचे जेवण झाल्यानंतर मी अंथरूणावर विचार करीत पडून राहिलो. उस्ताद अमीरखाँसाहेब यांची पहिली मैफल करण्याच्या वेळी मला कितीतरी लोकांनी चिंताक्रांत करून सोडले होते. मला त्या लोकांनी भलभलती नात्रे दिली होती आणि या माणसासाठी तो मोठा गायक येईलच कसा, अशा गावभर कंड्या पिकवल्या होत्या. तेच लोक गाणं ऐकण्यासाठी आले होते, हेही मला समजले कार्यक्रमानंतर. हा सारा प्रकार मला आठवला आणि माणसं मोठी, पण मनं खोटी असू शकतात, हे प्रकर्षानं जाणवलं होतं मला त्याप्रसंगी.

सकाळी पावणेदहाच्या सुमारास मी रॉयेल हॉटेलमधील खोलीवर पोचलो. अमीरखाँ कपडे करून तयारच होते. त्यांना घेऊन मी बाहेर पडलो. टॅक्सी ठरवली आणि दरवाजा उघडून मी अमीरखाँ यांना मागच्या सीटवर बसण्यास सांगितले. ड्रायव्हरला रस्ता दाखविणे सोपे जाईल अशा विचाराने मी पुढच्या सीटवर, ड्रायव्हरच्या शेजारी बसलो. मी बसलो पुढच्या सीटवर, पण माझे सर्व लक्ष होते मागील सीटवर बसलेल्या अमीरखाँसाहेबांच्याकडे.

आमची टॅक्सी निघाली नामपल्ली स्टेशनरोडवरून मुझुमजाही मार्केटकडे. मोठा चौरस्ता ओलांडला आणि फळांच्या बाजारावरून जातांना, दोन्ही बाजूला अमीरखाँ यांना दिसले उकिरडे, कचऱ्याचे आणि फळांच्या सालीचे मोठमोठे ढीग आणि त्यांचा अत्यंत उग्र वासाने, नाक तोडून खिशात घालावे, असंच वाटलं असणार त्यांना. साहजिकच डोळे बारीक करून तिरस्काराने ते पाहू लागले त्या गलिच्छ भागाकडे आणि त्यांच्या कपाळावर आठ्या दिसल्या मला घृणेच्या. हे पाहूनच मी त्यांना नम्रतेने म्हणालो की, मी त्यांना कुणा धनवंताच्या बंगल्यामध्ये नेत नसून एका गरीब माणसाच्या सर्वसामान्य घरी नेत आहे. अमीरखाँसाहेबांनी डाव्या हाताने माझ्या खांद्यावर प्रेमाने थोपटले. मला म्हणाले, 'अरे भाई, तू इतनी फिक्र क्यूँ करता है। तू तो दिलवाला आदमी हैं।' त्यांच्या या आपुलकीच्या उद्गारामुळे मला फार मोठा धीर आला. जामबाग चौरस्त्यावर उजवीकडे वळून आमची टॅक्सी आली आणि आमच्या वाड्याच्या फाटकासमोर येऊन थांबली. मी चटकन दरवाजा उघडून उतरलो आणि मागील दरवाजा उघडला. अमीरखाँसाहेब खाली उतरले. टॅक्सीचे भाडे दिल्यानंतर मी अमीरखाँ यांना फाटकातून आत आणले.

राजूरकर, दंताळे, घोटीकर, जोशीकाका, के. एस. कुलकर्णी या सर्वांनी नमस्कार करून अमीरखाँ यांचे आनंदाने स्वागत केले. त्यांना एका सिंगल सोफ्यावर बसण्याची विनंती केली मी. मित्रमंडळी मोठ्या सोफ्यावर बसली. दंताळे यांनी मग अमीरखाँ यांच्याशी संगीतक्षेत्राबद्दल, संगीतातील वेगवेगळ्या घराण्याबद्दल गप्पांना आरंभ केला. दंताळे आणि राजूरकर त्यांना एका पाठोपाठ एक असे प्रश्न विचारू लागले. अमीरखाँ प्रश्नांची उत्तरे देऊन त्यांचे समाधान करू लागले. पत्नीने उपम्याच्या डिशेस आणल्या आणि अमीरखाँना पहिली डिश दिली. सर्व मित्रांना डिशेस दिल्या आणि उपम्याचा स्वाद घेत घेत गप्पांना रंग चढला.

खरोखरच उपमा झाला होता उत्तम. खाँसाहेबांनी मला सांगितले, 'अरे भाई मोहोळकर, भाभी को बोल, मुझे और थोडा उपमा चाहिए। बहोत अच्छा बनवाया है भाभीने।' पत्नीने त्यांना आणि आम्हा सर्व मित्रमंडळींना उपमा आणून वाढला. गप्पा चालल्याच होत्या. उपमा खाऊन झाल्यानंतर पाण्याचा ग्लास मी त्यांच्या हातात दिला. मग चहा आला आणि सर्व मित्रांना दिला. आमचा चहा पिऊन होतो न होतो तोच, फोटोग्राफर आपला कॅमेरा गळ्यात अडकवून दरवाजातून आत आला अमीरखाँ म्हणाले, 'क्यों भाई फोटो खिंचवाना चाहते क्या? चलो बाहर खडे रहेंगे।' आमचा हुरूप वाढला आणि फोटोग्राफरने आमचे ग्रुप फोटो काढले. मग मी, अमीरखाँ सोफ्यावर बसलेले असताना त्यांचा एकट्याचा एक फोटो काढण्यास सांगितले. फोटो काढून झाल्यानंतर फोटोग्राफरना उपमा-चहा दिला. हास्यविनोद करण्यात अमीरखाँ रंगलेले दिसले. आम्हा सर्व मित्रांना अत्यंत आनंद झाला. गप्पा चालू असतानाच मी टॅक्सीसाठी बाहेर गेलो आणि चौरस्त्यावरून टॅक्सी घेऊन आलो.

पत्नीचा परिचय करून दिलाच होता. दंताळे व राजूरकर यांचा तर परिचय होताच.

घोटीकर, जोशीकाका, के. एस. यांचा परिचय करून दिलाच होता मी. प्रसन्न मनाने अमीरखाँ यांनी आमचा पाहुणचार स्वीकारला होता. सर्वांचा निरोप घेतला आणि मी त्यांना टॅक्सीतून रॉयल हॉटेलवर सोडले.'

माझी एक फार मोठी इच्छापूर्ती झाली. अमीरखाँसाहेब माझ्या घरी येऊन गेले. फोटोमुळे तो दिवस आजही मला आठवतो आणि मला पुनः प्रत्ययाचा मोठा आनंद मिळतो. अमीरखाँचा पहिला गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्याची संधी मला मिळाली. माझ्या इच्छेला मान देऊन अमीरखाँ माझ्यासारख्याच्या घरी चहासाठी येऊन गेले. मला धन्य धन्य वाटले !

थोड्याच दिवसानंतर मला समजले की समोरच राहणाऱ्या देसाई दांपत्याच्या घरी एक प्रथितयश आणि मान्यवर गायिका आल्या आहेत. ही गोष्ट मी दंताळे, घोटीकर, राजूरकरांना संध्याकाळी भेटून सांगितली. त्या गायिका प्रसिद्ध तर होत्याच. दंताळे - राजूरकरांचा व त्यांचा परिचय होता.

दुसरे दिवशी सकाळी आम्ही सर्वजण मिळूनच त्यांच्या भेटीसाठी देसाई यांच्या घरी गेलो. देसाई दांपत्याला आमच्या येण्याने आनंद झाला. सर्वांचा परिचय करून दिला दंताळे यांनी. मग संगीताबद्दल गप्पा सुरू झाल्या. अनेक गायक-गायिकांचा विषय निघाला. घराण्यांच्या गायकीबद्दलही मनमोकळी चर्चा चालली.

बोलता बोलता दंताळे यांनी त्या बाईंना सांगितले की या मोहोळकरांनी काही दिवसांपूर्वी अमीरखाँसाहेब यांची मैफल आयोजित केली होती. त्यांनी अमीरखाँ यांच्या गायकीबद्दल बोलायला आरंभ केला आणि आपली मते त्या स्पष्टपणे सांगू लागल्या. त्यांच्या दृष्टीने अमीरखाँ तालाला कच्चे होते आणि म्हणूनच ते तबला वाजविणाऱ्याला फक्त ठेका धरायला सांगतात. त्याला दिलखुलासपणे तबला वाजवू देत नाहीत. हे त्यांचे स्वतःचे मत होते. आम्ही फक्त एकमेकांकडे पाहून आश्चर्य व्यक्त केले. अमीरखाँसारखा मान्यवर गायक, ज्याच्या गायकीमुळे इंदोर घराण्याची प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी सर्वत्र पसरली, त्या गायकाला तालात कच्चे आहेत, असं आपण मानू शकतो काय ? एकेकाचे मत !

माझ्या घरी येऊन गेल्यानंतर अमीरखाँसाहेब परत हैदराबादला येऊ शकले नाहीत. १३ फेब्रुवारी १९७४ या दिवशी कलकत्ता येथे त्यांचे अपघाती निधन झाल्याची भयंकर बातमी वाचली पेपरमध्ये ! अमीरखाँ अल्लामियाँच्या भेटीला असे निघून गेले. मागे राहिल्या त्या त्यांच्या काळीज कुरतडणाऱ्या, पिळवटून टाकणाऱ्या फक्त आठवणी !

कलकत्ता येथील महाराष्ट्र मंडळाचा रौप्य महोत्सव होणार होता. त्या महाराष्ट्र मंडळाने हैदराबाद येथील आमच्या महाराष्ट्र मंडळाला अगत्याचे निमंत्रण पाठविले होते. त्यावेळी मी महाराष्ट्र मंडळाचा चिटणीस म्हणून काम करीत होतो. आमच्या महाराष्ट्र मंडळाचा प्रतिनिधी म्हणून मलाच पाठविण्यात आले होते. त्याप्रमाणे मी कलकत्त्याला चार दिवस गेलो होतो.

कै. अमीरखाँ यांच्या शिष्या श्रीमती कंकणा बॅनर्जी यांच्या घरी जाऊन मी त्यांच्या वडिलांना भेटलो होतो. झालेल्या अपघाताची हकीकत त्यांनीच मला वर्णन करून सांगितली. हैदराबादचे व्ही. व्ही. जोशी यांच्याही घरी गेलो होतो. त्यांनी मला उत्तररात्री झालेल्या त्या भीषण अपघाताची माहिती सांगितली. त्या साऱ्या घटना थरारून टाकणाऱ्या होत्या.

❑ ❑ ❑

माणसावर मनापासून प्रेम करणारा गानयोगी पं. कुमार गंधर्व

माणसांवर मनापासून प्रेम करणारे
गानयोगी पं. कुमार गंधर्व

१२ जानेवारी १९९२ या दिवशी शिवपुत्र सिद्रामप्पा कोमकली सर्व रसिक श्रोत्यांचे लाडके कुमार गंधर्व यांना देवाज्ञा झाली. सुरांच्या मस्तीत आणि धुंदीत असणारा स्वरयोगी. एक धगधगणारे स्थंडिल एकदम शांत झाले. गानयोगी, स्वरांचा बादशहा, रसीला गायक आणि नायक, धीरोदोत्त विचारवंत एकदम मैफलीतून निघून गेला. संगीतक्षेत्रामधील असामान्य तत्त्वज्ञ, प्रज्ञावंत, प्रतिभावंत आणि आत्मलक्षी कलावंत आपल्यामधून गेला. नेक पूर्वजन्मांचे संचित घेऊन ८ एप्रिल १९२४या शुभदिनी जन्माला आलेले कुमार गंधर्व चानक, अकाली अनपेक्षितपणे सर्व रसिकांना सोडून गेले.

कुमार गंधर्व म्हणजे स्वरवेलीवरील सुगंधी आणि सुरंगी फूल. बहुरंगी, बहुढंगी, बहुछंदी असे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. सुरांनी झपाटलेले एक आनंद वादळ एकदम थंडावले. एक हरहुन्नरी माणूस, बोलण्या-चालण्यात नटखट आणि मिश्किल असणारा हा रसीला माणूस असा कसा केला ? कोणत्याही कठीण प्रश्नाचे उत्तर केवळ एका वाक्यात देऊन चकित करणारे कुमार गंधर्व. असंख्य दर्दी श्रोत्यांच्या अंत:करणावर अवीट प्रभाव पाडणारा गवैय्या आणि तितकाच चिकित्सक, चोखंदळ असा खवैय्या !

कुमारजी तसे चार दोन इयत्ता शिकलेले कानडी गृहस्थ, पण अखंड वाचन, गाढा व्यासंग, सखोल चिंतन आणि स्वाध्याय करून प्रौढ, प्रगल्भ, प्रबुद्ध आणि परिपक्व होत जाणरे स्वयंभू कुमार गंधर्व. आमचे आवडते कुमरजी आम्हा सर्वांना सोडून गेले. आता मागे उरल्या व्याकूळ करणाऱ्या फक्त त्यांच्या अनंत आठवणी !

१९५४ च्या जानेवारीत हैदराबादमधील औद्योगिक प्रदर्शनाच्या विशाल मैदानावर एक आलीशान शामियाना टाकण्यात आला होता. अशा भव्य शामियान्यामध्ये विंटर फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. गायन, वादन, नर्तन याबरोबरच आमचे नाटक होणार होते. 'मुझे व्होट दीजिये' हे हिंदी नाटक म्हणजे आचार्य अत्रे यांच्या 'मी उभा आहे' या मराठी नाटकाचे हिंदी रूपांतर. मला प्रथमच नाटकामध्ये काम करण्याची संधी दिली साधना संघाचे प्रथितयश दिग्दर्शक मैराळ यांनी. आमचे नाटक विंटर फेस्टिव्हलमध्ये होणार होते. नाटकात काम करणाऱ्या आम्हा सर्वांना संपूर्ण फेस्टिव्हलचे पासेस देण्यात आले होते.

पं. कुमार गंधर्व या समारोहात गाणार असल्याचे समजले. कुमार गंधर्व यांचे नाव कानावर पडले होते. पण त्यांचे गायन ऐकण्याचे भाग्य लाभेल, असं स्वप्नामध्ये देखील वाटलं नव्हतं. फेस्टिव्हलमध्ये आमचे नाटक होणार असल्यामुळे हा भाग्ययोग आला.

कुमार गंधर्व यांना राजयक्षम्याने जर्जर करून अंथरूणाला खिळवून ठेवले होते, असं

वर्तमानपत्रात वाचले होते. कुमारजींची जबर इच्छाशक्ती आणि भानुमतीने केलेली शुश्रुषा यामुळेच ते दुर्धर रोगाशी सामना करून, त्याच्या मगरमिठीतून सहीसलामत बाहेर पडले होते. तीन तज्ज्ञ डॉक्टरांनी अहोरात्र त्यांच्यावर लक्ष ठेवून उत्तम उपचार केले. भानुमतीने त्यांची जिवापाड सेवासुश्रुषा केली म्हणूनच कुमार त्या भयंकर रोगाच्या जहरी विळख्यातून मुक्त झाले. थोडा वेळ गाण्याची परवानगी दिली डॉक्टरांनी. म्हणून कुमारांचे गंधर्वगायन ऐकण्याचा योग आला.

कुमार गंधर्व यांची हैदराबाद येथील पहिलीच मैफल असल्यामुळे शामियाना खचाखच भरलेला होता. सर्व रसिक श्रोते कार्यक्रम सुरू होण्याची उत्सुकतेने वाट पहात होते. कुमार गंधर्व यांना पाहण्यासाठी आणि त्यांचे स्वर्गीय गायन ऐकण्यासाठी मी आतुर झालो होतो. तिसरी घंटा झाली. मखमाली पडदा हळूहळू सरकत गेला. मध्यभागी बसले होते कुमार गंधर्व. कोवळे दिसणारे, ठसठशीत व्यक्तिमत्त्वाचे, अत्यंत देखणे कुमार. माझ्या डोळ्यांचे पारणेच फिटले !

कुमार गंधर्व यांच्या मागे, तंबोरा झंकारीत, कुमारांच्या पत्नी भानुमती बसलेल्या दिसल्या. त्यांच्या अप्रतीम सौंदर्याने सारा श्रोतृगण प्रभावित झाला. परिचय करून देणाऱ्या व्यक्तीने सांगितले की कुमार गंधर्व यांच्या पत्नी सौ. भानुमती- पूर्वाश्रमीच्या भानुमती कंस- पदवीधर असून सांगली येथील कॉलेजमधील एकेकाळच्या ब्युटीक्वीन होत्या. कॉलेजमध्ये असताना त्या टेनिसपटू होत्या. त्यांच्या मानाने कुमार गंधर्व अगदी किरकोळ आणि दुबळे दिसले. भानुमती देवासमधील एका शाळेत मुख्याध्यापिका होत्या.

कुमार गंधर्व यांच्याबरोबर तबल्याची साथ करीत होते वसंत आचरेकर. कुमार गंधर्व यांनी स्वतःच बांधलेल्या मालवनी रागाने गाण्याचा आरंभ केला. आघातयुक्त, चढ्या स्वरातील गायकीने सारे श्रोते प्रभावित झाले. धाडकन समेवर येण्याच्या त्यांच्या, अनोख्या पद्धतीने चकित झालेल्या रसिकांनी 'वाहव्वा', 'बहोत अच्छे', 'माशाल्ला' अशी त्यांना दाद दिली. कुमार गंधर्व यांचे गायन ऐकणे हा एक अविस्मरणीय आणि थरारक अनुभव !

माझा पहिला आवडतता गायक म्हणजे उस्ताद अमीरखाँ. त्यांची ती धीम्या लयीतील भारदस्त गायकी माझ्या हृदयाचा ठाव घेत असे. नभोवाणीवर त्यांचे गायन ऐकले होते. अमीरखाँ यांची आलापी ऐकून मी धुंद होत असे. त्यांचा दरबारी ऐकणं हा एक स्वर्गीय आनंदच !

दुसरा आवडता गायक पं. भीमसेन जोशी. किराना घराण्याची सुरीली गायकी ऐकावी तर ती पं. भीमसेन जोशी यांच्याकडून. सूर-प्रधान गायकीचे किराना घराणे ! सवाई गंधर्व यांचे शिष्य पं. भीमसेन जोशी. यांच्या अनेक मैफली ऐकल्या आणि आयोजित देखील केल्या हैदराबादेत.

कुमार गंधर्व यांचे स्वरसामर्थ्य आणि विजेप्रमाणे तळपत खाडकन समेवर येण्याच्या त्यांच्या पद्धतीने प्रभावित झालो. असं गाणं कधीच ऐकलं नव्हतं मी. त्यांची गायकी

अंत:करणाला भावली. त्यांची लयकारी अनोखी वाटली. पं. कुमार गंधर्व हेच आमचे दैवत झाले त्यानंतर.

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची संगीताची तीन दिवसांची एक कॉन्फरन्स हैदराबादमध्ये आयोजित करण्यात आली होती. आमच्या विवेकवर्धिनी हायस्कूलच्या मैदानावर एक विशाल शामियाना घालण्यात आला होता. पं. भीमसेन जोशी, कुमार गंधर्व आणि अनेक गायक-वादकांचे कार्यक्रम होणार होते. खास या संगीत परिषदेसाठी माझे सोलापूरचे बालमित्र आणि संगीताचे शौकीन श्रीराम पुजारी आले होते. नेहमीप्रमाणे पुजारी माझ्याच घरी उतरले होते. कुमार गंधर्वांच्या बरोबर त्यांच्या द्वितीय पत्नी सौ. वसुंधराताई आल्या होत्या. सौ. वसुंधरा कोमकली या पूर्वाश्रमीच्या वसुंधरा श्रीखंडे. यापूर्वीही त्या हैदराबादला येऊन गेल्या होत्या. त्यांचे गायन ऐकण्याचा आणि त्यांचा परिचय होण्याचा योग आला होता.

श्रीराम पुजारीमुळेच माझा अनेक गायक-वादक, कवी, नाटककार यांच्याशी परिचय झालेला होता. त्यांनीच कुमार गंधर्व आणि माझा परिचय करून दिला. कुमार गंधर्व यांच्या लाघवी हास्याने मी अतिशय प्रभावित झालो. कुमार गंधर्व यांचे सुमधुर गायन ऐकण्याचा हा माझा दुसरा योग होता. त्यांचे गायन थोड्या उशीराच सुरू झाले. पहिल्याच रांगेमध्ये मध्यभागी पं. भीमसेन जोशी आणि इतर बुजुर्ग मंडळी बसली होती. थोडा बाजूला मी बसलो होतो. कुमार गंधर्व यांचे गायन ऐकण्याची माझी उत्सुकता शिगेला पोचली होती. मी त्यासाठी अक्षरश: उतावीळ झालो होतो.

कुमार गंधर्व यांचे श्रवणीय गायन सुरू झाले. तबल्यावर होते वसंत आचरेकर. गायन चालू असताना वसंत आचरेकर यांनी जोशात येऊन तबल्यावर अशी जोरात थाप मारली की तबलाच फुटला ! कार्यकर्त्यांनी खूप शोधाशोध केली. पण कुमारांच्या स्वराचा तबला मिळेना. कुमारांनी पं. भीमसेन जोशी यांच्याकडे पहात, माईकवरून, मिश्किलपणे हसत जाहीर केले, ''भीमण्णा, माझ्या स्वराचा येथे दुसरा तबलाच नाही.'' सारे श्रोते आश्चर्यचकित होऊन आपापसात चर्चा करू लागले. शामियान्यामध्ये कुजबुज सुरू झाली. कुमारांनी गाणे तसेच चालू ठेवले. आचरेकर यांनी डग्ग्यावर ताल देऊन साथ चालूच ठेवली.

पं. भीमसेन जोशी ताडकन उठलेले दिसले. त्यांनी दंताळे यांच्याकडून त्यांच्या घराची किल्ली घेतली. आपल्या मोटारीतून निघाले. थोड्याच वेळात भीमसेनजी परत आले आणि कुमार गंधर्व यांच्यासमोर उजव्या हातात तबला घेऊन उभे राहिले ! चकित होऊन कुमारजी त्यांच्याकडे पहातच राहिले. मग वसंतराव आचरेकरांनी तो तबला घेतला आणि जमून साथ करू लागले. कुमार गंधर्व खुलले आणि पुढे गाऊ लागले. कुमार गायन थांबविणार असं दिसताच भीमण्णांनी त्यांना एक खास फर्मायिश केली. कुमारांनी अत्यंत आनंदाने ती स्वीकारली आणि मित्राचा मान राखला. भीमसेन जोशींच्यामुळे दुसरा तबला मिळाला

आणि एक झकास फर्मायिश श्रोत्यांना ऐकण्यास मिळाली. गायनामध्ये सौ. वसुंधराताईंनी सुरेल आणि सुरेख साथ दिली.

पं. भीमसेन जोशी आणि कुमार गंधर्व ही संगीत क्षेत्रामधील अत्युच्च शिखरे ! भीमसेन आणि कुमार यांची गायकी भिन्न ढंगाची. भीमसेन किराना घराण्याचे मान्यवर गायक तर कुमारांचे वेगळे घराणे त्यांनीच सुरू केलेले. एकमेकांवर आणि एकमेकांच्या गायकीवर नितांत प्रेम करणारे हे सन्मित्र ! आजच्या मैफलीत भीमसेन जोशी यांनी तत्परतेने दुसरा तबला आणून दिला. मला एकदम आठवले की एका सवाई गंधर्व महोत्सवामध्ये भीमसेन जोशी यांचे तानपुरे व्यवस्थित जुळवून दिले कुमार गंधर्व यांनी. केवढे घनिष्ट व जिव्हाळ्याचे जिवलग मित्र ! परस्परावरील निरपेक्ष प्रेमाचा विलोभनीय अविष्कार. मित्रप्रेमाचा आदर्श!

कुमार गंधर्व यांचा परिचय करून दिला श्रीराम पुजारी यांनी. माझ्या आयुष्यातील मणिकांचन योगच ! कुमारांचे गाणे ऐकणे आणि त्यांचा असा परिचय होणे. एका असामान्य कलावंताशी झालेला माझासारख्या सर्वसामान्य रसिकाचा परिचय. असाधारण योग !

दुसरे दिवशी कार्यक्रमाच्या वेळी कुमारजींच्या बरोबर हिंडत होतो. एक तरूण मुलगा कुमारांच्या जवळ आला. विनम्रतेने नमस्कार करून आदरपूर्वक त्याने प्रश्न केला, 'काल रात्री आपण कोणत्या तालात गात असताना तबला फुटला ?' कुमारांनी त्या तरूणाची चौकशी केली. तो हौशी कलावंत गुरूकडून तबल्यांचे शिक्षण घेत होता. कुमार त्याला म्हणाले, 'आपण तबला शिकत आहात. मग आपल्याला तो ताल समजायला हवा.' हिरमुसला होऊन तो तरूण खाली मान घालून गेला. मला वाईट वाटले. कुमारजींनी असं करायला नको होतं.

बोलत बोलत आम्ही पुढे गेलो. मी कुमारजींना सहजच सुचविले, 'आपण त्या तरुणाला न कळलेला ताल सांगितला असता, तर त्याची जिज्ञासा पूर्ण झाली असती. त्याच्या ज्ञानामध्ये चांगली भरच पडली असती.' माझ्याकडे कटाक्ष टाकून कुमारजी विचारमग्न झाले.

योगायोगाने तोच तरूण समोर दिसला. त्याला जवळ बोलावून त्याच्या खांद्यावर प्रेमाने आपला हात ठेवून, कुमारजींनी त्याला त्या तालाचे नांव सांगितले. हर्षोत्फुल्ल होऊन तो तरूण अत्यादाराने कुमारांना धन्यवाद देऊन निघून गेला.

मला खूप बरे वाटले. सौम्य भाषेत, ऋजुतेने केलेली सुयोग्य सूचना कुमारजी मोठ्या मनाने मानतात, हे माझ्या लक्षात आले. त्यांचा समंजसपणा मला प्रकर्षाने जाणवला. त्यांचा एक खास पैलू मला स्पष्ट दिसला.

तीन दिवसांचे संगीत संमेलन संपले. दुसरे दिवशी सकाळी कुमारजी, सौ. ताई, राम पुजारी आणि मी ऐका हॉटेलमध्ये गप्पाटप्पा करीत बसलो होतो. तास दीड तास आमच्या गप्पा रंगल्या. संगीताबद्दल ही चर्चा चालू होती. मला वाटलं की हाच खरा काव्यशास्त्र विनोद !

हॉटेलमधून प्रथम कुमारजी आणि सौ. ताई बाहेर पडले. ही संधी साधून मी रामला म्हणालो, 'अरे राम, आपण इतका वेळ या दोघांच्या सुखद, सुरेल आणि सुगंधी सहवासाचा आनंद भरभरून घेतला. या दोघांना आपल्या घरी चहाला येण्याचे निमंत्रण दे ना.'

आम्ही दोघे हॉटेलच्या बाहेर आलो. रामने त्या दोघांना माझी इच्छा सांगितली. कोणतेही आढेवेढे न घेता, आनंदाने होकार दिला कुमारजींनी. संध्याकाळी ५॥ च्या सुमारास आमच्या घरी चहासाठी येण्याचे त्यांनी मला आश्वासन दिले. माझ्या आनंदाला पारावारच उरला नाही.

कुमारजींनी एक सायकल रिक्षा ठरवली आणि ते दोघे आमचा निरोप घेऊन रिक्षामध्ये बसले. थोडे अंतर गेल्यानंतर त्यांची रिक्षा थांबली. माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. चहाचा बेत रहित करतात की काय कुमारजी अशी भीती वाटली. आम्ही दोघं रिक्षाजवळ पोंचलो. हसतहसत कुमारजी म्हणाले, 'हे पहा मोहोळकर, आज संध्याकाळी आम्ही दोघे आपल्या घरी चहाला न येता, जेवायलाच येतो. पण बेत मात्र आमच्या आवडीचा केला पाहिजे. आम्हाला बेत हवा साधाच - पिठलं भाकरीचा.' असं सांगून होतं न होतं तोच त्यांची रिक्षा पुढे निघून गेली. मी आश्चर्याने दंग होऊन पहातच राहिलो.

मी रामला म्हणालो, 'अरे राम, हा एवढा दिगंत कीर्तीचा महान गायक, आपल्या पत्नीसह, आपल्या घरी प्रथमच जेवायला येणार आणि बेत करायचा पिठलं-भाकरीचा?' रामने माझ्या खांद्यावर हलकेच हात ठेवला आणि म्हणाला, 'हे बघ कालिदास, भाकरी हा कुमारचा वीक पॉईंटच आहे. पण कुणीही त्यांची ही साधी इच्छा पूर्ण करून त्याला तृप्त करीत नाही आपण आज हाच बेत करू या. त्या दोघांना हा बेत खूपच आवडेल.'

आम्ही दोघे घरी आलो. कुमारजी आणि ताई आज संध्याकाळी आपल्या घरी जेवायला येणार असल्याची आनंदवार्ता मी सर्वांना सांगितली. सर्वांचे चेहरे आनंदाने फुलले. पिठलं-भाकरीचा साधाच बेत करावा, अशीच त्या दोघांची इच्छा आहे. सर्वजण अवाक् होऊन माझ्याकडे पहातच राहिले. मी त्या दोघांची हीच फर्मायिश असल्याचे सांगितले. योग चांगला होता. आमच्या स्वयंपाकाच्या बाई घरातच होत्या. त्यांनी हे सारं ऐकलंच होतं. संध्याकाळी ५ वा. येण्याचे कबूल करून त्या बाई गेल्या.

सौभाग्यवती, ज्योती, शुभा यांनी उत्साहाने तयारी सुरू केली. शेंगदाण्याची लसूण घातलेली चटणी, कारळाची खमंग चटणी, ताक, कांद्याचे पिठले, पांढरा स्वच्छ कांदा असा झकास बेत तयार झाला. तव्यावरून काढलेली गरमागरम भाकरी आणि कांद्याचे पिठले- त्यावर लसणाची खमंग फोडणी असा बेत केला.

सर्व तयारी मनासारखी झाली. संध्याकाळी ६॥ च्या सुमारास कुमारजी व ताई आले. दोघेही उत्फुल्ल दिसले. काळी शेरवानी व पांढरा स्वच्छ पायजमा घातलेले कुमारजी देखणे व प्रसन्न दिसले. सौ. ताईंचा आनंद त्यांच्या तोंडावरून ओसंडत होता. उभयतांचे स्वागत केले आम्ही सर्वांनी.

आम्ही चौघेजण जेवायला बसलो. दोन चटण्या, पांढरा कांदा, ताकाची वाटी, मस्त पिठलं हे पदार्थ पाहूनच कुमारजींचे डोळे आनंदाने चमकले. गरमागरम अशी भाकरी, टम्म फुगलेली- वाढली. कुमारजींनी आपल्या हाताने पिठल्यावर लसणाची फोडणी भरपूर घेतली. कुमारजी, ताई, रामभाऊ आणि मी त्या साध्याच बेताचा समाचार घेऊ लागलो. त्या दोघांचा आनंद पाहूनच आम्ही सर्वजण सुखावलो.

दुसरे दिवशी आणखी एक ठिकाणी कुमारजी गाणार होते. कुमारांनी इतके तेल खाणे चांगले वाटेना. म्हणून मी म्हणालो, 'उद्या आपल्याला गायचे आहे. इतकी फोडणी न घेणे श्रेयस्कर' ताडकन् कुमारजी म्हणाले, 'आता काही सांगू नका, मोहोळकर. मस्त सूर लागलाय !' त्यांचे हे उत्तर ऐकून आम्ही खुष झालो. हशा पिकला. दोघे मनसोक्त पोटभर जेवले. यातच आमच्या आनंदाला उधाण आले. एवढा महान कलावंत, भाकरी-पिठल्याचा दर्दी ! चवीने खाणारा खवैय्या !

योगायोगाने श्रीकांत देशपांडे या रसिक कलावंताचा झालेला परिचय हा दुसरा भाग्ययोग. कुमारांचा चाहता असा हा कलेचा भोक्ता. स्नेह वाढत गेला. सूर जुळत गेले. एक समानधर्मा भेटल्याचा आनंद झाला. मने आणि मते मिळाली. जिव्हाळा निर्माण झाला. आम्ही दोघेही संगीताचे शौकीन. आम्हा दोघांचेही दैवत म्हणजे कुमार गंधर्व. भेटीगाठी वाढल्या. संगीताविषयी चर्चा होत गेल्या. चर्चेचा मुख्य विषय म्हणजे कुमार गंधर्व आणि त्यांची गायनशैली.

एके दिवशी श्रीकांत देशपांडे यांनी एक एल्. पी. ऐकवली. राग होता सहेलीतोडी. कुमार गंधर्व यांची आम्ही न ऐकलेली रेकॉर्ड. आम्ही सारे मित्र श्वास रोखून, एकाग्रतेने रेकॉर्ड ऐकू लागलो. ताल-एकताल, लय-विलंबन, 'काहे रे जगावा, दे सोने दे रे। आज घर तो है, कल पर घर उडि जै है रे.' मग त्याच रेकॉर्डची दुसरी बाजू काळजीपूर्वक ऐकली. राग- सहेलीतोडी. ताल - एकताल , लय-द्रत. 'चंदासा मुख बन डारा। हँसहँस कर बतियाँ। ये मेरो सब हर लीनो। धीया मन बस कर लीनो ये।'

सहेली तोडीची बंदिश मनापासून ऐकली. अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. कितीही कसोशीने अर्थ लावण्याचा प्रयत्न करूनही अर्थ लागेना नीट. कशाचाच अंदाज येईना. काहे रे जगावा - असं कोण म्हणतंय ? कुणाला सांगितलं जातंय ? अनेक वेळा रेकॉर्ड ऐकली. वाटलं की 'काहे रे जगावा' असं आई म्हणत असावी. पण आई असं कुणाला बजावतेय ? काहीच कळेना. संदर्भ जुळेनात. द्रुतमधील शब्दांनी आम्हाला अधिकच बुचकळ्यात पाडले. चंदा सा मुखबन डारा - चंद्रासारा मुखडा झाला आहे, तो कुणाचा ? आम्हापैकी प्रत्येकाने वेगळाच अर्थ लावला. मनाचा गोंधळ वाढला. विचारांची गुंतागुंत खूपच झाली. बंदिशीचा अर्थ काय ?

श्रीकांतचीच दुसरी रेकॉर्ड ऐकली. राग - मधसुरजा, ताल - त्रिताल, लय - ठाय आणि मध्य. 'बचाले मोरी माँ, मातारी। घरमें ललुवा अकेलो बिन मोहे। अरज यही तोरे

पास मेरो यो हैं ।। द्रतु: ढोलियाँ बजाले.... असं आठवतं. हे माझे आई, माते, माझे रक्षण कर, मला वाचव. असं आर्ततेनं कोण पुकारा करीत आहे ? ललुवा म्हणजे कोण ? तो घरात एकटाच आहे, माझ्याविना. आर्ततेने आमची अंत:करणे हेलावली, पिळवटून गेली. काळीज कापले गेले. पण कोडे काही सुटेना. अर्थ लागेना. प्रत्येकजण वेगळीच कल्पना करीत होता. मनाचा गोंधळ वाढला. सारे संभ्रमात पडलो. गोंधळून गेलो. ही कोंडी कशी फुटणार ? कोण अर्थ सांगणार ?

माझ्या डोक्यात एक कल्पना आली. सहेलीतोडी आणि मधसुरजा हे दोन्ही नवीन धुनउगम राग स्वत: कुमारजींनीच बांधले. बंदिशी तयार केल्या त्यांनीच. मग त्यांनाच का नाही आपण विचारावे- पत्र टाकून. अंतर्भूत अर्थ कळेल. सारा संशय फिटेल. मी हा प्रस्ताव मांडला सर्व मित्रांच्यासमोर.

ठाम विरोध केला सर्वांनी. कुमारजींनी खुलासा विचारणारे तुम्ही कोण ? काय अधिकार आहे तुम्हाला ? तुमचे हे औधत्य आवडेल कुमारांना ? बंदिशींचा अर्थ विचारणारा जिज्ञासू कुमारजींना भेटला असेल काय ?

माझा निर्धार पक्का झाला. मी एक सविस्तर पत्र लिहून कुमारजींना या बंदिशींचा अर्थ विचारणार. त्यांना आवडो न आवडो. जास्तीत जास्त काय होईल ? कुमार रागावतील आणि माझ्यावरील कृपालोभ कमी होईल. कोणत्याही परिणामाला तोंड देण्याची तयारी केली मी.

अत्यंत मृदु, ऋजू शब्दामध्ये, आर्जवी भाषेत, एक विस्तृत पत्र मी लिहून काढले. माझी जिज्ञासा पूर्ण करावी, अशी विनम्रतेने विनंती केली त्यांना. माझ्या या उद्धटपणाबद्दल मी त्यांची अंत:करणापासून क्षमा मागितली. माझ्या मर्यादातिक्रमणाला माफी करावी, अशी याचना केली. पत्र पोस्टात टाकले.

पत्रोत्तराची प्रतीक्षा करण्याशिवाय अन्य मार्ग नव्हता. दोन आठवडे झाले. मग मात्र माझा धीर सुटला. मी धास्तावलो, निराश झालो. खिन्न बनलो. मन चिंती ते वैरीही न चिंती असं म्हणतात. विचारांचे वादळ मनामध्ये घोंघावू लागले. कुमारांचा आपण राग ओढवून घेतला. त्यांना नाराज केले. अशाच भीतीने मी कष्टी झालो. जिवाची घालमेल होऊ लागली. काळजाची कालवाकालव होऊ लागली. विलक्षण उलघाल होऊ लागली. माझे प्राणपाखरू तडफडू लागले. रात्र-रात्र मला झोप येईना. अस्वस्थ, अशांत, बेचैन झालो मी.

तीन आठवड्यानंतर मला जाडजूड पाकीट आले. पाकिटावर देवास असं लिहिलेलं वाचलं. भानुकुलचा पत्ता होता.माझा जीव भांड्यात पडला. कुमारांचे पत्र आले. आनंदाने मन थुईथुई नाचू लागले माझे. थरथरत्या हातांनी मी ते पाकीट फोडले. पत्र वाचू लागलो. भो आश्चर्यम् !

कुमार गंधर्व यांनी माझ्या जिज्ञासेचे कौतुक केले. माझ्या ऋजुतेची, विनम्रतेची,

विनयशीलतेची, लीनतेची प्रशंसा केली. मी भारून गेलो. कृतज्ञता भावाने गलबलून गेलो. बंदिशीतील कथानक जाणून घेण्याविषयीची माझी तीव्र इच्छा त्यांना समजली. माझे कुतूहल त्यांनी बरोबर जाणले. दोन्ही बंदिशीमधील कथानक, कल्पना, पार्श्वभूमी आणि मर्म त्यांनी विशद केले होते. राजस, सुशील, सुसंस्कृत आणि सौजन्यशील कुमार गंधर्व यांनी मला पत्र लिहून कायमचेच ऋणी करून टाकले. या त्यांच्या ऋणाची परतफेड करण्यापेक्षा, त्या ऋणातच राहण्यामध्ये अधिक सौंदर्य आणि ऋणाचे मोल वाटले.

सहेलीतोडी

एका छोट्या कुटुंबातील, वयात आलेली मुलगी, दिवस वर आला तरीही अगदी गाढ झोपलेली असते. तिचा धाकटा अजाण आणि निरागस मनाचा भाऊ निष्पाप बुद्धीने तिला जागं करीत आहे. त्या आपल्या मुलाला आई म्हणते, 'अरे, तिला कशाला उठवितोस ? झोपू दे रे तिला, झोपू दे. आज ती तुझ्या घरी आहे. उद्या ती दुसऱ्या घरी उडून जाणार आहे.' मुलगा विचारतो, 'उडून जाणार आहे, म्हणजे काय ?' आई म्हणते, 'अरे, तुला कसं समजावून देऊ ? तुला हे आतांच नाही कळणार.' थोड्या वेळाने मुलगी जागी होते. तिचा चंद्रासारखा नितळ, सौम्य शीतल, सुंदर चेहरा आंतरिक आनंदाने फुलला होता. तो तिचा मुखडा पाहून आईला अत्यंत हर्ष झाला. तिचं अंतःकरण सुखाने थुईथुई नाचू लागले. घरोघरी घडणारा हा सर्वसामान्य प्रसंग कुमारांनी अत्यंत हळुवार आणि चपखल शब्दामध्ये वर्णन केला आहे. संपूर्ण बंदिशीतील सुरेख शब्दरचना, सखोल भावना आणि कुमारजींचे पिळवटून काढणारे आर्त स्वर, तरल भाव यांनी हळूवार अंतःकरणाचे हळवे श्रोते भारून न जातील तरच आश्चर्य !

मधसुरजा

एके दिवशी दुपारी १२ च्या सुमारास कुमारजी आपल्या खोलीत वामकुक्षी घेत होते. बें, बें असा एक बकरीचा व्याकूळ करणारा आवाज आणि जोराजोरात वाजणाऱ्या ढोलांचा कर्कश आवाज ऐकून कुमारजींचे कोमल हृदय व्यथित झाले. खिडकी उघडून ते पाहू लागले. आठदहा माणसे एका बकरीला कुंकवाचे मळवट भरून, तिच्या गळ्यात हार घालून, ढोल वाजवीत, बळी देण्यासाठी देवीच्या मंदिराकडे घेऊन चालले असल्याचं करूण दृश्य पाहून ते हळहळले. क्रौंच पक्ष्याच्या जोडप्यातील नराचा नेमका वेध बाणाने घेऊन एका व्याधाने त्याला विद्ध केले. तो नर खाली मरून पडला. त्याची मादी आक्रोश करून ओरडू लागली. हे दृश्य पाहतांच वाल्मिकी ऋषीचे कोमल अंतःकरण कापले गेले आणि त्यांनी उस्फूर्तपणे 'मा निषाद' असा शाप दिला. त्या क्रुर कठोर, निघृण व्याधाला. ऋषीचा शाप काव्यरूपाने बाहेर पडला. त्याप्रमाणेच हळुवार अंतःकरणाच्या कुमारांचे हृदय बकरीच्या आर्त आक्रोशाने कळवळले, पिळवटून गेले. उस्फूर्त अशी एक करूण गंभीर बंदिश त्यांच्या मुखातून निघाली.

बळी देण्यासाठी नेली जाणारी बकरी आर्ततेने हंबरडा फोडून म्हणते, 'हे माते, हे

आई, देवी माझे रक्षण कर, मला वाचव. माझा बछडा मी घरी एकटाच टाकून आले आहे. माझ्या आठवणीने तो व्याकूळ होऊन, माझ्या वाटेकडे, चातकाप्रमाणे, डोळे लावून बसला असेल. मला माझ्या जिवाची मुळीच पर्वा नाही. पण माझ्या त्या एकट्याच असलेल्या बछड्यासाठी तरी मला वाचव ग आई',

ती मिरवणूक पुढे गेली. बकरीचे विव्हळणे चालूच होते. आपला जीव वाचत नाही, देवी रक्षण करू शकत नाही, याची तिला खात्री पटली. बळी जाण्यास ती तयार झाली. म्हणून ती बकरी म्हणते, 'अरे ढोलक-यांनो वाजवा, जोराजोरात ढोल वाजवा. जल्लोष करा. मी आनंदाने तयार आहे.

सहेलीतोडी, मधसुरजा, बिहडभैरव, शंकरा, मालवती अशा अनेक बंदिशी बांधणारे नायक कुमार ! बंदिशी तयार करता येत नाहीत. त्या अंत:करणामधून सहज बाहेर पडतात, बंदिशी होतात.अत्यंत संवेदनशील वृत्तीनेच बंदिशी होतात. कुमार होते हळुवार मनाचे, कोमल हृदयाचे, तीव्र संवेदनशील वृत्तीचे, सर्जनशील, प्रतिभावंत नायक, कुमारजीसारखा नायक आणि गायक युगायुगातून कधीतरी जन्माला येतो. कुमारजीसारखा अनेक प्रयोगाद्वारे शास्त्रीय संगीतामधील अनेक सौंदर्यस्थळे समर्थपणे ऐकवून, रसिक श्रोत्यांना प्रभावित करणारा असा गायक आणि नायक झालाच नाही.

हैदराबादमधील मुक्कामात कुमारजींनी मला सांगितले होते की, ते होळीच्या दिवशी कुठलाही कार्यक्रम घेत नाहीत. देवास आणि इंदोर येथेच होळीचा मोठा कार्यक्रम साजरा होतो. त्या कार्यक्रमात कुमारजींचे गायन होतेच. बंडूभैय्या चौगुले एक खास संगीताची मैफल आयोजित करीत असतात. अनेक स्थानिक आणि बाहेरचे गायक-वादक कलाकार आपली कला सादर करीत असतात.

१९७२ साली होलिकोत्सवाच्या दोन दिवस आधीच देवासला पोंचावे असा मी निर्धारच केला होता. कोणतीही पूर्व सूचना न देता, कुमारांच्या भानुकुल मध्ये अचानक उभे राहावे आणि कुमारजींसह सर्वांनाच सुखद आश्यर्याचा एक गोड धक्का देण्याचा माझा मानस होता.

श्री. व सौ. राजूरकरांच्या बरोबर मी मुंबईला गेलो होतो. तेथेच कुमार गंधर्व यांनी गणपती उत्सवास येण्याचे निमंत्रण सौ. मालिनी राजूरकरांना दिले होते. त्याचवेळी कुमारांनी इच्छा प्रदर्शित केली की मीही त्यांच्याबरोबर देवासला यावे. कुमारजींच्या या इच्छेला मी आनंदाने होकार दिला होता. गणपती उत्सवाच्या वेळी मी खात्रीने येतो, असे अभिवचन मी कुमारजींनी दिले होते.

गीत बसंत हा कार्यक्रम पुण्यामध्ये होणार होता. त्या कार्यक्रमासाठीच आम्ही पुण्याला आलो. गीत बसंतचा कार्यक्रम झाल्यानंतर मी आणि राजूरकर कुमारजींना भेटावयास गेलो. त्यावेळीही कुमारजींनी मला पुन्हा गणपती उत्सवास येण्याचे निमंत्रण दिले. माझ्या अभिवचनाची मला आठवण करून दिली.

माणूस मनामध्ये ठरवतो एक आणि दैव वेगळेच काही घडवून आणते. संकल्प आणि सिद्धी यामध्ये परमेश्वराची इच्छा उभी असते. देवासला जाण्याचा निश्चय केला, अभिवचनही दिले. पण माझ्या दैवगतीने वेगळेच वळण घेतले. मला माझ्या निर्धाराप्रमाणे देवासला जाणे शक्य झाले नाही. अभिवचनाचे मला पालन करणे जमले नाही. कुमार गंधर्व यांना नाराज करण्याचे नशिबी आले. या माझ्या दुर्दैवाला काय म्हणावे? स्थितीचा असे किंकर प्राणिमात्र!

त्या काळात मी हैदराबादमधील महाराष्ट्र मंडळात अत्यंत क्रियाशील होतो. कोणत्याही अधिकाराच्या पदावर नसूनही मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये भरपूर रस घेत होतो. कार्यक्रमाच्या यशामध्ये माझाही वाटा होता. संयोजन करण्यात मनापासून सहकार्य देत होतो. कष्ट करून कार्यक्रम यशस्वी करीत होतो. महाराष्ट्र मंडळ नाटके करीत असे, पुण्यामुंबईची नाटके आणवीत असे, भाषणांचे कार्यक्रम आयोजित करीत असे. मंडळाचे दुय्यम चिटणीस असलेले कुलकर्णी हे माझे जिवाभावाचे मित्र होते. मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमात मी त्यांच्या बरोबरीने काम करीत असे. कार्यक्रम संपेपर्यंत मी त्याच्या पाठीशी उभा असे.

हे माझे मित्र अचानक आजारी पडले. मंडळामध्ये जाणे अशक्य झाले त्यांना. गणपती उत्सवामध्ये नाटककार वसंत कानेटकर पत्नीसह येणार होते. त्यांचा मुक्काम तीन दिवस असणार होता. एके दिवशी कानेटकरांचे व्याख्यान, दुसरे दिवशी त्यांचे जाहीर नाट्यवाचन आणि तिसरे दिवशी हैदराबाद दर्शन. गणपती उत्सवाचे वेळीच मी देवासला सौ. राजूरकरांच्या बरोबर देवासला जाणार असल्याचे कुलकर्णी यांना माहित होते.

एके दिवशी मला कुलकर्णी यांचा निरोप आला. त्यांच्या घरी गेलो मी. ते पलंगावर पडून होते. त्यांनी माझ्यावर प्रश्नांची सरबत्तीच सुरू केली.

मंडळातील कार्यक्रमांचे आयोजन कोण करणार ? गणपती उत्सवाचे सारे समारंभ कसे होणार ? कानेटकरांचे व त्यांच्या पत्नींचे स्वागत कोण करणार ? त्यांच्याशी नाट्यचर्चा कोण करणार ? त्यांच्या बरोबर सतत कोण राहणार ? त्यांना हैदराबाद दर्शन कोण घडविणार ? त्यांच्या या प्रश्नांना मी काय उत्तर देणार ?

त्यांची प्रकृती, मनस्थिती, कार्यक्रमाविषयीची काळजी पाहून मला अतिशय दुःख झाले. माझ्या देवासला जाण्यामुळे त्यांचा मनस्ताप वाढणार होता. एका क्षणाला ते खूपच रागावले, चिडले, संतापून बोलू लागले. हे पाहूनच मी धास्तावलो. नाइलाजाने मला कबूल करावे लागले. मी गणपती उत्सवाचे वेळी देवासला जाणार नाही, हैदराबादमध्येच राहून कार्यक्रमांची व्यवस्था ठेवीन, कानेटकरांच्या बरोबर राहीन, सर्व समारोह यशस्वी करण्याचा प्रयत्न करीन. कुलकर्णी आनंदित झाले, सुखावले, सुटकेचा त्यांनी एक प्रदीर्घ श्वास सोडला. मित्राचे मन मोडवेना. त्यांच्या स्वास्थ्यासाठी देवासला जाण्याचा विचार मी माझ्या मनातून काढून टाकला. कुमार गंधर्व यांची नाराजी, गैरमर्जी सहन करण्यास

तयार झालो. कुमारांना नाखूष करण्याचे पाप घ्यावे लागणार होते. कुमारजींचा अपेक्षाभंग होणार होता. We have to choose between two evils. मी एक सविस्तर पत्र कुमारांना लिहिले. माझी अगतिकता पत्रातून स्पष्ट केली. सारी परिस्थिती कळवली. कानेटकरांच्या कार्यक्रमासाठीच मला देवासला येणे अशक्य झाल्याचा खुलासा केला. एका मित्रासाठी हे करणे भाग पडल्याचे मी त्यांना पटविण्याचा प्रयत्न केला. पुढे कधी तरी देवासला अवश्य येईन, असं लेखी आश्वासन दिलं त्या पत्रात. ते पत्र मी श्री. व सौ. राजूरकरांच्या हातात दिले. भानुकुलमध्ये पोचतांच ते पत्र कुमारजींना देण्याची विनंती केली.

गणपती उत्सवासाठी राजूरकर देवासला गेले. त्या दोघांनाच आलेले पाहून कुमारजींना आश्चर्य वाटले. त्यांनी विचारले, 'मोहोळकर कुठं आहेत ?' वसंतरावांनी माझे पाकीट त्यांच्या हातात दिले. कुमारजींनी ते पत्र भिरकावले आणि म्हटले, 'पत्र काय करायचे आहे? माणूस हवायं !'

परत आल्यानंतर राजूरकरांनी मला ही घटना सांगितली. माझा विश्वासच बसेना त्यांच्या सांगण्यावर. मी त्यांना पुन:पुन्हा विचारले त्या प्रसंगाबद्दल. त्यांनी मला शपथपूर्वक सांगितले तसंच घडलं म्हणून. कुमारजी माझ्या येण्याची किती उत्कंठेने वाट पहात होते, याची मला खात्री पटली. कुमारजींचा अपेक्षाभंग केल्याचे पाप माझ्या वाट्याला आले. मी अत्यंत व्यथित झालो. एका मित्रासाठी मी एका महान गायकाची नाराजी ओढवून घेतली. हताश झालो. भयंकर हळहळलो.

कुमारांचा दारूण अपेक्षाभंग केल्याबद्दल फार फार वाईट वाटले मला. त्यांचा माझ्यावरील राग कमी व्हावा, याच एका हेतूने मी पूर्वसूचना न देता देवासला जाण्याचे ठरविले. सुख मज जगण्यात नसे ।सुख मज मरण्यात नसे। प्रीति असे विसराळू। भीति जिवा वाटतसे ।। कुमारजींचे प्रेम कमी होऊ नये, हाच माझा प्रयत्न होता. रेल्वेचे आरक्षण केले. प्रवासाची सारी तयारी केली. ठरल्याप्रमाणे देवासला जाण्यास निघालो. होळीच्या अगोदर तीन दिवस मी देवासला पोचलो. रात्रीचे आठ वाजले होते.

भानुकुलमध्ये प्रवेश कर ेत असतांना मनामध्ये अनेक विचारांचे वादळच घोंघावू लागले. कुमारजींचा आजार आणि भानुमतीने केलेली सेवा आठवू लागली.

राजक्षम्यासारख्या दुर्धर रोगाने कुमारजी जर्जर झाले असतांना, त्यांच्या प्रथम पत्नीने, भानुमतीने अहोरात्र, तनमनधनाने, अथक, अविश्रांत, जिवापाड सेवा शुश्रूषा केली होती. त्या त्यांच्या अचाट सेवेबद्दल सर्वांनीच आश्चर्य व्यक्त केले. त्यांनी केलेल्या सेवाशुश्रूषेमुळेच, त्यांनी घेतलेल्या काळजीमुळेच, कुमारजी मृत्यूच्या मगरमिठीतून मुक्त होऊ शकले, यात शंकाच नाही.

कुमारजींना झालेला आजार त्याकाळी असाध्यच होता. राजयक्ष्म्या सारख्या दुर्धर व्याधीवर चांगली औषधे नव्हती. अत्यंत काळजीपूर्वक, एकनिष्ठेने, दिवसरात्र अखंड सेवा शुश्रूषा हाच एकमेव उपचार होता या रोगावर. कष्टाचे हे काम भानुमतीने अत्यंत मनापासून

केले असणार यात शंकाच नाही. घरात पहिला मुलगा मुकुल, कुमारजी आणि भगवंतानेच पाठविलेले मामाजी. घरखर्च चालविण्यासाठी भानुमती शाळेत नोकरी करीत होत्या हे विशेष. त्याशिवाय गत्यंतरच नव्हते. घरचा कर्ता पुरूष अंथरूणाला खिळून पडलेला. भानुमतींना नोकरी करणे भागच होते. दिवसभर शिक्षिकेची नोकरी करून घरी आल्यानंतर सेवा करायची आपल्या पतीची-सावित्रीच्याच श्रद्धेने. घरकाम सांभाळायचे आणि छोट्या मुकुलची देखभाल करायची. खरोखर ही तारेवरची कसरतच होती. भानुमतीची सत्त्वपरीक्षाच !

भानुमतीमुळेच कुमारजी त्या व्याधीतून कसेबसे उठले. दुसऱ्या मुलाला जन्म देऊन ती गृहदेवता कैलासवासी झाली. भानुकुलची तारणकर्ती अचानक, अनपेक्षितपणे, अकाली देवाघरी निघून गेली. दुसरा छोटा मुलगा त्याच्या डॉक्टर मावशीने सांभाळला व त्याचे पालन पोषण केले. एक दिवस कुमारजींची प्रकृती अति गंभीर झाली होती. खूपच क्षीण झाले होते कुमार. चेहरा काळा पडत चालला होता त्यांचा. भानुमती शाळेतील काम संपवून लगबगीने आल्या होत्या. कुमारजींची प्रकृती पाहूनच त्या निराश, उदास आणि खिन्न झाल्या. आपल्या प्रयत्नांना यश येणार नाही असा संशय त्यांना कुरतडू लागला. कुमारजींच्याकडे पाहणेही त्यांना अवघड झाले. तोंड बाजूला करून त्या मुसमुसून रडू लागल्या. कुमारजींचा हा आजार शेवटचाच ठरणार काय, अशी भीतीची पाल त्यांच्या मनात चुकचुकली. डोळे वहात होते आणि कुमारजींना अश्रू दिसू नयेत म्हणून त्या अश्रू पुसत होत्या. अत्यवस्थ स्थितीत कुमारजी अर्धवट उघड्या डोळ्यांनी भानूची स्थिती पहात होते. कुमारजींनी आपली मान उशीवरून वर केली. दोन्ही हातांनी रेटा देऊन शरीर वर उचलले थोडे आणि पराकोटीच्या आत्मविश्वासाने कुमारजी म्हणाले, 'भानू, रडू नकोस. संगीताच्या दुनियेत क्रांती केल्याशिवाय मी मरणार नाही.' केवढी जबर इच्छाशक्ती, प्रचंड जीवनोर्मी, अफाट जिजीविषा !

कुमारजींची जगण्याची दांडगी इच्छा, डॉक्टरांनी केलेले उपचार आणि भानुमतीने केलेली अखंड सेवा, यामुळेच कुमारजी त्या असाध्य रोगाच्या विळख्यातून सुटले. ही सारी त्या भगवंताचीच कृपा. भानुमतीचं कुंकू प्रबळ होतं, तिचं सौभाग्य आणि पूर्वसुकृत दांडगं म्हणूनच कुमारजींचा जीव बचावला, कुमारजींना नियतीने जिवदान दिले, संगीतामध्ये क्रांतीकारक कार्य करून आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीच !

भानुमती म्हणजे कुमारजींची गृहस्वामिनी, भानुकुलातील देवता, प्रेरणा, प्रसन्नता आणि स्फूर्तिदायिनी ! प्रज्ञा, सेवा, त्याग आणि अंतर्बाह्य सौंदर्य या सर्वांचा विलक्षण आविष्कार, तेजस्विनी, स्वामिनी आणि कामिनी.

गृहिणी सचिव : सखी मिथ : प्रियशिष्या ललिते कलाविधौ ।

भानुमती या सर्वच बाबतीत अत्यंत जागरूक आणि क्रियाशील होत्या. दुर्दम्य उत्साह, उदंड उभारी, तीव्र इच्छाशक्ती, निर्मळ भक्ती आणि सांगितिक विचारांची स्फूर्तिदात्री

अशाच होत्या. पदवीधर होत्या म्हणूनच त्यांना नोकरी मिळू शकली. मृत्यूच्या कराल दाढेतून खेचून बाहेर काढण्यात त्या यशस्वी झाल्या. पण स्वत: मात्र मृत्यूला शांतपणे सामोऱ्या गेल्या. कुमारजींना तळमळत ठेवून अनंतात विलीन झाल्या. दोन कोवळ्या मुलांना मागे ठेवून निमूटपणे स्वर्गवासी झाल्या !

यथा काष्ठंच काष्ठंच समेयातां महादधौ । दोन ओंडक्यांची होते सागरात भेट । एक लाट तोडी दोघां पुन्हा नाही भेट । असंच घडतं आपल्या सर्वांच्या जीवनामध्ये. कुमारजींच्या बाबतीत हे प्रकर्षानं जाणवतं. कधी तरी, योगायोगाने, एका मंगलक्षणी, सांगलीत कुमारजींची आणि भानुमती कंस यांची दृष्टादृष्ट झाली आणि पाहताक्षणीच ते एकमेकांवर अनुरक्त झाले, प्रेमाच्या पाशात अडकले. हा नियतीनेच घडवून आणलेला अजब योगायोग. भानुमती कंस होत्या स्वाभिमानी, स्वावलंबी, सुशिक्षित, सुसंस्कृत, सुविचारी आणि सदाचारी. उभयतांची मने आणि मते मिळाली. सूर जुळले. धागे गुंतले. जवळीक वाढली. जीव जडला. जिव्हाळ्याच्या धाग्यांनी ते एकमेकांत गुंतले. समसमा संयोग झाला. आणाभाका झाल्या. राजीखुषीने, एकमेकांच्या इच्छेने, विवाहविधी पार पडला. ते दोघे एकमेकांचे जोडीदार, साथीदार बनले. अगदी थोड्या अवधीत त्यांनी केवढे मोठे बेत केले, किती भव्य स्वप्नं पाहिली आणि देवाससारख्या दूर ठिकाणी आपले भानुकुलाचे स्वप्न साकार करू शकले. सहवास आणि सहजीवन थोड्याच वर्षांचे. अशी पाखरे येती आणि स्मृती ठेऊनी जाती । दोन दिसांची रंगत संगत दोन दिसांची नाती !

राजयक्ष्म्यासारख्या दुर्धर रोगाने कुमारजी जर्जर झाले आणि अंथरूणाला खिळून पडले. गाणे तर एकदम बंद करावे लागले. भानुमती स्वत: संगीतप्रेमी असल्याने कुमारजींच्याकडेच संगीत शिकत होत्या. कुमारजींना सुयोग्य साथ देत होत्या. असा सुंदर सहप्रवास चालू असतानाच, त्यांच्या सुखी आणि संगीतमय संसाराला दृष्टच लागली आणि कुमारजी आजारी झाले. प्रतिभावंत, प्रज्ञावंत, विचारवंत असणारे कुमारजी गाण्याच्या परिस्थितीतच नव्हते. पडल्या पडल्या चिंतन, मनन, श्रवण, अवलोकन करीत करीत, भानुमतीचे सांगितिक विचार, प्रयोगांची कल्पना आणि ध्येयासक्ती ऐकू लागले. जिज्ञासा पूर्ण करण्याचा, ज्ञानार्जनाचा हा सोपा मार्ग त्यांना घ्यावा लागला. सकलामध्ये विशेष श्रवण । श्रवणाहुनी थोर मनन । मननाने होय समाधान । याचीच आत्मप्रचीति कुमारांना येऊ लागली. अगदी बालपणापासून ते लोकगीते, लोकधूने, समूहगीते, लोकसंगीत लक्षपूर्वक ऐकत होते. त्यामुळेच त्यांना वाटू लागले की सर्व प्रकारचे भारतीय संगीत लोकगीतांतूनच निर्माण झाले असावे. लोकसंगीतातील स्वरसौंदर्य, शब्दलाघव, भावपूर्णता, नाट्यमयता, लयबद्धता आणि सहजता कुमारजींनी अचूक टिपली. पडल्या पडल्या, आंतल्या आत गाण्याशिवाय अन्य तरणोपायच नव्हता त्यांना. मनातल्या मनात गाण्याचा सरावच झाला. अंतर्मनातील संगीत चिंतन !

११ व्या वर्षापासून कुमारजी अचानक गाऊ लागले. ध्यानीमनी स्वप्नीदेखील नव्हते.

कुमारजींचे वडील त्या लहान बालकाला काखेत घेऊन गांवोगांवी फिरू लागले. कोणत्याही गायकाची, कोणत्याही घराण्याची, गायकी ऐकून हा मुलगा त्यांची सही नक्कल करून सर्व श्रोत्यांना थक्क करून टाकीत असे. कोणतीही रेकॉर्ड ऐकून ते गाणे हुबेहूब गाऊन दाखवीत असे. आलापी, ताना, पलटे अशा काही घेत असे की ती नक्कल न वाटता, गायकाचे अस्सल गाणेच वाटे. लोकही भरभरून दाद देत. या बालकलाकाराला बक्षिसे देत. कितीतरी बिल्ले, बक्षिसे आणि पैसे मिळविले या शिवपुत्राने, नककल करता करता गहन विचार आणि सखोल चिंतन करू लागला हा शिवपुत्र. शिवपुत्राचे वडील सिद्रामप्पा यांचे कुटूंब मोठे होते. या शिवपुत्राला खांद्यावर बसवून अनेक ठिकाणी त्याच्या गायनाचे जलसे करीत सिद्रामप्पा. शिवपुत्राच्या गायन कौशल्याने लोक विस्मयचकित होत. भरपूर बिदागी देऊन आपला आनंद व्यक्त करीत असत. मिळालेले बिल्ले आपल्या कोटाला लावून अभिमानाने आणि डौलाने शिवपुत्र गायनाच्या मैफली गाजवीत असे.

अनेक घराण्यांच्या गायकांची गाणी शिवपुत्राने ऐकली-मैफलीत किंवा रेकॉर्डस्‌च्या मदतीने. पारंपारिक बंदिशी आपोआप पाठ होऊ लागल्या. ऐकलेल्या बंदिशींचे सौंदर्य वाढविण्यासाठी आवश्यक ते चिंतन, मनन, विचार मंथन करण्याची सवय शिवपुत्राने अंगी बाणवली असावी. अन्य मान्यवर गायकांच्यापेक्षा आपलं गाणं वेगळ्या पद्धतीचं असलं तरच आपण गायनाच्या क्षेत्रामध्ये मान्यता पावू शकू. अशा दृष्टिकोनाने शिवपुत्राला झपाटून टाकले असणार. शिवपुत्राने आपली गायनशैली सैद्धांतिक आणि वैचारिक बनविण्याचा ध्यास घेतला असणार. नादब्रह्मात दिवस रात्र गुंग-मग्न-धुंद राहण्यातच शिवपुत्राला ब्रह्मानंद मिळत असावा.

केवळ नक्कल करण्यात समाधान मानणारा नव्हता तो शिवपुत्र. आपण स्वयंभू आहोत याबद्दल शिवपुत्राची खात्री होती. स्वसामर्थ्याने, अखंड साधनेने, अविरत चिंतन-मनन करून तो शिवपुत्र गायक-नायक-प्रतिभावंत आणि सर्जनशील कलावंत होण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करू लागला. हाच होता शिवपुत्राचा स्वाध्याय आणि हीच तपश्चर्या. स्वरवेलीवर उमललेल्या कोवळ्या कोवळ्या कळीचे रूपांतर हळूहळू विकसित होत जाणाऱ्या, फुलत जाणाऱ्या सुंदर, चित्ताकर्षक, सुगंधी आणि सुरेल फुलामध्ये होत गेले असणार. उद्धरेत् आत्मना आत्मानम् । आत्मोन्नती-आत्मोद्धार करण्याचा निर्धार केला असणार त्या शिवपुत्राने. संगीताचा असीम महासागरच शिवपुत्राच्या मनःचक्षूसमोर दिसला असणार. आत्मशोधाचा आरंभ झाला असावा. भानुकुलामध्ये मी प्रवेश केला तेव्हां रात्रीचे ८ वाजून गेले होते. कुमारजी, ताई, मुकुल आणि पिन्नू जेवायलाच बसले होते. मला पहाताच कुमारजी आनंदाने म्हणाले, ‘या, या, मोहोळकर. हातपाय धुवा आणि आमच्याबरोबर जेवायला बसा’.

मी रात्रीचे जेवण सोडून दिले होते. रात्री जेवण करीत नव्हतो. पण कुमारजींना काय वाटेल अशा विचाराने मी हात पाय धुतले आणि जेवायला बसलो. कुमारजींनी माझी,

माझ्या प्रवासाची, हैदराबादमधील सर्व मित्रांची आस्थेने चौकशी केली, खुशाली विचारली. गप्पा मारीत, हास्य विनोद करीत, जेवण झाले. थोडा वेळ कुमारांशी बोलत बसलो.

रात्रीचे १० वाजत आले. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, हॉलमध्ये अंथरूण घालून तयार आहे. आता आपण विश्रांती घेऊ या'. आपण झोपू या, असं कुमारजी म्हणत नाहीत, हे लक्षात आलं माझ्या. मी हॉलमध्ये आलो. अंथरूण व्यवस्थित घातलेले दिसले. पांढरी स्वच्छ चादर, उशी, पांघरूण पाहून मला आनंद वाटला. कुमारजींनी हॉलमधील दिवा बंद केला आणि ते आल्या झोपण्याच्या खोलीत गेले. हॉलमधून त्यांच्या खोलीत जाण्याचा दुसरा दरवाजा होता. त्यांनी त्यांच्या खोलीचा दरवाजा बंद केल्याचा आवाज मी ऐकला. मी गादीवर पडलो व उशीवर मान टाकली. थोड्याच वेळात त्यांच्या खोलीतील दिवाही बंद झाल्याचे दिसले. मी झोपेची आराधना करीत पडून राहिलो.

अशी एक दोनच मिनिटे गेली असतील नसतील, तोच कुमारजींच्या खोलीतील दिवा लागलेला दिसला. मला आश्चर्य वाटले. कुमारजींनी दरवाजा उघडला. मला म्हणाले, 'मोहोळकर, तुमच्या उशीखाली ओडोमस ठेवले आहे, ते लावा म्हणजे डासांचा त्रास होणार नाही'. एवढंच सांगून त्यांनी दरवाजा लावला आणि दिवा मालवला.

इकडं माझी अवस्था मोठी कठीण झाली. मी अक्षरशः गलबलून गेलो. मी माझ्या मनाला विचारले, 'अरे, कोण रे तू ? एक सर्वसामान्य माणूस. एवढा मोठा हा विख्यात गायक तुझी किती काळजी घेत आहे. आतिथ्यशील माणूस.' या विचारांनी माझा जीव कासावीस झाला. न कळत माझे डोळे वाहू लागले. उशी भिजून गेली माझी. अतिथि देवो भवं. अशाच वृत्तीने आचरण करणारे कुमारजी मला महामानवच वाटले.

सकाळी सहाच्या सुमारास मला जाग आली- कानावर पडणाऱ्या सुरेल आणि शांत-स्वरांनी. मी जागा आहे की स्वप्नातच गाणं ऐकतोय, हेच समजेना मला.

तेवढ्यात कुमारजी हॉलमध्ये आले. मला म्हणाले, 'त्या दुसऱ्या खोलीत ताईचा रोजचा रियाझ सुरू झाला आहे. दरवाजा लावून घेतला आहे. मी तिला अनेकदा बजावले की रियाझ करीत असताना दरवाजा लावून घेण्याची मुळीच जरूरी नाही. गायनाचा आम्हाला कधीही त्रास होत नाही'. असं म्हणून कुमारजी गेले बागेत. थोडा वेळ त्या स्वरांच्या आनंदात पडून राहिलो. उठून चादरीची, पांघरूणाची घडी करून ठेवली. गादी गुंडाळून ठेवली. सकाळचे कार्यक्रम सुरू झाले.

प्रातर्विधी झाल्यानंतर मी आणि कुमारजी चहा घेण्यासाठी टेबलावर बसलो. सौ. ताईंनी चहा आणला. वाफाळलेला आणि टेसदार चहा आम्ही घेऊ लागलो. चहाचा कप घेऊन मी हलकेच उठलो. चहाचा घोट घेत घेत मी स्वयंपाक घरात गेलो. तयारी चालली होती नाश्त्याची. कुमारजींना ऐकू न जाईल अशा हळू आवाजात मी ताईंना विचारले, 'ताई, लिंबू आहे का ?' खबरदारी घेऊनही माझे शब्द कुमारजींनी ऐकले. चटकन कुमारजींनी चौकशी केली, 'कां मोहोळकर, लिंबू कशाला पाहिजे ? पोट बिघडले की

काय ?' मग मात्र मला सारा खुलासा करावाच लागला. मी त्यांना म्हणालो, 'मी रात्री जेवीत नसतो. काल रात्री आपण मला जेवायला चला असं म्हणताच जेवावयास बसलो. आपली इच्छा मोडू नये म्हणून मी जेवलो. माझे पोट बिघडले. एक ग्लास सरबत घेतले की मला बरे वाटेल. कुमारजींनी ताबडतोब ताईंना बजावले, 'बा, आजपासून रात्री जेवण्याचा आग्रह करायचा नाही, मोहोळकरांना. आपल्या घरी आलेल्या व्यक्तीला त्रास होता उपयोगी नाही.' मी निर्धास्त झालो. त्यानंतर कधीही रात्री जेवण्याचा आग्रह झाला नाही. अतिथीचे स्वास्थ्य बिघडू नये यासाठी जागरूक असणारे कुमारजी ! कुमारजींचे कान अतिशय तीक्ष्ण असल्याचा अनुभव आला.

थोडा वेळ बागेमध्ये इकडे तिकडे भटकत होतो मी. कितीतरी प्रकारची फुल-झाडे पहात होतो. वेली चांगल्याच वाढलेल्या दिसल्या. आम्ही आत आलो. कुमारजी म्हणाले, 'चला मोहोळकर, नाश्त्याच्या पूर्वीच स्नान करून घ्या. गरम पाणी काढलेय'.

टॉवेल वगैरे घेऊन मी बाथरूममध्ये गेलो. पाणी कढत होते. मी छानपैकी स्नान केले. तेल लावून केस विंचरीत असतांनाच, एक पंचा घेऊन कुमारजी गेले बाथरूममध्ये. बाथरूममधील फरशीवर पडलेले पाणी पंचाने टिपून घेऊन, पंचा पिळून, फरशी कोरडी करीत होते कुमारजी. मी पाहातच राहिलो. स्वच्छतेची त्यांची आवड लक्षात आली. एक नवाच धडा शिकण्यास मिळाला.

नाश्त्यानंतर मी कुमारजींना म्हणालो, 'कुमारजी, आपली गांधी मल्हारची रेकॉर्ड ऐकण्याची इच्छा आहे. केव्हां ऐकायला मिळेल ?' कुमारजी म्हणाले, 'वाहवा, छान. आत्ता ऐकवतो तुम्हाला माझा गांधी मल्हार', असं म्हणून कुमारजी रेकॉर्ड प्लेअरच्या समोर बसले. आपल्या खांद्यावरील पांढऱ्या स्वच्छ कपड्याने त्यांनी प्रथम रेकॉर्ड प्लेअरवरची धूळ साफ केली. कित्येक दिवसात रेकॉर्ड प्लेअर वापरला नसावा. म्हणून तो व्यवस्थित साफ केला. मग एकेक रेकॉर्ड बाहेर काढून, कपड्याने दोन्ही बाजू नीट पुसून जॅकेटमध्ये ठेवण्यास सुरूवात केली. स्वच्छतेत जवळजवळ एक तास गेला. माझ्याकडे वळून कुमारजी म्हणाले, 'बऱ्याच दिवसानंतर रेकॉर्ड प्लेअर आणि रेकॉर्डस् साफसूफ करण्याची वेळ आली. करून टाकली हातासरशी, वेळ वाया न घालविता, वेळेचा सदुपयोग करण्याचा त्यांचा हा स्वभाव फार आवडला. त्यानंतर गांधी मल्हार मन लावून ऐकता आला.

दुसरे दिवशी नाश्त्यानंतर कुमारजी म्हणाले,'या मोहोळकर, आज तुम्हाला उत्तम रीतीने रेकॉर्ड केलेला त्रिवेणी ऐकवतो'. माझा आनंद गगनात मावेना. सूरदास, मीरा आणि कबीर यांच्या निवडक भजनांवर आधारित कुमारजींचा अतिसुंदर कार्यक्रम म्हणजे त्रिवेणी, असं ऐकून होतो. त्यांनी त्रिवेणीची कॅसेट सुरू केली व ते नेहमीप्रमाणे बागेत गेले. कॅसेटच्या सुरूवातीला राहुल बारपुते यांची प्रस्तावना होती. राहुल हे कुमारजींचे जिवलग मित्र आणि गंडाबंधित शिष्य. त्यानंतरची भजने होती अत्यंत भावार्द्र, सुरेल आणि भक्तिभावाने भरलेली. कुमारजींना सुरेख साथ दिली होती ताईंनी. तन्मयता, तल्लीनता

आणि तादात्म्यता यांचा आगळाच अनुभव आला. कॅसेटची एक बाजू केव्हां संपली हे समजलेच नाही. बागेत फेरफटका मारत असताना कुमारजीम्हणाले, कान सुरू केलेल्या कॅसेटकडेच असावेत.' कुमारजींनी ती कॅसेट काढली, केसमध्ये ठेवली. जागच्या जागी ठेवून दिली. मी आवाक् होऊन पहात असतानाच कुमारजींनी स्पष्टीकरण केले, 'मोहोळकर, माझ्या घरी आलेल्या रसिक श्रोत्याला मी माझी कॅसेट पूर्ण ऐकवीत नाही. कारण माझी अशी इच्छा असते की त्याने कॅसेटचा दुसरा भाग ऐकवीत नाही. कारण माझी अशी इच्छा असते की त्याने कॅसेटचा दुसरा.भाग ऐकण्यासाठी माझ्या घरी परत यावे.' मी विस्मयचकित होऊन बघू लागलो. कुमारजींच्या अंतर्हेतूविषयी मला कौतुकमिश्रित आनंद झाला. रसिक मित्राने पुन्हा आपल्या घरी यावे, याच केवळ हेतूने केलेली, कुमारजींची नामी युक्ती ! खरोखर अशी सदिच्छा बाळगणारी किती माणसे असतील या जगात ?

कुमारजी मला म्हणाले, 'मोहोळकर, आपण इंदोरला चिंचाळकर गुरूजींच्या भेटीसाठी जाऊ या'. आम्ही तयार झालो. कुमारजींची टॅक्सी ठरलेली असते. त्यांनी ती बोलावून घेतली. टॅक्सीत आम्ही दोघेच होतो. टॅक्सी इंदोरला जाण्यास निघाली. गप्पा मारता मारता मी म्हणालो, 'कुमारजी, आपण त्रिवेणी हा कार्यक्रम, केवळ इतर गायक गातात तशी भजने ऐकविण्यासाठी दिलेला वाटत नाही'. कुमारजींना आश्चर्याचा धक्काच बसला. माझ्याकडे रोखून बघत त्यांनी विचारले, 'म्हणजे, तुम्हाला काय म्हणायचे आहे, मोहोळकर?' मी म्हणालो, 'अनेक गायक भजने म्हणतात. पण सूदरास, मीरा, कबीर यांच्या भजनांचा आपला हा त्रिवेणी कार्यक्रम काही हेतू मनात ठेवून, आपण सादर केला असावा, असंच वाटतं मला'. कुमारजी यांनी कबुलीच दिली. 'होय मोहोळकर, एका खास हेतूनेच मी हा कार्यक्रम सादर केला आहे. प्रत्येकाच्या भक्तीमध्ये फरक आहे. सूरदास आहे अगदी चापलुशी, तो सारे काही मागतो आपल्या भगवंताला-स्वत:साठी. मीरा ही समर्पित भावनेने, भगवंताची प्रशंसा करते. तिला मागायचे काहीच नाही: ती कृष्णाशी एकरूपच होऊन गेलीय. खरा निरपेक्ष, नि:स्वार्थी भक्त आहे तो कबीर. तो भगवंताला जे काही मागतो, ते सर्व स्वत:साठी नाही, तर संपूर्ण मानवतेसाठीच ! मानवतेचे कल्याण हाच त्याचा अंतर्हेतू'. मी हलकेच विचारले, 'आपला हा मर्मग्राही हेतू, राहुलजींच्या प्रास्ताविकातून रसिक श्रोत्यांना जाणवतो काय ?' कुमारजी म्हणाले, 'व्वा मोहोळकर, तुम्ही त्रिवेणीचा एक भागच, पण अत्यंत लक्षपूर्वक आणि एकाग्रतेने ऐकलेला दिसतो. माझा हा हेतू राहुलच्या प्रास्ताविकातून स्पष्ट होत नाही, हे अगदी खरं आहे'. माझ्या मनात विचार आला, की राहुलजी हे कुमारजींचे गंडाबंधित शिष्यच असल्याने, ते आपल्या मर्यादा ओळखतात. खोलामध्ये जाऊन कुमारजींचा अंतर्हेतू विचारण्याचे धाडस करणार कसे ? असं विचारल्याशिवाय कुमारजी मनमोकळे करून बोलत नाहीत, हें माझ्या लक्षात आले. कुमारजींच्या स्वभावाचे आणखी एक वैशिष्ठ्य !

थोड्याच वेळात आमची टॅक्सी चिंचाळगुरुजींच्या घरासमोर थांबली. परत

जाण्यासाठी कुमारजींनी टॅक्सी थांबवून ठेवली. गुरूजींची ही माझी पहिलीच भेट. आमचा परिचय करून दिला कुमारजींनी. मनमोकळ्या गप्पा सुरू झाल्या. गुरूजींनी अनेक वस्तू दाखविल्या मला. निसर्गातील अनेक टाकून दिलेल्या वस्तूंची कौशल्याने, कल्पकतेने वेगवेगळ्या रचना करून, त्यांतून सुंदर, रेखीव, आकर्षक चित्राकृती तयार करण्यात गुरूजी निष्णात होते. त्यांनी घरात ठेवलेल्या, जमा केलेल्या, व्यवस्थित जोडलेल्या सुंदर वस्तू पाहून थक्क झालो मी. तो सारा अजबखानाच वाटला मला. केवळ अदभूत आणि अतिसुंदर! Fantastic !!

बोलता बोलता गुरूजींना एकदम आठवण झाली. आत जाऊन त्यांनी एक लांब आणि छान वेळू आणला. कुमारजींना असा वेळू हवा होता. कुमारजींचे पुण्यातील खास स्नेही शरश्चंद्र चिरमुले, त्या वेळूपासून बासरी करणार होते. कुमारजी एकदम खुष झाले तो वेळू पाहून. गप्पा रंगत गेल्या. चहापाणी झाले. आम्ही दोघे टॅक्सीने देवासला परत निघालो.

स्वयंपाक घरात ताई स्वयंपाक करून तयार होत्या. आम्ही सर्वजण टेबलावर येऊन बसलो. गरम गरम पोळी आम्हाला अर्धी अर्धी वाढीत होत्या. पानामध्ये होती तीन चार प्रकारची लोणची, काकडी, बीटरूट, कांदा, मुळा, गाजर इत्यादि. सॅलॅडची कुमारजींना अतिशय आवड होती. भाजी, आमटी, चटणी असायचीच. साग्र संगीत बेत असायचा रोजच. मला नेहमी वाटायचे की मीच फार सावकाश, चवीने, स्वाद घेत घेत जेवतो. पण माझे आजोबा शोभतील असे होते कुमारजी. अत्यंत सावकाश, मन लावून, प्रसन्न मनाने, प्रत्येक पदार्थाचा स्वाद घेत घेत जेवणारे कुमारजी पाहून मला खूप बरे वाटले. सर्व काही करायचे या पोटासाठी. मग जेवतानांच घाई कशाला ? वचावचा जेवण्यात काय अर्थ ? कुमारजींच्या घरी टेबलावर जेवण चाले-मस्त गप्पा मारीत-कमित कमी दीड तास !

पोटभर जेवण झाले माझे. मला वाटले की इतके जेवण झाल्यानंतर कुमारजी आपल्या खोलीत जाऊन वामकुक्षी घेतील. पण ते अंगणातील एका कोपऱ्यात बसलेले पाहून मला खूप आश्चर्य वाटले. कुतूहलाने मी जवळ जाऊन पाहू लागलो. गुरूजींनी दिलेल्या वेळूला तेल लावण्यात मग्न झाले होते कुमारजी. मला जवळ आलेले पाहून ते म्हणाले, 'मोहोळकर, हा वेळू मला पुण्याला घेऊन जायचा आहे. प्रथम मी जाणार आहे दिल्लीला. तेथून येणार मुंबईला. त्यानंतर पोंचणार पुण्याला. अगोदरच हा वेळू वाळलेला आहे. उन्हामुळे तो तडकू नये म्हणून मी वेळूला तेल लावतोय.' आपल्या मित्रासाठी घेतलेला वेळू व्यवस्थित राहावा, त्याची बासरी उत्तम व्हावी, म्हणून इतकी दक्षता घेणारे कुमारजी !

दुपारच्या चहाची वेळ असे चारची. मी सहज गेलो स्वयंपाकघरामध्ये. ताईंशी गप्पा मारता मारता, सकाळी टॅक्सीतून जाताना, इंदोरच्या वाटेवर, केलेल्या गप्पा आणि चर्चा त्यांना सांगितल्या. आनंद दर्शवीत ताई म्हणाल्या, 'मोहोळकर, तुम्ही खरोखरच फार नशीबवान आहांत. कुमारजी इतके मोकळे सहसा कधीच नसतात. कुठला तरी नवीन

कार्यक्रम समोर असतो. त्याच्या तयारीमध्ये कुमारजी व्यस्त आणि व्यग्र असतात. कुमारजी विचारमग्न असतात. मनमोकळ्या गप्पांना सवडच नसते. त्रिवेणीविषयी कुमारजी तुमच्याशी खूपच मन मोकळे करून बोलले. इतकं ते कुणाशीच बोलत नाहीत'.

दुसरे दिवशी सकाळी ८ च्या सुमारास फोनची घंटी वाजली. फोन घेतला कुमारजींनी. बडोद्याहून माधव आचवल यांचा फोन होता. माधव आचवल आणि त्यांचे एक मित्र १०-१०॥ पर्यंत कुमारांच्या भेटीसाठी येणार होते. कुमारजी म्हणाले, 'आनंद आहे. या, या दोघेही अवश्य या. आम्ही वाट पहातो. जेवायला थांबणार ना ?'

कुमारजींच्या हॉलमध्ये बेथोवेनचा फोटो पाहून मला आश्चर्य वाटले. मी चौकशी केली. याच माधव आचवलने जर्मनीतून येताना खास कुमारसाठीच तो फोटो आणला होता. हॉलमध्ये दुसरा फोटो होता नारायणराव बालगंधर्व यांचा. कुमारजींच्या झोपण्याच्या खोलीत फक्त एकच फोटो दिसला. शास्त्रीय संगीतातील गौरीशंकर म्हणून एकमुखाने गौरविल्या गेलेल्या गानमहर्षी - उस्ताद अल्लादिया खाँ यांचा. सकाळी डोळे उघडताच दर्शन व्हायचे अल्लादियाखाँसाहेब यांचेच. असाच लावला होता तो फोटो भानुकुलमध्ये. एवढे तीनच फोटो दिसले.

१०॥ च्या सुमारास माधव आचवल आणि त्यांचे एक मित्र आले, त्यांचा व माझा परिचय करून दिला कुमारजींनी. चहापाणी झाले. माधव आचवल म्हणाले, 'कुमार, तुझी त्रिवेणी ऐकण्याची इच्छा आहे. खास त्यासाठीच माझे हे स्नेही आले आहेत.' कुमारजींनी माझ्याकडे पाहून स्मित केले. माझ्या ध्यानात आले याचे कारण. त्रिवेणी ऐकण्याची ही संधी मला पुन्हा प्राप्त झाली.

कुमारजींनी कॅसेट काढली आणि सुरू केली. नेहमीप्रमाणे कुमारजी बाहेर गेले. आम्ही एकाग्र चित्ताने त्रिवेणीतील भक्तिगीताचा आनंद घेऊ लागलो. कॅसेटची एक बाजू संपता संपताच कुमारजी आले. त्यांनी कॅसेटची दुसरी बाजू लावली. हसून ते म्हणाले, 'मोहोळकर , तुम्ही नशीबवान आहात. संपूर्ण त्रिवेणी ऐकायला मिळत आहे तुम्हाला.' खरोखरच मी भाग्यवान असलो पाहिजे. प्रसन्न मनाने मी हसलो. त्रिवेणीचा संपूर्ण कार्यक्रम ऐकण्याचे भाग्य मला मिळाले. त्रिवेणीचा पहिला अर्धा भाग तर दोनदा ऐकण्याचा योग आला.

स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, व्यवस्थितपणा, आकर्षक कपडे, अतिथीचे स्वागत, बोलण्यातील सौजन्य, वागण्यातील सौहार्द, मैत्रीतील निरपेक्षता या सर्वच बाबतीत कुमारजींची बरोबरी करणाऱ्या व्यक्ती अतिशय दुर्मीळ. कुमारजींनी आपल्या सर्व कॅसेटस क्रमाने लावलेल्या स्पष्ट दिसल्या. कोणतीही कॅसेट नेमकी चटकन काढू शकत असत. त्यांच्या चेस्ट ऑफ ड्रॉवर्सला चार कप्पे होते. कोणत्या कप्प्यात काय आणि कुठं ठेवले आहे हे त्यांच्या लक्षात असे. कपड्यांच्या आपल्या बॅगा ते स्वत:च व्यवस्थित भरून ठेवीत असत. उत्तम इस्त्री केलेले स्वच्छ कपडे नीट घड्या घालून ठेवण्याचे त्यांचे काम

पाहूनच त्यांच्या व्यवस्थितपणाची सहज कल्पना आली मला. वापरायचे कपडे, शाल, उपरणे यांवर एकही सुरकुती नसे.

एके दिवशी सकाळी गप्पा मारतांना मी कुमारजींना म्हणालो, 'कुमारजी आपले गुरूजी प्रा. देवधर यांनी ताईंना लिहिलेले पत्र मला पहायला मिळेल काय ?' नेहमीप्रमाणे कुमारजी मिष्किल हसले आणि त्यांनी चेस्ट ऑफ ड्रॉवर्सचा एक कप्पा उघडला. दोन फायली बाहेर काढून बाजूला ठेवल्या. तिसरी फाईल हातात घेतली. त्या फाईलमधील ते पत्र काढून माझ्या हातात दिले. एकदीड मिनिटही वेळ लागला नाही त्यांना. कोणती वस्तू कुठं ठेवली आहे, हे पक्के ध्यानात ठेवणारे नीटनेटके कुमारजी ! नियमित रियाझाविषयीचे ते पत्र होते देवधरांनी लिहिलेले.

सौ. वसुंधराताईंनी एका मुलाखतीमध्ये स्पष्ट सांगितले होते की कुमारजी नियमित रियाझ करीत नाहीत. त्यांना अशा रियाझची आवश्यकता वाटत नाही. ते मनातल्या मनात सतत गातच असतात. लय-तालाचे भान ठेवूनच हे गाण्याचे चिंतन अखंड चाललेले असते. गुरूजींचा आक्षेप होता या सौ. ताईंच्या विधानावर. सर्व गायक नियमितपणे रोजच रियाझ करीत असतात. त्यांना रियाझाची आवश्यकता वाटते आणि कुमारजींना रियाझाची जरूरीच नसते. असं का ? कुमारजींच्या बरोबर जात असतांना, त्यांच्या तोंडून 'व्वा', 'क्या बात है' अशं ऐकायला येते. मनामध्ये चालू असलेल्या गाण्यातील एखाद्या सुंदर जागेला दिलेली ती दाद असते. कधी कधी एखाद्या बंदिशीचे चिंतन मनामध्ये चालू असते. ती बंदिश व्यवस्थित जमल्याबरोबर त्यांच्या मुखातून 'क्या बात है' असा सहजोद्गार निघून जातो. जीवघेण्या आजारात कुमारजी अंथरूणाला खिळून होते. तेव्हापासून त्यांना असं आतल्या आत गाणं म्हणण्याची सवय लागली असावी. सतत गाण्यामध्ये दंग असणारा, अखंड चिंतन करीत राहणारा हा गायक !

दोनतीनच इयत्ता शिकलेल्या कुमारजींनी आचार, विचार, उच्चार याबद्दल सखोल चिंतन केले असावे. अखंड वाचन, चिंतन, मनन करून ते खूपच प्रौढ बनत गेले असावेत. गाढा अभ्यास, प्रचंड व्यासंग करून त्यांनी ज्ञानार्जनाची तीव्र इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्नवाद सोडला नसावा. विचारांची परिपक्वता आली आणि ते चतुर, चाणाक्ष आणि चतुरस्त्र बनले असावेत. अगदी नवीन समीक्षाग्रंथ वाचण्याची त्यांची सवय पाहूनच चकित होतो आपण. ललित मासिकाचा ताजा अंक असतो त्यांच्याजवळ. हैदराबादमध्ये त्यांनी आपली बॅग उघडताच माधव अचवल यांचे नवीनच प्रकाशित झालेले, समीक्षात्मक 'किमया' हे पुस्तक पाहून मला आश्चर्याचा धक्काच बसला. स्वाध्याय आणि आत्मचिंतन ही त्यांची खास वैशिष्ट्ये वाटतात मला. संगीतशास्त्राचा त्यांनी सखोल, सूक्ष्म अभ्यास केला होता. त्यांचे वाचन अद्यावत असे. म्हणूनच कुमारजींनी आपली बुद्धिमत्ता, प्रतिभा आणि प्रज्ञा यांना धार आणली होती. कोणत्याही गहन प्रश्नाचे उत्तर ते एकदोनच शब्दात देऊ शकत असत. ही गोष्ट वाटते तितकी सोपी नसते.

इतके चपखल शब्द त्यांना कसे सुचत असतील, हाच प्रश्न पडे माझ्या मनाला. संगीत साधनेबरोबरच त्यांनी आपली सर्वांगांनी प्रगती आणि उन्नती साधली. संगीत, साहित्य, सर्व ललितकला, अभिजात कलांमधील सौंदर्याचा आस्वाद घेण्याची वृत्ती त्यांनी जोपासली. गुरूकडून मिळालेल्या दृष्टीमुळेच तर सर्व कलांमध्ये रस घेऊ शकत होते. गुरूजींचे ऋण मान्य करूनही त्यांचा स्वप्रयत्नावर दृढ विश्वास होता. दांडगा आत्मविश्वास, जबर शशक्ती, जगावेगळी इर्षा आणि विलक्षण चिकाटी यामुळेच ते श्रेष्ठ गायक आणि नायक बनू शकले. मला तरी असं वाटते की अनेक जन्मांचे संचित आणि सुकृत घेऊनच ते जन्माला आले असावेत. क्रमिक शिक्षण न घेता त्यांनी आपला सर्वांगांनी उत्कर्ष साधला. सूरदास, मीराबाई, कबीर, तांबे, तुलसीदास, बालगंधर्व, वेगवेगळे ऋतू. टप्पा, ठुमरी, तराणा याबद्दलचे वाचन सखोल केल्याशिवाय त्यांना आपले सांगीतिक प्रयोग सादर करता आले नसते. कुमारजींना संगीतामधील 'प्रश्नचिन्ह', 'उद्‌गारचिन्ह' किंवा '१०० वर्षानंतरचे गायन आज गाणारा गायक' असे म्हटले जाते.

एके दिवशी मी आणि कुमारजी देवासमधील रस्त्यांवरून सहज फिरत होतो. पांढरा स्वच्छ पायजमा, रेश्मी झब्बा, गळ्याभोवती सुंदर उपरणे आणि हातात चांदीची मूठ असलेली काठी यामुळे कुमारजींचे सौंदर्य दुणावले. आम्ही बोलत बोलत चाललो होतो. एका क्षणी माझ्या लक्षात आले की कुमारजी माझ्याबरोबर नाहीत, मागेच रेंगाळले आहेत. मी मागे वळून पाहिले. कुमारजी एकचित्ताने काही तरी ऐकत असावेत असं जाणवलं. मी त्यांच्याजवळ गेलो. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, ऐका, तांब्यापितळेची भांडी बनविणारा तो तांबट कसा आपला हातोडा, एका विशिष्ट लयीत ठोकतो आहे.' आपल्या दैनंदिन जीवनामध्ये आपल्या अवतीभोवती, लयीचे अनेक प्रकार चालूच असतात. पण ती लय अचूक टिपण्यासाठी आपले कान तयार लागतात. धोबी दगडावर कपडे आपटतो, सोनार ऐरणीवर ठकठक करतो, रेलगाडी रूळावरून जाते, या शर्व ठिकाणी विशिष्ट लय असलेली ऐकू येते. सर्वसामान्यांचे लक्ष जात नसते अशा आवाजातील लयीकडे. कुमारजींचे तीक्ष्ण कान ते स्वर, तो ध्वनी, ती लय अचूक टिपतात !

माझ्या भानुकुल मधील वास्तव्यात मी चि. मुकुलशी बरीच जवळीक साधली. त्याची आस्थेने, आपुलकीने, प्रेमाने सारी चौकशी केली. त्यावेळी तो नववीत असावा. कुमारजींनी त्याला माझा परिचय करून दिलाच होता. मी शिक्षक आहे आणि शैक्षणिक कोर्सेसची मला चांगली माहिती आहे, असंही कुमारजींनी त्याला सांगितले. माझा सल्ला घेण्याविषयी त्याला सुचविले होते. त्याच्याशी बोलत बोलत मी त्याच्या पुढील शिक्षणाविषयी विचारून घेतले. त्याला खूप समाधान वाटले.

एके दिवशी संध्याकाळी कुमारजींनी त्याला देवीच्या दर्शनासाठी मला घेऊन जाण्यास सांगितले. आम्ही दोघे देवीच्या देवळाकडे निघालो. माझ्याशी तो मन मोकळे करून बोलू लागला. बोलता बोलता भावपूर्ण शब्दात तो म्हणाला, 'मोहोळकरकाका, बाबांना

भेटण्यासाठी कितीतरी लोक नेहमी येत असतात. पण माझी कुणीही फारशी चौकशी करीत नाहीत. माझ्याशी फारसं बोलतही नाहीत. याला एकमेव असा अपवाद फक्त तुमचा. तुम्ही माझी आपुलकीने चौकशी केलीत. माझा अभ्यास, आवडीनिवडी, माझे छंद, गायन याबद्दल आस्थेने चौकशी केलीत. तुमच्यापाशी मी माझं मन मोकळं केलं. फार फार बरं वाटलं मला.' मुकुल भारल्यासारखा वाटला मला. मी त्याच्याबरोबर केलेल्या सहज संवादामुळे तो गलबलून गेला. मोठ्या, लोकप्रिय आणि प्रसिद्ध व्यक्तीच्या घरातील लहान मुलांना, त्यांची होणारी उपेक्षा, त्यांच्याकडे होणारे दुर्लक्ष, यामुळे अंतःकरणाची टोंचणी आणि वाटणारी खंत सहन करावीच लागते.

चि. मुकुल हा कै. भानुमतीचा - कुमारजींच्या प्रथम पत्नीचा ज्येष्ठ पुत्र. चि. पिन्नू - कलापिनी ही कुमारजींच्या द्वितीय पत्नी - सौ. वसुंधराताई यांची एकुलती एख मुलगी. मी देवासला गेलो तेव्हा ती खूपच लहान होती. तिचा आवाज चांगला असल्याचे कुमारजी मला म्हणाले होते. एकदा मी तिला गाणं म्हणण्याचा आग्रह केला. कुमारजींनी देखील गाणं म्हणण्यास सांगितले. रागावर आधारित असलेले एक गाणं तिनं म्हटलं. तिचा आवाज मधुर होता. तिला लय-तालाचेही चांगले ज्ञान आहे, हे माझ्या लक्षात आले.

एके दिवशी सकाळी १० च्या सुमारास कुमारजी मला म्हणाले, 'मोहोळकर, चला त्या आऊटहाऊसच्या माडीवर. आजपासूनच मी चि. मुकुलला संगीत गायनाचे धडे देण्यास आरंभ करणार आहे.' मी ताबडतोब माडीवरच्या खोलीत प्रवेश केला. तानपुरा, तबला डग्गा अगोदरच ठेवलेले दिसले. चि. मुकुल वर आला. पाठोपाठ कुमारजी आले. गुरूशिष्य समोरासमोर उभे राहिले. चि. मुकुलने आपल्या पित्याला - गानगुरूला खाली वाकून नमस्कार केला. प्रसन्न मनाने गुरूने आशीर्वाद दिला. विलोभनीय दृश्य होते ते, मी अगदी भारला गेलो.

गुरू-शिष्य समोरासमोर बसले. चि. मुकुल तानपुरा छेडू लागला. डग्गयावर ताल देणार होते कुमारजी. कुमारजींनी आलाप सुरू केले. ते ऐकून चि. मुकुल तीच आलापी करू लागला. थोड्या वेळानंतर कुमारजी म्हाले, 'मुका, माझ्यासारखं गायचं नाही. मी जे गातो आहे, ते तू तुझ्या आवाजात गा. माझी नक्कल करायची नाही.'

गुरूने शिष्याला दिलेली ही पहिलीच सूचना किती मोलाची आहे. प्रत्येकाने आपल्या पट्टीत गावे. गुरूचे हातवावे, अंगविक्षेप इत्यादि गुरूच्या लकबींचे अनुकरण करू नये. आपल्या आवाजात, आपल्या कुवतीप्रमाणे गावे. तरच तो शिष्य आपले अस्सल गाणे गाऊ शकतो. त्याचे स्वतःचे गाणे तयार होऊ लागते. अनेकांना या सूचनेचे मोल कळतच नाही. गुरूची सहीसही नक्कल करण्यातच शिष्याला धन्यता वाटते. त्यामुळे गुरूने केलेले हातवारे, अंगविक्षेप, तोंड वेडेवाकडे करण्याची गुरूची पद्धत याचीच नक्कल करण्याचा आटापिटा शिष्य करीत राहतो. हे अगदी चूक असते.

होळीच्या दिवशी पुरणपोळीचा झकास बेत केला होता ताईंनी. पानात वाढलेले

पदार्थ पाहूनच मन फुलले. ताईंनी तव्यावरून काढलेली गरमागरम पोळी माझ्या पानात वाढली. तुपाचे भांडे जवळच होते. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, पोळीवर तूप घ्या- त्या भांड्यातील.' मी दोनतीन चमचे तूप वाढून घेतले पोळीवर. कुमारजी हसत हसत खुर्चीवरून उठले. स्वतःच्या हाताने भांड्यातील लोणकढ तूप माझ्या पानातील पोळीवर भरपूर ओतले. ते म्हणाले, 'मोहोळकर, पोळी भिजली पाहिजे तुपाने, तरच पोळी खाण्याची खरी लज्जत.'

कित्येक वर्षात इतके तूप पोळीवर घेतले नव्हते. आमच्या सोलापूरच्या घरी तुपासाठी खास वाट्या होत्या. भरपूर तूप घेतल्याशिवाय पुरणपोळी खाता यायची नाही त्यावेळी.

संध्याकाळी कुमारजी म्हणाले की, आपल्याला रात्री महूला जायचे आहे. रात्री ९॥ वाजता एका ठिकाणी त्यांच्या गायनाचा कार्यक्रम ठरला होता. कार्यक्रम १२ वाजता संपणार होता. त्यानंतर महू येथूनच कलकत्त्याला जाण्यासाठी मला गाडी होती. कलकत्ता तेथील महाराष्ट्र मंडळाच्या रौप्य महोत्सवानिमित्त कार्यक्रम होणार होता तीन दिवस. हैदराबादच्या महाराष्ट्र मंडळाचा प्रतिनिधी म्हणून मी कलकत्याला जाणार होतो.

रात्री ८ च्या सुमारास पांढरे स्वच्छ धोतर आणि रेशमी झब्बा घालून कुमारजी तयार झाले. पायजमा,- नेहरू शर्ट घालून मी तयार झालो. मग कुमारजींनी विचारले, 'काय मोहोळकर, अत्तर कोणते आवडते ?' मला प्रश्नच पडला. अत्तराचा शौक कधी केलाच नव्हता. आठवले म्हणून सांगितले - हीना. कुमारजींनी कपाट उघडले. आतमध्ये अत्तराच्या अनेक बुधल्या ओळीने लावल्या होत्या. मी तर पहातच राहिलो. सर्व प्रकारच्या अत्तरांचा शौक कुमारजींना होता. मैफलीस जातांना सुगंधी वातावरण निर्माण करण्याची त्यांना आवड असावी. कुमारजींनी हीन्याची बाटली काढली. बूच काढून ठेवले. सवयीप्रमाणे मी माझ्या डाव्या हाताचे मनगट समोर केले- अत्तर लावून घेण्यासाठी. कुमारजींनी मग बाटलीतील अत्तर डाव्या तळहातावर ओतले- आपण खोबरेल तेल घेतो तसे. बाटली खाली ठेवली. दोन्ही तळहात एकमेकांवर चोळले. माझ्या नेहरू शर्टावर आपले हात वरपासून खालपर्यंत नेऊन अत्तर चोपडले. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, अशीच पद्धत असते आम्हा मध्यप्रदेशातील शौकिनांची.' मी थक्क होऊन पहातच राहिलो. अत्तराच्या घमघमाटाने धुंद झालो. अशा प्रकारे अत्तर लावण्याचा हा माझा पहिलाच अनुभव - कदाचित शेवटचाच. विविध प्रकारच्या सुगंधी अत्तरांचा शौक करणारा हा हौशी गायक !

टॅक्सीने आम्ही दोघे महूला निघालो. एका हॉलमध्ये होती गाण्याची मैफल. नेहमीप्रमाणेच कुमारजींचे गाणे छान झाले. तबल्यावर होते कुणी खरगोंडकर. कुमारांना तालामध्ये एक मात्राही कमी जास्त चालत नाही. अनेक ठिकाणी कुमारजींनी साथीदाराला मात्रा मोजण्यासंबंधी ताकीद दिली. त्यामुळे तबल्याची साथ म्हणावी तशी नसल्याने गाण्याची रंगत कमी झाली होती.

गायनानंतर कुमारजींच्यासाठी खास भोजनाची व्यवस्था केली होती. मी रात्री जेवत

नसल्यामुळे हॉलमध्ये एकटाच बसून राहिलो. कुमारजींचे जेवण झाले आणि ते हात-तोंड धुवून, टॉवेलने हात पुसतच हॉलमध्ये आले. कुमारांना पाहून मी उभा राहिलो. माझ्या खांद्यावर हलकाच हात ठेवून, मला हॉलच्या दुसऱ्या टोकाला नेऊन, मृदु आवाजात मला विचारले, 'मोहोळकर, खर्चासाठी पुरेसे पैसे आहेत ना ? प्रथमच देवासला, महूला आलात. येथून जाणार आहात कलकत्त्याला. तेथून मग हैदराबादला. लांबचा पल्ला आहे. माझी ही पद्धतच आहे. माझ्या घरी प्रथमच आलेल्या स्नेह्याला तो परत जातांना विचारतो मी पैशाबद्दल.' पुरेसे पैसे आहेत, असं मी त्यांना सांगितले. अशा प्रकारे आपल्या प्रेमी स्नेह्याला पैशाबद्दल विचारणारा हाच पहिला सन्मित्र ! अविस्मरणीय आगळा अनुभव !

पुढच्याच महिन्यात कुमारजी येणार होते हैदराबादला - चार दिवसांसाठी. कुमारजींच्या गायनाची मैफल महाराष्ट्र मंडळातर्फे आयोजित केली होती. हंसत हंसत कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, यावेळी माझा चार दिवसांचा मुक्काम आहे हैदराबादेत. या चार दिवसांचे माझे अन्य कार्यक्रम तुम्ही ठरवायचे. तुम्ही सांगाल तेथे मी येणार. मग कराल ना हे व्यवस्थापकाचे काम ?' अत्यानंदाने मी त्यांना होकार दिला. हा आपला बहुमानच आहे असा सार्थ अभिमान वाटला मला. कुमारजींनी ऑटो मागवली आणि हात हलवून माझा निरोप घेतला.

देवास-इंदोर-महू मधील माझा सर्व वेळ कुमारजींच्या सुरेल सहवासात गेल्यामुळे एक विलक्षण समाधान वाटले. त्या सोनेरी क्षणांची आठवण करीतच मी माझा पुढचा प्रवासं केला. अविस्मरणीय दिवस !

कुमारजींच्या स्वागतासाठी आम्ही सर्व मित्रमंडळी हार घेऊन सकाळी ६ वा. नामपल्ली स्टेशनवर जमलो. उत्कंठेने कुमारजींच्या गाडीची वाट पहातच आम्ही थांबलो. गप्पाटप्पा चालूच होत्या. मुंबईहून निघालेली गाडी आली. पहिल्या वर्गाच्या एका डब्यातून कुमारजी उतरले. त्यांचा तो पोषाख पाहूनच आम्ही अवाक् झालो. कडक इस्त्रीची पँट, पांढरा शुभ्र शर्ट पँटच्या आत खोचलेला, चौकड्यांचा वुलनचा शानदार कोट, मोजे-बूट घातलेले कुमारजी, या आगळ्यावेगळ्या पोषाखात एकदम सुरेख, देखणे, प्रफुल्ल दिसत होते. त्यांच्या प्रसन्न आणि चैतन्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने आम्ही सर्वजणच दिपून गेलो. मिष्किल हंसत त्यांनी आम्ही आणलेला सुगंधी, भरगच्च मोठा फुलांचा हार विनम्रतेने स्वीकारला. फुलांचा सुंदर हार घातलेले कुमारजी दृष्ट लागण्यासारखे दिसत होते. कुमारजींच्या येण्यामुळे आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे आम्हा सर्वांचा आनंद दुथडी भरून वाहू लागला. अत्यानंदाने आम्ही त्यांचे प्लॅटफॉर्मवरच फोटो काढले. कुमारजी देखील अत्यंत खुष झालेले दिसले.

चार दिवसांच्या मुक्कामात आम्ही त्यांचे आणखी काही फोटो काढण्याची इच्छा व्यक्त केली. कुमारजी म्हणाले, 'आणखी फोटो काढण्याची आवश्यकता नाही. मी तुम्हा सर्वांच्यासाठी माझे सुंदर फोटो देवासला गेल्यानंतर पाठवून देईन.' आणखी फोटो काढण्याचे टाळण्यासाठीच कुमारजींनी आम्हाला हे अभिवचन दिलेले असावे, असाच आम्हा सर्वांचा

गैरसमज झाला.

हैदराबादहून कुमारजी देवासला पोचल्यानंतर एक महिना उलटला. फोटो काही आले नाहीत. आम्ही सारे हळहळलो. उत्कंठेने फोटो येण्याची वाट पाहिली. शेवटी आम्ही निराश झालो. कुमारजी फोटो पाठविण्यास साफ विसरले, असाच आमचा आग्रह झाला.

एके दिवशी कुमारजींच्याकडून एक मोठे पार्सल आले- रजिस्टर पोस्टाने. ते माझ्या नावाने आले माझ्या घरी. मी ते उत्सुकतेने फोडले. प्रत्येक फोटोवर आपली सही करून कुमारजींनी आम्हा सर्वांना एकेक फोटो पाठविल्याचे पाहून मला अत्यानंद झाला. प्रत्येक मित्राच्या घरी जाऊन मी स्वतः एकेक फोटो दिला. कुमारजी आठवणीचे पक्के होते, हेच खरं.

कुमारजींना घेऊन आम्ही सर्वजण टूरिस्टमध्ये आलो. कुमारजींचा हा दौरा मोठा होता. त्यांनी चारपाच बॅगा आणल्या होत्या. त्यांचे सामान खोलीत आणून ठेवले गेले. पहिला चहा आला. चहा घेता घेता आमच्या कुमारजींशी गप्पा चालूच होत्या. गप्पा मारता मारता, आपल्या साथी बॅगमधून एक पांढरा कपडा काढला. आपल्या बॅगावरील धूळ साफ करण्यास सुरुवात केली. आम्ही पहातच राहिलो. एवढा मोठा कलावंत, आल्या आल्या बॅगावरील धूळ स्वतःच पुसू लागला. आपले काम आपणच करण्यात कमीपणा कसला ? श्रमप्रतिष्ठा म्हणतात ती हीच. कुमारजी घरातील अनेक छोटी मोठी कामं करीत असत. झाडांना पाणी घालणे, झाडांची निगा राखणे, घड्याळ दुरुस्त करणे, विजेची किरकोळ कामं करणे, इत्यादि कामं हौसेने करीत असत.

हैदराबादेतील महाराष्ट्र मंडळाने आयोजित केलेली कुमारजींची ही पहिलीच मैफिल. नेहमीच्या पद्धतीप्रमाणे कुमारजी दोन दिवस अगोदरच आले. भरपूर विश्रांती घेणे हाच महत्वाचा हेतू. आल्या दिवशीच गाण्याचा कार्यक्रम करणे त्यांना पसंत नसे. आपले स्वतःचे जवारीदार दोन तानपुरे नेहमी बरोबर घेऊन जात असत गावोगावी. कधीकधी तर तानपुऱ्यासाठी वेगळे तिकीट काढण्याची त्यांची तयारी असे. उत्तम जुळलेले, छान झंकारणारे तानपुरे हेच त्यांचे खरे साथीदार ! जिवापाड जपत असत कुमारजी आपले तानपुरे !

कुमारजींचा सहवास भरपूर मिळावा म्हणून मी रजाच घेतली होती. संध्याकाळी ५ च्या सुमारास मी कुमारजींना भेटण्यासाठी टूरिस्टमध्ये गेलो. कपडे बदलून कुमारजी माझी वाटच बघत होते. देवासच्या खास पद्धतीप्रमाणे मी त्यांना 'जय जय' म्हणून नमस्कार केला. फिरायला जाऊ या, असं ते म्हणाले. आम्ही दोघे टूरिस्टमधून बाहेर पडलो.

ऑटो थांबविण्यासाठी मी कुमारजींना घेऊन रस्त्याच्या डाव्या बाजूला गेलो. पण त्यांना ऑटोमधून जाण्याची इच्छा नव्हती. हैदराबादचे खास वैशिष्ट्य असलेल्या सायकलरिक्शात बसून आरामात इकडेतिकडे पहात जाणे त्यांना अधिक पसंत होते. टँकबंडला जाऊ या, अशी त्यांनी सूचना केली.

मी एक रिक्षा ठरवली. कुमारांच्या शेजारी बसलो. गप्पा सुरू झाल्या आमच्या. हैदराबादची माहिती देऊ लागलो मी. टँकबंडच्या पायथ्याशीच रिक्शा थांबली. ठरलेले पैसे दिले मी. आम्ही दोघे टँकबंडच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत सावकाश गप्पा करीत चालत गेलो. अनेक विषयांवर आमच्या मनमोकळया गप्पा रंगल्या. काव्यशास्त्रविनोदेन कालोगच्छति धीमताम् ! एका बाकावर बसून सूर्यास्त आणि तलावातील पाण्यावर पडलेले सोनेरी सूर्यकिरण पहाण्यात आम्ही दंग झालो. एक तास कसा गेला हे समजलेच नाही. फार उशीर नको म्हणून आम्ही उठलो. परत निघालो.

परत जाण्यासाठी सायकलरिक्शा ठरवली. परत आमच्या गप्पा रंगल्या. टूरिस्टच्या समोर आलो. पैसे देण्यासाठी मी खिशात हात घातला. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, जाताना तुम्ही किराया दिला होता. आता मी देणार. तुम्ही द्यायचा नाही.' मी चकित होऊन नुसता पहातच राहिलो. आपल्यासाठी दुसऱ्याने सारा खर्च करू नये, असा समंजसपणाने विचार करणारे कुमारजी !

मला आलेला हा पहिलाच अनुभव होता.

महाराष्ट्र मंडळाने कुमारजींचा कार्यक्रम आय. एम. ए. हॉलमध्ये करण्याचे ठरविले होते. कार्यक्रमाच्या आदले दिवशी सकाळी १० वा. आम्ही चौघे मित्र कुमारजींच्या खोलीत जमलो होतो. गप्पा करता करता कुमारजींनी गाण्याचा हॉल पाहण्याची इच्छा व्यक्त केली.

कुमारजींना बरोबर घेऊन आम्ही हॉलवर आलो. हॉल पाहूनच ते एकदम खुष झाले. त्यांनी चौकशी केली, 'पूर्व कोणती ?' आम्ही त्यांना पूर्व दिशा दाखवली. ताबडतोब त्यांनी आपल्या साथी बॅगेतून होकायंत्र काढून खात्री करून घेतली. हॉलमधील स्टेज होते दक्षिणेकडे तोंड करून. कुमारजींना स्टेज हवे होते पश्चिमेकडे तोंड असणारे. त्यांनी आम्हाला स्टेजची व्यवस्था पूर्वपश्चिम करण्यास सांगितले.

मैफलीचा हॉल, स्टेजची दिशा, श्रोते आत येण्याचा दरवाजा, वाद्ये लावण्याची जागा इत्यादि गोष्टी जातीने पहाणारा कलावंत म्हणजे कुमार गंधर्व ! अत्यंत काटेकोर आणि चिकित्सक !

गाण्याच्या दिवशी सकाळी आम्ही सर्वजण कुमारजींच्या भेटीसाठी गेलो. आपल्या पद्धतीप्रमाणे कुमारजी रात्री गावयाचा संपूर्ण कार्यक्रम कागदावर लिहून काढण्याच्या तयारीत होते. इंदोर-महू येथील मैफलीच्या दिवशी मी पाहिले होते की ते एका कागदावर मोठ्या सुवाच्य अक्षरात कार्यक्रम लिहून ठेवतात. कुमारजींनी मला विचारले, 'मोहोळकर, काय ऐकण्याची इच्छा आहे ?' सर्वांच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकून, मी भीत भीत सुचविले, 'कुमारजी, कवी अनील यांचे मराठी भावगीत- आज अचानक गाठ पडे- हे ऐकण्याची इच्छा आहे.' माझी फर्मायिश त्यांना पसंत पडल्याचे स्पष्ट दिसले, त्यांच्या मिश्किल हंसण्यावरून मला अतिशय आनंद वाटला.

त्या दिवशी हॉल खचाखच भरला होता ८।। वाजताच. कुमारजींचा हा पहिलाच सार्वजनिक कार्यक्रम होता हैदराबादमधील. ठरल्याप्रमाणे कुमारजी आपल्या साथीदारासह बरोबर ८।। वा. आले सभागृहात. वाद्ये जुळविण्यासाठी स्वतंत्र खोली नसल्यामुळे त्यांना व्यासपीठावरच न्यावे लागले. स्टेजची व्यवस्था त्यांच्या मनाप्रमाणे झालेली पाहून ते प्रसन्नपणे हसले. आमचा जीव भांड्यात पडला. तानपुरे जुळविण्यासाठी कुमारजींना पूर्ण शांतता लागते. आमचा नाइलाज झाला. श्रोते आपापसात बोलत होते, कुजबुजत होते. हवी ती शांतता न मिळाल्यामुळे कुमारजी सर्वांना उद्देशून माईकवरून म्हणाले, 'संयोजकांनी तानपुरे उत्तम जुळविण्यासाठी वेगळी सोय केली नाही. केवळ दोन मिनिटे आपण शांतता राखावी. तानपुरे जुळवून घेतो मी.' श्रोते शांत झाले. तानपुरे जुळवून झाले. आचरेकर यांनी तबला छान लावला. गैरसोयीबद्दल संयोजकांनाही सुनावणारे कुमारजी !

कार्यक्रमाला सुरुवात करण्यासाठी मी उभा राहिलो. कुमारजींचा त्यांच्या साथीदारांचा आणि तानपुरे छेडणाऱ्या व्यक्तींचा यथोचित परिचय करून दिला. लक्षपूर्वक ऐकत होते कुमारजी. कुमारजींना हार घालण्यासाठी मी थोडा पुढे गेलो. कुमारजींनी विनम्रतेने तो स्वीकारला. साथीदारांचे हार घालून मी स्वागत केले. तानपुऱ्यावरील व्यक्तींना गुच्छ दिले. स्वागताच्या वेळी श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. मला समोर बसण्यासाठी थोडी जागा करून दिली वसंतराव गोडसे यांनी. तानपुरे सुरेल लागले होते. त्या तानपुऱ्यांच्या झंकाराने धुंद झाले श्रोते. कान टवकारून ऐकू लागले. गायन सुरू झाले.

आपल्या मैफलीचा आरंभ कुमारजींनी बागेश्री या मधुर रागाने केला. आवाज छान लागला होता. जमून गाऊ लागले कुमारजी. द्रुतगतीने जेव्हा ते समेवर येत होते तेव्हा श्रोते उत्तम दाद देत होते. 'व्वा', 'बहोत अच्छे' असा प्रतिसाद देत होते सारे श्रोते. मी कुमारजींचे हावभाव, हातवारे निरखून बघत होतो. एका जागी कुमारजींनी आपल्या दोन हातांनी, मानेने, डोळ्यांनी इतका सुंदर अविर्भाव केला की, मी आणि वसंतराव यांनी एकमेकांकडे बघून आश्चर्य व्यक्त केले. 'क्या बात है' अशी उत्स्फूर्त दाद गेली माझ्या तोंडातून. एखाद्या कसलेल्या नटालाच शोभेल असा त्यांचा अभिनय सुरेख होता. मैफलीची रंगत वाढतच गेली. सारा श्रोतृवृंद माना डोलावीत होता, मनापासून दाद देत होता. आम्हा संयोजकांना अत्यानंद झाला. मध्यांतर केव्हा केले कुमारजींनी हे समजलेच नाही. सुरांच्या धुंदीत होतो आम्ही.

मध्यांतरानंतर सारे श्रोते आपापल्या जागी स्थिरावले. कुमारजींनी श्रोत्यांना सांगितले, 'हॉलमध्ये कुणीतरी चिरूट ओढत आहेत. त्यांनी कृपा करून हॉलच्या बाहेर जावून चिरूट ओढावा. मला त्या धुराचा त्रास होतो.' देवासमधील मुक्कामात समजले होते की कुमारजींचे कान फार तीक्ष्ण आहेत. आता लक्षात आले की त्यांचे घ्राणेंद्रिय देखील तितकेच तीक्ष्ण आहे.

मी सकाळी इच्छा प्रदर्शित केली होती कवि अनिलांच्या एका भावगीताची. कुमारजींचे

गाणे छानच चालले होते. श्रोत्यांनी टाळ्या वाजवून दाद दिली, 'आज अचानक गाठ पडे' या भावगीताला. रेकॉर्डपेक्षाही अधिक रंगले हे भावगीत. श्रोते एकदम खुष झाले. श्रोत्यांचा आनंद द्विगुणीत झाला, जेव्हां कुमारजींनी दुसरे भावगीत म्हणायला सुरुवात केली. माझा आनंद शतपट झाला. अनेक श्रोत्यांची इच्छा पूर्ण झालेली दिसली. कुमारजींची तल्लीनता स्पष्ट दिसली. हैदराबादकर रसिकांचा आनंद पाहूनच बरे वाटले. मैफल अप्रतिम झाली यात शंकाच नाही.

पुण्यातील बालगंधर्वमध्ये कुमारजींचा कार्यक्रम होता 'गीतबसंत.' आम्ही खास त्यासाठीच मुंबईहून पुण्याला आलो होतो. मी आणि राजूरकर लवकरच पोंचलो. आम्ही दोघे व्यासपीठावर गेलो. आप्पा जळगांवकर सूर देत होते हार्मोनियमवर आणि तानपुरे जुळविण्यात मग्न होते कुमारजी. कुमारजी एकाग्रतेने तानपुऱ्यांचे झंकार ऐकत होते. त्यांना आम्ही आदराने नमस्कार केला. मानेने आणि स्मित करून त्यांनी स्वीकारला. अनवधानाने मी अप्पाशी बोलू लागलो. कुमारजींनी फर्माविले, 'अप्पा, मोहोळकर, बोलायचेच असेल तर बाहेर जाऊन बोला. तानपुरे सुरात लावण्यासाठी मला शांतता हवी.'

मी एकदमच चपापलो आणि गप्प उभा राहून कुमारजींची एकाग्रता निरखून पाहू लागलो. तानपुरे सुरात जुळविणे अत्यावश्यक असते गाण्यासाठी. एक नवाच धडा शिकवला कुमारजींनी. अत्यंत तन्मयतेने तानपुरे जुळवीत असताना, अडथळा आणणाऱ्या आपल्या साथीदारालाही सुनावणारे कुमारजी ! स्वरभरणा करणाऱ्या तानपुऱ्यांना व्यवस्थित जुळविणारे कुमारजी !! त्यानंतर ही चूक मी कधीही केली नाही.

गीतबसंतचा कार्यक्रम संपताच मी आणि राजूरकर परत आत गेलो. कार्यक्रम संपवून एकदोन मिनिटेच झाली असावीत. देवास-इंदोर येथून खास आपल्यासाठी आलेल्या साथीदारांना - शिष्यांना कुमारजी त्यांच्या जाण्यायेण्याचा खर्च देत होते. माझे डोळे आश्चर्याने विस्फारले. कुमारजींच्या नजरेतून हे सुटले नाही. ते म्हणाले, 'मोहोळकर, मी खूप दूरच्या घरी उतरलो आहे. या माझ्या मंडळींना दूर येण्याचा त्रास होऊ नये म्हणूनच मी हे काम करीत आहे.' त्यांचा वेळ आणि श्रम वाचावेत, म्हणूनच मी त्यांचा हिशेब चुकता करीत आहे. आता ते परत जाण्यास मोकळे झाले.'

कुमारजींचे हे बोलणे ऐकून थक्कच झालो मी. आपल्या दुरून आलेल्या प्रेमीमंडळींनी तसदी घ्यावी लागू नये, त्यांना श्रम पडू नयेत, त्यांना खर्चात पाडू नये, घरी परत जाण्यास विलंब लागू नये, म्हणून त्यांची इतकी काळजी घेणारे आमचे कुमारजी !

कार्यक्रमाच्या दुसरे दिवशी आम्ही सर्व स्नेही भूमण्णा गल्लीतील देशपांडे यांच्या हॉलमध्ये जमलो होतो. कुमारजी अत्यानंदात होते. कालचा कार्यक्रम खूपच छान झाला असल्यामुळे आमच्या उत्साहाला उधाण आले होते. आम्हा सर्वांचा आनंद दुथडी भरून वहात होता. अशा जल्लोषाला जोड दिली तीर्थप्राशनाने. सर्वांच्या बरोबर मी देखील एक

पेग घेत असे. गप्पा मारीत, हास्यविनोद करीत, सर्वजणच हातात ग्लास घेऊन हॉलभर फिरत होतो. आनंद लुटत होतो.

वसंतराव गोडसे माझ्या मागे मागे येत असलेले पाहून कुमारजी त्यांना म्हणाले, 'काय वसंतराव, मोहोळकरांच्या मागे मागे कशासाठी जात आहात ?' वसंतराव म्हणाले, 'मोहोळकरांना आणखी एक पेग द्यायचा माझा विचार आहे.' कुमारजींनी बजावले, 'मुळीच द्यायचा नाही. उलट त्यांचेच आभार माना की ते तुम्हाला कंपनी देत आहेत. तुम्ही घ्या ना. त्यांनी तुम्हाला मनाई नाही केली.' वसंतरावांचा नाइलाज झाला. त्यांना खूप आश्चर्य वाटले. कुमारजींचा हा नवाच पैलू पहावयास मिळाला मला. रात्री मी आणि विसंतराव मिळून घरी जाण्यास निघालो. वसंतराव मला म्हणाले, 'मोहोळकर, कुमारजींचे तुमच्यावर भलतेच प्रेम दिसते. कोणत्या कारणाने तुम्ही हा लोभ संपादन केलात ?' मी म्हणालो, 'वसंतराव, तसे काहीही विशेष केलेले नाही मी. देवासमध्ये त्यांनी मला जवळून बघितले. माझी पारख केली असावी त्यांनी.'

आय. एम. ए. हॉलमधील कार्यक्रमानंतर नेहमीप्रमाणे जेवणाचा बेत केला होता. रात्रीचे दोन वाजले जेवण व्हायला. कुमारांचा पी. ए. होण्याचा मान मिळाला होता. कुमारजींचे अन्य कार्यक्रम ठरविण्याचे काम मलाच करायचे होते. दुसरे दिवशी मी श्रीकांत देशपांडे यांचे घरी त्या दोघांना घेऊन जाणार होतो. कुमारजी आराम घेत असतील असे वाटले. पाचला दहा मिनिटे कमी असताना मी श्री. दंताळे यांच्या घरी पोचलो. खोलीचा दरवाजा हलकेच उघडला. पहातो तो काय, कुमारजी तयार होऊन माझीच वाट पहात बसले होते. ते सौ. ताईंना म्हणाले, 'बघ बा, मी म्हणालो ना की, मोहोळकर वेळेवर येतील. चला मोहोळकर, आम्ही तयार आहोत.'

श्रीकांतचे घर फार दूर नव्हते. कुमारजी चालत जाऊ लागले. आम्ही तीघे बोलत बोलत भूमण्णा गल्लीतील श्रीकांतच्या घरी अगदी वेळेवर पोचलो. श्रीकांत आणि त्यांच्या बंधूंनी कुमारजी व सौ. ताई यांचे अत्यानंदाने स्वागत केले. वक्तशीरपणा ही कुमारजींची खासियत आहे याची जाणीव होती श्रीकांतला. आमची वाटच पहात होते देशपांडे कुटुंबीय. सारी तयारी झालीच होती. श्रीकांत आणि त्यांचे बंधू कुमारजी आणि सौ. ताई यांच्याशी चर्चा सुरू झाली. गप्पा खूपच रंगल्या. खाण्यापिण्याचे पदार्थ आले. कुमारजी आणि सौ. ताई प्रसन्न मनाने खाता खाता गप्पा करीत होते. माझ्या इच्छेला दोघांनी मान दिल्याने मला समाधान वाटले. कुमारांचे प्रेमी होते श्रीकांत आणि त्यांचे बंधू. कुमारजी यांनी दिलेली व्यवस्थापकाची जबाबदारी पार पाडली मी. धन्यवाद कुमारजी !

विद्यालयाला कुमार गंधर्व यांनी भेट द्यावी अशी फार इच्छा होती स. भ. देशपांडे यांची. त्यांनी मला शाळेत सांगितले. संध्याकाळी ६ वाजता विद्यालयात कुमारजींना घेऊन येण्याचे मी त्यांना अभिवचन दिले. स. भ. खुष झाले.

विद्यालय दूर नव्हते. म्हणून याही वेळी कुमारजी चालत येण्यास तयार झाले. सौ.

ताई येऊ शकल्या नाहीत. विद्यालयात आम्ही वेळेवर पोचलो. स. भ. यांना अत्यंत आनंद झाला. हार घालून यांनी कुमारजींचे छान स्वागत केले. गायन-वादन-नर्तनाच्या सर्व वर्गांमध्ये कुमारजींना नेले. संगीतशिक्षकांचा परिचय करून दिला. शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी यांना कुमारजींना जवळून पाहण्याची संधी मिळाली. संगीत शिक्षक आणि विद्यार्थी वर्गाला आनंद झाला. कुमार कधी भाषण देत नाहीत. संगीत विद्यालयाच्या भेटीने कुमारजी खुष झाले.

प्रत्येक वेळी वाहन हवे, गाडी हवी असा आग्रह नसतो कुमारजींचा. दंताळे यांच्या घरापासून श्रीकांतचे घर किंवा विवेकवर्धिनी संगीत विद्यालय चालत जाण्याइतक्या अंतरावर होते. चालत जाण्यास ते आनंदाने तयार असत. त्यात त्यांना कमीपणा कधीच वाटत नसे. सौ. ताईंना देखील चालत जाण्यामुळे अप्रतिष्ठा होते असं वाटत नसे. हैदराबादमधील अनेक ठिकाणी कुमारजी चालतच आले. खोट्या प्रतिष्ठेची त्या उभयतांना घृणा वाटे. सोलापुरात, देवास येथेही कुमारजी चालत येत होते माझ्याबरोबर. चालण्यातील आनंद घेण्यास ते तयार असत.

एकदा भूमण्णा गल्लीतील हरीभाऊ देशपांडे यांच्या घरी मिष्टान्न भोजनाचा कार्यक्रम ठेवला होता. म्युझिक कॉन्फरन्ससाठी आलेली अनेक मंडळी होती. हॉलमध्ये रांगोळ्या घालून पाने वाढली होती. मुख्य ठिकाणी कुमारजींचे पान वाढले होते. उदबत्तीचा सुगंध संपूर्ण हॉलभर दरवळत होता. खास बेत केला होता बासुंदीपुरीचा. चटणी, कोशिंबीर, पातळ भाजी, बटाट्याची भाजी, आमटी, साधा भात, वरण असा सांग्रसंगीत बेत होता. प्रत्येक पानाच्या बाजूला कटोरा भरून घट्ट बासुंदी ठेवली होती. पंगत छानच दिसत होती. मंडळी पानावर बसली.

सर्व निमंत्रित बसल्यानंतर साधा भात वाढण्यात आला. पिवळेधमक हिंगाचा वास असलेले खमंग साधे वरण गरम भातावर वाढले. लोणकढ तुपाचे चार चार चमचे वरणावर वाढले. लिंबाची फोड पानामध्ये होतीच. हरीभाऊ यांनी सर्वांना आरंभ करण्याची विनंती दोन्ही हात जोडून केली. सावकाश जेवावे आणि हवं ते मागून घ्यावे, असंही त्यांनी सर्वांना आग्रहाने सांगितले.

भोजन सुरू झाले. कुमारजींनी लिंबू पिळून भात कालवला, पहिलाच घास घेतला. एकदम खुष झाली स्वारी! त्यांनी हाक मारली मालिनी राजूरकर यांना. कुमारजी म्हणाले, 'मालिनी, हा कटोरा आत घेऊन जा. दुसऱ्या कटोऱ्यात साधे वरण आणि त्यावर चार चमचे तूप घालून आण.'

पंगतीतील सारी मंडळी थक्क झाली. कुमारांच्याकडे पाहू लागली. मान वर करून कुमारजी म्हणाले, 'आपण सर्वजण बासुंदीचा समाचार घ्या. मी मात्र या खमंग साध्या वरणावर एकदम खुष आहे.'

कुमारजींच्या सांगण्यामुळे सर्वांनी बासुंदी-पुरी पोटभर खाल्ली. साधे खमंग वरण,

हिंगाचा स्वाद असलेले यावरच ते प्रसन्न होते. बासुंदीपेक्षा त्यांना साधे वरण अधिक पसंत पडले. माझ्या घरच्या पिठलं-भाकरीची मला एकदम आठवण झाली. इतरांना साधे वाटणारे पदार्थ कुमारजी चवीने, आनंदाने खात असत. चवीने खाणारे कुमारजी !

बासुंदी-पुरीचे जेवण सर्वांना आवडले. पानाचे तबक आले. सर्वांनी छान पान जमविले. कुमारजी हास्यविनोद करण्यात मस्त होते. खूप वेळ झाला होता. थोडावेळ विश्रांती घेतल्यानंतर कुमारजी रघुवीर भैय्याच्या घरी जाण्यास निघाले. रघुवीरची गाडी नव्हती. ऊन मी म्हणत होते. आम्हा मित्रांचे जेवण व्हायचे होते. फक्त एकच मोटार होती खाली.

हलकेच कुमारजींनी विचारले, 'कुणाची आहे ती गाडी ?' सांगितलेले नाव कुमारजींना अपरिचित होते. त्या गाडीतून जाण्यास ते तयार नव्हते. ऑटो करून जाण्याची त्यांची तयारी दिसली. आम्ही कुणी बरोबर जाणार नव्हतो. कुमारजी एकटेच गेले. अनोळखी व्यक्तीच्या गाडीचा उपयोग करणे त्यांना प्रशस्त वाटले नाही.

देवासमध्ये इकडेतिकडे जाण्यासाठी, देवासहून इंदोर, महू अशा सर्व ठिकाणी जाण्यायेण्यासाठी कुमारजींचा टॅक्सीवाला किंवा टांगेवाला नेहमी ठरलेला असे. कुमारजी भरपूर पैसे देत असत त्यांना. या गरीब लोकांना नाखूष करू नये, असेच त्यांचे मत होते. कष्ट करून ते कसेतरी पोट भरतात. बसस्थानकावर, रेल्वे स्टेशनवर देखील सामान घेऊन जाणाऱ्या हमालालाही कुमारजी चांगले पैसे देत. टॅक्सीवाला, टांगेवाला कुमारजींच्या घरी जाण्यास चटकन होकार देत असत. भरपूर कमाईची खात्रीच वाटे त्यांना.

तसे बसस्थानकापासून कुमारांचा भानुकुल बंगला फारसा दूर नाही. सहज चालत जाऊ शकतो आपण. एकदा मी आणि रामभाऊ पुजारी भानुकुल मधून निघालो. एक टांगा समोर दिसला. आम्ही दोघे टांग्यात बसलो. रामला वाटले की टांगेवाला घेईल दोनतीन रूपये. आम्ही बसस्थानकावर आलो. किती द्यायचे असं रामने विचारले. टांगेवाल्याने मागितले पाच रुपये. राम चिडला आणि म्हणाला, 'तुझ्या टांग्याचा नंबर सांगतो कुमार गंधर्व यांना. त्यांना सांगतो की टांगेवाल्याने आमच्याकडून जास्त पैसे घेतले.' टांगेवाला हसून म्हणतो कसा, 'जरूर सांगा कुमार गंधर्व यांना. ते तुमच्यावर रागावतील आणि म्हणतील की त्याला १० रूपये द्यायला हवे होते.' टांगेवाल्याला चांगले माहित होते कुमार गंधर्व- त्यांचा हात सढळ होता आणि त्यांच्या अंत:करणामध्ये गरीबांविषयी कळवळा होता. अशी कळवळ्याची जाती । करी लाभावीण प्रीति।

एकदा तर कुमारजी हैदराबादला आले मीटरगेजवरील पॅसेंजरने. इतक्या लांबचा, अनेक तासांचा प्रवास पॅसेंजरने कसा केला ? कंटाळा नसेल आला ? असा प्रश्न माझ्या अंतर्मनाला सतावीत होता. मी त्यांना विचारले, 'कुमारजी, हा लांबचा प्रवास पॅसेंजरने आपल्याला कंटाळवाणा झाला नाही ?' कुमारजी एखाद्या निरागस बालकाप्रमाणे म्हणाले, 'मोहोळकर, पॅसेंजरमध्ये किती तरी वेळ बसायला मिळते. प्रवासाचा मला कंटाळा येतच

नाही. माझी छान करमणूक होते. दोन्ही बाजूंचे पळणारे वृक्ष, वेली, हिरवीगार राने, आकाशात पळणारे ढग, आकाशाचे बदलते रंग, ढगांचे भिन्न आकार, निसर्गाचे सौंदर्य, समांतर असणारे रूळ पहात बसतो मी. जमीन, मैदान, टेकड्या, गाईगुरे, शेळ्यामेंढ्या पहाण्याने खूप करमणूक होते माझी. भिरभिरणारा वारा, पक्ष्यांचा किलबिलाट, गाडीचा खडखडाट ऐकण्यातही आनंद असतो. एक प्रकारची मौज असते पॅसेंजरने प्रवास करण्यात.'

एके दिवशी सकाळी आम्ही काही मित्र आणि कुमारजी गप्पा करीत बसलो होतो. सहजच कुमारजी म्हणाले, 'एक वेळ अशी येईल की- ज्याप्रमाणे England Returned असं म्हणतात आणि त्यात फार मोठी प्रतिष्ठा मानली जाते- त्याचप्रमाणे संगीतक्षेत्रामध्ये Dewas Returned असं म्हणवून घेण्यात रसिकांना भूषण वाटेल.' प्रभाकर घोटीकर उत्साहाने म्हणाले, 'कुमार, मग मी आहे ना Dewas Returned ?' वसंतराव राजूरकर अभिमानाने मान ताठ करून म्हणाले, 'कुमारजी, मी आहे ना Dewas Returned ?' थोडसं स्मित करून, कुमारजी शांतपणे म्हणाले, 'खरा Dewas Returned म्हणून अभिमान बाळगण्यास पात्र आहेत हे मोहोळकर.'

कुमारजींनी स्वतःच हे शिफारसपत्र दिल्यामुळे घोटीकर-राजूरकर एकदम खजील झाले. मी मात्र आवाक् होऊन कुमारजींच्याकडे आश्चर्याने पाहू लागलो. मला कळेना की मला कुमारजींनी हा बहुमान कां दिला असावा.

माझ्या मनामध्ये विचारचक्र फिरू लागले. कुमारजींनी मलाच का दिली असावी ही पदवी. प्रथम त्यांना मी लिहिलेले ते पत्र- ज्यामध्ये मी त्यांना सहेली तोडी, मधसुरजा या बंदिशीमधील कथानक विचारलेले होते. त्यातून त्यांना माझी विनम्रता, विनयशीलता, लीनता प्रतीत झाली असावी. नंतर मी पाठविलेले दुसरे पत्र - गणपती उत्सवाला येऊ शकत नसल्याचे. मी त्यांची मनापासून क्षमा मागितली होती त्या पत्रामध्ये. आणखी अधिक खोलात जाऊन मी अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करण्याचा प्रयत्न केला. चार दिवस होतो मी देवास येथे. त्यावेळी कुमारजींनी माझे अंतर्बाह्य निरीक्षण - परीक्षण केले असले पाहिजे. माझे आचार-विचार-उच्चार, माझी वृत्ती आणि प्रवृत्ती, माझा स्वभाव, माझी जिज्ञासा, प्रश्न विचारण्याची माझी पद्धत इत्यादि अनेक दृष्टींनी त्यांनी माझी पारख केली असावी. निकटचा सहवास, मनमोकळी चर्चा, माझ्या प्रतिक्रिया यावरून त्यांना माझ्या स्वभावाची कल्पना आली असावी. म्हणूनच त्यांनी मला आपला चार दिवसांचा का होईना पण पी. ए. केला असावा. गायनापूर्वी माझी फर्मायिश विचारण्यास त्यांना विशेष आनंद मिळाला असावा. माझ्याबद्दलचे त्यांचे मत चांगले झाले असावं, असंच मला वाटतं.

एके दिवशी देवास येथे कुमारजींनी विषय काढला माझ्या पत्राचा- पत्र लिहिण्याच्या माझ्या कौशल्याचा आणि अंतर्भूत भावना विष्काराचा. ते मला म्हणाले, 'मोहोळकर, तुमचे पत्र अप्रतिम होते. फारच छान. खूप आवडले मला.'

'पत्र लिहून जसा मला आनंद दिलात, तसाच आनंद इतरांनाही पत्रे लिहून का देत नाही ? कुमारजींचा हा आदेश मी प्रत्यक्षामध्ये आणण्यास सुरुवात केली. १९७२ सालच्या होळीनंतर मी माझ्या घरच्यांना, वर्गमित्रांना, नातेवाईकांना, स्नेह्यांना, परिचितांना पत्रे लिहून अलोट आनंद देऊ लागलो. अनेकांना माझी पत्रे आवडतात. संग्रहणीय वाटतात. सर्वांना वाचावयास देण्याच्या योग्यतेची वाटतात, असं अनेकांनी मला सांगितलं आहे. आणखी काय हवे मग ?

पत्र लिहिण्यामुळे माझाच आत्मानंद दुणावतो. पत्र वाचणारे सुखावतात. प्रसन्न-प्रफुल्ल होतात. माझ्या पत्रांमुळे त्यांची उमेद आणि उभारी वाढत जातात. हा निर्भेळ आनंद केवळ माझ्या पत्रांमुळे प्राप्त होतो. माझ्या पत्रांची स्तुती करणारे - तारीफ करणारे - प्रशंसा करणारे अनेक आहेत. काहीजण टिंगलटवाळी करतात. कशाला पत्रे खरडतोस असं म्हणतात. व्यक्ती तितक्या प्रकृती. पत्रोत्तराची अपेक्षा मुळीच नसते माझी. अपेक्षाभंगाचे दु:ख होतच नाही मला. आनंद देण्यासारखा आनंद नाही. देणाऱ्याने देत जावे । घेणाऱ्याने घेत जावे । घेता घेता, घेणाऱ्याने देणाऱ्याचे हात घ्यावे ॥

आनंदाचे डोही आनंदतरंग । आनंदाचि अंग आनंदाचे ! व्रत घेतले आहे मी - पत्रे लिहिण्याचे. कुमारांची इच्छा !!

८ एप्रिल १९७४ रोजी कुमारजींना ५० वर्षे पूर्ण होऊन ते ५१ व्या वर्षात पदार्पण करणार होते. देवास-इंदोरमधील कुमारजींच्या समस्त शिष्यवर्गाने, त्यांच्या हितचिंतकांनी, सुहृदांनी, सौ. वसुंधराताई - चि. मुकुल, चि. पिन्नू या घरच्यांनी, कुमार पचास असा तीन दिवसांचा समारोह आयोजित केल्याचे आणि त्यासाठी येण्याचे अगत्याचे निमंत्रण आले.

कुमारजींचा परिचय झाल्यापासून, त्यांचे धुंद-फुंद करणारे गाणे ऐकल्यापासून, त्यांच्या सुखद-सुंदर- सुरेल- सुगंधी सहवासात राहाण्याची संधी मिळाल्यापासून आम्ही कुमारजींचे भक्तच बनलो होतो. अगदी झपाटूनच गेलो होतो. कुमारांच्या गाण्याचे वेडच लागले होते सर्वांना. कुमारजी हे आमचे दैवतच झाले होते.

या झपाटलेपणाचे - वेडे होण्याचे कारण समजावे, म्हणूनच मी माझ्या पत्नीला देवासला घेऊन जाण्याचे ठरविले. देवास येथील संगीतमय वातावरण, कुमारजींनी केलेली व्यवस्था, त्यांनी केलेले आतिथ्य, त्यांचे सौजन्य-सौहार्द, त्यांची सभ्यता - विनम्रता इत्यादि गोष्टींचा प्रत्यक्ष परिचय व्हावा, प्रचीति मिळावी, म्हणूनच हा निश्चय केला होता मी. अशी सुवर्णसंधी, असा भाग्ययोग परत येण्याची शक्यताच नव्हती.

कुमारच पचासचा कार्यक्रम तीन दिवस होणार होता. कुमारजी, सौ. ताई, कुमारजींचे सर्व शिष्य, कुमारजींचे प्रेमी असा फार मोठा स्वागत-समितीचा ताफा येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था पहाणार होता. सर्वांच्या सहकार्याने, सहयोगाने अथक आणि अविश्रांत कष्टांनी संपूर्ण व्यवस्था चोख होणारच होती. कुमार पचाससाठी भारताच्या काना-कोपऱ्यातून

कुमारजींचे प्रेमी-हितचिंतक-सुहृद आले होते. ५००-६०० निमंत्रित आले असावेत. कुमारजींना शुभेच्छा देण्यासाठी जीवेत् शरदः शतम् अशी शुभकामना व्यक्त करण्यासाठी. संपूर्ण वातावरण प्रसन्न, प्रफुल्ल आणि चैतन्यपूर्ण होते. कार्यकर्ते उत्साहाने कामाला लागले होते. समारोहासाठी भानुकुलच्या जवळच एक भव्य शामियाना टाकण्यात आला होता.

तीन दिवसांच्या कार्यक्रमातील अगदी आगळा-वेगळा, अनोखा, अविस्मरणीय असा कार्यक्रम म्हणजे पहिल्या दिवशीचा कृतज्ञता-समारोह. कुमारजींना झालेल्या दुर्धर रोगाच्या कराल दाढांतून, मृत्यूच्या मगरमिठीतून, बाहेर काढणाऱ्या तीन डॉक्टरांचा सत्कार करण्याचा दृष्ट लागण्यासारखाच समारंभ. त्या डॉक्टरांना सविनय वंदन करून, त्यांच्याविषयी वाटणारी कृतज्ञता व्यक्त करण्याचा खास समारोह.

सर्व वातावरण भारावलेले होते. अफाट जनसमुदाय जमलेला होता. शामियाना गच्च भरलेला होता. कितीततरी रसिक श्रोते- उत्सुक प्रेक्षक शामियानाच्या बाहेर उभे होते. अभूतपूर्व असा तो सोहळा, डोळ्यांचे पारणे फेडणारा असल्या कारणाने अफाट गर्दी झाली होती. शानदार शामियान्यात रंगीबेरंगी पताका, फुलांच्या माळा लावल्याने शामियाना सुंदर दिसत होता. फुलांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. अत्यंत आकर्षक पोषाख केलेले स्त्री-पुरुष आपापल्या जागा पकडून उत्कंठेने वाट पहात होते कार्यक्रम सुरू होण्याची- दृष्ट लागण्यासारखा समारोह प्रत्यक्ष पाहण्यासाठी.

व्यासपीठावर उपस्थित होते तीन डॉक्टर्स. तेच आज होते उत्सव-मूर्ती. त्या तीन डॉक्टरांनी आपापले हृद्गत अत्यंत भावपूर्ण, सुंदर आणि प्रभावी शब्दात व्यक्त केले. संपूर्ण वातावरण गंभीर आणि भारलेले होते. कुमारांनी स्वहस्ते, अत्यादराने, अत्यंत विनम्रभावाने त्या आपल्या जीवनदात्यांना सुगंधी फुलांचे प्रचंड मोठे हार घातले. सर्व उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले तो सत्कार बघून. कान तृप्त झाले भावनेने ओथंबलेले अमृतशब्द ऐकून. दृष्ट लागण्यासारखाच तो समारंभ होता.

डॉक्टरांचा सत्कार घरगुती वातावरणात, अनौपचारिक पद्धतीने झाल्याचे आपण कधीतरी ऐकतो. सर्वसामान्यपणे असा सत्कार समारंभ होत नाही. एखाद्या रोग्याला डॉक्टरांनी औषधोपचार करून, असाध्य रोगातून बाहेर काढल्याबद्दल त्या रोग्याचे आईवडील, बहीणभाऊ, पत्नी व मुले यांच्या उपस्थितीत कृतज्ञता व्यक्त केल्याचे आपण नुसते ऐकतो. डॉक्टरांची फी दिल्यानंतर फार तर धन्यवाद दिले जातात त्यांना. कुमारजींनी जो कृतज्ञता समारोह आयोजित केला होता तो सार्वजनिक होता. हजारो उपस्थितांच्या देखत केलेला असा सत्कार माझ्यातरी ऐकण्यातही नाही. न भूतो, न भविष्यति असा तो हृद्य कृतज्ञता समारोह !

देवासमध्ये कुमारजींचे बंधू शंकरराव यांचा परिचय होण्याचा योग आला. देवास येथे 'मास्तर' या नावाचे गृहस्थ होते. त्यांच्या घरी एकदा संध्याकाळच्या जेवणासाठी जायचे ठरले. कुमारजींच्या घरच्या सर्वांनाच निमंत्रण होते. संध्याकाळी मी जेवत नसे.

शंकररावांच्या बरोबर मी देखील यावे अशी कुमारजींची इच्छा असल्यामुळे मला जावे लागले. कुमारजी, ताई, पिन्नू टांग्यातून गेले. आम्ही दोघे गप्पा मारीत चालतच निघालो.

आम्ही सर्वजण मास्तरांच्या घरी पोचलो. घरी पोंचल्यापासून भोजन संपेपर्यंत मास्तर एकटेच बोलत होते. कुमारजींच्या बालपणीच्या अनेक आठवणी सांगत होते. आम्ही त्या मजेदार आठवणी लक्षपूर्वक ऐकत होतो. खरं वाटणार नाही, अशाच त्या सर्व आठवणी आम्ही कान टवकारून ऐकण्यात गुंग होतो. कुमारजी जेवता जेवता, मिष्किल हसून त्या आठवणींना मान हालवून दुजोरा देत होते. थक्क करून टाकणाऱ्या आठवणी.

घरी जात असतांना मी कुमारजींच्या बंधूस म्हणालो, 'शंकरराव, या कुमारजींच्या चकित करणाऱ्या आठवणी लिहून ठेवल्या पाहिजेत, असं नाही आपल्याला वाटत ?' शंकरराव म्हणाले, 'या साऱ्या आठवणी अगदी खऱ्या आहेत. मी कुमारला त्याच्या बालपणापासून पहात आलो. आणखी कितीतरी अशाच थरारक आठवणींची नोंद बेळगाव येथील घरातील एका बॅगेमध्ये आहे'. मी विचारमग्न होऊन भानुकुलच्या दिशेने चालत राहिलो.

कुमारजी आणि मंडळी टांग्यातून गेल्याने आमच्या अगोदर घरी पोंचले. आम्ही घरी आलो तेव्हा कुमारजी समोर दिसले नाहीत. ते आपल्या खोलीत आराम करीत असावेत. मी आणि शंकरराव अंगणातच खुर्च्या टाकून त्या आठवणीबद्दल चर्चा करू लागलो. थोड्याच वेळात कुमारजी आले अंगणात. येताच कुमारजी म्हणाले, 'काय मोहोळकर, कोणती चर्चा चालली आहे?' मी म्हणालो, 'मास्तरांनी ज्या आपल्या बालपणीच्या आठवणी वर्णन करून सांगितल्या, त्या साऱ्या लिहून ठेवल्या पाहिजेत, असं नाही वाटत आपल्याला? कुमारजी म्हणालो, 'अगदी बरोबर आहे. एखाद्या लेखकाने यावे माझ्या घरी. मी त्याची एकदम छान व्यवस्था ठेवीन आणि अशा सर्व आठवणी मी स्वतः सांगीन. माझे सांगीतिक विचार, माझ्या प्रयोगामागील उद्दिष्ट्ये वगैरे सर्व काही सांगण्यास मी तयार आहे. नेहमीच्या चरित्राप्रमाणे मला नको आहे माझी कथा. संगीता बद्दलचे माझे सारे विचार त्यांत यावेत, अशी माझी इच्छा आहे. होय की नाही?' आम्हा दोघांना खूप आनंद झाला. कुमारजी सर्व सांगायला तयार आहेत. पण लिहून कोण घेणार?

अशा प्रकारच्या बालपणीच्या, तरूणपणीच्या, देवधरांच्या क्लासमधील, भानुमती विषयीच्या आठवणींचे एक पुस्तक लिहिण्याची गरज वाटली मला. कुमारजींचे चरित्र लिहिले पाहिजे, या विचाराने मला अस्वस्थ केले. याचे स्फुल्लिंग माझ्या अंतःकरणात पडले. कुमारजींनी बालपणापासून केलेले चिंतन-मनन त्या चरित्रामध्ये स्पष्ट केले पाहिजे. कुमारजींच्या बंदिशी, त्या बंदिशींची मूळ पाश्वभूमी, कुमारजींचे क्रांतिकारक विचार भावी पिढ्यांच्यासाठी संग्रहित करून ठेवलेच पाहिजेत. माझ्या या विचाराला कुमारजींनी पाठिंबा दिला.

कुमारजींना अगदी बालपणापासूनच निसर्गातील स्वरांचे, रंगांचे, गंधांचे, स्वादांचे,

आकारांचे सूक्ष्म निरीक्षण, परीक्षण, विश्लेषण करण्याची आवड होती. मिळालेल्या अनुभवांना आपल्या अंतर्मनामध्ये जपून ठेवण्याची वृत्ती होती त्यांची. कुमारजींचे कान आणि डोळे, सर्व ज्ञानेंद्रिये, स्मरणशक्ती आणि निरीक्षणशक्ती, तीव्र होत गेले असणार. इंद्रधनुष्याचे सप्तरंग, संगीतामधील सप्तस्वर त्यांना आकर्षून घेत असणार. म्हणूनच-तैसी दशेची वाट न पाहतां। वयसे चिया गावा न जाता। बालपणीच सर्वज्ञता वरी तयाते। ज्ञानेश्वरांबद्दल आवर्जून सांगितल्या जाणाऱ्या या ओळी, शिवपुत्राच्या बाबतीतही एकदम खऱ्या वाटतात. शिवपुत्र कोमकाली स्वयंभूच असणार यात शंकाच वाटत नाही. अनेक पूर्व जन्मांचे संचित घेऊन जन्माला आलेले कुमारजी !

असं सांगितलं जातं की शिवपुत्र कोमकली चारपाच वर्षांचा असतांना मुळीच गात नसे. नंतर अचानक एके दिवशी त्याला गाणं फुटलं आणि तो गाऊ लागला. गाण्याचं शिक्षण शिवपुत्राला कुणीही दिलेलं नव्हतं. मग ताला-सुरांचं ज्ञान त्याला मिळालं कसं ? या शिवपुत्राने बाळपणीच नामांकित गायकांचे गायन सही सही म्हणण्यास सुरूवात केली. तीन्ही सप्तकांत शिवपुत्राचा गळा सहज फिरत असे. अशी आठवण सांगतात की इचलकरंजीकरबुवांनी शिवपुत्राला त्यांच्याच गाण्याची नक्कल करण्याची विनंती केली. शिवपुत्राने हुबेहूब नक्कल करून शाबासकी मिळवली. प्रथितयश गायकांनी दिलेली अशी शाबासकी, कौतुकाने दिलेली पाठीवरील थाप, झालेली प्रशंसा आणि स्तुती यामुळेच शिवपुत्राला प्रोत्साहन मिळत गेले. अखंड परिश्रमपूर्वक, चिकाटीने, संगीत साधना करीत करीत आपली उन्नती करून घेतली. एकेक पायरी चढत चढत शिवपुत्राने संगीतक्षेत्रामधील उच्च शिखर गाठले. देवधरांच्या क्लासमध्ये शिकत होते तेव्हां एकटेच फिरत असतांना कुमारजी ढसाढसा रडत उभे राहिले रस्त्यात-आपल्याला गाणं येत नाही म्हणून. पुढे तेच एकदा 'मला गाणं आलं 'या विचाराने, आनंदाने नाचू लागले.

कुमार पचासच्या वेळी ऐकलेला एक किस्सा संस्मरणीय असून तो कुमारजींचे एक खास वैशिष्ठ्य स्पष्ट करणारा वाटतो. शांताराम कशाळकर हा कुमारजींचा बालमित्र. त्याच्या मनात एकदा विचार आला की कुमारजींचा कार्यक्रम करावा आणि कुमारजींना काही बिदागी द्यावी. कुमारजींचे गायनाचे जलसे फार कमी होत होते. शांताराम कशाळकरांनी कुमारजींची मैफल निश्चित करून पत्र पाठवून विचारणा केली मानधनाची. कुमारजींनी पत्रामध्ये लिहिले, 'हे बघ शांतू, सध्याच्या माझ्या कठीण परिस्थितीत तू कितीही थोडी बिदागी दिलीस तरी ती मला खूपच मोठी वाटेल. शांतू, मी गाणे असे ऐकवीन की तू कितीही मोठी बिदागी दिलीस तरी ती कमीच असेल'. केवढा आत्मविश्वास!

हैदराबादमध्ये आम्ही कुमारजींची अनेक प्रेमी मंडळी असूनही कधी कधी कुमारजींच्या मैफलीला पैसे कमी मिळत. इतकी कमी बिदागी देण्याची शरम वाटायची आम्हाला. पण करणार काय ? लाज वाटून काय उपयोग ? अशा वेळी मलाच समोर करण्यात येई. मी ती छोटी बिदागी एका पाकिटात घालून कुमारजींच्या हातात देऊन, त्यांना खाली वाकून

वंदन करीत असे. ती बिदागी म्हणजे फूल ना फुलाची पाकळीच आहे, असा खुलासा करण्यास मी कधीही विसरत नसे. आम्ही दिलेली बिदागी पाहून वसंतराव आचरेकर आम्हां सर्वांना उद्देशून म्हणत, 'मोहोळकर, तुम्ही सर्व मंडळी कुमारजींच्या समंजसपणाचा गैरफायदाच घेता नेहमी.' कुमारजी आचरेकरांना म्हणाले, 'अरे वसंता, आपण हैदराबादला पैसे मिळविण्यासाठी नाही येत. पैशाची भरपूर कमाई करण्याची अन्य अनेक ठिकाणे आहेत. आपण येथे येतो या प्रेमी मंडळींना गाणं ऐकवण्यासाठी.' रसिकतेने गाणं ऐकणारी प्रेमीमंडळी लागतात कुमारजींना.

कुमारजी, ताई यांच्यासह आम्ही सर्व मित्रमंडळी औरंगाबदला जाणार होतो. कैलाशलेण्यातील शिवाच्या मूर्तीसमोर कुमारजी आपली खास बंदिश सादर करणार होते. वेरूळला जाण्याचा बेत ठरला होता. स्टेशनवर निघतांना माझ्या पत्नीने बेसनाचे लाडजू भरून एक डबा दिला होता. कुमारजी, ताई आणि पिन्न पहिल्या वर्गाच्या डब्यातून जाणार होते. आम्ही सर्वजण दुसऱ्या वर्गाच्या डब्यात बसणार होतो. मी तो डबा ताईंना दिला आणि बेसनाच्या लाडूचा आस्वाद घेण्यास सांगितले.

प्रवास होता रात्रीचा. सकाळी पोचलो औरंगाबादला. उतरल्याबरोबर आम्ही कुमारजींच्या डब्याकडे धावलो. कुमारजी मला आनंदाने म्हणाले, 'मोहोळकर, बेसनाचे लाडू अप्रतीम! नेहमी एकच लाडू खातो मी. काल रात्री दुसरा लाडू खाण्याचा मोह आवरता आला नाही. फारच छान. वहिनींना सांगा परत गेल्यावर.'

देवासच्या भानुकुल मध्ये आलेला कुणीही पाहुणा परत जाण्यास निघाला की कुमारजी फार खिन्न, उदास होत असत. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहून हे सहज कळे. चटकन निरोप घेऊन ते घरात जात असत. या बाबतीत मी त्यांना एकदा स्पष्ट विचारले देखील. ते म्हणाले, 'मोहोळकर, निरोप नेहमी चटकन घ्यावा. नाहीतर मनाची खिन्नता - उदासी बराच वेळ टिकून राहते. मित्राचे दूर जाणे जिवाला फार कासावीस करते.' मित्राच्या दूर जाण्याने विफल होणारे कुमारजी!

कुमारजी सोलापुरला आले होते. कुमारजी, अरविंद मंगरूळकर, रामभाऊ आणि आणि आम्ही सोलापुरातील काही मित्रमंडळी शुभराय महाराजांच्या मठात गेलो होतो शुभराय महाराज तसे प्रापंचिकच होते. नंतर त्यांनी प्रपंच सोडला, सर्वसंगपरित्याग करून संन्यास घेतला. तपश्चर्या, ध्यानधारणा, जपतप, खडतर साधना करून ते आध्यात्मिक क्षेत्रामध्ये महत्पदाला पोचले. ते उत्कृष्ठ चित्रकार झाले. संगीतक्षेत्रात ते वेगळ्याच उंचीवर पोंचले. अध्ययन, व्यासंग, साधना करून ते प्रतिभावंत कवी, प्रज्ञावंत गायक-नायक अशी सर्व बाबतीत त्यांनी आत्मोन्नती करून घेऊन ते ख्यातकीर्ति तत्त्वज्ञ, विचारवंत, प्रज्ञावंत म्हणून प्रसिद्ध झाले. एका व्यक्तीने अशी विविध क्षेत्रामध्ये प्रगती, आत्मोन्नती करून घ्यावी याचेच मला आश्चर्य वाटले. मठातून आम्ही बाहेर पडलो. नवी पेठेतून चालत चालत एका मित्राच्या घरी जात होतो. मी कुमारजींना प्रश्न केला, 'कुमारजी,

एकाच आयुष्यात एखादी व्यक्ती इतक्या विविध प्रकारे आपली उन्नती कशी काय करू शकते?' कुमारजी मला म्हणाले, 'मोहोळकर, प्रपंच, संसार, मुलेबाळे, कुटुंबकबिला यांना सोडून माणूस मुक्त होऊ शकला, की मग तो अशा प्रकारे सर्वच क्षेत्रामध्ये उच्चकोटीला पोचू शकतो. प्रौढ, प्रगल्भ, प्रबुद्ध, प्रतिभावंत, प्रज्ञावंत, विचारवंत, तत्त्वज्ञ सहज होऊ शकतो.' कुमारजी पुढे गेले रामभाऊशी बोलत. मी अरविंद मंगरूळकरांना म्हणालो, 'मंगरूळकर, कुमारजी याच मार्गाने- प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत'

कोकणातील एक छोटेसे आणि टुमदार गाव आचरे. या गावामध्ये असलेल्या श्रीरामेश्वराच्या मंदिरामध्ये रामनवमी साजरी करण्याची प्रथा होती. परंपराच होती. वसंत आचरेकर, चित्रकार, एम. आर. आचरेकर वगैरे सारी कुटुंबे या आचरे गावातून आलेली. वसंत आचरेकर आणि त्यांच्या सर्व आप्त स्वकीयांची, इष्टमित्रांची अशी इच्छा होती की कुमार गंधर्व आणि त्यांच्या प्रेमी मंजळींनी श्रीरामेश्वर मंदिरातील रामनवमीच्या उत्सवामध्ये आपले गायन करून सेवा करावी. अशा प्रकारची सारी योजना पूर्ण झाली. आचरेवासीयांची इंच्छा पूर्ण होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली.

जवळजवळ एक महिना अगोदर वसंतराव आचरेकरांनी कुमारजींना आपल्या आचरे गावी नेले. तेथील आपले घर आणि सारा परिसर दाखविला. घरामध्ये उतरण्यासाठी खोल्या, स्वयंपाक करण्यासाठी मोठे स्वयंपाकघर आणि जवळच पाण्याने भरलेली विहीर होती. घराच्या मागील बाजूस हिरवी गर्द झाडी होती. मध्यभागी एक गुरांचा गोठा होता. त्या गोठ्यांवर वृक्षांची थंडगार सावली पडत असल्या कारणाने उन्हाचा त्रास होण्याची शक्यताच नव्हती. हा प्रशस्त गोठाच कुमारजींना खूप आवडला. तो गोठा साफसूफ करून, त्यावरच सतरंज्या टाकून बिछायत करण्याचे ठरविले त्यांनी. आचरेवासी मंडळींनी कुमारजींची सूचना उचलून धरली. सर्व योजना पक्की झाली.

एके दिवशी रात्री वसंतराव राजूरकरांच्या घरी आम्ही गप्पा मारीत होतो. मुंबईहून वसंत आचरेकरांचा फोन आला. वसंतराव राजूरकरांनी फोन घेतला. वसंत आचरेकर म्हणाले, 'सारी तयारी पूर्ण झाली आहे. तुम्ही सर्वजण परवाच्या दिवशी संध्याकाळपर्यंत आमच्या घरी या. आपण सर्वजण खास बसने आचऱ्याला जाणार आहोत.' मी आचरेकरांचे व राजूरकरांचे संभाषण ऐकत होतो. राजूरकरांच्या हातातून फोन घेतला आणि मी आचरेकरांना विचारले, 'काय हो वसंतराव, मला आचऱ्याचे निमंत्रण नाही का ?' ते म्हणाले, 'मोहोळकर, तुम्हाला आमंत्रणाची आवश्यकताच नाही. तुम्हीही या ना राजूरकरांच्या बरोबर मुंबईला. पुढची सारी व्यवस्था आम्ही करू.'

प्रथम मुंबईला जायचे आणि तेथून सर्वांच्या बरोबर आचऱ्याला जायचे. सारी तयारी केली. मी आणि राजूरकर कंपनी मुंबईला आचरेकरांचे घरी पोंचलो. आराम बस आली. आम्ही सर्वजण सामान व्यवस्थित लावून बसमध्ये बसलो. प्रवास छान झाला. आचऱ्याला आम्ही सुखरूप पोंचलो. पोंचल्यानंतर दिसले की कुमारजी, सौ. ताई, पु. ल. आणि सौ.

सुनीता देशपांडे, अरविंद मंगरूळकर, चिरमुले, श्रीराम पुजारी, अशोक रानडे, श्री व सौ. रेळे आणि अन्य कुमारजींची प्रेमी मंडळी अगोदरच तेथे येऊन पोंचली आहेत.

पु. ल. आणि सौ. सुनीतासाठी एक खोली, वसंतराव-सौ. मालिनी राजूरकर आणि त्यांच्या दोन मुलींसाठी दुसरी खोली आणि तिसरी खोली होती कुमारजी आणि सौ. ताई यांच्यासाठी. पण त्या खास खोलीत राहण्यास कुमारजी राजी नव्हते. सौ. ताई एकट्याच त्या खोलीत राहणार होत्या. कुमारजी मात्र आम्हा सर्वांच्याबरोबर त्या गोठ्यावरच राहणार होते. आम्हा सर्व मित्रमंडळींना कुमारजींचा निकटचा सहवास हवाच होता. आम्हा सर्वांना अतिशय आनंद झाला. संपूर्ण तीन दिवस कुमारजींच्या सहवासात आम्ही राहणार होतो.

ओळीने तीन दिवस, सकाळी व संध्याकाळी, रामेश्वराच्या मूर्तीसमोर कुमारजी आणि अन्य गायक-गायिकांची गाणी झाली. कुमारजी, सौ. ताई, बाबूराव रेळे, अशोक रानडे, सौ. मालिनी राजूरकर या सर्वांनी आपले गायन सादर करून रामेश्वराची सेवाच केली. प्रसन्न वातावरणात सर्वांची गाणी अप्रतिम झाली. आचरे गावातील रसिकजन गाणं ऐकण्यासाठी येत होते. अशोक रानडे यांचे गायन ऐकण्याचा माझा पहिलाच योग होता. त्यांची गायकी वेगळ्याच घराण्याची वाटली मला.

दुपारी १२ च्या सुमारास भोजन असे. भोजनानंतर आम्ही सर्व मंडळी गोठ्यावरील बिछायतीवर जमत होतो. मग गप्पांची मैफल रंगत असे. विषय असे आपले भारतीय संगीत, संगीताची विविध घराणी आणि घराण्याची गायनशैली. एम. आर. आचरेकर या मैफलीत सामील होत असत. श्रीराम पुजारी अधुनमधून काहीतरी विनोद बोलून सर्वांना हसवीत असे. सौ. सुनीता देखील आपले म्हणणे ठासून सांगत. पु. लं. च्या जवळच त्या बसलेल्या असत. अरविंद मंगरूळकर, अशोक रानडे, चिरमुले आपापले मुद्दे ठामपणे सांगत असत. कुमारजी आपले मत एक दोन वाक्यात सांगून मैफलीची रंगत वाढवीत असत. माझ्यासारखे श्रोते एकाग्रतेने ऐकण्याचे काम करीत असत. ज्ञानामध्ये भरपूर भर पडत असे माझ्या.

तीन दिवस आणि तीन रात्री आम्ही सर्वजण गडबड-गोंधळ - वाहनांचे कर्कश आवाज- अशा गजबजलेल्या बाह्य जगापासून दूर होतो. शांत वातावरणात संगीताचा आनंद मनसोक्त लुटत होतो, सकाळी आणि संध्याकाळी.दुपारी संगीतशास्त्रावरील गंभीर अशा गप्पांच्या मैफली झडत होत्या. अविस्मरणीय होता तो रामनवमीचा तीन दिवसांचा संगीत-समारोह! रामेश्वराच्या मंदिरात रामनवमीचा उत्सव साजरे करणारे ते समन्वयवादी आचरेवासीय खरोखरच धन्य होत ! अशी रामनवमी अन्यत्र कुठेही साजरी होत नसणार.

शेवटच्या दिवशी प्रत्येकाला रामेश्वराचा प्रसाद, नारळ आणि रामेश्वराचा एक सुंदर फोटो देण्यात आला. मेटाग्राफचे तात्यासाहेब मुसळे यांनी ही सारी व्यवस्था केली होती. श्रीरामेश्वराचा फोटो आम्हा सर्वांना देऊन तात्यासाहेबांनी आम्हा सर्वांना त्यांचे ऋणी करून ठेवले.

श्रीरामेश्वराच्या प्रसादाने, रामेश्वराच्या त्या फोटोमुळे, जाज्वल्य देवस्थानच्या कृपामृतामुळेच बसमधील आम्हा प्रवाशांचा जीव वाचला. वेळ आली होती, पण काळ आला नव्हता, असंच म्हणायला हवं. तीन दिवसांच्या संगीतानंदाच्या त्या जल्लोषानंतरचा तो हलकल्लोळ माजविणारा भयंकर प्रसंग ! भयंकर अपघात ! रामनवमीचा समारोह संपवून आचरे येथून आमची आराम बस निघण्यास बराच उशीर झाला. रात्रीचे १०॥ वाजून गेले होते. तीन दिवसांच्या जागरणामुळे आम्ही प्रवासी मरगळून गेलो होतो. आम्हा सर्वांच्या बॅगा वगैरे सामान बसच्या टॉपवर ठेवण्यात आले होते. ड्रायव्हरच्या बरोबर मागे बसल्या होत्या सौ. मालिनीबाई आणि त्यांच्या शेजारी बसल्या होत्या त्यांच्या दोन कन्या. सौ. मालिनीबाईंच्या समोरच्या सीटवर होतो मी आणि माझ्या डाव्या बाजूला बसले होते वसंतराव राजूरकर. राजूरकरांच्या मागे बसले होते इंदोरमधील बंडू भैय्या चौगुले. इंदोर येथील होलिकोत्सवाचे आयोजन करणारे हेच बंडूभैय्या चौगुले. हार्मोनियमची साथ उत्तम करीत असत. हैदराबादच्या एका कार्यक्रमामध्ये कुमारजींच्या साथीला होते ते.

सकाळी ६ वाजले असावेत. झुंजुमुंजु होत होतं. बसमधील सर्वजणच झोपेच्या अधीन झाले होते. एकाएकी भयंकर मोठा आवाज झाला. त्यामुळेच मला थोडीशी जाग आली असावी. काचा काडकाड फुटल्याचा आवाज माझ्या कानावर पडला. आता मला चांगलीच जाग आली होती. पहातो तो काय ! समोरून येणाऱ्या ट्रकने आमच्या बसला धडक मारल्याचे माझ्या लक्षात आले. काचेचे बारिक बारिका तुकडे अक्षदेप्रमाणे आमच्या डोक्यावर पडू लागल्याचे मला जाणवले. ताबडतोब मी, मालिनीबाई, वसंतराव यांना जोराने हाका मारल्या, बसचा दरवाजा उघडला आणि त्या चौघांना बसच्या बाहेर काढले. घाईघाईने मी देखील बाहेर पडण्याच्या बेबात असतांनाच मी प्रत्यक्ष बघितले की त्या समोरून धडक मारलेल्या ट्रकचा दिव्याखाली असणारा आडवा लोखंडी रॉड आमच्या बसमध्ये घुसत आत आत येत आहे. तो लोखंडी रॉड आमच्या सीटांना कापून आत घुसला आणि मागे बसलेल्या बंडूभैय्या चौघुले यांच्या पायांवर जोराने आपटला- त्यांच्या उजव्या पायाचा गुडघ्याखालचा भाग तुटला. आमच्या बसच्या ड्रायव्हरने प्रसंगावधान साधून, दरवाजा घाईने उघडून, बाहेर उडी मारल्याने तो बचावला. नाहीतर त्याचे काय झाले असते, सांगता येत नाही. सर्वांनी मोठ्याने आरडाओरडा केला. किंचाळ्या ऐकू आल्या. भलताच गोंधळ माजला. ड्रायव्हरच्या मागेच बसलेल्या मालिनीबाई, त्यांच्या बाजूलाच बसलेल्या त्यांच्या दोन छोट्या मुली आणि वसंतराव यांना वेळेवर, हाका मारून, बसच्या बाहेर काढू शकलो नसतो, तर मात्र भलताच प्रसंग ओढवला असता. आमचा काळ आला होता, पण श्रीरामेश्वराने तशी वेळ येऊ दिली नाही हेच खरे.

राजूरकर कुटुंबीय आणि मी बालबाल बचावलो. राजूरकर पती-पत्नी यांना संगीताच्या क्षेत्रामध्ये बरंच काही करून दाखविण्यासाठी आणि मुलींना वाढविण्यासाठी श्रीरामेश्वरानेच त्यांचे रक्षण केले. माझाही जीव वाचला. भीतीने त्या तीघी थरथर कापत

होत्या. मुलींच्या केसात पडलेले काचेचे कण मालिनीबाई काढीत होत्या. त्या तीघींची बोबडीच वळलेली दिसली.

मी बसमध्ये चढलो आणि माझी उशी बंडूभैय्या यांच्या पायाखाली धरून, आम्ही त्यांना बसमधून कसेतरी बाहेर काढले. बंडूभैय्या यांचा गुडघ्याखालचा पाय चक्क लोंबकळत असलेला मी पाहिला. त्यांना आम्ही जमिनीवरच झोपविले- अन्य मार्गच नव्हता. आमच्या बसमधील बाकीचे सर्वजण उड्या मारून बसच्या बाहेर आले होते. एकच हाहाःकार उडाला. आमच्या बससमोर प्रवासी लोकांनी गर्दी केली. बघणारे सारे आश्चर्याने दंग होऊन पाहातच राहिले.

राजूरकर मंडळी आणि मी वेळेवर बसमधून बाहेर पडल्या कारणाने आत घुसलेल्या लोखंडी रॉड आमच्या मागे बसलेल्या बंडूभैय्या यांना जोराने लागला व त्यांचा पाय तुटला. बंडूभैय्याची सूटकेस बसच्या टपावर कितीतरी मागे ठेवलेली होती. पण समोरून आलेल्या ट्रकमुळे जो धक्का बसला, त्यामुळे फक्त बंडूभैय्या यांचीच कातडी बॅग पुढे फेकली गेली आणि बॅगचा वरचा भाग साफ कापून टाकल्यासारखा फाडला गेला असावा. पाय तुटला बंडू भैय्यांचा - बॅग फाटली बंडूभैय्यांचीच ! याला काय म्हणावे ? दैवी योगायोग ! दुर्दैवी बंडूभैय्या चौघुले !

कर्मधर्म संयोगाने बाबूराव रेळे यांची कार आली. झालेला भयंकर अपघात आणि बंडूभैय्यांची अवस्था त्यांनी प्रत्यक्ष पाहिली. आम्ही सर्वांनी बंडूभैय्या यांना अलगद उचलून रेळे यांच्या कारमध्ये व्यवस्थित ठेवले. बाबूराव रेळे हे मुंबईचेच असल्याुळे त्यांना अनेक हॉस्पिटल्सची माहिती होती. त्यांचीच कार आल्याने आम्हाला हायसे वाटले. बाबूराव रेळे यांची कार मुंबईच्या दिशेने वेगाने गेली.

अपघाताची बातमी सगळीकडे पसरली. कुमारजींना जेव्हा हा प्रकार कळला, तेव्हा ते कारमधून अपघातस्थळी आले. कारमधून उतरून आमची चौकशी केली. आम्हाला कुमारजींनी मनोधैर्य दिले. झालेल्या अपघातातून आम्ही वाचलोस कसे, हा त्यांना प्रश्नच पडला. कुमारजी आणि इतर मंडळी झालेला प्रकार पाहून आश्चर्यचकित झाली. श्रीरामेश्वराचीच कृपा म्हणून आम्ही सहीसलामत बाहेर आलो.

ट्रकसारख्या अवजड अशा वाहनाने दिलेली जोराची धडक, आमच्या बसच्या आत घुसलेला तो लोखंडी रॉड, यामुळे आमची बस अडकून पडली. ट्रक आणि बस यांना वेगळे काढणे सोपे नव्हते. माणसे इकडेतिकडे चौकशी करीत धावलीच होती. सुदैवाने जवळच कुठेतरी क्रेन मिळाला. त्या क्रेनच्या साह्याने गाड्या वेगळ्या करण्यासाठी बराच त्रास झाला. हे सारे होईपर्यंत सकाळचे १० वाजून गेले. चार तास या साऱ्या गडबडीत, धावपळीत, आरडाओरडा करण्यात कसें गेले, हे समजलेच नाही.

आम्हा सर्वांना मुंबईला पोचेपर्यंत संध्याकाळ झाली. आम्ही सर्वजण प्रथम गेलो हॉस्पिटलमध्ये. बंडूभैय्यांच्या पायाचे ऑपरेशन करून पायाला प्लॅस्टर घालण्यात आले

होते. ते सुखरूप असल्याचे पाहूनच आम्ही सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. मनोमनी आम्ही सर्वांनी श्रीरामेश्वराचे आभार मानले.

आचरे येथे मिळालेला श्रीरामेश्वराचा फोटो आजही माझ्याजवळ आहे. तो फोटो पाहिला की, रामेश्वर मंदिरातील तो रामनवमीचा उत्सव तर आठवतोच. त्या भयंकर अपघाताचे चित्र डोळ्यासमोर उभे राहते आणि जिवाचा थरकाप होतो. त्या भयानक अपघातातून आम्ही कसे सुटलो याचेही आश्चर्य वाटते. आमचे नशीब बलवत्तर म्हणूनच आम्ही बचावलो, यात शंकाच नाही.

कुमारजींची अनेक गाणी ऐकण्याचे भाग्य लाभले. हैदराबाद, देवास, महू, पुणे, मुंबई, सोलापूर, वेरूळ अशा अनेक ठिकाणी कुमारजींचे गायन ऐकू शकलो. हैदराबादेत कुमारजींची गाणी आयोजित करण्यात मी पुढाकार घेतला होता. मुंबई येथे आचरेकरांच्या घरी एक पत्रक पहायला मिळाले. कुमारजींच्या स्वतःच्याच बंदिशीची, सकाळच्या रागांची एक मैफल आयोजित केल्याबद्दलचे ते एक पत्रक होते. रागांची नावे, साथिदारांची नावे, स्थळ, वेळ, तारीख इत्यादि गोष्टींचा उल्लेख त्या पत्रकामध्ये होता. अशा प्रकारची कुमारजींची एक अनोखी मैफल आयोजित करून एक नवाच अनुभव आपण हैदराबाद-सिकंदराबाद मधील रसिक श्रोत्यांना द्यावा, असाच विचार माझ्या मनामध्ये घोळू लागला.

हा विचार मनामध्ये पक्का केला आणि त्याविषयी कुमारजींना मी एक सविस्तर पत्र पाठविले. सकाळच्या रागातील त्यांनी बांधलेल्या बंदिशी, ते सादर करणारे राग, बंदिशींची पार्श्वभूमी, लय, ताल इत्यादि माहिती मला सवडीने पाठविण्यास मी सांगितले. कुमारजींना खूप आनंद झाला. अशा प्रकारची मैफल आयोजित करण्याचा माझा विचार त्यांना आवडला. अंतःकरणापासून कुमारजींनी मला सहकार्य दिले. कुमारजींनी आवश्यक ती माहिती कळवली आणि त्यांना तीनचार दिवसांचा वेळ केव्हा आहे, त्याच्या तारखाही मला पाठविल्या. कुमारजींच्या या सहकार्याने मला विस्मयचकित केले. उदंड उत्साहाने मी या मैफलीच्या तयारीला लागलो. अशा प्रकारचा कार्यक्रम पूर्वी कधी झालेला नव्हता आणि आजपर्यंत कधीही केला नाही. अशी अभूतपूर्व मैफल आयोजित करण्याचे भाग्य मला लाभले. असे भाग्य खरोखर दुर्मिळच. कुमारजींच्या माझ्यावरील प्रेमामुळेच हे भाग्य मी प्रत्यक्षामध्ये उतरवू शकलो, यात शंकाच नाही.

कुमारजींनी सुवाच्य अक्षरात एक सविस्तर पत्र पाठविले मला. सहेलीतोडी, मधसुरजा, बिहडभैरव ह्या सकाळच्या रागांच्या बंदिशी त्यांनी बांधल्या होत्या. या साऱ्या बंदिशी त्यांना कशा व केव्हा सुचल्या, त्यांची पार्श्वभूमी, बंदिशीमधील अंतर्भूत कथानक, मैफलीतील रागांचा अनुक्रम, मध्यांतर त्यानंतर म्हणावयाचे राग इत्यादि सर्व माहिती मला कळवली. मैफलीचा आरंभ सकाळी बरोबर ९ वाजता होण्याचे ठरले. संपूर्ण कार्यक्रम मी व्यवस्थित लिहून काढला. प्रत्येक श्रोत्याला देण्यासाठी त्या पूर्ण कार्यक्रमाच्या झेरॉक्स कॉपीज काढून तयार ठेवल्या. पूर्वतयारी छान झाली.

आम्ही मित्रमंडळी एकत्र आलो. न भूतो न भविष्यती असे तीन दिवसांचे संगीत संमेलन आयोजित करण्याचा निर्धार केला. आम्ही सर्व मित्र होतो सात. तारसप्तक असं नाव दिले. आम्ही आमच्या नव्या संस्थेला. कुमारजींची सकाळच्या रागांची मैफल, दुसरी मैफल हरिप्रसाद चौरासिया यांच्या बासरीवादनाची आणि तिसरी मैफल कर्नाटक संगीतामधील रमणी यांच्या वादनाची.

आचरेकरांनी सांगितले की संगीत दिग्दर्शक याच दिवशी हैदराबादेत आहेत. आमच्या तारसप्तक या संस्थेच्या वतीने वसंत आचरेकरांनी वसंत देसाई यांना आमच्या संगीत संमेलनाचे उद्घाटन करण्याची विनंती केली. वसंत देसाई यांनी ही विनंती मान्य केली. तबल्याची साथ वसंतराव आचरेकर आणि हार्मोनियमची साथ पुण्याचे विठ्ठलराव सरदेशमुख यांनी करण्याचे कबूल केले.

हरिप्रसाद चौरासिया आणि रमणी आपापल्या साथीदारांसह येऊन पोचणार असल्याचे त्यांनी कळवले. संपूर्ण तीन दिवसांच्या संगीत संमेलनाचे संयोजन मलाच करावे लागणार होते. तारसप्तकचा चिटणीस या नात्याने मी ही जबाबदारी आनंदाने आणि अभिमानाने स्वीकारली.

नेहमीप्रमाणे कुमारजी एक दिवस अगोदर येणार होते. आम्ही सात संयोजक स्वागतासाठी नामपल्ली स्टेशनवर वेळेवर पोचलो. मुंबईहून निघालेली सिकंदराबाद एक्सप्रेस वेळेवर आली. कुमारजींच्या बरोबर वसंत आचरेकर, अरविंद मंगरूळकर, विठ्ठलराव सरदेशमुख येणार होते. आपले तानपुरे बरोबर आणले होते कुमारजींनी. सर्वांचे स्वागत करण्यासाठी आम्ही पुढे सरसावलो. सुगंधी फुलांचा एक सुंदर हार कुमारजींच्या गळ्यात घातला मी. अत्यानंदाने अरविंद मंगरूळकर यांनी मला मिठीच मारली आणि माझ्या पाठीवर कौतुकाची थाप दिली. विठ्ठलराव सरदेशमुख माझ्या गळ्यातच पडले आणि त्यांनी झालेला आनंद अशा रीतीने व्यक्त केला. कुमारजी प्रसन्न आणि प्रफुल्ल दिसले. वसंतराव आचरेकरांनी आनंदाने हस्तांदोलन करून आपला आनंद दाखविला. सर्व पाहुण्यांना घेऊन आम्ही भूमण्णा गल्लीतील निवासस्थानी आलो.

चहा-कॉफी झाली सर्वांची. सकाळचे सर्व कार्यक्रम उरकल्यानंतर आम्ही देशपांडे यांच्या हॉलमध्ये एकत्र बसलो. कार्यक्रमाबद्दलच चर्चेला आरंभ झाला. मला कुमारजींनी प्रश्न केला, 'मोहोळकर, बघू या तरी उद्या सकाळची मैफल कशी काय आखली आहे ?' मी कार्यक्रमाची रूपरेखा लिहिलेले कागद कुमारजींना दिले. त्यांनी संपूर्ण कार्यक्रम काळजीपूर्वक वाचून काढला. ते म्हणाले, 'यावरून असे दिसते की सुरुवातीलाच तुम्ही माझ्या संपूर्ण मैफलीची माहिती वाचून दाखविणार. एक राग संपल्यानंतर आम्हाला तानपुरे जुळवावे लागतातच. त्या वेळेमध्ये तुम्ही दुसऱ्या रागाची माहिती सांगितली तर श्रोत्यांना फार सोयीचे होईल.' मी अवाक् होऊन कुमारजींच्याकडे पहातच राहिलो. क्षणभर मी बुचकाळ्यात पडलो. कुमारांना काय उत्तर द्यावे, हेच समजेना. कुमारजी एवढे सहकार्य

देण्यास तयार होतील याची कल्पनाच नव्हती मला. एक राग झाल्यानंतर ते मला दुसऱ्या रागाविषयी माहिती सांगू देणार नाहीत, अशीच माझी कल्पना होती. जवळजवळ तशी खात्रीच वाटली होती. पण कुमारजींनी मला एक सुखद धक्काच दिला. अरविंद मंगरूळकर तर विस्फारलेल्या आनंदाने भरलेल्या डोळ्यांनी माझ्याकडे पाहू लागले. आता मी कुमारजींना काय उत्तर देतो, हे ऐकण्यास सर्वजण उत्सुक झाले.

शांतपणे मी म्हणालो, 'कुमारजी, आपण म्हणता ते खरं आहे. एक राग झाल्यानंतर मी दुसऱ्या रागविषयी श्रोत्यांना सांगावे, ही आपली सूचना योग्यच आहे. पण मी त्या दृष्टीने तयारी केलेली नाही. माझ्या विचारानुसार सारी तयारी पूर्ण झाली आहे. माझ्या निवेदनाच्या झेरॉक्स कॉपीज काढून तयार झाल्या आहेत. आपण म्हणता तसा बदल करणे मला योग्य दिसत नाही.' कुमारजींनी स्मित केले आणि म्हणाले, 'मोहोळकर, कार्यक्रम तुम्ही ठरविल्याप्रमाणेच होईल.' कुमारजींची संमती मिळाल्याने माझा जीव भांड्यात पडला. मी निर्धास्त झालो.

कुमारजी आतल्या खोलीत गेले. ही संधी साधून अरविंद मंगरूळकर म्हणाले, 'मोहोळकर, फार फार नशिबवान आहात. भाग्यवान दिसतां. तुम्हाला कुमारजींनी देऊ केलेले हे सहकार्य खरोखरच अनपेक्षित वाटले मला दखील. इतर कुणालाही एवढे सहकार्य कुमारजींनी मुळीचं दिले नसते. आता उद्याचा संपूर्ण कार्यक्रम तुमच्या नियोजनानुसारच करा. अप्रतीम मैफल जमणार यात शंकाच नाही. तीन दिवसांचे हे संगीत संमेलन यशस्वी होणार आहे, हे विसरू नका.' असं बोलून मंगरूळकरांनी माझ्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवला.

दुसरे दिवशी सकाळी बरोबर ८ वाजता आम्ही सर्वजण बशीरबाग मधील लेडी हैदरी क्लबच्या समोरील शामियान्यामध्ये जमलो. सर्व व्यवस्था सुरेख झाली होती. व्यासपीठावर पांढऱ्या स्वच्छ चादरी टाकून स्टेज शानदार सजविलेले दिसले. लाऊडस्पीकरची व्यवस्था ठीक झाली की नाही हे तपासले आम्ही. स्टेजवर तीन आणि एक मायक्रोफोन व्यासपीठाजवळ ठेवला होता. एकूण सारी तयारी मनासारखी झालेली पाहून खूप समाधान झाले. हार आणून ठेवले होते एका कोपऱ्यात.

श्रोते मंडळी येण्यास सुरुवात झाली. गर्दी वाढतच गेली. हॉल गच्च भरलेला पाहून आनंद झाला. संपूर्ण वातावरण प्रसन्न होते. हॉल आणि शामियाना श्रोत्यांनी भरून गेले. आमचा उत्साह शतपट झाला. ८॥ च्या सुमारास कुमारजींचे आगमन झाले. कुमारजी, वसंत आचरेकर, विठ्ठलराव सरदेशमुख आणि तानपुरे झंकारणारे स्टेजवर विराजमान झाले. अरविंद मंगरूळकर समोरच बसले.

बरोबर पावणे नऊ वाजता संगीत दिग्दर्शक वसंत देसाई यांनी प्रवेश केला सभागृहात. आम्ही त्यांच्या स्वागतासाठी पुढे सरसावलो. दिग्दर्शक वसंत देसाई यांना विनंती केली की कलाकारांचे स्वागत करावे. प्रथम कुमारजींचे पुष्पहार घालून वसंत देसाई यांनी स्वागत

केले. तेव्हा टाळ्यांचा कडकडाट झाला. नंतर वसंत देसाई यांनी वसंत आचरेकर आणि विठ्ठलराव सरदेशमुख यांचे स्वागत केले पुष्पहार घालून. तानपुऱ्यावरील व्यक्तींना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर मी पुष्पहार घालून वसंत देसाई यांचे यथोचित स्वागत केले. त्यानंतर संगीत संमेलनाचे उद्‌घाटन करण्याची त्यांना विनंती करण्यात आली. वसंत देसाई यांनी उद्‌घाटनाचे भाषण खूपच छान केले. त्यांच्या भाषणातील एका वाक्याने आम्ही सारे संयोजक बेहद्द खुष झालो. ते म्हणाले, 'ये सब लोक पहिलेही प्रोग्रॅममें तारसप्तकमें जा पहुँचे, इसका मुझे गर्व है।' सर्वांनी टाळ्या वाजवून वसंत देसाई यांच्या विधानाला दुजोरा दिला.

संगीत दिग्दर्शक वसंत देसाई यांच्या भाषणानंतर मी कार्यक्रमाची संपूर्ण माहिती सांगितली. कुमारजींच्या बंदिशी मी वाचून दाखविल्या. प्रत्येकाला प्रवेशद्वारावरच कार्यक्रमाची पत्रिका देण्याची व्यवस्था केलीच होती. सर्व श्रोते कार्यक्रमाची माहिती वाचू लागल्याचे दिसले. लय, ताल याचीही माहिती होती पत्रिकेमध्ये. रसिक श्रोते कुमारांचे गायन ऐकण्यास उत्सुक झालेले दिसले. कुमारजींना मैफल सुरू करण्याची नम्र विनंती करून मी माझे प्रास्ताविक संपविले.

कुमार गंधर्व यांनी सहेलीतोडी हा ख्याल सुरू केला. श्रोते एकाग्रतेने ऐकत होते. अधूनमधून बंदिशीतील शब्द वाचून गाण्याचा आनंद घेत होते. तल्लीन होऊन कुमारजी विलंबत ख्यालाची स्वराकृती कौशल्याने दाखवीत होते. समेवर येत होते- विजेसारखं काडकन्! दर्दी आणि जाणकार श्रोते झकास दाद देत होते त्यांना. कुमारजी रंगून गेलेले दिसले. कुमारजींचा संपूर्ण कार्यक्रम अप्रतिम झाला.

अशा प्रकारची कुमारजींनीच बांधलेल्या प्रातःकालीन रागांची ही पहिलीच मैफल होती हैदराबादमधील. सर्व श्रोते लक्षपूर्वक आणि तन्मयतेने गायन ऐकत होते. आम्हा संयोजकांच्या श्रमांचे सार्थक झाले. आमचा प्रयत्न यशस्वी झाला.

कार्यक्रम झाल्यानंतर अनेक श्रोत्यांनी आम्हा संयोजकांचे भरपूर कौतुक केले. माझी प्रशंसा केली अरविंद मंगरूळकर, विठ्ठलराव सरदेशमुख यांनी. वसंतराव आचरेकरांनी पाठीवर थाप मारून माझे तोंड भरून कौतुक केले. माझे संयोजन त्यांना एकदम छान वाटले.

नंतरच्या दोन्ही दिवशी कुमारजी सुरुवातीपासून शेवटपर्यंत उपस्थित होते. हरिप्रसाद चौरासिया आणि बी. रमणी या दोन्ही कलावंतांना पुष्पहार घालून त्यांचे स्वागत करण्याचा बहुमान कुमारजींना मिळाला. त्या कलावंतांचा आनंद आकाशाला पोचला. कुमारजींना झालेला आनंद पाहूनच आम्ही भारावून गेलो. दोन्ही कार्यक्रम रसिकांना खूप आवडले. रसिक आणि जाणकार श्रोत्यांनी दाद देऊन कार्यक्रमाची रंगत वाढविली. कुमारजीमुळेच आम्हा संयोजकाचा उत्साह आणि हुरूप दुणावला. अनेक श्रोत्यांनीही तीन दिवसांच्या कार्यक्रमाची स्तुती केली. अशा प्रकारची संगीताची मेजवानी दिल्याबद्दल आम्हाला हार्दिक

धन्यवाद दिले. आम्हाला पावतीच मिळाली.

कुमारजींनी सोलापूरच्या सिद्धेश्वर मंदिरामध्ये भजने गाऊन सिद्धेश्वराची सेवा केली होती. अनेक वर्षानंतर सिद्धेश्वराचे दर्शन घेता आले. कुमारजींच्या मुळेच दोन वेळा पंढरपूरची यात्रा घडली. विठ्ठल-रखुमाईच्या पायांवर डोके ठेवण्याचा आनंद मिळाला. तुळजापूरच्या भवानी देवीला मनोभावे नमस्कार करण्याची संधी कुमारजींच्यामुळेच मिळाली. अक्कलकोटच्या स्वामी महाराजांच्या समाधीपुढे नतमस्तक होण्याचे भाग्य त्यांच्यामुळेच लाभले. माचणूर येथील बाबा महाराजांची समाधी आणि आश्रमाचा रम्य परिसर पाहू शकलो. कुमारजींच्यासाठी असा देवदर्शनाचा कार्यक्रम संयोजित केला रामभाऊ पुजारी याने. गाड्याबरोबर नळ्याचीही यात्रा झाली.

कुमारजींच्यामुळेच आणखी एक संस्मरणीय भाग्ययोग आला. कुमारजी आणि सौ. ताई यांचे आगमन झाले इचलकरंजीला. श्रीराम पुजारी आणि सुरेश आचरेकर ही त्यांच्याबरोबर होते. इचलकरंजीतील रामकाकांच्या घरी त्यांचे उत्तम स्वागत झाले. वाडीला जाण्यासाठी रामकाका यांनी गाडी दिली. गाडीमध्ये जागा होती, म्हणूनच मी देखील त्यांच्याबरोबर निघालो.

प्रथम आम्ही वाडीला जाऊन दत्तदिगंबराचे मनोभावे दर्शन घेतले. सौ. ताई यांनी महाअभिषेक भाविकतेने केला. त्यावेळी कुमारजीसह आम्ही तो पहात होतो. महाअभिषेक सोहळा भावपूर्णतेने झाला. तो पाहूनच आम्हाला आनंद झाला.

वाडीनंतर आम्ही औदुंबरला पोचलो. कविराज सुधांशु यांच्या घरी जाण्यांचा माझा हा पहिलाच योग. कुमारजींच्या बरोबर जाण्यामुळे या भेटीला वेगळेच रूप मिळाले कुमारजींच्या व कविराजांच्या गप्पा ऐकण्यास मिळाल्या. तो सहजसंवाद ऐकणे हा एक अनुभवच होता. कविवर्यांनी आपली काव्याची पुस्तके कुमारजींना प्रेमाने भेट दिली. कविवर्यांची सही घेण्यास कुमारजी विसरले नाहीत. कविराजांनी आनंदाने तारीख लिहून प्रत्येक पुस्तकावर; कुमार गंधर्व यांना सप्रेम भेट- असे लिहिले.

सौ. ताई यांच्याबरोबर पुजारी आणि आचरेकर सुरेश घाटावर गेले. महाअभिषेकाचा तो दुसरा सोहळा मला पाहाता आला नाही. पण सौ. ताईंनी प्रसाद दिल्यामुळे आंतरिक समाधान मिळाले.

कविराज सुधांशु यांचा विनम्रतेने निरोप घेऊन कुमारजी त्यांच्या खोलीतून बाहेर पडले. मी त्यांच्या मागेच होतो. कविराजांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि प्रेमाने म्हणाले, 'मोहोळकर, तुम्ही विजय तेंडूलकरांच्या सारखे दिसता हं!' जानेवारी महिन्यात, मकरसंक्रांतीच्या दिवशी औदुबरच्या साहित्यसंमेलनासाठी अध्यक्ष म्हणून आले होते विजय तेंडूलकर. म्हणून कविराजांनी मला तसे म्हटले, हे माझ्या लक्षात आले. कुमारजींनी कविवर्यांना माझ्या नाट्याभिनयाबद्दल कौतुकमिश्रित भाषेत सांगितले. सुधांशु यांनी माझ्या पाठीवर प्रेमाने शाबासकीचा हात फिरवून कुमारजींच्या म्हणण्याला संमती दर्शविली.

कुमारजी असं काही सांगतील अशी मला कल्पनाच नव्हती. सुखद धक्काच होता हा.

कुमारजी भाविक आणि श्रद्धाळू आहेत. दैनंदिन करावयाच्या कर्मकांडावर मात्र त्यांचा विश्वास नाही. ते भाविकतेने दर्शन घेतात. भजने गाऊन संगीत-सेवा करतात. पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, सोलापूर येथे केलेली अशी संगीत-सेवा मी पाहू शकलो.

कुमार पचास समारोहाच्या पहिल्याच दिवशी कुमारजींनी ११ वैदिक दशग्रंथी ब्राह्मणांच्या अत्यंत लयबद्ध मंत्रघोषात होमहवन केले होते. त्या दशग्रंथी ब्राह्मणांचे सुरेल आणि स्पष्ट मंत्रोच्चारण ऐकूनच कान भरून गेले. एवढे प्रभावी मंत्रोच्चारण सहसा ऐकायला मिळत नाही. उदबत्त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळत होता. वातावरणात प्रसन्नता आणि प्रफुल्लता भरून असल्याने आम्ही उपस्थितांना देखील नतमस्तक व्हावेसे वाटले. आम्हा सर्वांच्या कपाळावर कुंकुमतिलक लावल्याने आम्ही त्या पूजेमध्ये सहभागी झाल्याचा आनंद आम्ही भरभरून घेत होतो.

होमहवन आणि पूजा अर्चा झाल्यानंतर कुमारजींनी भक्तिपूर्वक प्रत्येक ब्राह्मणाला साष्टांग नमस्कार घातला. हे भावपूर्ण दश्य पाहूनच आमच्या अंगावर रोमांच उभे राहिले. हा संपूर्ण धार्मिक विधी ब्रह्मवृंदाच्या सांगण्याप्रमाणे यथासांग पार पडला. ११ ब्राह्मणांचा कुमारजींनी यथाविधी सत्कार केला.

११ ब्राह्मणांपैकी एकजण वयाने कुमारजीपेक्षा लहान होता. त्या ब्राह्मणाने कुमारजींना एका पाटावर बसवून त्यांच्या भव्य कपाळावर कुंकम तिलक लावला. त्याने कुमारजींना साष्टांग नमस्कार घातल्याने आम्ही विस्मयचकित झालो. त्या वयाने लहान असलेल्या ब्राह्मणाचे आम्हा सर्वांना खूप कौतुक वाटले. वयाने लहान असूनही त्या दशग्रंथी ब्राह्मणाला साष्टांग दंडवत घालून कुमारजींनी त्याचा योग्य मान राखला. तो विद्वत्तेच्या आणि ज्ञानाच्या बाबतीत श्रेष्ठच होता.

कुमार पचासचा देवास येथील तीन दिवसांचा संगीत-सोहळा झाल्यानंतर आम्ही मित्रमंडळी हैदराबादला परत आलो. कुमारजींचा सत्कार करण्याची कल्पना मांडली एकाने. आम्हा सर्वांना ती कल्पना आवडली. हैदराबादमधील रसिक श्रोत्यांच्या उपस्थितीत एक भव्य सत्कार कुमारजींचा व्हावा या कल्पनेने आम्ही सर्वजण भारावून गेलो. त्या सत्कारसोहळ्याचा तपशील ठरविण्यात आम्ही मग्न झालो.

त्यानंतर कुमारजी हैदराबादला आले एका कार्यक्रमासाठीच. त्यांच्या गाण्याची बैठक होणार होती. नेहमीप्रमाणे कुमारजी एक दिवस अगोदरच आले हैदराबादला. या मैफलीच्या शेवटी कुमारजींचा सत्कार हैदराबादच्या रसिक श्रोत्यांच्या वतीने केल्यास, त्या सत्काराला औचित्यपूर्ण म्हणता आले असते. कुमारजींच्या परवानगीविना सत्कार कसा करणार आम्ही? सर्वांनी ही जबाबदारी माझ्या शिरावर टाकली.

कुमारजी आणि मी एका क्षणी दोघेच हॉलमध्ये होतो. ती संधी साधून मी सत्काराबाददल विनम्रतेने विचारणा केली. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, ठिकठिकाणी

माझे सत्कार व्हावेत, प्रेमी मंडळींनी मला अहेर करावा, माझ्या गळ्यात हार घालावा हे मला मुळीच पसंत नाही. अशी बुवाबाजी मला आवडत नाही. समजलं ना ?' कुमारजींचे हे म्हणणे बिनतोड वाटले मला. सर्व मित्रांना मी कुमारजींचा नकार समजावून सांगितला. सत्काराचा कार्यक्रम मग होणारच कसा ?

अशा सत्काराला जर होकार दिला असता कुमारजींनी तर अनेक शहरातील कुमारप्रेमी रसिकांनी असेच सत्कार समारंभ आयोजित केले असते. कुमारजींच्या गळयात असंख्य हार पडले असते, त्यांना श्रीफळ-शाल प्रत्येक ठिकाणी मिळाली असती. प्रेमी मंडळींनी कुमारजींना देणग्या-थैली देण्यात भूषण मानले असते. त्यांच्या स्वभावाला असा सत्कार मानवण्यासारखा नव्हताच. असे सत्कार ठिकठिकाणी करून घेणे, ही एक प्रकारची बुवाबाजीच वाटली त्यांना. देवासमधील सत्कारास मान्यता दिली हेच खूप झाले.

कविवर्य अनिल - आ. रा. देशपांडे उर्फ आप्पासाहेब हे कुमारजींचे एक खास मित्र-जिवलग आणि जिव्हाळ्याचे सन्मित्र. त्यांची दोन सुंदर भावगीते कुमारजींनी अमर करून टाकली. आज अचानक गाठ पडे आणि अजुनि रुसून आहे या दोन्ही भावगीतांना बहारदार चाली लावल्या कुमारजींनी आणि सुरेख म्हटली. या रेकॉर्डने रेकॉर्ड ब्रेक केले. प्रचंड खप झाला या रेकॉर्डचा. या रेकॉर्डची रॉयल्टी आप्पासाहेबांना कल्पनातीत मिळाली. मागे आप्पासाहेबांचा व माझा परिचय झाला होता सोलापुरात पुजारीच्या घरी.

देवासमध्ये आमची पुन्हा भेट झाली. प्रेमाचा रंग हे आणखी एक भावगीत आप्पासाहेबांनी कुमारजींना दिले असल्याचे कळले. या भावगीताला त्यांनी सुरेख चाल लावली असल्याबद्दल समजले. त्या चालीवर कुमारजी स्वतः खुष होते. पण त्या भावगीताला साजेसे दुसरे भावगीत मिळाले नाही. म्हणून त्या भावगीताची रेकॉर्ड करण्याचे राहून गेले.

देवासमधील भानुकुलात आम्ही सर्वजण गप्पा करीत बसलो होतो. मी म्हणालो, 'आप्पासाहेब, कुमारजींना सांगा ना 'प्रेमाचा रंग' हे भावगीत सर्वांना ऐकविण्यास.' आप्पासाहेब शांतपणे उत्तरले, 'नको रे बाबा. कुमारजींना जोड मिळाल्याशिवाय ते 'प्रेमाचा रंग' गाणार नाहीत. मग रेकॉर्ड होणार कशी ? ती रेकॉर्ड झाल्यानंतर मला मिळणारी रॉयल्टी अविश्वसनीय असेल.'

एकदा बाळ कोल्हटकर कुमारजींना भेटण्यास आले. ते काकुळतीने त्यांना म्हणाले, 'कुमार, मला माझ्या नाटकासाठी तुझी दोन गीते हवीत. देणार ना मला ?' कुमारजींनी तात्काळ म्हटले, 'दिली तुला ती दोन गीते.' बाळ कोल्हटकरच्या एका नाटकासाठी कुमारजींनी दोन गीते गाऊन ते नाटक गाजविले. एक पैसाही न घेतल्याचे त्यांनीच सांगितले.

एखादी कॅसेट लावली असल्यास ती सर्वांनी शातंपणे, एकाग्रतेने ऐकावी, असंच कुमारजींना वाटत असे. कॅसेट चालू असताना बोलणे, गप्पा मारणे त्यांना मुळीच पसंत नसे. कुमार पचासच्या वेळी हॉलमध्ये अनेक प्रेमी जमले होते. भानुकुल या वास्तूच्या गृहप्रवेशाच्या- वास्तुशांतीच्या मंगल दिवशी अंबादास यांनी पखवाज वादन केले होते.

पखवाज वादन फार फार छान झाले होते. त्या पखवाज वादनाची कॅसेट कुमारजींची अत्यंत आवडती होती. एक चिरस्मरणीय पखवाज वादन !

कुणीतरी या कॅसेटची आठवण केली. कुमारजी एकदम खुष झाले. त्यांनी कपाटातून ती कॅसेट काढली आणि सुरू केली. कुमारजी देखील एकाग्रतेने ऐकत बसले. थोड्याच वेळात कुमारजींच्या लक्षात आले की काही जणांचे कॅसेटमध्ये लक्ष नसून ते गप्पा मारण्यात रमले आहेत. ताडकन् कुमारजी म्हणाले, 'गप्पामध्येच रस असेल, तर मी ही कॅसेट बंद करतो. आपण गप्पा मारू शकता.' एकदम सर्वजण शांत बसले आणि मन लावून पखवाज वादन ऐकू लागले.

माझा मुक्काम देवास येथे असताना एके दिवशी मला कुमारजींनी देवासच्या परिसरातच असलेल्या शीलनाथांची धुनी संस्थानातील समाधी पाहण्यास नेले होते. तेथील धुनी दिवसाचे चोवीस तास धगधगत असते. समाधीच्या भोवतालच्या आवारात अनेक फुल-झाडे, वेली आणि वृक्ष यांची दाटी झाली होती. संपूर्ण बाग दिसत होती हिरवीगर्द. सुंदर आणि सुगंधी फुलांनी बाग किती छान दिसत होती. त्या बागेत काही पाट्या दिसल्या. खडी को पाडी नये - पाडी को उठाये नये.

कुमारजींना मी त्या पाट्यांचा अर्थ विचारला. कुमारजींनी स्पष्टीकरण केले. झाडे-वेली, वृक्ष या वनस्पती देखील सजीवच आहेत. त्यांना त्रास देऊ नये. फुले तोडू नयेत. पडलेल्या वेलीला उभी करण्याचा प्रयत्न करू नये. उभ्या असलेल्या वेलीला खाली पाडू नये. अशाच सूचना देणाऱ्या त्या पाट्या आहेत

पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधील एका सभागृहामध्ये कुमारजींची एक प्रकट मुलाखत झाली होती. त्यावेळी मी उपस्थित होतो. अरविंद मंगरूळकर, चिरमुले आणि पुण्यातील अनेक जाणकार, अभ्यासू, संगीतज्ञ, समीक्षक, गायक आणि रसिक जिज्ञासू श्रोते उपस्थित होते. कुमारजींना संगीतशास्त्राबद्दल, संगीतातील अनेक घराण्याविषयी, घराण्याच्या गायनशैलीबद्दल एका पाठोपाठ एक असे अनेक प्रश्न विचारीत होते. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर कुमारजींनी व्यवस्थित देऊन त्यांचे समाधान केले. रसिक श्रोत्यांचे कुतूहल, उत्सुकता, जिज्ञासा पूर्ण करून त्यांच्या ज्ञानामध्ये भर घालण्यासाठी कुमारजींनी अशी चर्चा करण्याचा नवा पायंडा घातला. प्रकट मुलाखतीची पद्धत सुरू केली.

गांधर्व महाविद्यालयातून तयार झालेल्या गायकांना कुमारजींचे गायन आवडत नाही. कुमारजी पारंपारिक पद्धतीने ख्यालाची मांडणी करीत नाहीत. कुमारजींना पारंपरिक गायकी येत नाही. पारंपारिक बंदिशी गाताना कुमारजी मोडतोड करतात, वर्ज्य स्वर लावतात, अशा प्रकारच्या तक्रारी अनेक गायक खाजगी गप्पामध्ये करीत असत. घराण्याचा अवास्तव अभिमान बाळगणारे गायकच अशा तक्रारी करीत असतात. या सर्व तक्रारी कुमारजींच्या कानावर येत असत. पण कुमारजी कुठेही या तक्रारीविषयी ब्र देखील काढीत नसत. कोणत्याही कुत्सित टीकेला कुमारजी उत्तर देत नसत.

मुंबई येथे गायक - वादक - समीक्षक - अभ्यासक यांच्या खास उपस्थितीत सकाळच्या रागांच्या मैफलींची मालिकाच आयोजित केली होती. कुमारजींना या सभेमध्ये गाण्यासाठी आमंत्रित केले होते. प्रा. देवधर हे कुमारजींचे आद्यगुरू ! कुमारजी देवास येथून जातानाच मनाचा निर्धार करून निघाले. सर्व श्रोत्यांना चकित करून टाकण्याचा निश्चय केला होता. तशी मनाची तयारी करूनच ते गाण्यासाठी निघाले.

आपल्या मैफलीत कुमारजींनी पारंपारिक राग, पारंपारिक बंदिशी, पारंपारिक पद्धतींनी सादर करून सर्व श्रोत्यंना महदाश्चर्याचा जबरदस्त धक्काच दिला. गांधर्व महाविद्यालयातून शिकून तयार झालेले गायक ख्यालाची मांडणी ज्या प्रकारे करीत असत, त्या पद्धतीने कुमारजी गायले. त्यांच्या गायनानंतर कुमारजींचे गुरूजी- प्रा. देवधर यांनी स्वच्छ शब्दामध्ये कबूल केले. 'अद्यापदेखील मला हा कुमार नीट आकलन झालेला नाही. आजचे कुमारचे गायन ऐकून मी संभ्रमित झालोय. पारंपारिक शैलीने गात असलेला कुमार पाहून खरोखर मला आश्चर्याचा धक्का बसला.'

माझा मुक्काम देवासमधील भानुकुलात होता. त्या खास मैफलीत गाऊन आल्यानंतर कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, मी फक्त ८०% इतकेच गायलो. गांधर्व महाविद्यालयाच्या पारंपारिक पद्धतीने. जर मी १००% गायन त्यांच्या शैलीत केले असते तर ?' कुमारजी पारंपारिक पद्धतीने गाऊ शकतात, हे त्यांनी त्या दिवशी सिद्ध केले.

देवधरांच्या क्लासमध्ये कुमारजी १२ वर्षे संगीताचे अध्ययन करीत होते. देवधर गुरूजींनी अनेक नामवंत गायकांच्या, सर्व घराणेदार गायकांच्या मैफली ऐकण्याची संधी कुमारजींना दिली. प्रत्येक गायनशैलीतील सौंदर्यस्थळे कुमारजींना समजावून दिली. त्या गायनशैलीतील ग्राह्य गुण कोणते, अग्राह्य दोष कोणते, हे कुमारजींना सांगत होते. गुरूजींनी संगीताकडे पाहण्याची अचूक दृष्टी दिली. सखोल सूक्ष्म अभ्यास करून कुमारजींनी भरपूर चिंतन केले. आपले स्वतःचे एक वेगळेच घराणे सुरू केले. त्यांनी पुरेपूर जाणले की- ताल गया, तो बाल गया. सूर गया तो सर गया.

कुंदगोळ गावी सवाई गंधर्व यांची पुण्यतिथी नाडगीर नावाचे धनाढ्य पण रसिक गायनप्रेमी गृहस्थ दरवर्षी आपल्या वाड्यातच करीत असतात असं ऐकलं होतं. तेथे जाण्याचा योग एकदा अचानकपणे जुळून आला. कुंदगोळ मधील समारोहात गाणार होते कुमार गंधर्व. म्हणून मी कुंदगोळला गेलो वसंतराव आणि मालिनी राजूकरांच्या सह. कुमारजी कुंदगोळ येथे तीन दिवस राहणार असल्याचे कळले होते. कुमारजींच्या सहवासाच्या आशेने मला कुंदगोळला खेचून नेले. कुमारजींच्या शेजारी बसून मी अनेक गायकांची गाणी ऐकण्याचे भाग्य मिळवू शकलो. अलभ्य लाभ !

आजचे प्रथितयश आणि ख्यातकीर्त गायक अजय पोहनकर त्यावेळी उदयोन्मुख असे कलाकार होते. त्यांचे गायन आम्ही ऐकले नव्हते. कुमारजी देखील त्यांचे गायन ऐकण्यास उत्सुक होते. अजय पोहनकरच्या गाण्याचे कुमारजींना अत्यंत कुतुहल होते. पण त्यांची

वेळ होती रात्री साधारणपणे दोन वाजता. इतर सर्वजण झोपेने पेंगुळले होते. मला कुमारजी म्हणाले, 'चला मोहोळकर, आपण फिरतफिरत गाणं ऐकू या. अजयने कितपत तयारी केली आहे, हे जाणून घेण्याची इच्छा आहे. आपण दोघे फिरत राहू आणि अजय गायला बसेपर्यंत जागे राहू.' नवोदित कलाकाराचे गाणं ऐकल्याशिवाय चैन पडत नसे कुमारजींना.

आम्ही दोन वाजेपर्यंत फिरत होतो. अजय पोहनकरचे नांव सांगितले. आम्ही दोघे एका जागी बसलो. कुमारजी कान टवकारून, तन्मयतेने अजयचे गायन ऐकू लागले. अधूनमधून त्यांनी दिलेली दाद 'वाहव्वा' ऐकून मी सुखावलो. मला अजयचे गायन आवडलं. गाणं संपल्यानंतर आम्ही अजयच्या जवळ गेलो. खाली वाकून अजयने कुमारजींना वंदन केले. कुमारजींनी मनःपूर्वक शुभाशीर्वाद दिले. पाठीवरून हात फिरवला. नवीन कलाकारांना प्रोत्साहन देणे हे कुमारजींना आपले कर्तव्यच वाटत असे. अशा अनेक गायक-वादकांना प्रेरणा देणारे कुमारजी !

कुमारजींच्या बरोबर असताना अनेक संयोजक त्यांना भेटायला आलेले मी पाहिले आहेत. ते कुमारजींना विचारत असत, नवीन होतकरू कलावंताबद्दल. अशा कलावंतांचे कार्यक्रम करण्याची त्यांची तयारी असे. कुमारजींच्या तोंडातून अशावेळी दोन नावे नेहमी ऐकत होतो. एक नाव होते डी. के. दातार यांचे तर दुसरे नाव होते मालिनी राजुरकरांचे. अशा नवोदितांना चेतना देणारे कुमारजी !

कुमारजींनी केलेली अशी शिफारस अत्यंत मोलाची वाटे संयोजकांना. वर्तमानपत्रातील प्रशंसेपेक्षा ही शिफारस अधिक खात्रीची वाटणारच. कुमारजी हे असामान्य आणि अलौकिक गायक असल्याबद्दल भारताच्या कानाकोपऱ्यात त्यांच्या नावाचा डंका वाजत होता. नवीन उदयोन्मुख गायक-गायिका - वादक यांना प्रोत्साहन- प्रेरणा देण्यास कुमारजी चुकत नसत. प्रथितयश गायकाने दिलेल्या या प्रोत्साहनामुळेच हे होतकरू तरूण गायक आणि गायिका, कुमारजींना खाली पहायला लागू नये, म्हणून प्रयत्नांची शिकस्त करीत असत. नियमितपणे भरपूर रियाझ करून, विवेक विचार पूर्वक, घराणेदार गायकी श्रोत्यांना ऐकवण्याचाच ध्यास घेत असत.

८ एप्रिल १९८४ रोजी कुमारजींना ६० वर्षे पूर्ण होऊन ६१ व्या वर्षात पदार्पण केले. षष्ठ्यब्दीपूर्तीचा भव्य समारोह दिल्ली येथील गांधर्व महाविद्यालयातर्फे साजरा करण्यात आला. त्यानंतर देवास येथे एकसष्ठी समारंभ करण्याचे निश्चित झाले. या समारंभाचे औचित्य साधून कुमारजी विषयीचा एक गौरव अंक प्रकाशित करण्याचे ठरले. हैदराबादमध्ये अशा प्रकारच्या बातम्या ऐकून आम्ही सर्वजण अत्यंत आनंदित झालो. देवासला जाण्याची स्वप्ने पाहू लागलो. कुमार पचासनंतर या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आम्ही देवासला जाण्यासाठी अत्यंत उत्सुक झालो होतो.

एके दिवशी मला देवासचा शिक्का आणि पत्ता असलेले एक पाकीट आले. त्यामध्ये समारंभाचा संपूर्ण कार्यक्रम दिलेला होता. सौ. ताईंच्या सहीचे पत्र होते ते. त्या पत्रामध्ये

मला कुमारजी विषयीच्या माझ्या आठवणी लिहून पाठविण्यासंबंधी कळविले होते. आणखी एक गोष्टीचा खुलासाही केलेला होता त्या पत्रामध्ये. गौरव अंकाची पाने आणि छपाईचा खर्च या दोन्ही गोष्टी लक्षात घेतल्यास, पाठविलेल्या सर्व आठवणी छापल्या जातीलच याची खात्री देता येत नाही. ही सूचना मला योग्यच वाटली. अपेक्षाभंग होऊ नये म्हणून ही सूचना रास्तच होती.

त्याच दिवशी मी सौ. ताईंना उलट टपाली एक पत्र पाठिवले. मी त्यांना कळवले की मी आपल्याला माझ्या कुमारजीविषयींच्या आठवणी निश्चित पाठवीत आहे. माझ्या आठवणी योग्य मुदतीत पोचतील अशी मी काळजी घेत आहे.आणखी एक गोष्ट मी स्पष्ट केली की मी पाठ्वीत असलेल्या सर्व आठवणी गौरव अंकामध्ये समाविष्ट केल्या किंवा एकही आठवण छापली नाही, तरी मला चालेल. आपण मला माझ्या आठवणी पाठविण्यासंबंधी पत्र पाठविले यातच माझा बहुमान झाल्याचा मला आनंद मिळाला.

आठवणींनी गर्दी केली माझ्या मनामध्ये. कुमारजींच्या सहवासातील अनंत आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करू लागलो. हैदराबाद, देवास, इंदोर, महू, पुणे, मुंबई, सोलापूर येथील कितीतरी आठवणी माझ्या डोळ्यासमोरून एखाद्या चलचित्रपटाप्रमाणे जाऊ लागल्या. माझ्या अंतःचक्षूसमोर दिसू लागल्या. एकेक आठवण मला हर्षोत्फुल्ल करीत होती. मला पुनःप्रत्ययाचा आनंद मिळू लागला. मी जवळजवळ २४ आठवणी लिहून काढल्या. प्रत्येक आठवणीला एक सुयोग्य शीर्षक दिले. या आठवणी सौ. ताईंच्या नावाने देवासला पाठवून दिल्या.

देवासला कुमारजींच्या एकसष्ठी समारंभाला जाण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मी रेल्वेचे आरक्षणही करून टाकले. १९७४ साली ८ एप्रिल रोजी कुमार पचास या समारोहासाठी जातांना माझ्याबरोबर स्थानिक संगीतप्रेमी, माझी पत्नी व श्रीकांत देशपांडे ही मंडळी होती. या समारोहाला उपस्थित राहण्यासाठी यावेळी एकटाच निघालो. माझ्या मित्रांच्या वर्तुळात काहीतरी वेगळेच परिवर्तन घडून आले. फार मोठ्या गैरसमजाचा हा परिणाम असावा, असेच वाटले मला. माझ्याशी असलेले प्रेमाचे संबंध त्यांनी तोडून टाकले. सर्वांनी मला वाळीतच टाकले. माझ्याशी बोलणे देखील बंद केले सर्वांनी. संगीतक्षेत्रापासून मी दूर फेकला गेलो. पण मी निराश मुळीच झालो नाही. याही अनुभवाने मला जाणीव झाली की Every difficulty in my life is a blessing in disguise.

हैदराबादला झालेल्या कुमारजींच्या मैफलीच्या वेळी त्यांनी हे बरोबर जाणले. कुमारजी चतुर आणि चाणाक्ष असल्यामुळे त्यांच्या लक्षात आला हा बदल. कुमारजींनी मला खूपच धीर दिला. कुमारजींचे माझ्यावरील प्रेम यत्किंचितही कमी झाले नाही हे माझ्या ध्यानात आले. त्यांच्या माझ्यावरील अकृत्रिम आणि निरपेक्ष प्रेमामुळे माझा उत्साह शतपटीने वाढला. त्यांच्यामुळंच मी 'एकला चलो रे' असं मनाशी गुणगुणत उदंड उमेदीने उभारीने, उसळल्या उत्साहाने जीवनाची वाटचाल करू लागलो. ते एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे

मला मार्ग दाखवीत होते. मन सुद्ध तुझं, गोष्ट हाये पृथवी मोलाची। तू चाल पुढं, तुला रं गड्या भीती कशाची, पर्वा भी कुणाची ॥ कुंकू चित्रपटातील या गीताची मला प्रकर्षाने आठवण झाली. कुमारजी माझ्या पाठीशी आहेत, याचाच मला अभिमान वाटू लागला. अकृत्रिम, निरपेक्ष अशा प्रेमाचा वर्षाव करणारे कुमारजी !

देवासच्या समारोहासाठी वेळेवर पोचलो. येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्था करण्याची पूर्वतयारी कुमारजींनी काळजीपूर्वक करून ठेवली होती. देवासमधील अनेक लॉजमधील खोल्या बुक करून टेवल्या होत्या. गांवोगावीच्या पाहुण्यांची सोय कुठं करायची याची लेखी यादी केली होती. अनेक स्वयंसेवक पाहुण्यांना ठरलेल्या लॉजमध्ये घेऊन जाण्यास सज्ज होते. जाण्यायेण्यासाठी वाहने-मोटारींचा ताफा तयार ठेवला होता. लॉजच्या सर्वच मालकांना बजावले होते की त्यांनी पाहुण्यांची व्यवस्था उत्तम ठेवावी. थंड-गरम पाणी, चहा-कॉफी, दूध, कपडे धुण्याची वगैरे व्यवस्था पहिल्या श्रेणीची करावी. कुणाकडूनही कोणतेही बिल मागायचे नाही. सर्व बिले नोंद करून ठेवावीत. ती बिले कुमार गंधर्व समारोहानंतर देतील. आलेल्या १०००-१२०० पाहुण्यांची राहण्याची वगैरे सोय उत्कृष्ठ केली होती. सर्व पाहुणे मंळींनाही बजावले की त्यांनी कशाचेही पैसे द्यायचे नाहीत.

भानुकुलच्या आवारातच प्रचंड मोठा शामियाना टाकला होता. खुर्च्या मांडून ठेवण्यात आल्या होत्या सर्व बाजूंनी. पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय होती. हात धुण्यासाठी वेगळी व्यवस्था केली होती. कुमार-पचास समारोहाच्या वेळी थोडी गैरसोय झाली असल्याचे कुमारजींनी पाहिले होते. एक स्नानगृह आणि दोन स्वच्छतागृहे कुमारजींनी नवीनच बांधून घेतली होती. भानुकुलच्या आवारात.

बुफे पद्धती असल्यामुळे आलेला प्रत्येक पाहुणा आपल्याला आवडेल, तो पदार्थ वाटेल तितका घेऊ शकत होता. स्वतः कुमारजी, सौ. ताई, राहुल बारपुते आणि अनेक स्वयंसेवक पाहुण्यांना काय हवे ते पहात फिरत होते. सावकाश- पोटभर- जेवण्याची हात जोडून विनंती करीत फिरत होते. कुमारजी- सौ. ताई यांचे देवास-इंदोरमधील सर्व शिष्य धावपळ करीत होते. निमंत्रितांची यत्किंचितही गैरव्यवस्था होऊ नये म्हणून दक्ष होते. अशी सारी व्यवस्था पाहूनच सर्वजण प्रसन्न झाले. सकाळ संध्याकाळ भोजनाचा मेनू नवा होता. एक मिष्टान्न केलेले असे. एक दिवस बेत होता हुग्गीचा.

काही मित्रांची व्यवस्था भानुकुलमध्येच करण्यात आली होती. उन्हाळ्याचे दिवस असले तरी गाद्या-गिरद्या सर्व खोल्यांमध्ये पसरून, पांढऱ्या स्वच्छ चादरी घातल्या होत्या. कोणत्याही प्रकारची गैरव्यवस्था होऊ नये म्हणून खबरदारी घेतली होती भरपूर. चहा-दूध-कॉफीची वेगळी व्यवस्था दिसली.

१९७४ च्या कुमार पचास या समारोहाच्या वेळी प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे पु. ल. येऊ शकले नव्हते. त्यांची अनुपस्थिती सर्वांनाच प्रकर्षाने जाणवली होती. श्रीराम पुजारी याने पु. ल. यांना आवर्जून उपस्थित राहण्याची विनंती केली असल्याचे समजले. पु. ल.

यांच्या उपस्थितीने सारी पाहुणे मंडळी प्रफुल्ल दिसत होती. सर्व वातावरण अत्यंत प्रसन्न आणि चैतन्यपूर्ण दिसत होते. कुमार-पचासच्या वेळी आलेली बहुतेक सर्व कुमार-प्रेमी मंडळी आलेली दिसली.

१९७४ च्या कुमार पचास समारोहाप्रमाणेच याही वेळी भानुकुलमध्ये खास अनौपचारिक समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कुमारजींच्या अनेक दूरच्या ठिकाणाहून आलेल्या प्रेमी मंडळींनी संपूर्ण भानुकुल भरून गेले होते. सर्वांच्या उत्साहाला उधाण आले होते. सकाळी १० ची वेळ होती.

अनेक वक्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या या घरगुती समारोहात. पु. ल. देशपांडे यांनी कै. भानुमती विषयीच्या, चटका लावणाऱ्या, कितीतरी आठवणी सांगून सारे वातावरण भारून टाकले. भानुमती विषयीच्या त्या आठवणींनी सर्व मंडळी गलबलून गेल्याचे जाणवले. अनेक मंडळींनी आपले डोळे टिपल्याचे स्पष्ट दिसून आले. भानुमतीमुळेच कुमारजी आपल्याला मिळाले हे त्यांनी स्पष्ट केले. भानुमती ही कुमारजींचे सर्वस्व होती. भानुमतीने केलेली सेवाशुश्रूषा, अथक प्रयत्न, अविश्रांत परिश्रम, कुमारजींची घेतलेली असीम काळजी, यामुळेच कुमारजी आजारातून उठले, यात तिळमात्र शंका नाही. अर्ध्या संसारातून भानुमती देवाघरी निघून गेल्या. कुमारजींना एकाकी सोडून, दोन कोवळी मुले मागे ठेवून, भानुमती गेल्या. कुमारजींना असा जबरदस्त मानसिक धक्का बसला की त्यातून ते कधीही बाहेर पडू शकले नसावेत. भानुमतीची आठवण कुमारजी कशी विसरतील?

भानुमती गेल्यानंतर कुमार एकटेपणाच्या आगीत होरपळू लागले. भानुमतीच्या मुलांना सांभाळणार कोण ? त्यांचे पालनपोषण होणार कसे ? कुमार आजारातून बरे झाले, पण या बिकट परिस्थितीत सापडले. या सर्व जबाबदारीची जाणीव ठेवून वसुंधरा श्रीखंडे यांनी कुमार गंधर्व याच्याशी अगदी साध्या पद्धतीने मुंबईत विवाह केला. त्या वसुंधरा कोमकली होऊन भानुकुलात आल्या. शिरावर जबाबदारीचा प्रचंड डोंगरच होता त्यांच्या !

सौ. वसुंधराताईंनी नुसता संसारच सांभाळला नाही, तर त्यांनी भानुकुलमधील सर्व गोष्टीं व्यवस्थित सांभाळण्यात भरपूर यश मिळविले. कुमार गंधर्व यांच्या संगीत साधनेत, त्यांच्या सर्व सांगीतिक प्रयोगामध्ये उत्तम साथ दिली. सावत्रपणाचा थोडा देखील जाच आणि काच होऊ नये, म्हणून त्या अत्यंत काळजी घेत राहिल्या. ताईंच्या शिरावर पडलेली मोठी जबाबदारी त्यांनी नेकीने आणि नेटाने पार पाडली. चि. मुकूल याचे पालन पोषण आईच्या मायेने, ममतेने आणि वत्सलतेने केले.

संसार सांभाळून त्या कुमारजींच्या संगीत साधनेत सहभागी होऊ लागल्या. कुमारजींच्या मागे बसून त्या कुमारजींचे सारे प्रयोग यशस्वी करू लागल्या. कुमारजींचे सारे सांगीतिक प्रयोग यशस्वी करण्यात, लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता, असं म्हटल्यास अतिशयोक्ती होऊ नये. ताईंची कर्तबगारी आणि कर्तृत्व याला तोड नाही.

कुमारजींचा अर्धवट राहिलेला संसार पूर्ण करण्याचे कार्य ताईंनी एक निष्ठेने, जबाबदारीने, काळजीपूर्वक आणि विवेक विचार करूनच केले, यात दुमत होणे शक्यच नाही. आपल्या ह्या अवघड जबाबदारी मध्ये त्या यशस्वी झाल्या हे निर्विवाद. ताईंनी कुमारजींना केवळ सांभाळले नाही, तर त्यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांनी कुमारजींना सर्वच बाबतीत सतत सहकार्याचा हात दिला. त्रिवेणी, निर्गुणी भजने, गीतवर्षा, गीत हेमंत, गीतबसंत या कुमारजींच्या प्रयोगामध्ये त्यांनी दिलेली साथ सर्व रसिक श्रोत्यांना प्रशंसनीय आणि गौरवास्पद वाटली.

कुमार गंधर्व होते उत्सवमूर्ती. त्यांच्याविषयी सर्वांनी खुलून-खुलवून, अत्यंत मनमोकळी, गुणवर्णनपर भाषणे केली. अत्यंत भावपूर्ण अशी. संगीत क्षेत्रामधील त्यांनी भरीव कामगिरी केली, कर्तृत्व दाखविले, क्रांतिकारक विचार व्यक्त केले, नवीन बंदिशी बांधल्या, गायक आणि नायक म्हणून ते भारतभर नांवाजले गेले. संगीत क्षेत्रामधील चमत्कार ! संगीत क्षेत्रातील एक मोठे प्रश्नचिन्ह !! एक विस्मयचकित करून सोडणारे उद्‌गारचिन्ह !!! १०० वर्षानंतरचे गाणे कुमारजी आज गातात आणि मी मी म्हणणाऱ्या गायकांना तोंडात बोट घालण्यास भाग पाडतात. कुमार गंधर्व हे अजब रसायन आहे. कुमारजींनी घराण्यांच्या भिंती पार मोडकळीस आणल्या. खास अशा आपल्या गायन शैलीने टीकाकारांच्या प्रश्नांना चोख उत्तर दिले. कुमारजी हे अत्यंत सर्जनशील-प्रतिभावंत-प्रज्ञावंत-प्रयोगशील गायक आणि नायक म्हणून सर्व भारतभर गाजले. असा गायक-नायक पुढे होणार नाही. कुमारजींच्या चिंतन-मननामधून धून-उगम रागांच्या अनेक बंदिशी उत्स्फूर्तपणे निघाल्या. मालवती, मधसुरजा, सहेली तोजी, शिवमतभैरव अशा रागांची निर्मिती केली. ऋतुराज मेहफिल, मालवाकी लोकधुने, टप्पा-ठुमरी-तराणा हे बहारीचे कार्यक्रम त्यांनी भारदस्तपणे सादर करून प्रचंड प्रशंसा मिळविली. तुलसी-दर्शन, तुकाराम-दर्शन, भा. रा. तांबे-दर्शन, मला उमजलेले बालगंधर्व, सूरदास-गोरखनाथ-चंद्रमुखी-कबीर-मीरा यांची भावपूर्ण, भक्तिरसप्रधान भजने असे अनेक प्रयोग रसिकांच्या समोर सादर केले. त्यांनी बांधलेले तराणे अगदी लाजवाब आहेत. निर्गुणी भजने गावीत कुमार गंधर्व यांनीच.

रसिक आणि दर्दी, जाणकार आणि तज्ञ वक्त्यांनी कुमारजींची स्तुती-प्रशंसा आणि तोंडभरून कौतुक केले, कुमारजी ही सारी भाषणे खाली मान घालून एकाग्रतेने ऐकत होते. त्यांची विनम्रता - विनयशीलता - लीनता यांमुळेच ते मूक राहू शकले. अनेक नवीन गोष्टी समजल्या कुमारजीविषयी.

कुमार गंधर्व एकसष्टी समारोहानिमित्त सौ. ताईंचे देवास आणि इंदोर मधील सारे शिष्य आलेले होते. गायक आणि गायिका यांचा समावेश या शिष्यवर्गात असल्याचे जाणवले मला प्रथमच. या गायक-गायिकांचे गायन ऐकण्याचा योग प्रथमच आला होता. सौ. ताईंनी इतका मोठा शिष्यवर्ग तयार केला असेल याची कल्पनाच नव्हती. त्यांच्या गायनातून

अनेक ठिकाणी कुमारजींच्या गायन शैलीची झलक दिसली. या सर्वांच्या गायनाने खूपच रंगत आणली. रसिक श्रोत्यांनी छान दाद दिली त्यांना. सर्व शिष्यांनी हजेरी लावली आणि समारोहाची एक संपूर्ण रात्र संगीतमय करून सोडली.

कुमार गंधर्व यांचेही अनेक शिष्य समारोहासाठी आले होते. प्रत्येक शिष्याला आणि शिष्येला भरपूर वेळ दिला होता संयोजकांनी. एकापेक्षां एक शिष्य सुंदर गात असलेले पाहून खूप आनंद वाटला. अनेक शिष्य गाऊन गेले. पुण्याच्या विजय सरदेशमुखने बाजी मारली. कुमारीजींची गायन शैली त्याने बरीच उचलली होती. अनेक शिष्यांकडून फार मोठ्या अपेक्षा ठेवण्यास भरपूर वाव आहे याची खात्री पटली.

दिल्ली येथील गांधर्व महाविद्यालयाच्या वतीने कुमार गंधर्वांची षष्ठब्दीपूर्ती अतिशय भव्य प्रमाणात साजरी झाल्याचे वर्तमान पत्रातून वाचले होते. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन केले होते विनयचंद्र मौद्‌, गल्य यांनी. दिल्लीच्या कानाकोपऱ्यांत कुमारजींचे भव्य पोस्टर्स लावली होती, असे समजले. नमूना म्हणून हे पोस्टर कुमारजींच्या घरातील हॉलमध्ये लावले होते. ते पाहूनच आलेले सर्व पाहुणे विस्मयचकित झाले. समारोहाची व्हिडीओ कॅसेट आम्हा सर्वांना पहाण्याची सुवर्णसंधी मिळाली. स्वतः विनयचंद्र उपस्थित होते. त्यांनी त्या समारोहाच्या निमित्ताने कुमारजींच्या विषयीचा एक गौरव अंक प्रकाशित केला होता. आम्हा सर्वांना त्या गौरव अंकाची एक प्रत देण्यात आली. अतिभव्य प्रमाणात झालेला गौरव समारोह कुमारजींचा.

सौ. वसुंधराताईंच्या माहेरची मंडळी-श्रीखंडे कुटूंबीय समारोहाला आवर्जून आली होती. सौ. ताईंच्या ज्येष्ठ बंधूचा परिचय करून दिला होता. कुमारजींच्या या षष्ठ्यब्दीपूर्ती भव्य समारोहाची व्यवस्था ठेवण्यामध्ये सौ. ताईंचा सिंहाचा वाटा होता यात दुमत होणे शक्यच नाही. सौ. ताईंची चाललेली धावपळ, त्यांची व्यवस्थेसाठी चाललेली घाईगर्दी यावरून सर्वांनाच हे जाणवले. सौ. ताईंच्या व्यवस्थापन कौशल्याची तारीफ करावी तेवढी कमीच. समारोहाच्या यशाचे श्रेय सौ. ताईंना दिलेच पाहिजे.

हा संपूर्ण सोहळा अतिभव्य प्रमाणात साजरा झाला. दूरदूरच्या ठिकाणाहून कुमारजींचे प्रेमी, चाहते, सन्मित्र आणि सुहृद या समारोहाला आलेले दिसले. त्यांच्या आनंदाला मर्यादाच नव्हत्या.

१९७४ च्या कुमार पचासला सौ. मोहोळकर उपस्थित होत्या. त्यांनी तीन दिवस चढत्या क्रमाने रंगत गेलेला कार्यक्रम प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला. नांदेड येथील कुमारजींचे खास प्रेमी श्रीकांत देशपांडे यांनाही उपस्थित राहणे अशक्य झाले. त्यांच्या अनुपस्थितीची जाणीव मला प्रकर्षाने झाली होती.

कुमारजी हैदराबादमध्ये आल्याचे मला बरोबर समजत असे. जणू काही टेलीपथीच. त्यांची व्यवस्था कोणत्या हॉटेलमध्ये करण्यात आली आहे, याची नीट चौकशी करीत असे मी. त्यांना फोन करून त्यांच्याशी संपर्क साधल्याशिवाय मला चैन पडत नसे. फोन वरून

मी त्यांची, ताईंची, पिन्नूचीही चौकशी करीत असे. ज्या व्यक्तीला आपण आपल्या जिव्हाळ्याची व्यक्ती मानतो, तिची आणि तिच्या घरच्यांची खुशाली विचारल्याने मनाला आगळेच समाधाने लाभते. हा माझा स्वभावच झाला आहे.

सरोवर नावाचे हॉटेल टँक बंडच्या जवळ आहे. सरोवरमध्ये कुमारजींची सोय करण्यात आल्याचे कळले. ते सकाळी बाहेर पडण्याच्या अगोदरच मी त्यांना फोन केला. नेहमीप्रमाणे सारी चौकशी केली. कुमारजींनी आस्थेने माझी खुशाली विचारली. भेटीसाठी हॉटेलमध्ये केव्हा येऊ, असं मी त्यांना विचारलं. रात्री ९ वाजता येण्यास हरकत नाही, असं त्यांनी मला सांगितलं. मला आनंद वाटला. कुमारजींच्या प्रत्यक्ष भेटीने मिळणारे समाधान अवर्णनीयच. चैतन्य द्विगुणीत करणारी भेट.

रात्री बरोबर नऊ वाजता हॉटेलमध्ये कुमारजींची भेट घेण्याच्या इराद्याने मी पावणे नऊ वाजता सरोवर हॉटेलमध्ये पोचलो. व्यवस्थापकाला कुमार गंधर्व यांच्या खोलीचा नंबर विचारला. त्याने नंबर सांगितला आणि कुमार गंधर्व बाहेर गेल्याचे मला सांगितले. अचानक एखाद्या भेटीचा कार्यक्रम ठरला असावा आणि कुमारजी तिकडे गेले असतील, असं मला वाटलं. मी त्यांना ९ ची वेळ त्यांच्याच सांगण्यावरून दिली होती. कुमारजी ९ वाजता परत येतील असं मला वाटलं म्हणून मी स्वागतकक्ष मध्ये त्यांची वाट पहात थांबलो.

स्वागतकक्षातील घड्याळामध्ये नऊचे ठोके पडले आणि फोनची घंटा वाजली. माझ्या मनात विचार आला की हा फोन निश्चितपणे कुमारजींचाच असणार. व्यवस्थापकाने फोन घेतला. मला त्याने विचारले, 'आप ही मोहोळकर हैं क्या ? कुमारजी आपसे बात करना चाहते हैं।' मी धावलो आणि फोन घेतला. कुमारजी म्हणाले, 'मोहोळकर, मला खात्रीच होती की तुम्ही बरोबर ९ वाजता सरोवरमध्ये आला असणार. मी रघुवीरच्या घरून बोलतोय. येथे बरीच मित्रमंडळी जमलीत. आता कुठं सुरुवात झाली आहे. हे संपल्यानंतर भोजन वगैरे संपण्यास ११ तरी वाजतील. तुम्हाला याची कल्पना आहेच. विनाकारण तुम्हाला हॉटेलमध्ये ताटकळत बसावं लागू नये, म्हणूनच मी बरोबर नऊ वाजता फोन केला उद्या सकाळी ९ वाजता या हॉटेलमध्ये. मग आपण बोलू.'

कुमारजींनी मला फोन करून सर्व काही सांगितले ठीक नऊ वाजता. माझा वेळ वाया कां जावा ? आपल्यासाठी कुणी वाट पहात वेळ घालवू नये असंच त्यांना वाटतं. वक्तशीरपणा हा कुमारजींचा स्पृहणीय गुण. मी ९ वाजता भेटीसाठी येणार याचीही त्यांना खात्री होती. तसं पहायला गेलं तर मी एक कुमारजींचा सर्वसामान्य प्रेमी. मला त्यांच्या भेटीसाठी इतक्या दुरून यावे लागले, याचे त्यांना भान होते. प्रतीक्षा करण्यात रात्रीचे दोन अडीच तास वाया जाऊ नयेत माझे, याच सौजन्यपूर्ण विचाराने त्यांनी मला बरोबर ९ वाजता परिस्थितीची कल्पना दिली. दुसऱ्याच्या वेळची कदर करणारे आणि बेहोष होण्याच्या वेळी नेमका होष ठेवून, स्मरणपूर्वक सूचना देणारे कुमारजी ! माझ्यासारख्या प्रेमी व्यक्तीचा वेळ वाया गेला म्हणून काय बिघडले, असा विचारही कुमारजींच्या मनाला

शिवला नाही. हा अनुभव खरोखर विलक्षणच !

कुमारजींनी हे बरोबर हेरले की हैदराबादमधील एके काळच्या माझ्या घनिष्ठ मित्रांनी माझ्याशी असलेले मैत्रीचे संबंध तोडले आहेत. सर्वांनी मला एकाकी करण्याचा प्रयत्न चालविला आहे, हे चतुर कुमारजींनी अचूक जागले. एका वाक्यातच मला मोठा धीर आणि दिलासा देऊन देवासला परत गेले.

कुमारजी हैदराबादला येणार आहेत आणि त्यांच्या गायनाच्या दोन मैफली होणार असल्याची मला बातमी लागली. एक गाणं होणार होतं आय्. एम्. ए. च्या हॉलमध्ये-सर्वांच्यासाठी. दुसरा कार्यक्रम होणार होता. ए. एस. कुलकर्णी यांच्या घरच्या हॉलमध्ये. ही दुसरी मैफल होती अत्यंत खाजगी आणि केवळ निमंत्रितांसाठीच. एक मैफल तरी निश्चित ऐकायला मिळण्याची संधी होती. म्हणून मी नांदेडमध्ये असलेल्या माझ्या मित्राला श्रीकांत देशपांडे यांना, कुमारजींच्या येण्याच्या तारखा ताबडतोब पत्राने कळवल्या. श्रीकांत देशपांडे चार दिवसांची रजा घेऊन हैदराबादेत दाखल झाले.

सर्वांच्यासाठी खुली असलेल्या मैफलीला मी माझ्या मेहुण्यांना घेऊन गेलो. श्रीकांत देशपांडे परस्पर येणार होते. नेहमीप्रमाणे मी आणि श्रीकांत गाणे सुरू होण्यापूर्वीच कुमारजींना भेटलो आणि त्यांना अभिवादन करून समोरच बसलो. गायन खूपच छान झाले. आम्ही त्यांना उत्तम दाद दिली. कार्यक्रम संपल्यानंतर आम्ही कुमारजींना भेटून गाणं अप्रतिम झाल्याचे सांगितले. कुमारजींनी मंद स्मित करून आनंद झाल्याचे दर्शविले. कुमारजींचा आणि त्यांच्या साथीदारांचा आम्ही निरोप घेतला. कुमारजी आपल्या साथीदारासह सभागृहाबाहेर पडले.

गाणं संपल्यानंतर मी, राजाभाऊ कुलकर्णी आणि श्रीकांत देशपांडे गप्पा मारीत, गाण्याबद्दल चर्चा करीत थोडा वेळ हॉलमध्ये थांबलो होतो. तेवढ्यात वसंतराव राजूरकर माझ्याजवळ आले आणि मला म्हणाले, 'उद्या रात्री होणारा कुमारजींचा कार्यक्रम खाजगी आणि केवळ निमंत्रितासाठीच आहे.' मला खूप आश्चर्य वाटले. वसंतरावांना मी मान हालवून मान्यता दिली. सौ. मालिनीबाई तरातरा आल्या आणि तावातावाने म्हणाल्या, 'उद्याच्या गाण्याचे निमंत्रण फक्त मोहोळकरांना आहे, त्यांच्या मित्राला नाही.' माझ्या लक्षात आला त्यांच्या ठणकावण्याचा रोख. मी म्हणालो, 'ठीक आहे. उद्याच्या गाण्याला मी माझ्याबरोबर माझ्या त्या मेहुण्यांना आणि माझ्या पत्नीला तरी आणू शकतो काय ?' त्या उभयतांनी मला होकार दिला. आम्ही हॉलमधून बाहेर पडलो आणि झाल्या प्रकाराबद्दल चर्चा करू लागलो.

मला कुमारजींचा निरोप आला की मी रात्री ९ च्या सुमारास रघुवीरच्या घरी यावे. त्याप्रमाणे मी रघुवीरभैय्या यांच्या घरी पोचलो. नेहमीची सारी मंडळी जमलेली होती. गप्पाटप्पा करीत मस्त भोजन झाले. एकेक करून सारी मंडळी कुमारजींचा निरोप घेऊन आपापल्या घरी गेली. माझा हात धरून ठेवला कुमारजींनी आणि मला थांबण्यास सांगितले.

मीच एकटा मागे राहिलो. ११ वाजल्याचे पाहिले. मी कुमारजींना म्हणालो, 'कुमारजी, आपण आता विश्रांती घ्यावी. उद्या रात्रीं आपल्याला गायचे आहे. आता मी आपली रजा घेतो.' कुमारजींनी विचारले, 'कसं जाणार तुम्ही, मोहोळकर ? रघुवीरला गाडी काढण्यास सांगतो मी.' मी उत्तर दिले, 'नको कुमारजी. आपल्याप्रमाणेच भैय्यालाही हवी विश्रांती. ऑटो करून जातो.' दोघांचा निरोप घेऊन मी खोलीच्या बाहेर पाऊल ठेवले.

तेवढ्यात कुमारजींनी मला नको तोच प्रश्न नेमका विचारला. याच प्रश्नाची मला भीती वाटत होती. कुमारजी चाणाक्ष होते. त्यांना अशा गोष्टी सहज कळत असत. मला कुमारजींनी विचारले, 'मोहोळकर, उद्याच्या माझ्या गाण्याचे आमंत्रण श्रीकांतला आहे ना ? खास माझं गाणं ऐकण्यासाठी नांदेडहून आला आहे श्रीकांत.' मी कपाळाला हात लावून म्हणालो, 'कुमारजी, कशाला हा प्रश्न विचारलात ? आपल्या उद्याच्या गाण्याचे आमंत्रण श्रीकांतला नाही.' थोडा वेळ कुमारजी विचारमग्न झाले. मग मला म्हणाले, 'मोहोळकर, उद्याच्या माझ्या गाण्याला माझा गेस्ट म्हणून येण्यास सांगा श्रीकांतला. सांगाल ना ?' मी म्हणालो, 'जरूर सांगेन. पण माझ्या सांगण्यावर श्रीकांतचा विश्वास तरी बसेल काय ?' रघुवीरने म्हटले, 'ठीक है, मोहोळकरजी, आप जाइए. मै देखता हूँ।' दोघांना परत नमस्कार करून मी त्यांचा निरोप घेऊन निघालो.

सकाळी कुमारजी, त्यांचे साथीदार आणि हैदराबादेतील मित्रमंडळी या सर्वांना राजूरकरांचे घरी भोजन आयोजित केले होते. लाजेकाजेने मलाही निमंत्रण पाठविले होते. निमंत्रित मंडळी बरीच दिसली. कुमारजी, त्यांचे साथीदार आणि काही बुजर्ग मंडळी पहिल्या पंगतीत बसली. या सर्वांचे भोजन झाल्यानंतर थोडा वेळ विश्रांती घेऊन कुमारजी जाण्यासाठी निघाले. आम्ही सर्वजण वर्तुळ करूनच उभे होतो. निघण्यापूर्वी आम्हा सर्वांच्याकडे पाहात, खास करून राजूरकरांना उद्देशून कुमारजी म्हणाले, 'वसंता, आज रात्री होणाऱ्या माझ्या गाण्याला श्रीकांत देशपांडे माझे गेस्ट म्हणून येतील, बरं का ?' आम्ही सर्वजण चकित होऊन कुमारजींच्या अविर्भावाकडे पहात असतांनाच, कुमारजी बाहेर पडले. राजूरकरांचा चेहरा पडला. त्यांना हे मुळीच अपेक्षित नव्हते.

रात्री ८॥ च्या सुमारास मी श्रीकांतच्या घरी गेलो. ते माझीच वाट बघत होते. त्यांनी मला सांगितले, 'मोहोळकर, दुपारी ४॥ च्या सुमारास वसंतराव राजूरकर माझ्या घरी आले आणि मला आजच्या कुमारजींच्या गाण्याचं निमंत्रण देऊन गेले.' कुमारजींच्यामुळे हे सारे घडले. श्रीकांत केवळ आपल्या भेटीसाठी आणि आपलं गाणं ऐकण्यासाठी आला आहे नांदेडहून, याची पुरेपूर कल्पना होती त्यांना. कुमारजींच्या आम्हा दोघांवरील या निर्व्याज मनोहर प्रेमाचे आणि लोभाचे दर्शन आम्हाला अप्रूपच वाटले. आम्हाला हर्षवायू होण्याचीच वेळ आली. आमचा आनंद दुथडी भरून वाहू लागला. कुमारजींच्या गाण्यालाच आम्ही जाणार होतो दोघेही. अत्यानंदाने आम्ही एकमेकांचे हात हातात घेतले, ते घट्ट दाबले आणि कुमारजींना लाख लाख धन्यवाद दिले.

कुमारजींचे गायन ऐकण्याच्या उत्सुकतेने आम्ही दोघे वेगाने निघालो. ए. एस. कुलकर्णी यांच्या घरातील हॉलमध्ये गाण्याची बैठक आयोजित केली होती. आम्ही दोघे हलकेच हॉलमध्ये शिरलो. हॉलच्या मध्यभागी कुमारजी तानपुरे जुळविण्यात मग्न होते. आम्ही त्यांच्या जवळ जाऊन त्यांना विनम्रतेने नमस्कार केला. प्रसन्न हसून त्यांनी स्वीकार केला. कुमारजींच्या समोरच मी बसलो. माझ्या एका बाजूला श्रीकांत आणि दुसऱ्या बाजूला राजूरकर बसले. बाकी सर्व स्त्रीपुरुष हॉलच्या भिंतींना टेकून बसले होते. हॉलचा बराचसा भाग मोकळाच पाहून मला खूप आश्चर्य वाटले.

घरातील हॉलदेखील भरलेला नव्हता. निमंत्रित मंडळी आली नसावीत किंवा फारच थोड्या रसिकांना निमंत्रण दिले असण्याची शक्यता वाटली मला. इतका हॉल मोठा असताना, माझ्या एका मित्राला निमंत्रण न देण्याचे कारण काय असावे, असा माझ्या मनामध्ये प्रश्न उभा राहिला. निमंत्रित मंडळी भरपूर असती आणि हॉल गच्च भरलेला असता, तर माझ्या मित्राला निमंत्रण न देणे सयुक्तिक झाले असते.

हॉलच्या मध्यभागी, कुमारजींच्या अगदी जवळ आणि समोरच आम्ही तिघे बसलो होतो. आम्ही तिघांनीच त्या रात्रीचे कुमारजींचे गाणं रंगविले आणि खुलविले, अत्यंत योग्य जागी भरभरून दाद देऊन. कुमारजी जणू काही गात होते आम्हा तिघांसाठीच. आम्ही तिघे कुमारजींच्या गाण्याचे खरे प्रेमी. वाहव्वा, क्या बात है, बहोत अच्छे- अशी उत्स्फूर्त दाद निघत होती आमच्या तोंडातून. अधूनमधून मी बाकीच्या श्रोत्यांचे निरीक्षण करीत होतो. भिंतींना टेकून बसलेले हे सारे श्रोते पेंगत असलेले पाहून मला फार वाईट वाटले. गाणं ऐकण्यासाठी ते आलेले दिसले नाहीत. नाइलाज झाला, म्हणूनच आले असावेत. आम्ही तिघांनी दिलेली दाद ऐकून कुमारजी फुलत गेले. जमून गायिले कुमारजी. आम्ही तिघे एकदम खुष झालो.

गाणं संपल्यानंतर मी आणि श्रीकांत उभे राहून कुमारजींना नमस्कार केला. दुसरे दिवशी नांदेडला परत जाणार असल्याचे श्रीकांतने त्यांना सांगितले. कुमारजी म्हणाले, 'बराय, मोहोळकर, श्रीकांत, परत भेटू आपण.' कुमारजींचा निरोप घेतला व आम्ही दोघे हलकेच हॉलबाहेर पडलो.

विलोभनीय प्रेम करणारे कुमारजी !

भानुमती कंस यांना कुमारजींच्या आगळ्यावेगळ्या गायनशैलीने प्रभावित केले असणार. म्हणूनच त्या गाणं शिकण्यासाठी कुमारजीकडे आल्या होत्या. त्यांचा आवाज खूपच रूंद आणि झारदार होता. गाणं शिकण्याच्या जिद्दीने आणि जबरदस्त इच्छाशक्तीने त्या आल्या असणार. संगीत साधना सुरू झाली त्यांची. कुमारजींची महत्त्वाकांक्षा पाहूनच त्या चकित झाल्या असाव्यात. अशा गायकाची प्रेरणा झाल्या. त्या यथाकाल संगीतशास्त्राचा त्यांचाही अभ्यास होता. कुमारजींच्या सहवासात त्यांना संगीतशास्त्राचे मंत्र आणि तंत्र उमगले. नियतीनेच त्यांना एकत्र आणले आणि शिवपुत्र कोमकलीचा कुमार गंधर्व झाला.

कुमार गंधर्व यांनी स्पष्ट म्हटलं आहे, 'भानुने माझा प्रत्येक विचार, प्रत्येक कृती पारखून घेतली. दुसऱ्या कुणाकडे जाऊन पारख करवून घेण्याची गरजच भासू दिली नाही. तिने माझे विचार तोलले-मापले-पारखले - आपलेसे केले. आपल्या होकाराने आणि प्रोत्साहनाने माझ्यामध्ये धाडस - साहस - धमक - धैर्य निर्माण केले. माझे विचार साकार करण्यासाठी समर्थ सहकार्य दिले.'

कुमार गंधर्व यांचे सांगीतिक विचार शांतपणे ऐकून घेऊन भानुमती गप्प बसल्या नाहीत. प्रत्येक विचाराबद्दल सखोल चर्चा केली असणार कुमारांच्या बरोबर. कुमारांच्या अभ्यासाला, व्यासंगाला सुयोग्य साथ दिली असणार त्यांनी. कुमारांच्या विचारांना पाठिंबा देऊन त्यांनी कुमारजींना अधिक चिकित्सक व चोखंदळ करण्यात हातभार लावला असला पाहिजे. अशा प्रकारे प्रत्येक सांगीतिक विचाराचे विवेचन, विश्लेषण, परीक्षण करण्यात मग्न असणारे हे गुरू-शिष्य ! कुमारजींची उमेद आणि उभारी गणित श्रेणीत वाढतच गेली असणार. त्यांच्या उसळत्या उत्साहाला भानूने अधिक गतिमान केले असणार.

कुमार आणि भानू यांच्या अशाच चर्चेमुळेच त्यांच्या मनामध्ये नवीन आणि नाविन्यपूर्ण प्रयोग करण्याच्या विचाराने मूळ धरले असणार. वैविध्याच्या आणि वैचित्र्याच्या कुमारांच्या ध्यासाला खतपाणी घालण्याचे महत्त्वाचे कार्य केले त्यांच्या अर्धांगिनीने. Future belongs to those who prepare for it. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री उभी असते. भानूच्या सुरेल सहवासात कुमारांनी पुढे करावयाच्या प्रयोगांची रूपरेखा तयार केली असणार, यात शंकाच नाही. या त्यांच्या प्रयोगाबद्दल भानूने त्यांची प्रशंसा तर केलीच असणार, त्यांना प्रोत्साहन दिले असणार. पुढील आयुष्यात कुमारांनी जे अनेक प्रयोग केले, त्या सर्व प्रयोगांना भानूने उचलून धरले असावे.

दोघांनाही गाढा अभ्यास, सूक्ष्म निरीक्षण, चिकित्सक परीक्षण आणि विश्लेषण करण्याची हौस होती. प्रत्येक विचाराविषयी चिंतन, मनन करण्यास ते एकमेकांना सहकार्य देत असावेत. उभयतांचे संगीताबद्दलचे प्रेम निर्लेप होते. दोघेही बनजारा वृत्तीने झपाटलेले असावेत. लोकगीते, लोकधुने, लोकसंगीत यांच्या ध्यासाने ते सतत दूरदूरच्या ठिकाणी जाऊन विविध प्रकारच्या सुरांच्या धुंदीचा अनुभव घेत असणार. निसर्गाचे सान्निध्य, असाधारण सांगीतिकता, विलक्षण संवेदनशीलता, ग्रहणशील आणि संग्राहक वृत्ती यामुळेच उभयतांचे वैचरिक मनोमीलन वाढत गेले असणार, यात शंकाच नाही. अशा समानधर्मीय पतीपत्नीचे दुसरे उदाहरण झाले नाही, होणारही नाही.

कुमारजी आणि त्यांच्या पत्नी भानुमती प्रवास करीत करीत माळव्यात आले. माळव्यातील हवामान त्यांना सुखकारक वाटले. म्हणून त्यांनी माळव्यातच वास्तव्य करण्याचा निश्चय केला.

माळव्यातील लोकगीते लक्षपूर्वक आणि एकाग्रतेने ऐकण्याचे वेडच लागले कुमारजींना. अनेक ठिकाणी जाऊन ते दोघे लोकधुने ऐकू लागले. त्यावर चर्चा होऊ

लागली. कुमारजींनी हे जाणले की भारतीय संगीताची बीजे अशा प्रकारच्या लोकगीतांत आढळतात. माळव्यातील लोकगीते म्हणजे ख्यालांचे मूळ रूपच आहे. लोकगीते व लोकधुने यांचा कुमारजींनी खूप अभ्यास केला. चिंतन, मनन केले. शास्त्रीय संगीताची गंगोत्री त्यांना या लोकगीतांमध्येच दिसली.

माळव्यातील एका ठिकाणी चाललेल्या कार्यक्रमातील नृत्याचे प्रकार, गायनाच्या पद्धती ऐकत असतांना काही अजाण मंडळींना भलतीच शंका आली आणि ती मंडळी मारण्यासाठी धावून आली. त्यांना समजावता समजावता कुमारजींना नाकी नऊ आले.

माळव्याप्रमाणेच भारताच्या प्रत्येक प्रांतामध्ये अनेक लोकगीते वर्षानुवर्षे गायिली जातात- पारंपारिक पद्धतीने. हा लोकगीतांचा खजिना भावी पिढ्यांकरिता जतन करून ठेवला पाहिजे असं कुमारजी सांगत असत.

माळवा की लोकधुने हा त्यांचा प्रयोग याच एका हेतूने केला होता. अशा प्रकारचा कार्यक्रम अन्य कोणा गायकाने केलेला ऐकिवात नाही. सखोल सूक्ष्म अभ्यास करूनच कुमारजींनी हा प्रयोग रसिकांना ऐकविला. जाणकार श्रोत्यांना हा कार्यक्रम खूप आवडला. या लोकगीतांमधूनच रागनिर्मिती झाली असावी हे मर्मज्ञ अभ्यासकांना पटले असण्याची शक्यता आहे. त्यातूनच मग कुमारजींनी धुनउगम रागांची निर्मिती केली. कुमारजींची ही नवनिर्मिती लक्षणीय आहे.

कीट न जाने भृंग को । यों गुरू करे आप समान ।। भृंगाच्या सहवासाने, पालनपोषणामुळे, आस्थापूर्वक प्रेमाने केलेल्या काळजीमुळे, त्या कीटकाचे रूपांतर होते भृंगामध्ये ! गुरूच्या शिकवण्यामुळे, गुरूच्या सान्निध्यामुळे, रोजच एकत्र केलेल्या अध्ययनामुळे, गुरूने केलेल्या संस्कारामुळे, गुरूच्या मार्गदर्शनामुळे, नकळत तो शिष्य गुरूप्रमाणेच गाऊ लागतो, गुरुची नक्कल करू लागतो. गुरूच्या अंगविक्षेपांचा- तोंड वेडेवाकडे करण्याचा प्रभाव पडल्याने शिष्याचे देखील अंगविक्षेप गुरूसारखेच होऊ लागतात. गुरूसारखीच गायकी आत्मसात करू लागतो. गुरूप्रमाणेच शिष्यदेखील तोंड वेडेवाकडे करण्यास शिकतो. शिष्य गुरूची नक्कल करण्यात धन्यता मानू लागतो. शिष्याला अस्सल गाणे समजतच नाही. अस्सल आणि नक्कल यातील भेद समजून देण्याचे मोलाचे कार्य करायचे असते गुरूने. 'माझ्यासारखे गा' असं आग्रहाने व अट्टाहासाने सांगणारेच गुरू बहुसंख्य असतात. एखादाच अपवादात्मक गुरू असतो प्रा. बी. आर. देवधरांसारखा !

देवधरांच्या क्लासमध्ये शिकू लागले कुमार गंधर्व. १२ वर्षे कुमार गंधर्व गुरूच्या घरी राहून संगीत साधना करण्यात व्यस्त आणि व्यग्र होते. पण हा गुरू जगावेगळा होता. या गुरूने आपल्या शिष्याला कधीही गाऊन दाखविले नाही. अनुकरण करण्यापासून परावृत्त केले. आपल्या आवाजाची जात, आवाजाची पोत, आवाजाची पट्टी समजून-उमजून गायला सांगणारा गुरू भेटला कुमार गंधर्वांना.

देवधरांचा संगीताचा वर्ग चांगलाच नावाजलेला होता. संगीतक्षेत्रामध्ये देवधरांच्या

नावाचा मोठाच दबदबा होता. संगीतक्षेत्रातील एक बुजुर्ग, सखोल अभ्यासक आणि समीक्षक, उत्तम शिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून ख्याती होती देवधरांची. देवधरांची चिकित्सक दृष्टी आणि चोखंदळ वृत्ती सर्व गायक-गायिकांना चांगली माहित होती. देवधरांच्या क्लासमध्ये आपली गायनकला दाखविण्यासाठी उत्सुक असत अनेक नामांकित गायक आणि वादक.

अनेक घराणेदार आणि प्रसिद्ध गायकांचे गायन ऐकण्याची संधी दिली देवधरांनी. कुमार गंधर्व यांच्यासाठीच अनेक गवयांचे जलसे आयोजित केले. मोठमोठ्या गायकांच्या मैफली आपल्या क्लासमध्ये घडवून आणल्या. सर्वमान्य अशा घराण्यांच्या गायनशैली एकतानतेने, एकाग्रतेने ऐकू लागले कुमार गंधर्व. प्रत्येक घराण्याच्या गायकीची वैशिष्ट्ये ध्यानात घेण्याची सवयच लावली गुरूने. स्वरप्रधान गायकी, लयप्रधान गायकी लक्षपूर्वक ऐकण्यात मग्न असत कुमार. प्रत्येक घराण्याच्या गायकीतील बलस्थाने आणि मर्मस्थाने समजावून देऊ लागले गुरूजी. प्रत्येकाच्या गायकीतील मर्म जाणण्याचे सामर्थ्य कळू लागले कुमारांना. गायकीतील सौंदर्यास्वाद आणि रसास्वाद घेण्यास शिकविले गुरूजींनी. ग्वाल्हेर गायकीचा डौल, जयपूर गायकीतील लयीचा दिमाख, आग्रा गायकीतील स्वरांची सफाई आणि समेवर घातलेली चित्त्यासारखी झडप गुरूजींनी खुलवून समजावून सांगितली. खानदानी घराण्याच्या गायनशैलीतील उत्तमोत्ततम तत्त्वे आत्मसात करण्यास शिकले कुमार. ऐकलेल्या सर्वच गायकीमधील सौंदर्याचे एक सुरेख आणि मनमोहित करणारे मिश्रण तयार करण्याचा विक्रम करू लागले कुमार गंधर्व. समन्वयात्मक गायकी झाली कुमारांची.

गायकाचं गाणं ऐकून झाल्यानंतर गुरू आपल्या शिष्याला समोर बसवून त्याच्याशी मनमोकळी चर्चा करीत असत. प्रत्येकाच्या गायकीतील गुणदोषाबद्दल खुलासेवार सांगत असत. काय ग्राह्य आहे, काय अग्राह्य आहे याची स्पष्ट जाणीव देत असत गुरूजी. कुमारजींना एक वेगळीच दृष्टी देण्यात यशस्वी झाले गुरूजी. ही खास दृष्टी देण्याचे सामर्थ्य असणारे गुरूजी आणि ती दृष्टी अचूक आत्मसात करणारे कुमार ! आपली गायनशैली आगळीवेगळी असली पाहिजे, असं पटवून दिले गुरूजींनी. वैविध्य आणि वैचित्र्य यांचाच ध्यास घेणारे कुमार !

एके काळी नक्कल करण्यांतच आनंद मानणारे आता अस्सल गाणं शिकण्याच्या इर्षेने संगीतसाधनेमध्ये व्यस्त आणि व्यग्र होऊ लागले. ऐकलेल्या घराणेदार गायकीतील सौंदर्यस्थळे ते गाऊन दाखवीत असतील आपल्या गुरूजींना. त्या गाण्यातील चांगल्या गोष्टीबद्दल तारीफ आणि कौतुक करण्यात गुरूजींना समाधान वाटत असावे. पण जे नको ते अनुकरण केल्याबद्दल शिष्याची कानउघाडणी करण्यास गुरूजी मागेपुढे पहात नसावेत. अशा प्रकारे कुमारजींचे संगीतशिक्षण चालले असणार १२ वर्षे.

कालचे सारे पुसून टाकून कोऱ्या पाटीवर नवी अक्षरे लिहिण्याचीच हौस होती कुमारजींना. चाकोरीबद्ध न होता, चाकोरीबाहेर जाण्याची आणि चाकोरीबाहेर

राहण्याचीच जिद्द बाळगणारे कुमार. पारंपारिक गायकी, पारंपारिक बंदिशी, पारंपारिक पद्धतीने गाण्यामध्ये कधीही रस न घेणारे होते कुमार. स्वरसाम्राज्याचा एकाकी चिरप्रवासी असलेले कुमार गंधर्व !

स्वराकाशाक्त गरूडझेप घेण्याची महत्त्वाकांक्षा आणि तीव्र इच्छा निर्माण करण्याचे मुख्य कार्य करणारी होती भानू ! स्वरांच्या महासागरात खोल डूब घेण्याची वृत्ती जिवंत ठेवण्यात यशस्वी झाली भानू ! आत्मविश्वास आणि मनोबल दिले कुमारांना त्यांच्या गुरुजींनी. अधिक वैविध्य, अधिक वैचित्र्य, अधिक गोडवा आपल्या गायकीमध्ये यावीत म्हणून प्रयत्नांची पराकाष्ठा करणारे कुमार. कुमारांच्या आंतरिक प्रेरणा दिल्या भानूने आणि त्यांना वाढविले, जोपासले गुरूजींनी. आपल्या गायकीमध्ये आक्रमकपणा आणि आवेश आणण्यासाठीच कुमारांचा अट्टाहास सुरू झाला असणार. तानेचा जलदपणा, जोरकसपणा आणण्यासाठी दिवसरात्र कष्ट करणारे कुमारजी !

गुरूजींचे मार्गदर्शन मिळत गेले एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे. कुमार स्वरांचा महासागर पाहून थक्क झाले असणार. महासागराचा तळ शोधणे म्हणजे संगीताचा आत्माच शोधणे. नव्या नव्या ताना, थरारक कल्पना कुमारांना सहज सुचू लागल्या आणि गळ्यातून सहजपणे निघू लागल्या असणार. वेगाने येणाऱ्या ताना श्रोत्यांना धक्का देतात, अचंबित करतात, कधीही न ऐकलेल्या त्या ताना थक्क करून सोडतात. कुमारांच्या गाण्यातील नाविन्यामध्ये असणारा जोम आणि जोष विलक्षणच वाटतात. त्यांच्या गायकीतील पायऱ्यासारखे असणारे चापल्य आणि चमक रसिक श्रोत्यांच्या अंत:करणाला भावतात. चमक मोहविणारी असते आणि चापल्य चकित करणारे असते. गुरूजींनी हिऱ्याला पैलू पाडण्याचे कार्य कौशल्याने केले हे सर्वांनाच मान्य करावे लागते.

कलेच्या - गायनकलेच्या निरागस धुंदीत झोकून देण्याची वृत्ती कसोशीने जोपासणारा कलावंत. एका ठिकाणी थांबून राहणे म्हणजेच संपणे असं मानणारा थोर गायक. सतत नवनिर्मितीचा ध्यास जपणारा कलावंत. नवनिर्मितीचा ध्यास संपेल तोच अखेरचा श्वास ठरेल असं मानणारे कुमार. प्रगतीचा, उन्नतीचा प्रवास ज्या क्षणी संपेल, त्या दिवशी गाणं बंद करीन, असं निर्धारपूर्वक सांगणारे कुमार. स्वरमहासागरात आपली नाव सतत पुढे नेत नेत, प्रगती करण्याची महत्त्वाकांक्षा असणारा, अमूर्त अशा सौंदर्याला आपल्या दिव्य दृष्टीने पाहून, ते सौंदर्य आपल्या गायकीत दाखविण्याची ताकद असणारा कुमार. श्रोत्यांना अंतर्मूख करून आत्मशोधाला उद्युक्त करणारा कुमार. रसिक श्रोत्यांच्या डोळ्यात अश्रू निर्मा[illegible] करण्याचे सामर्थ्य असणारा कुमार. सतत नवीन नवीन प्रयोग करून संगीताचे सप्तरंगी सौंदर्य दाखविणारे कुमार. घराण्याच्या भिंती पाडून नवीनच गायनशैली निर्माण क[illegible] शकणारे कुमार. बलशाली बंडखोरी समर्थपणे सिद्ध करून समीक्षकांनाही चकित करणारे कुमार.

कुमारांनी आपली गायकी अशी तयार केली की ते पुढची जागा कोणती घेणार,

हरकत की तान की बोलतान हे सांगणं मी मी म्हणणाऱ्या मर्मज्ञालाही मुष्कील वाटत असे. त्यांच्या गायनातील पलटे हुलकावणी देतात. साथीदारांनाही चकवा देतात, तरूण होतकरू गायकांना मोह पाडतात, रसिकांना धुंद करून सोडतात, श्रोत्यांना मोहित करतात. मध्यलयीचा बादशहाच शोभणारे कुमार गंधर्व ! संगीतक्षेत्रातील एक प्रश्नचिन्ह ! उद्गारचिन्ह !

कुमार गंधर्व यांची प्रत्येक मैफल ही देखील एक संपूर्णपणे नवनिर्मितीच असते. काल गायलेला मालकंस ते आज नवा करून मांडतात. प्रत्येक रागाकडे ते कधी समोरून, तर कधी एका बाजूने पाहू शकतात आणि नव्याने त्याचा आकृतिबंध तयार करतात. अशी नवनिर्मिती करण्याचा, नव्या पाऊलवाटा शोधण्याचा, जुन्या रूळलेल्या वाटा नाकारून नव्याच वाटा स्वयंप्रज्ञेने निर्माण करणारा, या नव्या वाटांना आपल्या विलक्षण प्रतिभेने राजरस्त्यांची प्रतिष्ठा - प्रसिद्धी- मान्यता मिळवून देण्याचे सामर्थ्य असणारा विचारवंत गायक कुमार गंधर्व. नव्या आणि जुन्या, पारंपारिक आणि बंडखोरी करून निर्माण केलेल्या गायनशैलींना एकत्र करून बेमालूम मिश्रण तयार करणारा- सांधा जोडणारा, समन्वय साधणारा महान गायक !

नवीन गायकीच निर्माण करण्याची क्षमता असणारे कुमार गंधर्व. गुरूजींनी दिलेल्या कलात्मक नजरेने सर्वच अभिजात कलांमधील सौंदर्यस्थळे अचूक पाहणारे कुमार गंधर्व. स्वरविलास आणि स्वरविकास साधण्याचाच ध्यास घेतलेले कुमार. वाग्गेयकार म्हणून ख्याती पावलेले कुमार गंधर्व. प्रत्येक चीजेमध्ये, प्रत्येक बंदिशीमध्ये स्वर विलासाला आणि स्वरविकासाला प्राधान्य देण्यासाठी चपखल शब्दयोजना करू शकणारेकुमार गंधर्व. स्वररचनेतील आणि शब्दार्थातून व्यक्त होणारी भावस्थिती एकरूप करण्याची ताकद या प्रतिभावंत नायकाने दाखवून दिली. घराण्याच्या शिस्तीत व भिंतीत न अडकता गायला शिकलेले कुमार गंधर्व !

आडवाटेने जाऊन शिखरापर्यंत जाण्याचे धाडस असणारे कुमार. स्वर-सागरामध्ये खोल जाऊन तळ शोधण्याचे सामर्थ्य असणारे कुमार. सूर आणि लय यांना एकरूप करून स्वरसिंधू तरून जाण्याची महत्त्वाकांक्षा असणारे कुमार. म्हणूनच कुमार सूरसतीचे म्हणजे सरस्वतीचे नामस्मरण करीत राहात. सर्वांना नामस्मरण करायला सांगत. स्वरवलये एकत्र करण्याची कल्पना प्रगल्भ गायकालाच सुचू शकते, अन्य कुणाला सुचणारही नाही. नवनिर्मिती करण्यासाठी अत्यावश्यक असतात प्रज्ञा, प्रतिभा, स्वतंत्र वृत्ती, प्रयोगशील प्रवृत्ती, बंडखोर म्हणवून घेण्याची आत्मशक्ती, संगीताच्या आत्म्याचाच शोध घेण्याचा ध्यास, निर्भय आणि निर्भीड स्वभाव. 'शोक' या नावाने नव्या बंदिशींना बांधणारे कुमार! कुमार सांगत असत, 'मी नेहमी काहीना काहीतरी नवीन नवीन प्रयोग करण्याच्या उद्योगात असतो. त्याशिवाय मला चैन पडत नाही.' उद्योगम् पुरुषलक्षणम् !

कुमार गंधर्व यांनी सादर केलेले विविध प्रयोग १) त्रिवेणी २) निर्गुणी भजने ३)

मालवाकी लोक धुने ४) मला उमजलेले बालगंधर्व ५) टप्पा, ठुमरी, तराणा ६) गीत बसंत ७) गीत वर्षा ८) गीत हेमंत ९) तुकाराम-एक दर्शन १०) भा. रा. तांबे-एक दर्शन ११) तुलसीदास-एक दर्शन १२) कल्याण के प्रकार १३) ऋतुराज मेहफिल

या सर्व नाविन्यपूर्ण कार्यक्रमावरून कुमारांच्या सृजनशीलतेचा आवाका किती मोठा होता हे सहज लक्षात येते. निर्गुणी भजने आणि तराणे ही त्यांची खास वैशिष्ठ्ये होती. भजनाचा तर त्यांनी सगळा बाजच बदलून टाकला. आजपर्यंत एकही गायक व नायक झालेला नाही, ज्याने इतके नवीन प्रयोग केले आणि इतक्या बंदिशी बांधल्या. कुमारजींनी १७ बंदिशी स्वतः बांधल्या. त्यापैकी ११ आहेत अगदी नवीन रागातील. १) पारंपारिक रागातील नव्या बंदिशी २) नवीन राग-नवीन बंदिशी ३) जुने राग-जोड राग-नव्या बंदिशी. विपुल नवनिर्मिती करून, लिहून नोटेशन करून, छापून पुस्तक रूपाने प्रसिद्ध केल्या. एवढं मोलाचं काम इतर कुणीही केलं नाही. नव्या बंदिशी टिकत नाहीत, गायल्या जात नाहीत. कुमारांचे यश आहे नेत्रदीपक आणि थक्क करून सोडणारे. नव्या चीजा, नव्या बंदिशी, नवा प्रत्येक राग, नव्या जोड रागाची नवी बंदिग-असंख्य मैफलीतून अनेक वेळा गाऊन त्यांनी आत्मपरीक्षण केले आणि त्यांचा श्रोत्यांवर होणारा परिणाम तपासला. श्रोत्यांच्या प्रतिक्रिया अजमावल्या. एका छोट्या आयुष्यात केलेले प्रचंड कार्य !

संगीतासारख्या विषयावर प्रकट मुलाखत देण्यास सुरूवात करणाराहा पहिलाच गायक. फर्गसन कॉलेजमधील एका सभागृहामध्ये कुमारजींनी पहिली प्रकट मुलाखत दिली-चर्चा केली-प्रश्नांची उत्तरे दिली. संगीत समीक्षक, गायक-वादक, जिज्ञासू रसिक, अभ्यासक यांनी घराण्याच्या गायन शैलीबद्दल, स्वर आणि लय यांच्या परस्पर संबंधाबद्दल, ख्याल गायकीबद्दल विचारलेल्या प्रश्नांना कुमारजींनी समाधानकारक उत्तरे दिली होती. या चर्चेच्या वेळी मी उपस्थित राहू शकलो होतो.

कर्नाटक साहित्य संघ मंदिरात सलग तीन संध्याकाळी कुमारजींनी Lectrure cum Demonstration असा कार्यक्रम केला होता. सभागृह गच्च भरले होते. अनेकांनी त्यांना संगीतातील घराणी, घराणेदार गायकी, नियमित रियाजाची आवश्यकता, संगीत शिक्षण एका गुरूकडूनच घ्यावे. अनेक गुरू करावे की नाही, घराण्याची शिस्त पाळावी की नाही, पारंपारिक बंदिशी, नव्या बंदिशी, चीजेतील शब्दोच्चार, भावाविष्कार, लयीचे महत्व, अशा कित्येक शंका विचारल्या गेल्या आणि त्या शंकांचे निरसन करीत हाते कुमारजी. या कार्यक्रमाला देखील मी उपस्थित राहू शकलो होतो.

अशाच प्रकारचा कार्यक्रम वाशी येथे संयोजित केला होता. त्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे भाग्य लाभले नाही. पण या संपूर्ण चर्चेची माहिती देणारे पुस्तक प्रकाशित झाले आहे. चर्चा करून विचारमंथन होऊ शकते हे कुमारजींनी सिद्ध करून दाखविले. चर्चा करण्याचा पायंडा पाडणारे कुमार गंधर्व.

कुमारजींना मध्यलयीचा बादशहा, लयीचा अनभिषिक्त सम्राट अशा शब्दांत मान

दिला जात असलेला ऐकून आनंद होतो. लयीचे भिन्न प्रकार दाखवून कुमारजींनी हे शब्द खरे करून दाखविले. गोविंदराव टेंबे म्हणत असत-कुमार गंधर्व हे संगीत सृष्टीतील एक फार मोठे प्रश्‍न चिन्ह आहे. अनेकांनी त्यांना संगीतातील उद्‌गारचिन्ह म्हटले आहे संगीत क्षेत्रातील एक महान चमत्कार असेही म्हणतात. संगीत क्षेत्रामध्ये कुमारजींनी केलेले अफाट आणि अचाट कार्य पाहूनच आपण विस्मयचकित होतो. ११ व्या वर्षापासून कुमार अचानक गाऊ लागले-ध्यानी मनी स्वप्नी नसतांना. असंख्य मैफलीत गायन सादर करून श्रोत्यांना तृप्त केले त्यांनी. प्रचंड नवनिर्मिती करून न थांबता त्या निर्मितीचा अविष्कार केला मैफलीमध्ये. संगीत चर्चा, विचार मंथन करण्याच्या हेतूने त्यांनी प्रकट मुलाखती देण्यास आरंभ केला, स्वतंत्र घराणे निर्माण करण्याची आत्मशक्ती असणारे कुमार गंधर्व !

कुमार गंधर्व यांचे केवळ ६८ वर्षांचें आयुष्य ! त्यांच्या जीवनातील घटनांचा वेध घेत असताना मला त्यांच्या आजारपणातील त्यांची मनस्थिती अत्यंत करूणास्पद आणि कासावीस करणारी वाटते. भानुमतीशी विवाह झाल्यानंतर त्यांना राजयक्ष्म्यासारख्या रोगाने ग्रासले. १९४७ मध्ये त्यांना या असाध्य रोगाने जर्जर करून टाकले. १९४७ पासून १९५३ पर्यंत अशी तब्बल ६ वर्षे त्यांना अंथरूणाला खिळून राहावे लागले. न्यूनगंड त्यांना कधीच नव्हता. पण या भयंकर रोगाने ते अंधःकाराच्या खोल दरीत जाऊन पडले. गाणे अशक्य झाल्याने, त्यांच्या साऱ्या आशा मालवल्या. ते आंतून उद्‌ध्वस्त झाले असणार. वैफल्याने, नैराश्याने त्यांना त्रस्त करून टाकले असणार. त्यांच्या जिवाचा तडफडाट होत असणार. काळीज कुरतडले जात असणार त्यांचे.

भानूचा आत्मयज्ञ हाच त्यांना दिसणारा एकुलता एक आशेचा प्रकाश किरण त्यांची जीवनोर्मी वाढवित असावा. त्यांची जबरदस्त इच्छाशक्ती त्यांना सतत धीर देत असावी. तीन तज्ज्ञ डॉक्टर्स दिवस रात्र त्यांच्यावर उपचार करीत होते. भानूने केलेली सेवा शुश्रूषा, डॉक्टरांचे परिश्रम आणि त्यांची स्वतःची आंतरिक शक्ती यामुळेच ते हळूहळू बरे होऊ लागले. ते पडून असतांना देखील संगीताचे चिंतन-मनन चालूच असावे. संगीताबद्दल अनेक विचार भानूकडून श्रवण करीत असणार. त्यांचे मन दिवस व रात्र गाण्यांत व्यग्र-व्यस्त असणार. पडल्या पडल्या आतल्या आत ते गुणगुणत असणार, सुरांच्या सहवासात राहण्याचा प्रयत्न करीत असणार. संगीत शास्त्राची उजळणी मनात अखंड चालू असावी नाहीतर तो एकांतवास भीषण झाला असता. चिंतन-मनन करण्याच्या या शक्तीनेच त्यांना धीर दिला, त्यांचा आत्मविश्वास शतपट केला आणि आशेचा अंधुक किरण त्यांना दिसू लागला. विचारांच्या मदतीने ते संगीत-सरोवरात खोल खोल जाऊन तळ शोधण्याचा-संगीताचा आत्मा शोधण्याचा प्रयत्न करू शकत होते. आजारी असतांना देखील त्यांना सुरांची सतत साथ होती. म्हणूनच इतरांना असह्य वाटणारा तो एकाकीपणा त्यांना सुसह्य होऊ शकला. सतत संगीताचे चिंतन-मनन करून त्यांनी त्या एकाकीपणाचाही फायदा करून घेतला. नियतीने त्यांना ६ वर्षे असं जखडून ठेवलं. पण त्यांच्या चिंतनशील वृत्तीमुळे ते आंतून स्वस्थ राहू शकले. जीवघेणी अशी व्याधी उपकारकच ठरली. अनेक लोक धुने आणि लोक गीते यांनी त्यांची करमणूक केली. त्यांतील स्वर आणि लय, शब्द आणि भाव ते कान टवकारून ऐकत होते. त्या स्वरांनी दिलेला आनंद त्यांना आतून धीर देणारा

ठरला. एक प्रकाश किरण त्यांना दिसू लागला. लोक धुनांच्या माधुर्याकडे त्यांचे लक्ष खेचले गेले. एका नवीनच संगीत-विश्वाचे दर्शन झाले. ऐकलेले सारे सूर, लय आपल्या अंतर्मनांत साठवून ठेवण्याची सवय लागली. हलकेच गुणगुण्याची सवय लागली. लोकगीते आणि लोकसंगीत हे त्यांना रागरूपांचे अजब भांडारच असल्याचा साक्षात्कार झाला. निवांत अशा अवस्थेत ते संगीताच्या गंगोत्री पर्यंत डूब मारण्यात दंग झाले असणार. त्यांच्या अंतर्मनातील संगीत वेलीला नवा कोवळा अंकूर फूटला. तो अंकूर रूजला-वाढला-फोफावला. त्यांच्या सांगीतिक उद्यानामध्ये वसंत ऋतूच फुलला. विचार मंथनातून नवीन राग सापडले, नव्या बंदिशी बांधण्याची प्रेरणा वाढीस लागली. त्यांच्या नकळत त्यांना स्वर-समृद्धीचा आत्मानंद होत गेला. गुप्तधनाचाच अजब खजीना त्यांना सापडला. वैफल्य, नैराश्य पार नाहीसे झाले. मनातला सारा अंधःकार पार निवळला. अमर्याद आनंदाने ते पुलकित झाले. सहा वर्षांचा एकांतवास, एकटेपणा, एकाकीपणा मुळीच जाणवला नाही, ही त्या भगवंताचीच कृपा. गायन शास्त्राचे तंत्र आणि मंत्र, मर्म आणि धर्म यांची पुरेपूर जाणीव आली त्यांना. कुमारजी बरे झाले.

आजारातून उठण्याच्या वेळीच त्यांना साक्षात्कार झाला. आत्मज्ञान झाले-आत्मप्रचीतीच आली, की त्यांना गाणं आलं! अत्यंत उमेदीने, उभारीने, उसळत्या उत्साहाने ते देवास येथील गायक मित्र कृष्णराव मुजुमदार यांच्या घरी येऊन पोंचले. त्यांना अभिमानाने म्हणाले, 'आपल्याला गाणं ऐकवावं या हेतून मी आलो आहे, कुमार मृत्यूच्या कराल दाढेतून सहीसलामत बाहेर आल्यामुळे त्यांचा आनंद आकाशाला भिडला होताच. आता तर कुमार गंधर्व खास गाणं ऐकवण्यासाठी आलेले पाहूनच त्यांना हर्षवायू होण्याचीच वेळ आली. कुमार गंधर्व अखंड १० दिवस गाणं ऐकवीत होते कृष्णरावांना स्वर्गीय संगीताचा ब्रह्मानंदच त्यांना मिळू लागला. कुमारजी एकदम प्रसन्न आणि चैतन्यपूर्ण होते. एके दिवशी रात्री 'भीमपलास' राग असा काही जमला की कुमारजींना स्वतःलाच परत साक्षात्कार झाला की 'मला गाणं आलं!

आत्मविश्वासाने, जबर इच्छाशक्तीच्या बळावर, अखंड चिंतन-मनन-अध्ययन करून कुमारजींनी किती मोठी मजल मारली होती. एके काळी देवधर गुरूजीच्या क्लासमध्ये शिकत असतांना, एकटेच फिरत असतांना, एका क्षणी ते रस्त्यावरच उभे राहून ओक्साबोक्सी रडू लागले, आपल्याला गाणं येत नाही म्हणून. कृष्णराव मुजुमदारांना गाणं ऐकवीत असतानांच त्यांना उमगलं की आपल्याला गाणं आलं. गाणं येत नाही म्हणून रडणारा असा एकही गायक औषधालाही मिळणार नाही. मला गाणं आलं असा आत्मविश्वास असणाराही गायक ऐकिवात नाही. महत्त्वाकांक्षा पूर्ण केल्याचाच हा जबर आत्मविश्वास!

एवढं प्रचंड कार्य करूनही कुमार गंधर्व यांना जाणीव होती, की मैं था जिसके पीछे पीछे। अब मैं उनके आगे आगे। देखा मैं आगे पीछे। दीखा सब कुछ आगे आगे। नच पार या सुरनिधीला-असंच उमजून आलं कुमार गंधर्व यांना!

❑ ❑



पं. कुमार गंधर्व, त्यांची कन्या कलापिनी, डॉ. श्रीराम पुजारी यांचे सह

त्रिवेणी - संगमावर

तीन ख्यातनाम कलावंतांच्या अंतरंगाचा वेध घेणारा हा संग्रह. रूळलेल्या वाटेवरून न जाता लेखकाने या व्यक्ती आपल्याला कशा भावल्या याचे कथन केले आहे. साहित्य-समीक्षा वगळता निराळ्या क्षेत्रातील कलावंतांच्या कलेचे मूल्यमापन करणारे मराठी साहित्य प्रमाणतः कमीच प्रसिद्ध होते. जे साहित्य उपलब्ध आहे त्यात कलावंतांच्या कलाविष्काराचे मूल्यमापन प्राधान्याने होत असते. त्याच्या समग्र चित्रण अशा लेखनातून सामान्यपणे दुर्लक्ष केले जाते. अशा लेखनातून कलावंताचे अंतरंग, त्याची जडण-घडण व त्याचा झालेला परिणाम यांची चर्चा अपवादात्मकच येते.

या संग्रहात कवी, चित्रकार, नट, नाटककार असे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले कै. वसंतराव गोडसे, ख्यातनाम गायक अमीरखाँ आणि गानयोगी कुमार गंधर्व यांची संस्मरणे शब्दांकित करताना श्री. कालिदासराव मोहोळकर या कलावंतांचे मूल्यमापन करण्याच्या खटाटोपात पडले नाहीत. या व्यक्तींचा केवळ गुणगौरव करावा अशीही भूमिका त्यांनी घेतली नाही. या कलावंतातील माणूस शोधण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. योगायोगाने या तिघांच्याही सहवासात त्यांना दीर्घकाळ वावरता आल्याने या लेखनाला एक वेगळेपण आलेले आहे. लेखनात सहजताही त्यामुळेच आली आहे. 'मी जे अनुभवले तेंच मला कथीत करावयाचे आहे' या भूमिकेतून ही तीन व्यक्तिमत्वे श्री. मोहोळकर यांनी चित्रित केली आहेत. एका परीने तो स्वतःशीच साधलेला संवाद आहे आणि निकट सहवासात आलेल्या कलावंताचे संस्मरणही.

त्या निमित्ताने केशवसुतांच्या या कवितेचे स्मरण झाले. त्रिभुवन धुंडूनही 'हरपले श्रेय' केशवसुतांना गवसले नाही. आयुष्यभर शिक्षकाचा व्यवसाय करीत असलेल्या या माणसाला मात्र कलावंतांच्या सहवासात 'हरपले श्रेय' जवळपास असल्याचा प्रत्यय आला असावा.

हॅम्लेट या नाटकात "Method in Madness' असा शब्दप्रयोग एका संवादात येतो. श्रेयाच्या शोधात असलेल्या मोहोळकरांच्या अंगी देखील एक विशिष्ट शिस्त दिसते. कलावंतांच्या सहवासात वावरताना त्यांना आत्मगौरवावर संतुष्ट होता आले असते. परंतु, मोहोळकर सहवासात आलेल्या कलावंतातला 'माणूस' सारखे शोधीत होते. अमीरखान आणि कुमार गंधर्व यांच्या कलेपेक्षा या कलावंतातील 'माणसाचे' त्यांनी घडविलेले दर्शन अधिक हृद्य वाटते. कै. गोडसे यांच्यासंबंधी त्यांनी लिहिले नसते, तर हा अष्टपैलू कलावंत अंधारातच राहिला असता.

प्रतिभावान आणि मनस्वी कलावंत तसा आत्मकेंद्रित आणि एका परीने स्वार्थी असतो. मित्र कितीही जिव्हाळ्याचा असला तरी तो आपल्या मनाच्या अंतःपुरात त्याचा प्रवेश होऊ देत नाही. अशा प्रतिभावंतांचा जिव्हाळा संपादन करणे, त्यांच्या अंतराचा वेध घेणे ही एक तपस्याच असते. आपल्या श्रेयाच्या शोधात मोहोळकरांनी या बाबतीत बरीच साधना केलेली दिसते. त्यामुळेच या प्रतिभावंतांच्या अंतरात त्यांना प्रवेश करता आला. श्री. मोहोळकर यांनी मात्र आपल्या तपस्येचे फळ केवळ स्वतःपुरते मर्यादित ठेवले नाही. 'त्रिवेणी' च्या रूपात त्यांनी ते वाचकांना उपलब्ध करून दिले आहे. श्री. मोहोळकर यांचे या कार्याबद्दल मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

श्री. मोहोळकर यांच्या हातून वाढती साहित्यसेवा घडो ही शुभेच्छा !

-डॉ. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी